
म. ग्रं. सं. ठाणे
विषय — चरित्र
सं. न ७२२

RFBK 0008909

# केशवसुत-स्मृति-ग्रंथ

मराठी ग्रंथ … स्थळप्रत.
क्रमांक २०७७५ चरित्र.
क्रमांक १०२२ ता. २३।३।५६

# केशवसुत-स्मृति-ग्रंथ

(केशवसुत–कृष्णाजी केशव दामले)

संपादक

परशराम चिंतामण दामले
बी. ए., एल्‌एल्‌. बी.
वकील, राहुरी

—पुस्तकें मिळण्याचे ठिकाण—
प. चिं. दामले, २४४ सदाशिव पेठ, पुणें २.

–१९५६–

प्रकाशक
प. चि. दामले, (वकील)
राहुरी (जि. अहमदनगर)

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रक :
श. रा. ढाते,
यशवंत छापखाना,
२००/३ सदाशिव पुणें

मराठी ग्रंथ सं... स्थळप्रत.
अनुक्रम 20829 ... 
क्रमांक 822 ... दि 13/3/56

# संपादकीय निवेदन

आधुनिक मराठी काव्याचे जनक कै. केशवसुत ऊर्फ कृष्णाजी केशव दामले हे माझे पूजनीय चुलते दि ७।११।५५ रोजीं त्याना दिवगत होऊन पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्तानें एक स्मृतिग्रथ प्रसिद्ध करावा अशी कल्पना मनात आली या प्रसगीं महाराष्ट्रांत अनेक ठिकाणी त्याच्या भक्तानी त्याचा स्मृतिदिन फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला याच वेळीं आपणहि केशव-सुताची स्मृति ताजी ठेवण्यासाठीं एखादा ग्रथ प्रसिद्ध करावा अशी कल्पना दृढ झाली कै केशवसुतानीं माझ्या बालपणी माझें पुत्रवत् पालन केलें असल्यामुळें मनात कधींहि न फिटणाऱ्या ऋणाची भावना सतत होतीच. काहीं अशी तरी त्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं ही ग्रथाची योजना मी तावडतोब हातीं घेतली समाधानाची गोष्ट अशी कीं माझ्या या सकल्पित योजनेस अनेक इष्टमित्रांनीं, हितचितकानीं व कै. केशवसुतांच्या चाहत्यानीं मनापासून पाठिंबा दिला त्यामुळें उत्साहित होऊन मी याबद्दलचें एक निवेदन केसरी, काळ वगैरे वृत्तपत्रातून प्रसिद्ध केलें. त्यास पुष्कळानीं पत्र-द्वारा साथ देऊन या उपक्रमाची प्रसशा केली महाराष्ट्रातील प्रसिद्ध अशा केशवसुताच्या भक्तांचे लेख मिळविण्याच्या उद्योगास मी लागलीच लागलों कारण पहिला सकल्प असा होता की ग्रथ कविवर्यांच्या पुण्यतिथीस म्हणजे ७-११-५५ रोजी प्रसिद्ध व्हावा

पण तसा योग नव्हता स्मृतिग्रथाविषयींचें निवेदन प्रसिद्ध झाल्यानतर माझी प्रकृति एकाएकी बिघडली सर्व व्यवसाय सोडून औषधोपचारासाठीं मला पुण्यास रहावें लागलें. ग्रथाची रूपरेखा आखणें, साहित्यिकाच्या गाठीभेटी घेणें, इत्यादि कामात साहजिकपणे दिरगाई होऊ लागली तरी-सुद्धां माझा मुलगा चि मधुकर यानें लेखकाना वारवार भेटून लेख जमा करण्याचे कार्य चिकाटीनें करण्याचें पत्करलें त्यामुळेंच हा ग्रथ थोड्या उशिरानें का होईना पण प्रसिद्ध होत आहे ग्रथ वेळेवर प्रसिद्ध न झाल्यामुळें कै केशवसुताच्या अनेक चाहत्याचा हिरमोड झाला पण ही गोष्ट माझ्या हातातील नसल्यानें ते सर्व मला क्षमा करतील अशी आशा आहे

## स्मृतिग्रंथाचें स्वरूप

या ग्रथाचें नाव स्मृतिग्रथ असले तरी यात सर्व काही स्मृतीच आल्या आहेत असें नाही केशवसुताच्या चिरतन स्मृतीसाठीं त्याच्या काव्याच्या विवेचनाचाच मुख्य भाग ग्रथात असावा अशी योजना आहे. कै केशवसुतांच्या काव्यावर आजपर्यंत अनेकानी लिहिले आहे आतां पुनः नव्याने काय सागण्यासारखे उरलें? या प्रश्नास फारसा अर्थ आहे असे नाहीं. श्रेष्ठ काव्याचे स्वरूप नित्य नूतन असें असल्यामुळें दर एक पिढीला त्याच काव्याचे सौन्दर्य वेगवेगळ्या दृष्टींतून जाणवू लागते. कै केशवसुताच्या काव्याचा अर्थ आधुनिक काळात कांही वेगळ्या पद्धतींनीं लावला जातो यांतील मर्महि हेच नाहीं काय? मराठीतील नामवत टीकाकाराचे लेख या ग्रथात समाविष्ट झालेले आहेत. कांहीं लेख पूर्वी अन्यत्र मासिकातून वा वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले होते, पण त्याचे स्थायी स्वरूप ध्यानांत घेऊनच ते या ग्रथांत घेतले आहेत, तर कांहीं लेख नव्याने या ठिकाणी प्रथमच प्रसिद्ध झालेले दिसतील कै केशवसुताच्या काव्याचें सौन्दर्य विविध दृष्टीतून कसें विलोभनीय होते याचा प्रत्यय या ग्रथावरून येईलसें वाटतें. केशवसुताच्या काव्यातील निराशा हा एक अलीकडे वादाचा प्रश्न होऊन बसला आहे त्याविषयींची प्रस्तुतच्या ग्रथातील चर्चा उद्‌बोधक व मार्गदर्शक होईलसे वाटतें. प्रा. ना के बेहेरे, प्रा बनहट्टी, यांच्यासारख्या जुन्या पिढीतील खद्या लेखकांचे व प्रा म ना. अदवत, डॉ वि म कुलकर्णी वगैरे सारख्या नव्या पिढीतील टीकाकाराचें साहय मला लाभलें म्हणूनच स्मृतिग्रथाची शोभा वाढली आहे कै केशवसुताचे बधु कै सी के दामले याचा कविवर्यांच्या काव्यावरील लेख फार महत्त्वाचा असल्यामुळें व तो कवितेच्या नव्या आवृत्तींत नसल्यामुळें या पुस्तकात मुद्दाम समाविष्ट केला आहे

या पुस्तकाचा दुसरा चरित्रविषयक भागहि तितकाच महत्त्वाचा आहे नवलाची गोष्ट अशी की कै केशवसुत याना दिवगत होऊन पन्नास वर्षेच लोटली असूनहि त्याच्या जीविताच्या समग्र विवेचनास आपण पारखे झालो आहोंत मध्ययुगीन काळांतील एखाद्या सतकवीबद्दल जशी चरित्रात्मक माहिती आपणास थोडीच मिळते त्याचप्रमाणें केशवसुताच्या समग्र

चरित्राचीं साधनेंहि आज दुर्मिळ झालीं आहेत त्याची कारणें इतरत्र याच पुस्तकात दिलीं आहेत पत्रें, दैनंदिनी, समकालिनाचे पुरावे इत्यादींच्या साहचाने त्याचें विस्तारपूर्वक चरित्र तयार होणें तूर्त तरी अशक्य दिसतें कै केशवसुत स्वतः अबोल व प्रसिद्धिपराङ्मुख होते त्यावेळीं काव्याबद्दल सामान्य लोकाना आस्था नव्हती. हा चमत्कारिक वृत्तीचा मनुष्य पुढें मोठा प्रसिद्ध कवि होणार याची कल्पना संबधित आप्तांनाहि नसावी इत्यादि अनेक कारणानी कै. केशवसुतांच्या चरित्राची साधनें नीट काळजीपूर्वक कोठें जतन करून ठेविली असतील असें वाटत नाहीं तेव्हां अशा परिस्थि-तीत त्याचेच बधु कै. सी. के दामले यानीं लिहिलेले कविवर्यांचें त्रोटक चरित्र हेच एक महत्त्वाचे ठरले तेंहि कवितेच्या नव्या आवृत्तीत सपूर्ण नसल्याने या पुस्तकात थोडयाफार फरकानें दिलेलें आहे

युगवाणी मासिकांत मी स्वतः कविवर्यांचें एक शब्दचित्र दिलें होतें तेंहि या पुस्तकात घेतलें आहे कै केशवसुत फैजपूर येथे हेडमास्तर असतांना त्याच्या हाताखालीं असणारे शिक्षक वा वा. गद्रे याचा स्मृतिविषयक लेख मुबईच्या हिंद मासिकात प्रसिद्ध झाला होता त्याचें महत्त्व विशेष असल्यामुळें तोहि या पुस्तकात समाविष्ट केलेला आहे याखेरीज आणखी काहीं कविवर्यांच्या सहवासात असणाऱ्या लोकाच्या आठवणी पुस्तकात मुद्दाम घेतलेल्या आहेत कविवर्यांच्या प्रकृति–स्वभावावर काही प्रकाश पडावा व काही गैरसमज दूर व्हावेत एवढाच त्यांत हेतु आहे

## केशवसुतांचें रेखाचित्र

एक दुर्दैवाची गोष्ट अशी कीं मराठी काव्याच्या या जनकाचें एकहि छायाचित्र उपलब्ध नाही स्वतःचा फोटो काढण्याच्या ते विरुद्धच असल्यामुळे कित्येकदा संधि येऊनहि त्याचें छायाचित्र निघू शकलें नाहीं कै केशवसुत सन १८९६ अखेरपर्यंत मुबई येथें राहात असत तेथेंच असताना त्याचा व हिंदु मिशनरी सोसायटीचे आद्य संस्थापक कै गजानन भास्कर वैद्य यांचा परिचय झाला कै गजाननरावाचे बधु श्री सुदरराव याचीहि कविवर्यांशी दृढ मैत्री जमली. श्री सुदरराव वैद्य हे मुबईचे प्रसिद्ध शिल्पकार आहेत त्यानीं आपल्या स्मृतीच्या आधारें केशवसुताचे एक चित्र रेखाटलें, तें मुबई मराठी ग्रथसग्रहालयातर्फे दि ७-११-५५ रोजी समारभ साजरा झाला त्यांत प्रदर्शनार्थ

ठेविले होतें मी जेव्हां हें चित्र पाहिलें तेव्हां माझ्याहि जुन्या आठवणी जागृत झाल्या कविवर्यांच्या मूर्तीचा एक अस्पष्ट ठसा मनावर होता त्यास उजळा मिळाला व श्री. सुंदरराव वैद्य यानीं तयार केलेल्या या चित्रांत काही सुधारणा व्हाव्यात असें वाटलें. इतर कांही जुन्या पिढीतील लोकाचाहि हाच अभिप्राय पडल्यामुळे आम्ही त्या सूचना श्री वैद्य याना केल्या त्यानी त्या आनदानें मान्य करून त्याप्रमाणे चित्रात सुधारणा केल्या आणि त्याच्याच कौशल्यानें परिपूर्ण झालेलें रेखाचित्र आज या पुस्तकात प्रसिद्ध होत आहे. अर्थात् हें काही केशवसुताचें छायाचित्र नाहीं स्मृतीना जागवून कल्पनेच्या साहचानें आकारास आलेल्या या चित्राचें त्या दृष्टीनें आकलन करावयास पाहिजे. कै केशवसुत यांचे समकालीन श्री करंदीकर (हल्ली वय ८४) याना मी हें चित्र दाखविलें तेव्हा त्यानी उद्गार काढले. मला फार आनद झाला. प्रत्यक्ष केशवसुत समोर आहेत असें वाटतें " केशवसुतांच्या भावडापैकी एकटीच हयात असलेली धाकटी बहीण ती ग. भा. लक्ष्मीबाई दाडेकर (वय ८२) हिलाहि हें रेखाचित्र दाखविण्यात आलें तिनेहि तोच अभिप्राय व्यक्त केला. तेव्हा हा दुर्मुखलेला कवि 'होता कसा आननी?' हें जाणून घेण्याची अनेकाची इच्छा होती ती अल्पाशानें का होईना, पण पूर्ण होईल असे वाटतें हा योग जुळवून आणण्यास मदत करणारे श्री सुदरराव वैद्य याचे आभार मानावेत तेवढे थोडेच होतील

## कै केशवसुतांचे बंधु

कै केशवसुतांच्या स्वरूपाची जाणीव होण्यासाठीं आणखी एक साधन आहे तें म्हणजे त्याच्या तीन बधूचीं उपलब्ध असलेलीं छायाचित्रें होत अर्थात भावासारखा भाऊ असतोच असें नाहीं हें खरें असलें तरी ढोबळ रूपरेखा ध्यानात येण्यास मदत होईल म्हणून त्यांच्या तीनही बधूचीं छायाचित्रे मुद्दाम या पुस्तकांत दिली आहेत माझे वडील कै चिंतामण ऊर्फ चिंतोपत हे केशवसुताचे थोरले बधु व त्याच्या पाठचे केशवसुत या दोघांच्या चेहऱ्यात बरेंच साम्य होतें अर्थात् चिंतोपताचा फोटो उतारवयातील आहे व केशवसुतांचे चित्र स्मरणावरून काढलें असून ते त्याच्या तारुण्यातील आहे हें ध्यानांत ठेवूनच दोघाच्या चेहऱ्यातील साम्य निरखावयाचें आहे केशवसुताचे सर्वांत मोठे बधु म्हणजे कै श्रीधर केशव दामले हे होत ते चागले

विद्वान् असून जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर होते. ते मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजचे फेलो असून काहीं काळ तेथें प्रोफेसरहि होते नंतर ते बडोदें येथील कॉलेजांत प्राध्यापक होते. पण त्यांना आयुष्य फार थोडें लाभलें आणि त्यांचें छायाचित्रही उपलब्ध नाही केशवसुतांच्या पाठचे धाकटे बंधु मराठीचे प्रसिद्ध व्याकरणकार कै. मोरो केशव दामले हे होत यांचा जन्म सन १८६८ मध्यें रत्नागिरी जिल्ह्यात मालगुंड येथे झाला. त्यांचें इंग्रजी शिक्षण प्रारंभीं वडील बंधु कै श्री के दामले यांचेकडे झालें. मॅट्रिक झाल्यावर डेक्कन कॉलेजांतून ते एम् ए झाले. एम् ए परीक्षेचा निकाल जाहीर होण्याचे आधीच सन १८९४ मध्यें उज्जैन येथील माधव कॉलेजांत ते प्राध्यापक म्हणून नियुक्त झाले त्यानंतर नागपूर येथें त्यांचें काही काळ वास्तव्य होतें. सन १९१३ साली रेल्वेच्या अपघातात त्यांचें व त्यांच्या पत्नीचें शोचनीय निधन झाले. प्रसिद्ध व्याकरणकार व न्यायशास्त्रज्ञ म्हणून त्यांचा लौकिक मोठाच होता. त्यांचेहि छायाचित्र या पुस्तकात आहेच


केशवसुतांचे सर्वांत धाकटे बंधु सीताराम केशव दामले हे होत सन १८७८ मध्ये यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यात खेड येथे झाला मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून हे बी ए. झाले व तेथेच त्यांची फेलो म्हणून नेमणूक झाली. यांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व असामान्य होतें एल्‌एल् बी चा अभ्यास संपविल्यानंतर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्येंहि काहीं काळ प्राध्यापकाचें काम केलें. पण वृत्तपत्राचा व्यवसाय हेच त्यांचे मुख्य जीवितकार्य होतें ज्ञानप्रकाश, मराठा, राष्ट्रमत, राजकारण इत्यादि वृत्तपत्रांचेही ते संपादक होते त्यांच्या राजकीय विचारांची धारहि सर्वांना परिचयाची आहे काही कादंबऱ्या, महात्मा गांधी, कार्लाईल, यांची चरित्रें इत्यादि यांची साहित्यसेवा मराठीत वैशिष्ट्यपूर्ण अशीच आहे 'मार्गण' या नांवानें त्यांची बरीच कविता प्रसिद्ध झालेली होती

केशवसुतांच्या बंधूंची त्रोटक माहिती येथें नमूद केली आहे तिचा हेतु स्पष्ट आहे सर्व बंधूंच्या मध्ये एकमेकांबद्दल प्रीति वसत होती श्रीधरपंत, केशवसुत व मोरोपंत, हे तीनहि बंधु अल्पवयातच दिवंगत झाल्यामुळें माझे वडील कै. चिंतोपंत यांच्यावर मोठाच भार पडला त्यांच्या मनास धक्काहि कमालीचा बसला 'माझे सर्व बंधू गेले, मीच तेवढा मागें काय म्हणून उरलो ?' असें ते वारंवार म्हणत असल्याचे मला स्मरते

केशवसुताना पुत्रसतान नव्हतें. त्याच्या सर्व मुली दिगवत झाल्या आहेत त्याच्या तीन मुलीपैकी सर्वांत धाकटी मुलगी अगदीं लहान वयात वारली सर्वांत मोठी मुलगी मनोरमा हिला मूलबाळ नव्हतें मधली वत्सला सुमारें दोन वर्षापूर्वी दिगवत झाली तिला दोन मुलें. एक विनायक विठ्ठल फाटक, हे सध्या कल्याण येथे रहातात दुसरे चिरजीव अनत हे कोकणात घरींच शेती पहातात

## केशवसुतांचें घराणें

केशवसुताच्या घराण्याची वशावळ माहितीसाठीं खाली देत आहे




टीप : वरील वशावळींत हयात व्यक्तींचीं नावें जाड ठशात दिलीआहेत

## आभार आणि धन्यवाद

या पुस्तकाच्या बाबतींत ज्याचे मला साहाय्य झालें त्यांचे आभार मानल्या शिवाय हे निवेदन पुरें होऊच शकत नाही या पुस्तकात माझें स्वतःचे लेखन फारसें नाही आणि म्हणून हें पुस्तक तयार झाले त्याचें सर्व श्रेय मुख्यतः निरनिराळ्या विषयावर लेख लिहिणाऱ्या लेखकांकडेच जातें हें सागणें नकोच त्याच्या मदतीशिवाय हें पुस्तक अस्तित्वात येऊ शकलें नसतें आणि म्हणून त्याचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत स्मृतिग्रथाची कल्पना मूर्तस्वरूपात आणण्याचें अवघड काम माझे जामात डॉ ध न जोशी, एम् ए, पीएच्. डी यानी मोठ्या आनदानें केलें, त्याबद्दल मी त्याचे आभार मानणें त्याना पसत पडणार नाहीं, म्हणून मी त्याचें फक्त या ठिकाणी अभिनदन करतों यशवत प्रेसचे मालक व काळ पत्राचे विद्वान् सपादक माझे मित्र श्री मामासाहेब दाते यानी आपुलकीनें वेळोवेळीं पुस्तकाच्या बाबतींत उपयुक्त सूचना केल्या व पुस्तक छपाईचें कामहि उत्तम तऱ्हेने केले त्याबद्दल मी त्याचा फार आभारी आहे. पुस्तकाचें वेष्टण आकर्षक करून दिल्याबद्दल साधना प्रेसचे श्री चि ग. वझे याचेही मी आभार मानतों त्याचप्रमाणें चित्रशाळेचे श्री वसतराव देवकुळे यांनी स्वत लक्ष घालून आम्हाला पुस्तकातील ठसे उत्तम करून दिल्या- बद्दल त्याचे आभार मानतों. या ग्रथाच्या शेवटी केशवसुताच्या वाङमया- सबधीची अभ्यासकासाठी जी सूची जोडली आहे ती करून देण्याचे काम श्री गो रा. पराजपे यानी केलें म्हणून मी त्याचा आभारी आहें

मनात योजिलेलें कार्य थोडें उशिरा का होईना पण आज पूर्ण होत आहे आणि माझे परमपूजनीय चुलते व दामले घराण्याचे 'कुलदीपक' म्हणून मान्यता पावलेले आधुनिक कवितेचे जनक कविवर्य केशवसुत याची थोडी- फार सेवा या निमित्तानें माझ्या हातून घडली म्हणून मला अतिशय आनद होत आहे, तो शब्दानी वर्णन करणें केवळ अशक्य आहे।

पुणे, दि १।८।५६

सर्वांचा नम्र,

**प चिं दामले**

# अनुक्रमणिका


१ आधुनिक मराठी काव्याची गंगोत्री —प्रा ना. के. बेहरे १
२ केशवसुत कसचे मेले . . ? —प्रा वि. मा दी.पटवर्धन १३
३ केशवसुतांची प्रतिभा —प्रा श के कानेटकर ३०
४ केशवसुतांची स्वर्ग-समक्षतेची कल्पना—प्रा दि के बेडेकर ३७
५ सौंदर्यवादाचे प्रणेते केशवसुत —प्रा श्री. के क्षीरसागर ४२
६ द्रष्टे कवि केशवसुत —प्रा श्री ना बनहट्टी ५३
७ केशवसुताचे व्यक्तिमत्त्व —श्री शरच्चंद्र मुक्तिबोध ६९
८ माझे गुरु केशवसुत —श्री धों. वा गद्रे (काव्य विहारी) ८०
९. केशवसुत कल्पित कथांचे निर्माते —श्री. वा ना देशपांडे ९७
१० केशवसुत आणि निसर्ग : कांही विचार—डॉ वि म कुलकर्णी १०५
११ केशवसुताच्या काव्यातील विसंगति —प्रा म वा धोंड ११३
१२ केशवसुताच्या कवितेतील निराशा —प्रा भ श्री पंडित १२०
१३. केशवसुताचे क्रांतिकारकत्व —प्रा म. ना अदवंत १४८
१४ केशवसुत—काव्यदर्शन —श्री सी के. दामले १६०
१५ केशवसुतांच्या कवितांतील उपमानसृष्टि —प्रा अ ना देशपांडे १८३
१६ हृद्गत —डॉ रा प्र पारनेरकर १९५
१७ केशवसुतांचें त्रोटक चरित्र —कै सी के दामले २०१
१८ केशवसुत कांहीं स्मृति —श्री. प चिं. दामले २१९
१९ केशवसुताच्या सहवासांतील तीन वर्षें —कै वा वा गद्रे २२७
२० आमचे मराठीचे शिक्षक कवि केशवसुत —श्री द. वें केतकर २३८
२१ मास्तर भ्रमिष्ट आहेत झाले ! —कै डॉ भि गु चिक्केरूर २४१
२२ मी नरस कविता पुन्हा लिहीन —श्री वि. श्री. करंदीकर २४३
२३ कविवर्य केशवसुतांचे एक पत्र —केशवसुत २४४
२४ केशवसुतविषयक वाङ्मयसूचि —श्री गो. रा. परांजपे २४७



कै. कृष्णाजी केशव दामले ऊर्फ कवि केशवसुत

हें चित्र श्री सुंदरराव वैद्य यांनीं स्मरणानें काढलें आहे

जन्म :— सन १८६६ मृत्यु .— सन १९०५



चिंतो केशव दामले
जन्म — सन १८६८
मृत्यु — सन १९३



मोरो केशव दामले
जन्म — सन १८६८
मृत्यु :— १९१



सीताराम केशव दामले
जन्म :— सन १८७८
मृत्यु :— १९२७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थळप्रत.
अनुक्रमांक २०४२९ दि. ...
क्रमांक ... नों. दि. ...

श्री ना के बेहेरे, नागपूर

# १ : आधुनिक मराठी काव्याची गंगोत्री

केशवसुताच्या मृत्यूला आज पन्नास वर्षे लोटलीं असलीं तरी त्याचा जन्मशताब्दि साजरा करावयास अजून दहा वर्षांचा काल आहे यावरून त्याची या जगातील यात्रा किती लवकर सपली याची सहज कल्पना करता येईल जन्मत परिस्थिति साधारण बरी असली तरी मिळवत्या बधूच्या अकाली मृत्यूमुळें लहानपणी विद्यार्जनासाठीं इतस्ततः भटकणे त्याना भाग पडलें त्यामुळें त्याचें पद्धतशीर शिक्षण पार पडू शकलें नाही आणि मॅट्रिक व्हावयास १८९० साल उजाडावे लागले पण शाळेंत शिकणाऱ्या या कृष्णाच्या हृदयात मुरलीचें वादन फार दिवसापासून सुरू झालें होतें, आणि त्याच्या हृदयात उमटलेले स्फूर्तीचे पडसाद अधून मधून शब्दरूपें धारण करीत होते. पुढें शिक्षण होऊनही ससाररथाचा गाडा ओढावयास सुरुवात झाल्यानतरही बाह्य परिस्थितीचे चटके त्याना जाणवत होते. त्याचे मन कवितेच्या नादात गुगलें असल्यामुळे बाह्य जगाविषयी त्याची वृत्ति बेफिकीर होती [ईश्वराचें देणें लाभलेला कोणताही महापुरुष परिस्थितीपुढें वाकत नाहीं तो काटचाकुटचातूनच आपली वाट शोधून काढतो] त्याप्रमाणें लोकानी त्याच्या गुणाची त्याच्या हयातीत फारशी कदर केली नसली तरी "कालो ह्यय निरवधिर्विपुला च पृथ्वी ।।" या वचनावर विसबून त्यानी कवितादेवीच्या उपासनेंत तिळमात्रही फरक पडू दिला नाही जगाच्या दृष्टीनें फारसा न शिकलेला, परतु अत्यत प्रतिभाशाली असा पुरुष स्वभावतःच मानिधन असतो.

ग्रंथ संग्रहालय ठाणे

त्यामुळें कायम स्वरूपाची नोकरीही त्याना लाभली नाहीं व लाभली तरी टिकू शकली नाहीं

[केशवसुताची पहिली उपलब्ध असलेली कविता नोव्हेंबर १८८५ मध्यें स्फुरलेली आहे आणि 'हरपलें श्रेय' ही कविता चिपळूण येथे २५ मे १९०५ रोजीं लिहिली गेली आहे म्हणजे त्याच्या सर्व कविताचा प्रपच वीस वर्षांचे आतच आटोपलेला आहे ] त्याच्या काळीं प्रसिद्धीला फारशी साधनें उपलब्ध नव्हतीं. आणि जी थोडीबहुत साधनें उपलब्ध होतीं त्याच्या सपादकाना पडित कवीचीच कविता पसत पडत असे ["केशवसुताची कविता" त्याच्या पूर्वीच्या मराठी कवीहून अगदी निराळ्या प्रकारची, निराळ्या भावाची आणि निराळ्या वृत्तीची आहे कारण कविता निर्माण करावी हें केशवसुताचें ध्येय नव्हतें त्याच्या मनावर जे संस्कार बालपणी घडून आले आणि जी खळबळ माजली त्याचा भावनोद्रेक म्हणजे त्याचे काव्य होय पुण्याला न्यू इंग्लिश स्कूल-मध्यें शिकत असताना लो टिळक व प्रि आगरकर या दोन महापुरुषाशीं त्याचा सबध आला आणि त्यामुळें आपल्या देशातील लोकांची राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक बाबतीत किती दुर्दशा झाली आहे हें त्याच्या प्रत्ययास आलें धर्मापेक्षा रूढींना समाजात अधिक मान होता अन्याय व लोभ याचे समाजात ताडव नृत्य चालू होतें] त्यामुळे लोकाची दुर्दशा कशी दूर करता येईल याचा त्याना लहानपणापासून ध्यास लागला समाजाचा उद्धार होऊन त्याचें पाऊल योग्य मार्गानें पुढें पडलें पाहिजे असें त्याना वाटू लागले. \समाजोद्धाराच्या या आतरिक तळमळीतूनच त्याचें काव्य निर्माण झालेलें आहे \

प्राचीन मराठी कवी आणि त्याचें काव्य याचा जर आपण आढावा घेतला तर त्याचे दोन ठळक वर्ग पाडता येतात मोरोपत किंवा वामन पडित या थोर मराठी कवींनीं भूषविलेलें पडिती काव्य आणि नामदेव, तुकाराम याच्या हातून लोककल्याणाच्या आणि लोकोद्धाराच्या तळमळीनें निर्माण झालेलें अभग काव्य

पहिल्या वर्गांतील कवींना आपण पंडित कवि म्हणतों आणि दुसऱ्या वर्गातील कवींना संत असें नांव देतों. पंडित कवींच्या काव्यांत भक्तीचा लवलेशही सांपडणार नाहीं आणि संत कवींच्या काव्यांत पांडित्याचा आढळ राहणार नाहीं असें मात्र नाहीं. स्थूलमानानें हे दोन ठळक भेद दर्शविलेले आहेत. [मराठी राज्य नाहीसें होऊन इंग्रजी सत्तेची महाराष्ट्रांत प्राणप्रतिष्ठा झाल्यापासून विष्णुशास्त्री चिपळूणकर, परशरामपंत गोडबोले, किंवा गंगाधरराव मोगरे हे अर्वाचीन कालांतील म्हणजे आधुनिक मराठी काव्यखंडातील पंडित कवि होत. प्राचीन पंडित कवींच्या नमुन्याबरहुकूम यांच्या काव्याची रचना झाली आहे. त्यांत रचनासौंदर्य आहे, शब्द-सौष्ठव आहे, कल्पनाविलास आहे आणि अलंकारही आहेत. पण भावनेला त्यांत फारसें स्थान नाहीं. केशवसुताच्या काव्याचा ढंग अगदी निराळा आहे. त्यांत भावनेला प्राधान्य, मुख्यतः त्यांत आंतरिक तळमळ आहे, जिव्हाळा आहे आणि उद्धाराची ऊर्मि आहे. केशव-सुताचें वर्गीकरण म्हणूनच जुन्या संत कवींच्या परंपरेंत करावें लागेल. पूर्वी मोक्ष हें ध्येय आणि भक्ति हें साधन संत कवींनीं आपल्यापुढें ठेवलें होतें. लोकांचा उद्धार व्हावा, त्यांची सेवा आपल्या हातून व्हावी ही त्यांनाही तळमळ होती. केशवसुताच्या काळीं स्वर्ग व मोक्ष हें ध्येय मागें पडून जगांतील इतर लोकां-प्रमाणें आपल्यालाही स्वातंत्र्य लाभावें, आपल्या समाजांत धर्माच्या नांवाखालीं रूढींचें चाललेलें थैमान बंद पडावें, खऱ्याखुऱ्या बंधु-भावाची आणि समतेची घडी समाजांत बसावी, वेदान्ताला आलेलें दुबळें व आळशी स्वरूप जाऊन माणसाचा पराक्रम जागृत व्हावा अशी नवीं ध्येयस्वप्नें त्यांच्या डोळ्यासमोर तळपूं लागलीं आणि त्या आपल्या स्वप्नांना त्यांनीं वाचा फोडलेली आहे.

केशवसुताची जीविताविषयींची कल्पना तें निःसार किंवा माया-मय आहे अशी नाहीं. जीवन हें खरें आहे, व आनंदमय आहे, "ब्रह्म सत्य जगत् सत्यम्" हाच त्यांचा सिद्धान्त होता.]

"नाहीं स्वप्न न भास वा बुडबुडा, जीवित्व साचें असे !
प्रेमानें परमेश्वरास भजतो जो निर्मळें मानसे !
लोटी निर्मल सौख्यसिंधुलहरी त्याचेवरी जीवित,
तो आनंदनिधानशैलशिखरी क्रीडा करी सन्तत !"

मनुष्य आपल्या कर्मानें व कर्तबगारीनें नराचा नारायण होऊ शकेल या पृथ्वीवरच स्वर्ग निर्माण करण्याचे सामर्थ्य माणसात अंतर्भूत झालेलें आहे त्याला स्वसामर्थ्याची जाणीव मात्र व्हावयास हवी त्याच्या अनेक कवितात या स्वर्भूसंगमाचे चित्र रेखाटलेलें आहे रांगोळी घालताना पाहून त्यानीं असें म्हटले आहे

" स्वर्भूसंग असा तयात इतक्या अल्पावकाशीं नसे
कोणी दाखविला अजून सुभगे ! जो साधिला तू असे "

मनुष्याच्या कर्तबगारीवर आणि त्याच्या हृदयातील सुप्त देवपणावर त्याचा पूर्ण विश्वास असल्यामुळें त्याच्या हातून "आम्ही कोण?" ही अपूर्व कविता निर्माण झाली आहे यात अहंभाव नाहीं, आत्मविश्वास आहे यात गर्व नाही, पण स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव आहे देवाना देखील आम्हींच निर्माण केले आहे. दिक्कालातून देखील आरपार आमची दृष्टि पाहू शकते आम्हीच या पृथ्वीला स्वर्गाचें स्वरूप प्राप्त करून देतों आमच्या करस्पर्शानें वस्तुमात्रात सौंदर्य निर्माण होतें भक्त जर नसले तर ज्याप्रमाणे देवळाला व देवाला कोणीही विचारणार नाहीं, त्याप्रमाणेंच या महाकवी वगैरेंना तर सूर्य,चंद्र, व तारा निष्प्रभ वाटतील आणि स्वर्ग, मृत्यु, पाताळ या तिन्ही लोकात शून्यतेची व अज्ञानांधकाराची पोकळी निर्माण होईल त्याचा आत्मविश्वास आणि त्याची स्फूर्ति इतकी उज्ज्वल होती की त्यानीं वर्तविलेलें भविष्य त्याच्या मृत्यूनंतर पंचवीस वर्षांच्या आतच महाराष्ट्र रसिकांच्या प्रत्ययास आलें

"माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या, चालावयाचा पुढे
आहे सुन्दर तो सदा सरसवाङ्‌निष्यन्द चोहींकडे !
तुम्ही नाहि तरी सुतादि तुमचे घालील तो प्राशुनी !
कोणीही पुसणार नाहि, "कवि तो होता कसा आननीं ?"

आणि खरोखरच असा चमत्कार झाला केशवसुताच्या हयातींत केवळ चार दोनच रसिक मित्र त्याना मिळाले होते. इतरत्र त्याची अवहेलनाच होत होती पण आज ते अर्वाचीन मराठी कवीचे आद्य शंकराचार्य मानले जातात त्यातल्या त्यांत समाधानाची गोष्ट ही कीं, प्रो वासुदेव बळवंत पटवर्धन, हरि नारायण आपटे, नारायण वामन टिळक आणि विनायक जनार्दन करंदीकर या त्याच्या चार रसिक मित्राची योग्यता तत्कालीन चार हजार मराठी वाचकापेक्षा खात्रीनें अधिक ठरेल.

केशवसुताची कल्पनाशक्ति अमर्याद होती तिची व्यापकता आणि विशाल दृष्टि मनाला स्तंभित करते ईश्वराचा ग्रंथ, सृष्टि-[illegible]

तत्त्व आणि दिव्य दृष्टि, [illegible], शब्दांनो मागुते या, क्षणात नाहींसे कल्पकता, रूढि–सृष्टी–कली, होणारे दिव्य भास, हीं त्याच्या महामनस्कतेचीं उदाहरणें म्हणून देता येतील त्याची दृष्टि खरोखरच दिक्कालातीत होती "जें न देखे रवी, तें देखे कवी" या दिव्य दूर दृष्टीचीं उदाहरणें म्हणून "अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न" "जगामधि या तुला कशाला परमेशें धाडिले" आणि "मजुरावर उपासमारीची पाळी" हीं उदाहरणें देतां येतील मुलास झोडपणाऱ्या एका पतोजीचा धिक्कार करून त्यानीं नव्या शिक्षणपद्धतीची मुहूर्तमेढ रोवली 'गोफण केली छान' ही जोरदार कविता समर्थ रामदासाच्या 'यत्न तो देव जाणावा' या प्रशस्तीची आठवण करून देते त्याची 'घुबड' ही कविता मूळ आधारभूत 'रेव्हन' या इंग्रजी कवितेपेक्षा उत्तम साधली आहे. आणि 'घडयाळ' ही कविता Longfellow च्या 'Grand Father Taught' या कवितेला खरोखरच लाजविते

"लवाजम्याचे हत्ती झुलती
लक्ष त्याकडे देतो कोण,
मित रव जर हे सावध करिती –
'आला क्षण–गेला क्षण!'

'मर्त्य जगाच्या व्यवहाराच्या पातळीवर' या कविता अप्रतिम साधल्या आहेत त्यातील ध्वनि आणि प्रसाद मनोवेधक आहेत कोणीकडून कोणीकडे, हरपलें श्रेय, झपूर्झा, म्हातारी, आणि सतारीचे बोल, या वाचकाला तत्त्वचिंतनपर उच्च व पवित्र वातावरणात विहार करावयास लावणाऱ्या कविताची थोरवी मग किती वर्णन करावी ? शब्दसंगीत, भावना, आणि उदात्त कल्पना या दृष्टीनें पाहिलें असता 'सतारीचे बोल' अशी सर्वांगसुंदर कविता पाश्चात्य वाङ्मयात देखील क्वचितच सापडू शकेल भारताची नवी मांडणी करू पहाणाऱ्या तुतारी व नवा शिपाई यातील चैतन्य सतत खळाळत आहे.

केशवसुताच्या भोवती भयाण परिस्थितीचा काळोख पसरला असताही त्याचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन प्रेमळ, सहृदय व आशावादी होता त्याच्यातील महाकवि शोकानें भावावणारा व रडणारा नव्हता तो

"आशा, प्रेम तसेंच वीर्य कवनी तो आपल्या गाइल,
गेले वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल"

प्रेताना देखील जिवत करण्याचे सामर्थ्य त्याच्या वाणीत साठवलें होतें आणि हातीं नवकाव्याचे निशाण धरून त्यानी महाराष्ट्रातील जीवन्मृताना युद्धोत्सुक बनविण्याचा प्रयत्न केला कवींच्या सामर्थ्यावर लोकाचा विश्वास वसत नसला तरी देखील त्यानीं

"द्या उत्तेजन हो कवीस, न करा गाणें तयाचें मुके,
गाण्यानें श्रम वाटतात हलके, हेंही नसे थोडकें"

नामदेव तुकाराम यानी पांडुरंगाची कधीं आळवणी केली, कधी त्याची स्तुति केली, कधी त्याच्या चरणावर मस्तक नम्र केलें, तर कधीं त्याच्यावर रुसवा काढला लहान मूल प्रसंगोपात्त आपल्या आईवर रागावलें तरी त्याचे मातृप्रेम निरपवाद असतें लहान मुलाचा आईवरील रुसवा हा प्रेमाचाच एक प्रकार आहे केशवसुत प्रतिभा किंवा कविताशक्ति हिला देवाची जननी मानीत असत कारण कवीच्या प्रतिभेमुळेंच देवाची निर्मिति झाली. आणि स्वर्ग अस्तित्वात

आला वाल्मीकि व व्यास हेच रामकृष्ण परपरेचे सस्थापक होत या प्रतिभेला उद्देशून स्फूर्ति, फिर्याद आणि थकलेल्या भटकणाराचे गाणें या अत्यत सुदर कविता त्यानी लिहिल्या आहेत या तिसऱ्या कवितेंतील गोडी अवीट आहे तिच्या शब्दांशब्दातून नादमाधुर्य व भावरस ठिपकत आहे त्याच्या सर्वच कवितात सौंदर्याचा आविष्कार आहे त्या सौदर्याचें स्वरूप भिन्न असले तरी त्या भिन्नतेंत मनोहर एकतानता आहे पुष्प सुदर, जवाहर सुदर, तारका सुदर कीं बालक सुदर ? सिंहाची भव्यता, हरिणाची निरागसता कीं भृगाची चचलता अधिक मनोरम? मनोहारिणी ही तर सौंदर्याची मूस आहे पण ह्या सौदर्याला सत्याचा आधार आहे त्यात गुलाबाच्या फुलाचा सुवास आहे नैर्ऋत्येकडच्या वाऱ्यानें सुखस्पर्शी शीतलत्व आहे सूर्याचे ओज आहे, चद्राचें रम्य दर्शन आहे, तारकाचें नर्तन आहे व वृक्षवेलीचा सुदर आदर्श ससार आहे हीरकाला सुवर्णाचें कोंदण जडलेलें आहे त्या सौंदर्याला पावित्र्याचे प्रावरण आहे वृक्षवेलींच्या ससारात पुष्पें फळे अतर्भून झाली आहेत रविकिरणाचे शुभ्र हास्य जगाला उजळा देत आहे गगा पापाचा नाश करते व चद्र ताप हरण करतो कर्णाच्या औदार्यानें दैन्य दूर पळतें, अमृतामुळें व्याधीचा व मृत्यूचा लोप होतो सत्य शिव सुदर हीच काव्याची एकमेव व्याख्या! बारा तेरा वर्षे वयाच्या एका शातपणें निजलेल्या निरागस सुदर कुमारिकेस पाहून केशवसुताच्या हृदयांतील वात्सल्य पाझरतें आणि तिची एक गोड पापी घेण्याचा त्याना मोह पडतो पण तिच्या पवित्र कौमार्यावर लोकापवादाचा निष्कारण देखील शितोडा उडू नये म्हणून मोठ्या ऋषीमुनींच्या अगी शोभणाऱ्या सयमानें ते आपलें मन आवरतात यौवनानें उत्फुल्ल झालेल्या एका कामिनीच्या सौंदर्याचा प्रभाव पडून त्याचे नेत्र व चित्त दिपू लागताच त्यापेक्षा मरण ओढवेल तर बरें असे त्याना वाटू लागतें आणि देहाचा अध.पात होऊ देण्याऐवजी पिशाचयोनींत प्रवेश करावयास ते तयार होतात. [मोह प्रत्येकाला पडतो, पण मनोविजय मात्र एखाद्यालाच साधतो हाच 'हजारांतून

एखादा महापुरुष म्हणून जगात प्रसिद्धि पावतो त्यालाच युग-प्रवर्तक म्हणतात तोच महात्मा म्हणून ओळखला जातो।

केशवसुताच्या काव्यसंग्रहात सृष्टि-सौंदर्यविषयक पुष्कळ कविता आहेत परंतु त्यापैकीं फारच थोड्यात सृष्टिसौंदर्याचें शुद्ध स्वरूप व यथातथ्य वर्णन आढळतें सृष्टिसौंदर्यदर्शनानें त्याच्या भावनाचे व मनोवृत्तीचे जे आंदोलन होतें त्या संघर्षाचेंच प्रतिबिंब त्या कवितात पहावयास सापडतें त्याची वैयक्तिक आत्मवादी Pragmatic दृष्टि जशी त्या वेळीं असेल तशी त्याना सृष्टि भासते व दिसते तें पूर्ण व शुद्ध सत्य नव्हे तें एकांगी वर्णन व अंशसत्य होय सहा अंधळ्यानीं हातानी चाचपून हत्तीचें खरें स्वरूप ओळखण्याचा प्रयत्न करावा त्यातलाच हा प्रकार होय ज्यानें हत्तीचा पाय चाचपला तो म्हणाला, हत्ती खांबासारखा आहे ज्यानें कान चाच-पला त्याला हत्ती सुपासारखा वाटला ज्यानें शेपूट धरलें त्याला तो सर्प भासला, ज्यानें हत्तीच्या पाठीला हात लावला त्याला ती किल्लेकोटाची प्रचंड भिंत वाटली ह्या वर्णनात व स्वरूपनिर्णयात प्रामाणिकपणा भरपूर असला तरी त्यात सत्याचा अंतर्भाव अंशमात्र आहे फुलपांखरू किंवा फुलाची पखरण अशा शुद्ध सृष्टि-सौंदर्यवर्णनपर काही कविता अपवादात्मकच ठरतील पण सृष्टि-वर्णनाच्या सदरातील इतर कवितांना त्याच्या व्यक्तिविकारी एकांगी दृष्टीची बाधा झाली असली तरी त्यामुळें त्याचे सौंदर्य कमी न होतां उलट वाढलेच आहे लैला जगाला कशी दिसते हा प्रश्न महत्त्वाचा नसून ती मजनूला कशी दिसली त्यात तिचे सौंदर्य साठलेलें आहे।दोन्ही डोळ्यानीं पाहण्यापेक्षा केवळ डाव्या डोळ्याची नजरफेक करताच शृंगाराला ओहोटी न लागता भरती येते। या न्यायालाच अनुसरून केशवसुताच्या भृंग, पुष्पाप्रत सन्ध्याकाळ, फुलातले गुण, सृष्टि आणि कवी, दिवस आणि रात्र या कवितांचें सौन्दर्य अनेक पटींनीं वृद्धिंगत झाले आहे भृंगातील कांहीं कांहीं ओळी जणू बालकवीनीच लिहिल्या आहेत असा भास होतो

तुझ्यामागें वाटे यावे
गोड फुलें चुंबित रावें
"भृंगा ! आणि तुझें गान
सृष्टीचें गमते कवन !
गा ! तू गा ! नादी भ्रमरा !
मी गणमात्रा जुळणारा !"

याच तऱ्हेची नादमधुरता आणि अर्थविपुलता खालील दोन ओळीतही उत्कटतेनें प्रत्ययास येईल

" प्रीति, चारुता, आनन्द
याचे गा मधुरच्छन्द "

केशवसुताच्या संसारी कविता पवित्र भावनांनी नटलेल्या आहेत अपरकविता दैवत अशा एखाद्या कवितेंत किंचित् उच्छृंखलता डोकावत असली तरी ती देवाधर्माला सहमत अशीच आहे

'एक खेडें' व 'गोष्टी घराकडिल मी वदतों गड्या रे!' या दोन ग्रामीण जीवनाच्या कविता या संग्रहात उठून दिसतात सरळ—साधें निसर्गाचे वर्णन आणि धावता शब्दप्रवाह यामुळें त्या वस्तूच्या प्रतिकृति नजरेसमोर मूर्तिमंत उभ्या ठाकतात शब्दामध्यें चित्रणाचें विलक्षण सामर्थ्य साठविलेलें आहे या दोन्ही कवितात भरपूर नाद-माधुर्य आहे. आणि दोन्हीही वर्णनें बारीक सारीक तपशिलासह परंतु इतक्या हळूवार भावनानी रंगविलेली आहेत की, त्या शब्दचित्रानीं माणूस सहजगत्या मोहून जातो. या कविताच्या तोडीस तोड कविता वर्डस्वर्थच्या समग्र संग्रहात क्वचितच सापडतील

केशवसुताच्या कवितेबद्दल सर्वत्र जरी प्रशंसापर उद्गार ऐकू येतात तरी त्यातील शब्द पुष्कळ वेळा खडबडीत असतात असा दोषारोप करण्यात येतो 'खिडकीकडे मौज पहावयास!' 'आग-बोटीच्या काठाशी समुद्राच्या शोभेकडे पहात उभ्या असलेल्या एका तरुणीस,' अन्योक्ति वगैरे स्फुट कविता, 'रांगोळी घालताना पाहून,' 'नैर्ऋत्येकडील वारा, 'किरातार्जुनीय,' आणि 'कचाप्रत देवयानी,' या कवितांतील कवीची भाषा संस्कृतप्रचुर व लालित्य-

पूर्ण आहे त्यामुळें कवीचे भाषेवर सामर्थ्य नव्हतें असा आरोप करिता येणार नाहीं पण त्याबरोबर काहीं ठिकाणीं अडखळण्यासारखे ओबडधोबड शब्द आढळतात हें कबूल करावे लागेल काव्य अधिक परिणामकारक व्हावे म्हणून मुद्दामच कवीनें काहीं विशिष्ट शब्द प्रसंगविशेषी योजले असावे असा त्यामुळें संभ्रम पडतो एका लहानशा सुभाषितवजा चुटक्यात 'गद्धा' हा गद्य शब्द कवीनें वापरला आहे गाढव किंवा गर्दभ हे शब्द कवीला येत नव्हते असे म्हणण्याची सोय नाहीं कवीनें आपल्या आयुष्यात त्याच्या कवितांचे हेटाळणी करणारे अनेक गाढव व गर्दभ कदाचित् समक्ष पाहिलेही असतील परंतु त्यांनीं मुद्दामच 'गद्धा' हा शब्द वापरला असावा 'अज्ञानी' बद्दल 'अजाण' शब्द वापरणें हें संस्कृताचे मराठीकरण होय प्रकृतिमानाप्रमाणें कोणाला हे मराठीकरण रुचतें, कोणाला नाहीं कांहीं जणाना काव्याचें सौंदर्य केवळ शब्दांतच खचून भरलेलें आढळतें गद्याला फाटक्या जोड्याचाच मार दिलेला ज्याना चालतो त्याना काव्यावर तुटून पडण्याच्या वेळी जीर्ण उपानहाची स्मृति होते हा मतवैचित्र्याचा प्रश्न आहे केशवसुताच्या कवितेंत मधुर-ललित वचनाचा सुकाळ नसला तरी त्यात शब्दशिल्प भरपूर प्रमाणात आहे चित्रकाराला हलक्या हातानें रंग भरावे लागतात कुंचलीनें रंग द्यावे लागतात आणि रंगसंगति साधावी लागते मूर्तिकाराला व शिल्पशास्त्रज्ञाला इतकें हळुवार होऊन भागत नाही मदन व रतीची देखील मूर्ति घडविताना त्याला छिन्नी व हातोडीचा उपयोग करावा लागतो परंतु अशा कठोर उपचारातूनच मूर्तीचें सौंदर्य निर्माण होतें 'कवितेचें प्रयोजन' या कवितेत —

"शान्तीचे घर सोडुनी प्रखर त्या हारी प्रयत्नाचिया,
प्रीतीचाहि निकुंज सोडुनि रणीं जीवित्व नावाचिया,
माता ही सुजला, स्वभूमि सुफला, तीच्या परी लेकरा
खायाला पुरतें पहा नच मिळे कीं हाल आहे पुरा,"

अनुक्र. २०८२९ दि. ०८.५.७.
क्रमांक ०२२ दि. १३।१।७५



पहिल्या दोन ओळींत शब्दलालित्य कमी असलें तरी खबीर पायावर दृष्टान्त उभा करून सबंध परिस्थितीचें यथातथ्य चित्रण त्यानीं केले आहे दुसऱ्या दोन ओळीत जन्मभूमीला लावलेली सुजला सुफला ही दोन मधुर विशेषणे बंकिमचंद्राच्या सुप्रसिद्ध वंदेमातरम् गीतातील सुजलाम् सुफलाम् या शब्दाची आठवण करून देतात केशवसुतानी ही कविता १८९० पूर्वीं केव्हा तरी लिहिली आहे आणि वंदेमातरम् गीताची निर्मिति जरी तत्पूर्वी झाली असली तरी तें गीत 'आनंदमठ' या कादंबरींत दडलेलें होतें १९०५ सालच्या वंग-भंगाच्या चळवळीनंतरच हें गीत राष्ट्रगीत म्हणून हिंदुस्थानभर प्रसिद्ध झालें अनेक ठिकाणी केशवसुतानीं असे अर्थपूर्ण व सहज-सुंदर शब्द वापरले आहेत. त्यांची भाषा अर्थानुसारी आणि अर्थानुवाही आहे परंतु मनातील विचार आणि भावना तंतोतंत प्रकट करताना ते अर्थापेक्षा शब्दाला कमी महत्त्वाचे लेखतात याला जर दोष म्हणावयाचा असेल तर संतश्रेष्ठ तुकाराम महाराजाच्या अभंगातही असे अनेक नाठाळ शब्द आढळतील. अर्थावर लक्ष केंद्रित केल्यामुळें बाह्योपचारी आवरणात व्याकरण-दोष व वृत्तदोष क्वचित स्थळी डोकावणें स्वाभाविक आहे. कोणताही संत कवि या दोषारोपातून सुटू शकणार नाहीं आणि केशवसुत हे त्याच जुन्या परंपरेंत पण नव्या युगाचे प्रतिनिधि म्हणून मोडतात

केशवसुताची प्रतिभा अत्यंत प्रभावशाली आहे त्याच्या अंतर्मनात जीवनातील संघर्षामुळें उत्पन्न झालेल्या लाटा खळाळत होत्या त्या ऊर्मींनीच हें काव्यस्वरूप धारण केले आहे त्याचे वाचन मर्यादित, जीवन तोकडें आणि अनुभव मर्यादित असल्यामुळे त्याच्या काव्यगंगेला अथांग खोली व विस्तीर्ण पात्र लाभू शकलें नाही. त्याची काव्यनिर्मिति हें केवळ ईश्वराचे देणें आहे हा परमेश्वराचा प्रसाद आहे आणि ह्या एका कारणामुळेंच नव्या युगातील मराठी कवितेचे आद्य प्रणेते म्हणून त्याचा सर्वत्र गौरव झाला आहे गंगोत्री उगमा-जवळ गंगेची खोली व पात्र मर्यादित असले तरी तिचें महत्त्व व

पावित्र्य काशी येथील गंगेलाही येणार नाहीं मग हवऱ्याजवळच्या समुद्रप्राय गगेची कथा दूरच राहिली [आधुनिक काळातील युगप्रवर्तक कवि नव्या समाजनीतीचे व वैयक्तिक स्वातंत्र्याचे उद्‌गाते म्हणून त्याचें स्थान मराठी वाङ्मयाच्या दालनात अढळ झालें आहे त्याना वदन केल्याशिवाय कोणत्याही नवकवीला आपली लेखणी पवित्र वाटणार नाहीं ]काशीयात्रेपेक्षा गगोत्रीच्या यात्रेचें महत्त्व अधिक हें सत्य प्रत्येक हिंदुमात्राला परिचयाचें आहे

* * *

श्री वि. वा दी पटवर्धन, एम् एस्सी

# २ : केशवसुत कसचे मेले......?

कै तात्यासाहेब केळकर यानी आपल्या एका लेखात काहीं प्रसिद्ध मराठी कवींची कविता सगुण रूप धारण करून आपल्या-पुढ उभी राहिली तर ती कशी दिसेल याविषयीं मजेदार कल्पना केल्या आहेत त्यात केशवसुताच्या कवितेच सगुणरूप "दाभणकाठी पचा नेसलेला कोरीव मिशाचा सुदृढ प्रकृतीचा चित्पावन" असं रगविल आहे।

या रूपाची तात्यासाहेबानी केलेली उकल अशी–

दाभणकाठी पचा– हा विचाराचा आटपसरपणा, रेखीवपणा आणि राकटपणा दाखवितो.

मिशा– मर्दपणा दाखवितात

कोरीव मिशा– यामुळे कवितेचा तोंडवळा उग्र वाटतो

सुदृढ प्रकृति– काव्यातली मस्ती आणि दाडगेपणा सूचवितात

चित्पावन– फटकळ तोंड आणि जगाशीं भाडखोरी

तात्यासाहेबाबद्दल योग्य आदर बाळगूनही मी म्हणतों कीं ही उपमा समर्पक नाहीं, आणि केशवसुताच्या कवितेच खरखुर चित्र डोळ्यासमोर उभ करणारी तर मुळींच नाही त्यानी कल्पिलेल्या सगुण रूपातले काही अवयव केशवसुताच्या काव्यात अगभूत असतीलही [पण गगनाला गवसणी घालणारा आत्मविश्वास, प्रतिभेचि उत्तुग भरारी, चित्त थरारून टाकणारा आवेश, समाजांतल्या विषमतेबद्दल द्वेष, माणसाच्या निर्जीवतेबद्दल चीड, ढोंगबाजीविरुद्ध पुकारलेला जेहाद, राष्ट्राच्या पुनरुत्थानाची तळमळ, भावी समाजक्रांतीच भव्य दर्शन आणि माणुसकीचा गाढ

गहिवर यातल काहीही त्या सगुणरूपात नाहीं] तस रूप कल्पायचच झाल तर, श्री वरेरकराच्या 'सोन्याचा कळस' नाटकातली बिजली मी केशवसुताच्या कवितेकरता अधिक पसत करीन. वर सागितलेले बरेच गुण बिजलीत आढळतात, आणि नेमक्या या गुणामुळेंच केशवसुत युगप्रवर्तक कवींच्या योग्यतेस जाऊन पोहोचले आहेत अस मला वाटत

[खरोखरच मराठी शारदेच्या दरबारात आधुनिक कालीं केशवसुताइतका तेजस्वी आणि धडाडीचा दुसरा कोणीही कवि मुजरा करून गेलेला नाही गद्यवाङमयात कै आगरकराना जें स्थान आहे तें पद्यात केशवसुताना द्यायलाच पाहिजे] गोविंदाग्रजासारखा अत्यत बुद्धिमान् आणि प्रतिभासपन्न शिष्यही आपल्या गुरूची थोरवी सागताना "शिवरायाच्या मागुन आम्ही लाल महाली फिरणें । तसेंच याच्या मागून आम्हीं नवीन कविता करणे ।" असे विषादपूर्ण उद्गार काढतो श्रीशिवरायाच्या पराक्रमासारख केशवसुताच्या काव्यात काय आहे? असा कोणी प्रश्न केला तर त्यालाही गोविंदाग्रजानी उत्तर देऊन ठेवल आहे गोविंदाग्रज म्हणतात– अरे, केशवसुताच्या गाण्यात काय आहे म्हणून काय विचारतोस? त्याच्यात अस सामर्थ्य आहे कीं हा त्याचा चेला देखील 'त्या गाण्याचा गाऊन सूर' कुणी मनाचा असेल कच्चा, करील त्यालाही मनशूर!'

केशवसुताच्या काव्याच एकागी परीक्षण करून, त्याना कवि तरी म्हणाव की नाही ही शका उपस्थित करणाऱ्या टीकाकारानों, बोला, गोविंदाग्रजापेक्षा काव्यातल तुम्हाला जास्त काही समजत अस का तुमच म्हणण आहे?

केशवसुताचे काही टीकाकार त्याच्या त्रुटित काव्यनिर्मितीकड बोट दाखवून म्हणतात– किती थोडी याची कविता? महाकवीचा काव्यप्रपच यापेक्षा मोठा असायला हवा

केशवसुताची काव्यसपदा अवघ्या १००।१५० पानातच विखुरलेली आहे हें खर, आणि आजच्या कवींची बेसुमार काव्यप्रसवशक्ति लक्षात घेतली तर ही तुटपुजी वाटणारच. पण काव्याच्या विस्तारावरून जर आपण कवीची योग्यता पारखू लागलों तर वामनपडित अथवा मोरोपत याच्यापुढे आजचे सगळे प्रसिद्ध कवीदेखील "कवडे" च ठरतील बकुळीच्या झाडाप्रमाणे काव्यपुष्पाची बरसात केशवसुतानी केली नाहीं देवान त्याना तेवढें आयुष्य दिल नाहीं दैवान स्वास्थ्य दिल नाही. पण हजारों बकुलपुष्पापेक्षाही प्रखर असा सुगध जसा कस्तुरीच्या एका कणात साठविलेला असतो तसा केशवसुताच्या थोड्याशाच कवितेंत प्रखर असा काव्यगुण ठेचून भरलेला आहे अस्सल कस्तुरीचा सुगध फार जवळून घेतला तर सहन होत नाही काहीं नाजुक नाकाचा तर चक्क घुणघुणाच फुटतो! सौंदर्याचिही असच आहे पाचूच्या खड्याचाच सौंदर्य जवळून निरखायच असत, वनराजींनी वेष्टित अशा पर्वतराजाच सौन्दर्य लाबूनच पहाव लागत. केशवसुताच्या काव्य सौन्दर्याबद्दलही हेंच म्हणता येईल

फ्रान्सचा व्हॉल्टेअर, जर्मनीचा गटे, आणि रशियाचा पुष्किन हे आपापल्या देशात युगप्रवर्तक कवि मानले गेले तसेच महाराष्ट्रात रामदास आणि केशवसुत हे युगप्रवर्तक कवि होऊन गेले अस आपण मानल पाहिजे. वरील तीनही कवींचा काव्यविस्तार बेताबाताचाच आहे आग्ल कवि ग्रे याची कविता देखील सुमारें दोनशें पानात बसेल एवढीच आहे पण आपल्या Elegy न तो अजरामर झाला केशवसुतही एकट्या तुतारीमुळे अजरामर झाले आहेत.

कवीची खरी योग्यता काय आहे हें मराठी कविमडळात रामदासानीं प्रथमच सांगितल, आणि स्वतःच्या चरित्रात पटवूनही दिलं ते म्हणतात—

जरि नसता कवीचा व्यापार । तरि कैचा असता जगदुद्धार ।
म्हणौनि कवि हे आधार । सकल सृष्टिशीं ।

केशवसुतानाही आपल्या काली कवीच्या थोरवीसबधीं अशीच समज टीकाकाराना द्यावी लागली किबहुना अलीकडच्या काळात कवीची वकिली केशवसुताइतक्या हिरीरीन दुसऱ्या कोणीही केलेली नाही

त्याच्या काळीं कवि हा समाजात एक कुचेष्टेचा विषय होऊन बसला होता भोजराजाच्या दरबारात कवीला चढलेली किमत राजभोजाच्या दुकानातल्या पायतणाइतकीही राहिली नव्हती' खुद्द केशवसुताच्या निधनानतर त्याचा मृत्युलेख लिहिताना एका ब्रुद्रुक सपादकान " गेला कवीश्वर बरा, सुटला विचारा " असे नाटकी विषादाचे उद्‌गार काढलेले होते आज देखील काही नाम-वत कवींना आपण "नुसतेच" कवी नसून पट्टीचे गद्यलेखकही आहोंत हें मुद्दाम दाखविण्याचा मोह आवरत नाही केशवसुताच्या मागून केवळ कवि म्हणून दिगत कीर्ति मिळविली फक्त के ताब्यांनीच बाकीचे कवि कोणी नाटककार, तर कोणी टीकाकार, कोणी निबधकार तर कोणी पत्रकार अशा दुहेरी नात्यान लोकापुढ आले निर्भेळ कवीला साहित्यसभेत पुरेशी मान्यता मिळत नाहीं, असा एक बारीकसा न्यूनगड आजही कवींच्या मनात दडलेला असतो मग केशवसुताच्या वेळची गोष्टच बोलायला नको

केशवसुताच्या मनाला हा न्यूनगड कदापिही शिवलेला दिसत नाही या समाजात कवीच स्थान कोणत आणि या जगात त्याच कार्य कोणत याविषयी त्याना यत्किंचितही सदेह नव्हता कवि म्हणून आपण जन्मास आलों, तें आपल काहीं एक जीवितकार्य आधी नियुक्त करून घेऊनच आलों याची स्पष्ट जाणीव रामदासां-प्रमाणें केशवसुताना होती.

आम्ही कोण म्हणून काय पुसता आम्हीं असू लाडके
देवाचे, दिधले असें जग तयें आम्हास खेळावया
आम्हाला वगळा, गतप्रभ झणीं होतील तारागणें
आम्हाला वगळा, विकेल कवडी मोलावरी हें जिणें

असा दाडगा आत्मविश्वास प्रकट करून केशवसुत आपल्या कवि-मित्राना सागतात, मित्रहो, जग आपणास विक्षिप्त म्हणत हसतं.

केलें खरें, वर जाता जाता ती एका वेदिकेजवळ येऊन पोचली. तिनें तेथें तपश्चरण केलें त्या साधनेचा उपयोग झाला त्या वेदिकेंतील ज्वालेनें तिला एक 'दिव्य ठिणगी' दिली व तीच घेऊन, ती खालीं पृथ्वीवर आली येथे आल्यावर तिनें त्या ज्वालेला कितीतरी बळी दिले या ठिणगीच्या द्वारें तेज आणून तिला पृथ्वीवरील अधार नाहींसा करावयाचा होता व पृथ्वीला स्वर्गासारखें करावयाचें होतें पण लोकाना त्याचें महत्त्व कळलें नाहीं मात्र आत्मशक्तीनें तिचें सामर्थ्य ओळखलें, यातील अधार' 'दिव्य ठिणगी' तपश्चरण, बली, लोकानीं न ओळखलेलें तिचे महत्त्व व आत्मशक्तीचें समाधान या शब्दातून केशवसुतानी केवढा तरी गूढार्थ सूचित केला आहे जीवनातील अधार नाहीसा करण्यासाठी अशा दिव्य तेजाचा महात्म्याना वेळोवेळीं कसा उपयोग करावा लागतो व कलावताचें जीवनहि त्या दृष्टीनें कसें निर्माणक्षम असतें, हें केशवसुताना सागावयाचें आहे आणि हे सागताना त्यानी पुन प्रतिभेच्या दिव्यत्वावर जोर दिला आहे

वरील दोन्ही कवितात केशवसुतानी प्रतिभेच्या दिव्यत्वावर विशेष भर दिला असला तरी प्रतिभेंतील इतर गुणाचा त्यानीं उल्लेख केलेला नाही, पण तिसऱ्या म्हणजे 'कल्पकता' या कवितेंत त्यानी प्रतिभेचा दुसरा एक प्रमुख गुण जो 'कल्पकता' (Imagination and Fancy) त्यावर जोर दिला आहे या ठिकाणीं केशवसुताची कल्पनाहि खऱ्या अर्थानें व्यापक झाली आहे 'कल्पकता' हा कवीच्या प्रतिभेचा एक अत्यत महत्त्वाचा भाग आहे याविषयीं पौर्वात्य व पाश्चात्य पडिताचें ऐकमत्य आहे. केशवसुतानी हें तत्त्व विशद करण्यासाठीं एका सुदर, उदात्त कथेची योजना केली आहे ही कथा त्यानीं अतिशय कलात्मकतेनें सागितली आहे एका दुर्गम भूशिरावर बसलेली एक देवी एक अद्‌भुत वस्त्र विणीत होती तिचे नेत्र शोधक होते, तिचे कर्ण तीक्ष्ण होते, तिचें भाळ देवगुरूनीं पूजा करावी असें विशाल होतें. तिनें आपलें वस्त्र विणण्यासाठीं सूर्यचद्राचीं किरणें, इद्रधनुष्य, मेघाच्या छटा, चमकणारी चचल

वीज, ध्वनि, लाटा, पाऊस, पक्षी, धबधबे, उल्का राहूकेतू आदि ग्रह, सारांश या विश्वात जें जें सुदर आहे, तें तें सर्व, घेतलें होतें वस्त्र विणून होताच तिनें तें सहज पृथ्वीला लेवविलें त्याबरोबर वसुधरेवर तारुण्य ओथबलें व 'आता मला स्वर्ग वरण्यास खास येणार' असें ती उद्गारली कल्पकता ही किती सर्वगामी, सर्वव्यापी, पल्लेदार व सुदर असते, तिचे डोळे कसे शोधक असतात, तिचे कान कसे तिखट असतात, तिचे भाल कसे पूजार्ह असतात या सर्व गोष्टी केशवसुतानी मोठ्या खुबीनें व कल्पकतेनें माडल्या आहेत. 'पृथ्वी ही समान व सुखी झाली पाहिजे' या आपल्या आवडत्या कल्पनेशी तिचा त्यानी इथें कसा सुदर मेळ घातला आहे हें दिसेल 'कल्पकता' ही कविता कल्पकतेचे दर्शन घडविणारी तर आहेच, पण केशवसुताच्या पल्लेदार कल्पकतेचेंहि तें एक प्रात्यक्षिकच आहे ही कविता आमूलाग्र सुदर आहे कारण हीत प्रतिभेचे दिव्यत्व हें जसें अलौकिक सद्विचारात आहे, तसें तें अलौकिक कल्पकतेंतहि आहे, हे यावरून स्पष्ट होतें केशवसुताना हेंच आवर्जुन सागावयाचें' आहे व तेच त्यानीं आपल्या प्रतिभेच्या जोरावर रमाळ व कलात्मक पद्धतीनें रगविलें आहे

पण प्रतिभेचें सर्वांगीण स्वरूप पहावयाचें असल्यास, आपणांस त्याची 'प्रतिभा' हीच कविता वाचली पाहिजे ही कविता त्यानी आयुष्याच्या शेवटी शेवटीं म्हणजे इ स १९०४ सालीं लिहिली यावेळीं त्याची प्रतिभा परिणतप्रज्ञ झालेली होती जगातील पुष्कळसें ज्ञान, विज्ञान व कडूगोड अनुभूति त्याच्या पाठीशी उभ्या होत्या त्याच्या महत्त्वाकाक्षेचे पख विस्तारलेले होते तिनें जग त्रिखड हिंडून धुंडलें होतें व ती परोक्षापरोक्षातून सचार करीत होती अशा वेळी त्याना प्रतिभेचे सपूर्ण दर्शन झालें असलें तर ते यथोचितच होय या भिकार जगात जिनें त्याना जन्मभर काव्यानद दिला, त्या प्रतिभेची थोरवी गाण्याची त्याना या वेळीं स्फूर्ति होणें साहजिक आहे हे सुनीत प्रतिभेच्या उपपत्तींच्या दृष्टीने अत्यत समुचित व सर्वव्यापी असून, अनेक पौर्वात्य व पाश्चात्य पडिताच्या उपपत्ती

त्यात सामावून बसण्यासारख्या आहेत इतकें असूनही, काहीं गोष्टी त्यात अशा आहेत, कीं, ज्या केशवसुताचें वैशिष्टच म्हणून शिल्लक राहतातच केशवसुत म्हणतात--

"ती प्रतिभेची अत्यद्‌भुत शक्ति एकदा अगात सचारली कीं, मुक्त झालेला आपला आत्मा गगनात उच उच उडतो व त्याची ती भरारी पाहून प्रत्यक्ष इद्राचा अश्व देखील चमकतो कारण त्या आत्म्याच्या ठिकाणीं दैत्याचें ( शारीरिक ) बल व देवाचें (आत्मिक) बल एकवटलेले असतें, आणि सृष्टीचा कर्ता जो विराट् पुरुष तो त्याला आपलें सायुज्यत्व बहाल करतो.आणि मग एक चमत्कार होतो ! त्याच्या अतरगात जे एक सुवर्णमडल असतें, तें आपली प्रभा सर्वत्र पसरू लागतें. त्याचे तेज इतकें चमकदार व धारदार असतें कीं, देव देखील आपली बोथटलेलीं जुनी शस्त्रें त्याच्या अरावर पाजळतात, परजतात, आणि दानव त्याच्या तेजानें मोहून त्यावर जेंव्हा झडप घालतात, त्या वेळी ते पतगासारखे जळून मरतात (यानतर) त्याच्या पिडात ब्रह्माड सामावतें व दोहोंची एकरूपता होते, तोंच सारे शब्दब्रह्म उचबळून येतें, आणि मग त्याच्यातून जगाला पाहिजे असलेली भविष्यवाणी बाहेर पडते तोंच आणखी एक चमत्कार असा होतो की, साक्षात् ब्रह्यालाहि नवसृष्टिरचनेचे कार्य हाती घेणें भाग पडतें अशी ही देवाची जननी ' प्रतिभा ' जर कोणावर प्रसन्न झाली तर त्याला जग हें तुच्छ वाटल्यास नवल काय ?"

केशवसुताच्या या सुनीताने प्रतिभेच्या बहुतेक सर्व लक्षणाचा आविष्कार केला आहे त्यांत अद्‌भुतत्व म्हणजे दिव्यत्व आहे, मुक्तात्म्याचा स्वैर सचार आहे, देवदानवाची दोन्ही सामर्थ्यें आहेत, ईश्वरी अशाशी सायुज्यत्व पावलेली अलौकिक शक्ति आहे, देवाच्याहि बुद्धीला धार लावणारें व दानवाना जाळून टाकणारें असें दिव्य तेज आहे, ' अवघी भूतें साम्या आली ' अशी घोषणा करणारी तुकारामाची व्यापक सहानुभूतीची भूमिका म्हणजे पिड व ब्रह्माड याचें एकत्व आहे, याच अवस्थेत भावनोत्कटतेनें खळखळून

उचबळून येणारें शब्दब्रह्म आहे, एखाद्या द्रष्टच्या ऋषीला शोभणारी भविष्यवाणी आहे व सर्वांवर ताण करणारी गोष्ट म्हणजे ब्रह्मदेवाचें नवसृष्टिनिर्मितीचे कार्यहि आहे थोर कवीच्या प्रतिभेमध्यें हे सर्व गुण आढळतात अद्‌भुतरम्य गूढ शक्ति, आत्म्याचें स्वातत्र्य सत्‌ व असत्‌ याचीं अतुल्य सामर्थ्ये, ईश्वरी अशाची प्रतीति तेजस्वीपणातील धार, पिंडब्रह्मांडाचें एकत्व, शब्दब्रह्माचे भावनोत्कट उचबळणे प्रेषिताचा द्रष्टेपणा, व नवसृष्टिनिर्मितीचे पुनर्रचनाकार्य ( म्हणजेच कलेचे कार्य ) या सर्व सामर्थ्यांची प्रतीति श्रीज्ञानेश्वर नामदेवादि सताच्या वाणींत प्रत्ययास येते, शेक्सपियर कालिदासादि कवींच्या वचनात त्याचा साक्षात्कार होतो असल्याचे नसतें व नसल्याचे असतें करणारी हीं सामर्थ्ये जगातील थोर प्रतिभाशाली कवींच्या काव्यात अनुस्यूत असलेलीं प्रत्ययास येतात प्रतिभेचे हे सर्व गुण सुटेपणानें विवेचिलेले पुष्कळ ठिकाणीं आढळतात, पण ते एकत्रितपणे सागण्याचें महत्कार्य केशवसुतानीं ‘ प्रतिभा ’ या सुनीतात केलेलें आहे हें त्याचे वैशिष्टच आहे त्याच्या डोळस अनुभूतीतून हे तेजस्वी, सर्वव्यापी व चिरजीव उद्‌गार निघाल्यामुळें त्यानीं—“ ही शक्ति ज्यावर प्रसन्न झाली आहे, त्याला हें सध्याचे अधारमय जग तुच्छ वाटेल, यात नवल काय ?” असें जें म्हटलें आहे तें किती खरें आहे, हें ध्यानीं येईल

प्रतिभेचीं लक्षणें सागताना आपल्या कल्पकतेच्या जोरावर केशवसुतानीं आत्म्याच्या सचारावर व आविष्कारावर ज्या अद्‌भुतरम्य कथा रचल्या, त्यात व्यक्तित्वाचें, सौन्दर्यदृष्टीचें व शैलीचें वैशिष्टच साठविलेलें आहे अर्थात्‌ त्याच्या बुडाशीं गाढी अनुभूति व तीव्र सवेदनक्षमता आहे, आणि म्हणूनच ‘ आम्ही कोण ’ या सुनीतात कवीसबधी बोलताना

“आम्हाला वगळा — गतप्रभ झणी होतील तारागणें !
आम्हाला वगळा— विकेल कवडीमोलापरी हें जिणें ! ”

असे आत्मप्रत्ययाचें ठणठणीत रोकडे उद्‌गार ते काढू शकतात

* * *

प्रा दि के बेडेकर, पुणे

# ४ : केशवसुतांची- 'स्वर्गसमक्षते'ची कल्पना

केशवसुताची 'दिवाळी' ही कविता वीस शार्दूलविक्रीडितें असलेली एक लाबच लाब कविता आहे दिवाळींतील आनदाचें वर्णन कवीनें मोठे साधे व गमतीचे केलें आहे पण कवितेच्या शेवटी मोठ्या विलक्षण दोन ओळी आहेत :–

"खाणें आणि पिणें, विनोद करणे, गाणेंहि वा खेळणें
जैसें ज्यास रुचेल त्यापरि तुम्ही या उत्सवी वागणे"

असे म्हणून कवि एकदम जणू काय पाठमोरा होतो व म्हणतो

"मी सध्यासमयी खुशाल गिरणातीरावरी बैसुनी
कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी ! "

या पाठमोरेपणात नुसता कवीचा विक्षिप्तपणा आहे का ? कीं आनदाविषयी एक बुरसटलेली तिरसट अव्हेरवृत्ति आहे ?

पण केशवसुताच्या कवितेंत आनदाला पाठमोरें होण्याची अशी वृत्ति नाहीं उलट त्याचा एकदर पिंड दु:खाच्या उगाळणींत रिझण्याचा नसून आनदाच्या हव्यासाने दिव्याभासाच्या मागें बेछूट धावण्याचा आहे त्याना आनद हवा आहे 'माझिया तर जीविती तिमिर सारें' असें ते म्हणतात खरें, पण त्याची मूळ श्रद्धा अशी आहे कीं 'तम अल्प, द्युति बहु' असून मनुष्यमात्राला ह्या द्युतीचा किंवा प्रकाशाचा लाभ होण्यासारखा आहे त्याना एकटेपणा हवासा वाटतो तोहि एवढ्यासाठीं की आनंदाचा साक्षात्कार होण्यास आजच्या 'गद्यग्रथित जगा'चा 'मठ्ठपणा' आडवा येतो म्हणून ! त्यानी म्हटलें आहे की 'जनमर्यादा धरुनि कसें, अमर्याद तें मज गवसे?' अमर्याद आनद त्याना हवासा वाटतो

## 'स्वर्गसमक्षता'

केशवसुताच्या सुटया एकएक कविता घेतल्या तर कधी 'तम' 'तिमिर' यात काळवडून गेलेलें त्याचे मन दिसतें, तर कधी 'छद फद उच्छृखल अमुचे' असे दुर्दम्य आनदोत्साहाचे उद्गार

त्याच्या हृदयातून उमटतात जगाला कधीं ते पाठमोरे होतात तर कधीं बडाचा बावटा घेऊन जनसमर्दात एकरूप होऊन जातात. या काव्यभावनाच्या विविधतेला नुसती सुटचा अनुभवाची रास म्हणता येईल व प्रत्येक कवितेंतील वेगवेगळ्या संवेदनेचा सुटा अर्थ घेता येईल. किंवा दुसरे असें म्हणता येईल कीं, या विविधतेंत सुटचा भावनाचा विस्कळितपणा नसून कवीच्या विशिष्ट व्यक्तित्वाच्या एकसंधपणामुळे या वैचित्र्यातहि एक परोक्ष परतु प्राणभूत अशी रचना आहे दुसऱ्या तऱ्हेनें, म्हणजे व्यक्तित्वामुळे एकदर काव्यनिर्मितीला लाभलेल्या रचनेचा शोध घेण्याच्या पद्धतीनें, केशवसुताच्या सर्व कविताचा अर्थ पाहता मला असें वाटतें की त्याच्या काव्यप्रतिभेला व आविष्काराला एक केंद्र आहे तें केंद्र स्वर्गसमक्षते'च्या त्याच्या विशिष्ट कल्पनेंत आहे

'रागोळी घालताना पाहून' या त्याच्या प्रसिद्ध कवितेच्या शेवटच्या चार ओळींपैकी आधीच्या दोन ओळी प्रसिद्धच आहेत

"साध्याहि विषयात आशय कधीं मोठा किती आढळे ।
नित्याच्या अवलोकनें जन परी होती पहा आंधळे ।"

या दोन ओळीमध्ये प्रकट झालेली कल्पना उदात्त आहे परतु तिला केवळ एका सुभाषिताचें रूप देऊन तिचा अर्थ संपविण्यात येतो तें मात्र बरोबर नाही. केशवसुताना तरी या दोन ओळींचा अर्थ स्वयपूर्ण सुभाषितवजा सागावयाचा नव्हता हें पुढील दोन ओळीवरून स्पष्ट होतें ते म्हणतात

"रागोळी बघुनी इत पर तरी होणे तयी शाहणें ।
कोठें स्वर्गसमक्षता प्रकटते तें नेहमीं पाहणें ।।"

त्याना साध्य विषयात नुसता 'मोठा आशय' दिसत नाहीं तर स्वर्गच दिसतो हा स्वर्गहि नुसता काल्पनिक स्वर्ग नाही तर तो मनुष्यमात्राला 'समक्ष' असू शकणारा स्वर्ग आहे त्यानी दुसऱ्या एका प्रसिद्ध कवितेंत म्हटलें आहे की कवि, चित्रकार, शास्त्रज्ञ किंवा समाजक्रांतीचे द्रष्टे 'पृथ्वीला सुरलोकसाम्य' आणण्यास झटत असतात आज जरी पृथ्वीवरील मनुष्यजीवन हें क्लिष्ट

असलें तरी तें वस्तुत तसें असण्याचे कारण नाहीं उलट, पृथ्वीवरच नदनवन निर्माण करण्याचे सामर्थ्य मानवी बुद्धीत व हृदयात आहे ही केशवसुताची श्रद्धा आहे. 'स्वर्ग' हा दु खापासून पळून जाण्यासाठी निर्माण केलेला कल्पनेचा गधर्वलोक नसून मनुष्याला या जीवनातच 'स्वर्गसमक्षता' लाभू शकते अशी त्याची प्रतिज्ञा आहे.

### 'स्वर्गसमक्षते'चा आशय

केशवसुताच्या सामाजिक क्रातीच्या व राष्ट्रीयत्वाच्या भावनेनें उत्स्फूर्त झालेल्या कविता समकालीन सामाजिक व वैचारिक प्रबोधनाचीं उत्कट गीतें आहेत हें खरे, पण केवळ समकालीन सामाजिक सुधारणेची तुतारी ते फुकीत होते असा ग्रह मात्र चुकीचा ठरेल केशवसुताना काही जणानी 'क्रातिकारक' ठरवावें, काहींनी 'क्षीण प्रतिभेचे' व 'स्त्रैण' ठरवावें, आणि काहींनीं त्याना 'सौंदर्यवादी' ठरवावें अशी त्याच्या बाबतीत मोठी करुणास्पद स्थिति झालेली दिसते. ही करुणास्पदता अर्थात् त्याची नसून आपली म्हणजे रसिकाची व टीकाकाराची आहे पण त्याच्या एकदर काव्यनिर्मितीचें 'स्वर्गसमक्षता' हें जर केंद्र मानलें तर मला वाटतें, पुष्कळसा उलगडा होईल. त्याची 'प्रचारकी वाटणारी कविता एका विलक्षण, दूरस्थित परतु प्रत्यक्ष होऊ शकणाऱ्या 'स्वर्गाची ओढ' आहे असें दिसून येईल व त्याच्या 'हरपलें श्रेय' सारख्या कविताचे नातेंहि या आदर्शावस्थेच्या चिंतनाशीं व दुर्दम्य आशावादाशी जुळेल

'तहान आणि भूक आरभी नव्हती' ही त्याची विशेष प्रसिद्ध नसलेली कविता घ्या या छोटचाशा कवितेंत एक विलक्षण कल्पना त्यानी माडली आहे अन्न व मुखे अभिन्न होती, नर व नारी एकाच देही होती, अशी एक अवस्था त्यानी वर्णन केली आहे नासदीयसूक्तामधील काहीं कल्पनाचा पडसाद या कवितेंत आहे तसाच पॅरॅडाइसच्या ख्रिस्ती कल्पनेच्या छटा यात आहेत यात कवि शेवटीं म्हणतो की त्या आरभावस्थेंत "स्वर्ग व पृथ्वी

जुळून होती " व म्हणून मानवी जीवनामध्यें 'खती' निर्माण झालेल्या नव्हत्या

सृष्टीचा जसा हा स्वर्गधरेच्या अभिन्नत्वाचा काळ कवीनें कल्पिला आहे, तसाच मानवी जीवनांतहि शैशवाचा काळहि 'खती'विना लाभलेल्या निरागस आनदाचा असल्याचें त्यानें ठिकठिकाणीं म्हटलें आहे पुढें 'फुलराणी' मध्यें स्वर्गधरेचा सगम होऊन आनदाचा सर्वत्र उद्रेक होतो अशी जी उत्कट कल्पना बालकवींनीं वर्णन केली आहे तिचीं बीजें केशवसुताच्या शैशव-विषयक कल्पनेंत दिसतात वर्डस्वर्थच्या कल्पनेचाहि पडसाद येथें ओळखणें सोपें आहे परतु, मला येथें मुख्यतः जें सांगावयाचे आहे तें असें की, सृष्टीच्या आणि मानवाच्या एका निरागस आनद-स्वर्गाची कल्पना केशवसुताच्या कवितेंत गाभ्यासारखी आहे

**प्रत्यक्षातून परोक्षाकडे**

या बाबतीत केशवसुताच्या कल्पनाविश्वाचे एक वैशिष्ट्य लक्षात घेण्यासारखें आहे प्रारभकाळीं पृथ्वी व स्वर्ग याची अभिन्नता होती व ती अभिन्नताच बालकें, फुले व फुलपाखरें याच्या रूपाने प्रौढ मानवाला क्षणभर का होईना भासमान होते, एवढेच कवि सागत नाहीं, हा जो स्वर्ग म्हणजे स्वर्भूसगम मानवाला समक्ष होऊ शकतो, तो प्रत्यक्षातूनच होऊ शकतो असेंहि त्यानी वारवार सांगितलें आहे

'म्हातारी 'मध्यें ते म्हणतात'—

" स्वरूप सत्य तुझें मुळीहि तें मजला नुमजें
तरी तुझ्या ठायीं वसतसें अद्‌भुत तें काहीं
प्रत्यक्षातुनि तें परोक्षीं शीघ्र मला नेतें "

'ज्वाले'स द्यावा लागणारा बलि

प्रत्यक्षातून परोक्ष अशा स्वर्गाकडे जाणें ही केशवसुताच्या साऱ्या निर्मितीची प्रेरणा आहे या निर्मितीचा अर्थ त्याच्या दृष्टीनें स्वप्नरजनासारखा नाहीं तर खडतर तपश्चरणाचा किंवा कर्तव्य-पालनाचा आहे ते कर्तव्य कवीचें वेगळे, तत्त्वज्ञाचे वेगळें किंबहुना प्रत्येकाचें वेगळेंच असणार हें त्याना ठाऊक आहेच मनुष्याची कृतार्थता 'तेजाच्या उगमाकडे' एकसारखें चालण्यात आहे एवढेंच सागून ते थाबत नाहींत ' दिव्य ठिणगी' या कवितेंत ते म्हणतात की तेजाची एकच ठिणगी पृथ्वीकडे आणण्यासाठीं " बलि दिला ज्वालेस त्या मी किती? तें मातें कळलें पुरे " पण या बलि-दानातच त्याना कृतार्थतेचा आनद आहे त्याचें प्रत्यक्ष जीवनही त्याच्या स्वतःच्या बलिदानाची, कृतार्थतेची व आनदाची साक्ष देणारें आहे ' समृद्धि आणि प्रीति ' यासारख्या त्याच्या साधारण कवितातूनहि त्याची ही 'स्वर्गसमक्षते'साठी धडपड व ती 'समक्षता' प्रत्यक्ष कृतीनें साधण्याची पौरुषपूर्ण वृत्ति ओसडताना कोणालाहि आढळेल

महाराष्ट्रातील आधुनिक प्रबोधनाला असा प्रबळ काव्यात्म हुंकार लाभला हें एक मराठी भाषेचे व मराठी मनाचे सामर्थ्य-चिन्ह होय असे मी म्हणेन केशवसुतानी निर्माण केलेल्या काव्य-विश्वात सामावलेलीं अनेक बीजेच पुढच्या मराठी कवितेंत आजतागायत विस्तारत आहेत व विस्तारत राहतील, एवढें सामर्थ्य त्याच्या प्रतिभेत आढळतें केशवसुताना दिवगत होऊन गेल्या ७ नोव्हेंबर १९५५ ला पन्नास वर्षें पूर्ण झालीं त्या निमित्ताने महाराष्ट्रात ठिकठिकाणीं त्याना पुण्यस्मरणपूर्वक श्रद्धाजली वाहण्यात आल्या पन्नास वर्षांनीं त्याचे मृत्युदिनीं स्मरण करतांना आज मराठी मनाला त्या सामर्थ्याचा पुन्हा स्पर्श होत आहे व ' आम्हापुढें घनतमिस्र सारे दिसे अशा अवस्थेत आपण असताना त्याचे पुण्यस्मरण हे आपल्याला फारच मार्ग-दर्शक ठरणारें आहे.

*   *   *

प्रा. श्री. के क्षीरसागर, पुणें

# ५ : सौंदर्यवादाचे प्रणेते केशवसुत

आधुनिक काव्याचे कुलगुरु केशवसुत ऊर्फ कृष्णाजी केशव दामले याना दिवगत झाल्याला हा लेख प्रसिद्ध होण्याचा दिवशीं पन्नास वर्षे पूर्ण होतील त्याचा स्मृतिदिन ता ७ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात ठिकठिकाणी साजरा होणार आहे. व त्या निमित्तानें त्याच्या काव्याचे पुन्हा एकदा मूल्यमापन होत आहे हें स्वाभाविकच आहे

केशवसुताचा सूर मराठी काव्याच्या प्रातात इतका नवीन होता, व काही दृष्टीनीं इतका लहान होता की त्याच आकलन त्याच्या हयातीत अजीबात झाल नसत तरी नवल नव्हत. काहीं प्रतिभावन्ताना त्याच्या हयातीत कुणी सहचरच न मिळाल्याचही वाङमयाच्या इतिहासावरूनच दिसून येईल सुप्रसिद्ध 'इलेजी' चा कर्ता आग्ल कवि ग्रे, ' हा जन्मात कधीं बोललाच नाहीं । ' अस एका टीकाकारान त्याच्या सहचरशून्यत्वाला अनुलक्षून अलकारिक भाषेंत म्हटल आहे। केशवसुताची कविता इतकी वेगळी होती व इतकी थोडी होती की, हरिभाऊ आपटयासारखे प्रतिभावन्त समानधर्मे त्यास लाभले नसते तर ती काहीं काळ विसरून जाण्याचाहि सभव होता पण हरिभाऊ आपटे, वासुदेव बळवत पटवर्धन याच्यासारखे स्वतत्र बुद्धीचे रसज्ञ, रेव्हरड टिळकासारखे उदार वृत्तीचे समकालीन कवी, आणि गोविंदाग्रजासारखे उघडपणें स्वत ला सच्चा चेला म्हणवून घेणारे पुढच्याच पिढीचे विख्यात अनुयायी केशवसुताना लाभले हें त्याचें भाग्य होय यात शका नाही एवढ्या मोठ्या प्रतिभावन्तानी त्याच युगप्रवर्तकत्व आधीच मान्य करून ठेवल नसत, तर त्यानतरच्या अस्थिर आणि चचल बुद्धीच्या जमान्यात त्याना कोणत स्थान दिल गेल असत हा एक प्रश्नच आहे.

वास्तविक प्रत्येक पिढीला अशा युगप्रवर्तक कवीच मूल्यमापन अधिकाधिक स्पष्ट आणि निश्चित व्हायला हव. ज्यानी या अगदी नव्या आणि वेगळ्या अशा सुरातला जोम आणि नाजूकपणा ओळखला, ते अर्थातच धन्यवादाला पात्र आहेत पण त्याच्यामागून येणाऱ्या टीकाकारानीं त्या सुराचा उमाळा कुठून येतो आहे हें निश्चित विशद करण जरूर होत नव मत म्हटल, की तें भिन्नच असायला पाहिजे, अस मानणाऱ्या आजच्या वैचित्र्यलोलुप जमान्यात मूल्यापेक्षा मतभिन्नतेलाच अधिक मोल आल तर नवल नाही! केशवसुताच्या मूल्यमापनातली 'तेजीमदी' शोधीत जाण मोठ मनोरजक होईल! आजच्या अर्धशतसावत्सरिक उत्सवाच्या प्रसगी समोर पुस्तकाच्या– आणि विशेषत. मासिकाच्या–फायली घेऊन बसण हास्यास्पद ठरेल पण स्थूलमानान काव्यभक्ताना जें आठवत असेल त्याच पुन स्मरण या स्मृतिदिनाच्या निमित्तान करायला हरकत नाही

हरिभाऊ, रेव्ह टिळक याच्या पिढीनतर आणि गोविंदाग्रजाच्या अकालीं निधनानतर काहीं काल मराठी काव्याच्या प्रान्तात काहीं एक प्रकारची शून्यता भासू लागली होती चद्रशेखर आणि ताबे या काळात प्रतिभेच्या ऐन माध्यान्हीला होते हें खर, पण हे मराठी शारदेचे सरदार दूरदूरच्या सुभ्यावर - बडोदें-ग्वालेरला–अडकून पडले होते अशा स्थितीत पुण्यात काही रात्रबाजीच्या करामतीला अवसर मिळाला असला तर नवल नाही ज्या सधिकालात पुण्यात कोणी एक अनततनय हेहि दरबार भरवू शकत होते त्या काळाच्या मदप्रभतेची कल्पनाच केलेली बरी! याच सुमाराला काव्यात जाणीवपूर्वक आणि सहकार्यपूर्वक हालचाल करण्याकरिता काहीं तरुण कवी महाराष्ट्रशारदामदिर या मोठ्या सस्थेंतच सवता ससार स्थापून बसले ते रविकिरणमडळाचे कवी होत या मडळात नव्या दमाचे कवी होते, तसे नव्या मूल्याचे टीकाकारही होते नव्या मूल्याचा पहिला टीकाकार – माडखोलकर – याच मडळान महाराष्ट्राला दिला माडखोलकरानीं आपल्या 'कविपचकांत'

क्रान्तिकारक केशवसुतांचं रौद्ररसपूर्ण स्तोत्र गायिलेलं मजप्रमाणं अनेक काव्यभक्तांना आठवेल पण याच माडखोलकरांनी त्यानंतर दहाच वर्षांनीं आपल्या मूल्यमापनाचा, काव्यभक्तीचा आणि क्रांतिपूजेचा 'फेरविचार केला' १९३५ च्या सुमारास श्रीमंत सयाजीराव यांच्या वाढदिवसाच्या निमित्तानं निघालेल्या समालोचन-ग्रंथात, त्यांनी विष्णुशास्त्र्यांच्या तुलनेनं केशवसुतांना स्त्रैण ठरवून, त्यांच्या क्रान्तीच्या ध्वजावर स्वतःच चढवलेल्या 'गृध्राला' त्यांनी स्वतःच अवघ्या दहा वर्षांच्या अवधींत 'चिमणी' ठरवून टाकलं!

पण याच्याहि आधी, याच मंडळातल्या एका प्रतिभावंत कवीनं आणि विद्वान् पंडितांनी केशवसुतांच्या कवितेवर एक विद्वत्ता-प्रचुर प्रबंध लिहून एका वाङ्मयीन कोशांत प्रसिद्ध केला होता हे पंडित म्हणजे आमचे माधवराव पटवर्धन होत त्यांच्या या सुमारे ऐंशी पानांच्या निबंधाइतका सशास्त्र असा केशवसुत-काव्याचा अभ्यास यापूर्वी तर काय, पण यानंतरहि झाला नाहीं असं मी म्हणेन पण आजकाल बोकाळलेल्या काव्यविनाशक शवविच्छेदनाचं खरं मूळ माधवरावांच्या या प्रामाणिक, विद्वत्तापूर्ण पण भरकटलेल्या काव्यविवेचनातच आहे!

दरम्यान केशवसुतांच्या कवितेची भ्रान्त स्तुति आणि भ्रान्त निन्दा होतच होती कोणी तिजमध्यें समाजक्रान्तीला आवाहन आहे म्हणून ती क्रान्तिकारक असे म्हणत, कुणी तिजमध्यें नैराश्य आहे म्हणून ती रडवी आहे असे म्हणत, कुणीं यमक आणि वृत्तें यांच्या परंपरा केशवसुती कवितेनं मोडल्या, यातच तिचं क्रान्तिकारकत्व मानीत, तर कुणी हें सर्वच नाकारून इंग्रजी काव्याच्या वाचनानं जें सहज सगळीकडेच पसरलं, तें काव्यातच तेवढं क्रान्तिकारक कसं म्हणता येईल? अशी शंका काढीत, तर कुणी केशवसुतांचं सामाजिक क्रान्तिकारकत्व सुद्धा आगरकरांकडून उसनं घेतलेलं होतं असं ठरवून त्यांना एकट्यालाच नव्हे, तर सर्व काव्यालाच गद्याच्या मानानं नकली आणि 'सेकंड हॅंड' ठरवीत!

मधून मधून नकळत शहाणपणाचं मूल्यमापन आणि काव्यनिदान होत नव्हतं असं नाही पण एकदरीत वर संगृहीत केलेल्या शहाणपणाच्या नाऱ्याच्या मानानं तें कमीच पडलं असं म्हटलं पाहिजे. नाही तर आज केशवसुताच्या निधनाला अर्ध शतक लोटल्यावर पुन्हा त्याच्या संबंधीच्या प्राथमिक शंका कां निघाव्या ?

या निमित्तानं 'लोकसत्तेनं' प्रसिद्ध केलेल्या लेखांपैकी प्रो. जोगांच्या लेखात, केशवसुत काव्यदर्शनातील आपलाच अखेरचा परिच्छेद जोगांनी उद्धृत केला आहे त्यात ते 'केशवसुताचें महत्त्व टीकाकारांनीहि ओळखण्यास कोणता प्रत्यवाय असावा?' असा प्रश्न विचारतात या प्रश्नाचं उत्तर त्यांच्या या विषयावरील अभ्यासग्रंथात तर सापडेलच, पण त्यांच्या 'लोकसत्तें'तल्या लहानशा लेखातहि सापडेल तपशील परिश्रमपूर्वक गोळा करावयाचा, परंतु मूळ गड्डयाला हात घालायलाच मात्र मोठ्या सौजन्यानं कचरायचं, आपल्या प्रतिपाद्य मताचं सर्वतोपरि समर्थन करायचं, पण अखेर (वाचकाच्या) कोर्टानं आपल्या पक्षकाराचा संपूर्ण दावा मान्य केलाच पाहिजे असं काही नाहीं असा अर्ज आपणच नेऊन गुदरायचा। यासारख्या तऱ्हामुळं मराठी टीकावाङमयात बाह्यत: समतोल वाटणारा, परंतु अन्तःस्थपणें निर्णयशून्य ठरणारा एक प्रवाह बराच मोठा आहे या संप्रदायामुळंच मराठी वाङमयाच्या 'हाती' 'चांगला' माल कधी पुरेसा 'चांगला' म्हणून म्हटला जात नाही. अणि भिकार मालहि पुरेसा 'वाईट' म्हणायला कुणाला धीर होत नाहीं। भिकार आणि ओंगळ कविताहि नांदू द्या! म्हणून गळ घातली जाते, आणि उत्तम कविताहि थोड्या तोऱ्यानंच Patronising वृत्तीनंच।—कोपऱ्यात बसवली जाते। उघडच आहे कुणालाहि नांदवून घेण्याइतके सन्त टीकाकार घरधनी झाल्यावर जिला नांदवायला हवं तिला नांदवण्यात थोडी हयगय होणारच।

केशवसुताची कविता प्राचीन कवितेच्या तुलनेनं "लौकिक, जीवननिष्ठ, आत्मलेखनात्मक भावगीत स्वरूपाची म्हणजेच वेगळी

नाही काय?" असं जोग आपल्या लेखात मोठ्या तळमळीनं विचारीत आहेत पण लगेच "अर्वाचीन कवितेचे प्रणेते युगप्रवर्तक ही विशेषणें केशवसुतास लावायचीं नसलीं तर लावू नयेत" अशी (प्रतिपक्षाला) औदार्याची सवलत देत आहेत! आणि लगेच पुढें सर्वच सज्जनांना प्रिय होणारा 'दुहेरी निषेध' (Double Negative) वापरून ते लिहितात "पण तेवढ्यानें मराठी कवितेला इंग्रजी कवितेच्या अभ्यासामुळे निराळें वळण मिळून मराठी कवितेचें, इतर मराठी वाङ्मयप्रकाराप्रमाणेंच निराळें युग सुरू झालें नाहीं असें होत नाहीं पण एवढ्यानेंच समाधान न होऊन, ते पुढें बिचाऱ्या केशवसुतांना आणखीहि काहीं अभावात्मक आहेर(Left-handed complments) करतात, ते पाहण्यासारखे आहेत! ते म्हणतात तें स्थान कोणाला द्यावे याचा शोध घेता घेता अखेर केशवसुतासमोरच येऊन थांबावे लागेल परंतु फेरविचार करावयास काहीच हरकत नाही "

या "काहींच हरकत नसणाऱ्या" सौजन्यामुळच श्री आवळीकरासारख्या नवीन लेखकाच्या मनात गोंधळ होतो आणि त्यांना सर्वमान्य गोष्टींचाहि 'फेरविचार' करायला धीर होतो!

रा आवळीकर यांचं इतर काहीं लिहिणं माझ्या पाहण्यात नाहीं तरी या लेखावरून त्यांची काव्यविषयक रुचि अविकृत दिसत आहे कोमल भावनांचे केशवसुत, प्रेषिताच्या आवेशानं वज्रहृदय भासणारे केशवसुत आणि सहज गमतीनं एखादी बोधपर कल्पना सुचली म्हणून कविता लिहून टाकणारे केशवसुत अशी त्रिविध दत्तात्रयस्वरूप मूर्ति त्यांच्या काव्यसंग्रहात दृष्टीस पडते, असं एखाद्यानं म्हटलं तरी त्यालाही माझी 'ना' नाही. फार काय केवळ ' रियाज्' म्हणून कालिदासाच्या एखाद्या सर्गाचं भाषान्तर करणारं त्यांचं चौथं मुखहि त्यात भरीला घालून त्यांना चतुरानन ठरवायलाहि माझी तयारी आहे पुष्कळ लोकांचं त्यांच्या भावनात्मक कवितांकडे दुर्लक्ष तरी झालं किंवा लक्ष गेलंच तर त्यांना रडवे ठरविण्याकरता गेलं, हेंहि खोटं नाहीं केशवसुत म्हटलं कीं ,तुतारी केशवसुत म्हटलं की गोफण, अशा ठराविक कविता

लक्षात आणणारे लोक न कळत त्या कवितातील ओजाच आणि सौंदर्याचे मूळ कशात आहे हें विसरत असत आणि म्हणूनच त्याना 'स्त्रैण' केशवसुत आणि क्रान्तिकारक केशवसुत अस द्वैत तरी दिसे नाहीं तर 'सुधारक' साप्ताहिकात मिल् स्पेन्सरच्या कोटद्या लढविणारे 'गद्य प्रेषित' आगरकर आणि त्याच विषयावर 'पादाकुलकात' नाहीं तर दोहच्यात लिहिणारे 'पद्यप्रेषित' केशवसुत या दोघात अद्वैत तरी भासे।

पण वस्तुस्थिति निराळीच आहे केशवसुताचा रडवेपणा आणि केशवसुताचा प्रक्षोभ, स्त्रैणपणा आणि त्याच पौरुष यातल अद्वैत या मडळींनी ओळखायला शिकल पाहिजे आणि प्रत्येक खरा काव्यभक्त तें ओळखून असतोहि। मजसारखा केशवसुतभक्त केवळ काहीं विरोधाभासाच्या पकडी करून दाखवीत आहे किंवा special pleading करीत आहे अस ज्याना वाटेल त्याना मला एवढच सागयच आहे की केशवसुताचे उत्तम भाष्यकार आणि वकील केशवसुत हेच होत त्यानीं आपल्या 'कवितेचें प्रयोजन' या कवितेत त्याच्या पिढीच्या अरसिकाना ज्या गोष्टी समजाविल्या आहेत त्याच त्याच्या वतीन आजच्या पिढीतल्या 'रसिकाना' समजाऊन देण आवश्यक दिसत। केशवसुत म्हणतात –

त्याचा स्त्रैणपणा असा प्रकटला वाटेल कोणा परी
धीरोदात्त असेचि तो श्रुत असें हें दूरहि भूवरी

कालक्रीडित हें बघून रडला, हें व्यस्त काही नसे
प्रौढत्वी निजशैशवास जपणें बाणा कवीचा असे

ज्यांना इथ केशवसुतानीं सागितलेला कवीचा विचित्र बाणा उमगला त्यानाच आधुनिक कविता म्हणजे काय हे समजेल त्यानाच केशवसुत हेच तिचे प्रणेते का तें समजेल, आणि त्यानाच आधुनिक कवितेचा खरा सप्रदाय कोणता अणि तो जुन्याना ठाऊक असलेल्या काव्यसप्रदायापासून वेगळा कसा तें समजेल हें सर्व अवघड नाहीं, पण पाडित्याच्या जोरावर समजून घ्यायच

म्हटलं तर मात्र अवघड आहे, 'बाल्याच्या' ऋजुतेनं समजून घ्यायचं म्हटलं तर अवघड नाहीं।

जुन्या कवितेंत जर कोणत्या एखाद्या काव्याला प्राणभूत अशा गोष्टीची गळचेपी होत असेल तर ती कवीच्या बालसदृश सहज भावनाची। जुन्या काळात कवीला बालकाचं मुग्धत्व पाहून नाचावसं वाटत नसे का? त्याला महाराष्ट्राच्या निसर्गरम्यभूमींतील हिरवीगार रानं आणि सह्याद्रीच्या अजस्र कड्यावरून आपली हिमधवल काया कुरवडून टाकणारे जलौघ पाहून मंत्रमुग्ध होऊन उभं रहावंसं वाटत नसे का? त्याना जुन्या काळातल्या महाराष्ट्रीय रमणीचं तें सलज्ज सोज्ज्वळ मुखकमल पाहून सौंदर्यस्तोत्र गावंसं वाटत नसे का? त्याना त्याच्याच समोर घडत असलेलं शिवप्रभूंचं अलौकिक अवतारकृत्य पाहून अठरा पुराणं गुडाळून ठेवून एक नवंच महाकाव्य लिहावंसं वाटत नसे का? इतके विविध काव्यविषय समोर असता, त्याच्यातील पंढिकाच्या काव्यात रूपावलि समासचक्र पढल्याचं आणि पुराणिकाचा धंदा केल्याचंच तेवढं प्रत्यतर यावं आणि त्याच्यातील 'अपंडिता'च्या काव्यात ईश्वरभक्ति, नाहींतर मोक्षपिपासा यासारख्या एखाद्याच वैयक्तिक भावनेचं दर्शन व्हावं हें कशाचं लक्षण? अर्थात्‌च काव्याची आणि कवींची सहजवृत्ति साफ मारून टाकण्यात आली होती या गोष्टी-चंच होय। "तुम्ही संत म्हणून तरी लिहिलं पाहिजे, नाही तर हरिदासपुराणिक म्हणून तरी लिहिलं पाहिजे नाहींतर तुमची गणना अशिक्षित अणि असभ्य शाहिरा–तमासगिरात करूं।" अशी त्या वेळच्या कवींना सक्त ताकीद होती।

पण पुढें इंग्रजी अमल आला। होय, मला माहीत आहे की या इंग्रजी अमलाच्या उपपत्तीमुळं अनेक टीकाकाराची साफ फसगत झाली आहे. इंग्रजी अमलाबरोबरच लौकिक (प्रापंचिक व सम-कालीन) विषयावरची बंदी उठली हें खरं, पण म्हणजे लगेच कृष्णशास्त्री आणि कुंटे हे केशवसुतासारखं लिहू लागले असं मात्र नाही। केवळ ऐहिकपर कविता लिहिणं म्हणजे आधुनिक केशवसुती

कविता नव्हे, फार काय इंग्रजी कवितेचे अध्ययन करून कुंट्याच्या प्रमाणे महाकाव्याची योजना आखणे म्हणजेहि आधुनिक कवितेचा आरंभ नव्हे. पण काहीं पंडितांनीं विष्णु मोरेश्वर महाजनी आणि कुंटे यांना केशवसुताचे पितर ठरविले आहेत! पण हें मत पंडितांपुरतेंच राहिलें! सर्वसामान्य काव्यभक्त आणि टिळक-गडकरी यांच्यासारखे प्रांजल आधुनिक कवी यांनीं केशवसुतांचें कविकुल-गुरुत्व ओळखलेंहि आणि निरहंकारपणें मान्य केलेंहि!

कुंटे-महाजनी आणि केशवसुत यांच्यांत फरक कोणता? पहिले दोघे मराठी भाषेंत प्रयोग करणारे प्रौढवृत्तीचे पंडित होते, तर केशवसुत हे स्वतःच्या पोटांत न मावणारे हर्षखेद, द्वेष-उत्साह पद्यमय व गेय भाषेंत आविष्कृत करणारे शिशुवृत्तीचे कवि होते. सहजप्रवृत्तींना जपणें, भावनांना पवित्र मानणें, दुसऱ्यांनीं आणून दिलेले काव्यविषय न पत्करणें, सौंदर्यानें पुलकित होणें आणि तसें झाल्याचें सांगण्यांत अभिमान मानणें, अन्यायानें संतप्त होणें आणि तो संताप व्यक्त करणें, हें एकशेआठ रामायणें लिहिण्यापेक्षां पुण्यप्रद मानणें, निसर्गाशीं गुजगोष्टी करणें, हा या नव्या शैशव-पूजक कवींचा संप्रदाय होता. यालाच इंग्रजींत Romantic School असें म्हणतात. आणि यालाच मराठींत 'सौंदर्यवाद' म्हटलें पाहिजे. मनुष्य इंग्रजी वाङ्मय वाचून सौंदर्यवादी होत असता, तर कुंटे महाजनीहि होऊं शकते आणि आजचे डझनभर नवकवीहि सौंदर्य-द्रष्टे कां झाले असते? सौंदर्यवाद हा पिंडांत असावा लागतो. तो इंग्रजी शिक्षणानें, अथवा इंग्लंडच्या बोटीनें 'इम्पोर्ट' करतां येतो असें नाहीं.

पण रोमँटिसिझम् म्हणजे काव्यांतील केवळ एखादा रीतिभेद (mere style) आहे असें समजणाराचा पुन्हा कसा गोंधळ होतो हें पहाण्यासारखें आहे. आधीं मराठी कवितेच्या आकलनास या पाश्चात्त्य संज्ञेच्या आकलनाची गरज आहे याचीच फारशी कल्पना आमच्या टीकाकारांना नव्हती. पुढें ती कल्पना देण्यांत आल्यावरहि त्या संज्ञेचा व्याप केवढा आहे हें समजून घेण्याची त्यांची तयारी

नव्हती. उदाहरणार्थ रोमँटिसिझम् ऊर्फ सौंदर्यवाद या विषयावर मी एका वाङमयीन वादविषयक व्याख्यानमालेंत व्याख्यान दिल्यावर एका शहाण्यासुर्त्या टीकाकारानी मला म्हटल, "काय हो ! केशवसुतहि रोमॅंटिक सप्रदायी आणि रेव्ह. टिळकही रोमॅंटिक सप्रदायी हे तुमच काही पटत नाही आपल्याला !" तसच तांबे आणि केशवसुत याना परस्पर-विरोधी सप्रदायाचे समजणारे लोक आहेतच. मुबई-साहित्य-सम्मेलनात हा वादाकरता विषयच निवडला होता व त्या दोघाचा सप्रदाय एकच म्हणजे 'सौंदर्यवादी ऊर्फ Romantic हे मी त्या वादाच्या उपन्यासादाखल वाचलेल्या निबधात स्पष्ट केल होत पण हेच गैरसमज Romanticism या शब्दाच भाषान्तर करतानाहि दिसून येतात उदा० 'स्वैर सप्रदाय' अथवा 'स्वच्छद सप्रदाय' असं भाषान्तर करणारे लोक, या सप्रदायातल काव्य-परपरा–विरुद्धत्वच तेवढ लक्षात घेतात वस्तुत ती त्याची केवळ प्रतिक्रियात्मक अथवा negative बाजू होय या सप्रदायाची क्रियात्मक अथवा Positive बाजू म्हणजे सौंदर्यपूजन आणि भावनापूजन. या दोहोंतील एखादा शब्दच या सज्ञेला मराठी प्रतिशब्द होऊ शकेल प्रख्यात अमेरिकन मानसशास्त्रज्ञ विल्यम् जेम्स् यान "Valuing experience for its own sake" हें या सप्रदायाच लक्षण ( Pragmatism वर लिहिताना जाता जाता ) केल आहे, तहि अर्थपूर्ण आहे.

पण केशवसुतसप्रदयाच्या आकलनाला मुख्य अडचण त्याच्या प्रेषित भूमिकेंतील तात्त्विक कवितांची होते अस दिसत. तुतारी, गोफण यासारख्या कवितांतील सामाजिक तत्त्वज्ञानान केशवसुतांच्या भक्ताची आणि अभक्ताची सारखीच फसगत केली आहे ! भक्ताना वाटू लागल कीं सामाजिक पुरोगामित्वाच वऱ्हाट वळल, की केशवसुती कविता झाली आमचे सर्व द्वेष्टे आणि दांभिक नवकवी, केशवसुतांशी सोयरीक करायला जातात ते अशाच सामाजिक सतापाच्या कविताच्या वशिल्यानं ! पण

दा. क्र

ज्याला काही पूज्य आणि प्रिय आहे त्याचा राग आणि ज्याला सर्व तुच्छ आणि उपहास्य वाटत आहे अशा Cynic चा राग, यातील फरक खरे काव्यभक्त ओळखतात ! पण केशवसुतांचे हे खरेखोटे सगेसोयरे सोडून, त्यांच्या प्रामाणिक विरोधकाकडे वळल तर कै. ताब्याच नाव त्यात डोळ्यापुढ उभ रहात आणि टीकाकाराला एक धर्मसकटच पडत ! केशवसुताच्या सामाजिक कवितासबधी सात्त्विक सतापान बोलताना मी स्वत ताब्याना पाहिल्याच मला चागल आठवत ! हे काव्यविषय त्याना Negative ऊर्फ केवळ प्रतिक्रियात्मक वाटत तर काहीना ते विचारप्रधान ऊर्फ Didactic म्हणून दुय्यम दर्जाचे वाटतात ! पण या विचारप्रधान कवितासबधीहि अखेरची कसोटी भावनात्मकच आहे निसर्गाच्या अथवा व्यक्तीच्या आकर्षणान कवीची भावना आणि कल्पना प्रज्वलित होते, तशीच ती एखाद्या ध्येयान अथवा उदात्त विचारानहि होऊ शकेल मुख्य प्रश्न हा आहे कीं कुठल्या तरी मूर्त सौंदर्याच्या अगर अमूर्त आदर्शाच्या आकर्षणान कवीच रक्त अधिक वेगान वाहू लागल आहे, कीं 'नवकवीप्रमाण' तो एक थड Cold-blooded प्राणी आहे ! आणि या कसोटीवरून पाहता अमूर्त आदर्शासबधीहि मूर्त सौंदर्याइतक्याच बेहोषीन लिहिणारे कवि मराठीत केशवसुत हेच होऊन गेले हें पाहून त्याच अधिकच कौतुक करावस वाटत !

किंबहुना प्रेषिताच्या भूमिकेमुळेंच ते एक युगप्रवर्तक सप्रदायाचे कुलगुरु बनले एक नवा प्रात, एक नवी जाणीव, आणि एक नवा आदर्श आपल्याला सापडला आहे याची उन्मादकारी जाणीव केशवसुताच्या शब्दाशब्दात दिसून येते. या सप्रदायाचे ते पहिलेच कवि असल्यामुळं असो कीं, माधवराव पटवर्धनाप्रमाण काहींशी 'कष्टप्रसू' प्रतिभा असल्यामुळ असो, त्यांच्या कल्पनाच्या आणि विचारांच्या वादळाला पुर पडेल अस वाहन त्याच्या वाणींत आढळत नाहीं. पण जेव्हा त्याच्या प्रतिभेची भट्टी भरपूर तापते तेव्हां तिजमधून बाहेर पडणाऱ्या तप्तसुवर्णाच्या शारदामूर्ति

मराठी काव्यात केव्हांहि पहिल्या पक्तींत बसविण्याच्या योग्यतेच्याच ठरतील !

सतारीचे बोल, थकलेल्या भटकणाराचे गाणें, तुतारी, सिंहावलोकन, वातचक्र या कवितासारख्या कविता केशवसुताखेरीज कोणता कवि लिहू शकला असता ? आम्ही कोण ? कवितेचे प्रयोजन, आणि स्फूर्ति या कवितात दिसून येणारी कवीच्या जीवितकार्याविषयींची श्रद्धा दुसऱ्या कोणत्या कवीनें व्यक्त केली आहे ? 'साध्याहि विषयातली' अर्थपूर्णता केशवसुतांपूर्वी कुणाला दिसली होती ?——आणि त्याच्यानतर तरी त्यांच्या इतकी किती कवींना प्रतीत झाली ?

केशवसुतांच्या सप्रदायाच मनन आणि आकलन, ते गेल्याला अर्धशतक झाल तरी अजून पुरत व्हायचच आहे !

* * *

प्रा श्री ना बनहट्टी, एम् ए, पुणें

# ६ : द्रष्टे कवि केशवसुत

त्याचा स्त्रैणपणा असा प्रकटला वाटेल कोणा, परी
धीरोदात्त असेचि तो श्रुत असे हें दूरही भूवरी !
प्रेतेंही उठवील जी निजरवें, ती तो तुतारी करी
आता नादवती, निरर्थ तर ती त्याची करी चाकरी ?

— केशवसुत, 'कवितेचे प्रयोजन'.

विद्यार्थिदशेतला एक प्रसग अजून आठवतो आमच्या कॉलेजातल्या वाङमयमडळापुढें व्याख्यान देण्याकरिता एका विद्वान् वक्त्याना पाचारण केलें होतें व्याख्यानाचा विषय नक्की काय होता हें आठवत नाही 'जुने मराठी कवि' किंवा 'मोरोपत' अशापैकी काही तरी असावा व्याख्याते सुरवातीस म्हणाले "मोरोपत (किंवा जुने मराठी पद्यकार) हे कवि होते कीं नाहीं हें ठरवायच झाल्यास काव्य म्हणजे काय, काव्य कशाला म्हणाव, हें अगोदर पाहिल पाहिजे मी काव्याची अगदी सुटसुटीत अशी व्याख्या केलेली आहे" ही ह्याची अभिनव अल्पाक्षररमणीय अशी व्याख्या काय असेल बरें, म्हणून आम्ही उत्कठेनें कान टवकारून ऐकू लागलो कानावर शब्द पडले, "माझी काव्याची व्याख्या अशी 'जें टिकत तें काव्य

ही व्याख्या ऐकून आम्ही खदखदून हसलों आम्हा कॉलेजकुमाराच्या स्नेहमडळात त्या वयातल्या उसळत्या वृत्तीस अनुसरून या व्याख्येची थट्टामस्करी पण झाली

ही थट्टा अयोग्य असेल, पण निष्कारण नव्हती काव्याची रसिकग्राह्य व्याख्या करण्याचें व्याख्यात्यांना जमलेलें नव्हतें ज्याची असमजसता लहान मुलाच्याहि लक्षात यावी असें विलक्षण अतिव्याप्त विधान आपण जणू कांहीं मोठें महत्वाचे तत्त्व सागतों

आहोत' अशा समजुतीनें त्यांनीं केलें होतें. पण अतिव्याप्ति आणि असमंजसता काढून टाकल्यास व्याख्यात्याच्या त्या विधानांत काहीं सत्य उरेल असें वाटतें ज्यात विशेष सत्त्वांश तेंच काव्य टिकून राहतें, अशी जर त्यानी आपल्या विधानाची मांडणी केली असती तर तें योग्य झालें असते त्याच्या मनातून त्याना हेंच सांगायचें होतें

सत्त्वांशाची पारख केशवसुताच्या कवितेच्या बाबतीत जितक्या कठोर रीतीनें झाली, तितकी इतर कोणाच्या लिखाणाबाबतीत क्वचितच झाली असेल त्याच्या हयातींत त्याची कविता पुस्तकरूपाने प्रसिद्ध होणे तर राहोच, फुकाचे चार बरे शब्द देखील तिजविषयीं कोणी काढले नाहीत तत्कालीन कविमंडळातील मोजक्या व्यक्तींखेरीज फार थोड्यानी त्याची कविता वाचली असेल कविमंडळावर मात्र त्याच्या कवित्वाचा परिणाम अत्यंत गाढ झाला होता पण सामान्य वाचकवर्गाला त्याची नीटशी कल्पना नव्हती त वारल्यानंतर काही वर्षांनी गोविंदाग्रजासारख्या अत्यंत लोकप्रिय कवीनें स्वत स केशवसुताचा चेला म्हणवून घेतलें व त्याच्यावर गौरवपूर्ण कविता लिहिली तेव्हा लोकाना मोठें नवल वाटलें प्रा वा ब पटवर्धनासारख्या रसिकाच्या तोंडून त्याच्या कवितेचा गुणगौरव होऊं लागला तव्हा थोडेंबहुत कुतूहल उत्पन्न होऊं लागलें, तरीपण एकदरीनें तत्कालीन वाङ्मयीन वातावरणात अवहेलनेचे व हेटाळणीचे साद घुमत होतें आणि त्याचे पडसाद आमच्या लहानपणींच्या संस्कारसुलभ मनावर उमटल्याखेरीज राहिले नव्हते पण अखेर काळानें आपला धरमकाटा उचलला, आणि भरपूर उज्ज्वल कीर्तीचे माप त्यानें केशवसुताच्या पदरात घातलें. इ स १९१७ साली हरिभाऊ आपट्यानी केशवसुताच्या कवितेची सकलित आवृत्ति काढली आणि लगोलग कै घा दा गुणे, श्री न श रहाळकर, कै वै का राजवाडे या पंडित कवि-चिकित्सक प्रवरानीं तिचें जें स्तुतिस्तोत्र गायिलें त्यामुळे कीर्तिमंदिरात तिची अढळपदी स्थापना झाली. त्यानंतर अनेकानी स्तुतिसुमने उधळलीं व आरत्या ओवाळल्या या जयजयकाराची

प्रतिक्रिया म्हणूनच कीं काय अनेक मातबर आक्षेपकहि निघाले आणि त्यांनीं आपआपल्या आरोपपत्रिका सादर केल्या याचा परिणाम हालवून खुटा बळकट करावा त्याप्रमाणें झाला. केशवसुताचे काव्य, त्या काव्याला प्रेरक असलेली त्याची कविभूमिका आणि त्या काव्यानं घडवून आणलेला परिणाम याची अधिक कसून छाननी झाली. तावून सुलाखून निघणाऱ्या सोन्याप्रमाणे त्याच्या काव्याचा कस आता पक्केपणीं ठरला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं

केशवसुताच्या भाषेंत लालित्य कमी असेल, त्याच्या वृत्तरचनेंत सहजता व सफाई याची उणीव भासत असेल, त्याची शब्दयोजना पुष्कळ ठिकाणी कृत्रिम व वैरस्यकारक असेल, चमत्कृतिजनक क्लिष्ट कल्पनींचा व अतर्कशुद्ध विचारसरणीचा आढळ त्याच्या काव्यात मधून मधून होत असेल, पण त्याच्या काव्याचा प्रभाव या दोषांमुळे अडून राहिला नाहीं तो प्रभाव प्रत्यक्ष अनुभविणाऱ्याना त्याच्यावर केलेले रोगटपणाचे व स्वैरपणाचे आरोप म्हणजे अक्षरजननीस व्यर्थ शिणविण्याचा खटाटोप असें वाटल्याखेरीज राहिलें नाही

एखाद्या विशिष्ट क्षेत्रामध्यें विशिष्ट परिस्थितीत एखादा पुरुष अलौकिक कर्तबगारी करून जातो त्याचें द्रष्टेपण ज्याना आकलन होत नाहीं अशा टीकाकाराना त्याचे किरकोळ दोष फार महत्त्वाचे वाटू लागतात त्याची मानसिक प्रक्रिया एवढ्यावरच थांबत नाहीं द्रष्टयाची विशिष्ट गुणवत्ताही त्याना अवगुणाच्या स्वरूपात भासू लागते आणि मग द्रष्टयाच्या कार्याची उफराटी चिकित्सा त्याच्या बुद्धींतून अवतीर्ण होऊं लागते द्रष्टयाचें थोरपण त्याना स्वतःला आकलन होत नसल्यामुळें लोक त्याला मोठा मानतात ही त्याची मोठी भूल होय या प्रमादापासून त्यांना बचावलें पाहिजे असे त्याना प्रामाणिकपणें वाटतें.

केशवसुताचें द्रष्टेपण कशात आहे हें उमजावें यासाठीं द्रष्टा कुणाला म्हणावें ह्याचा जरा खोलात जाऊन विचार करणे इष्ट

होईल द्रष्टेपणाचे निकष कोणते हें जाणून घेतले म्हणजे केशवसुतांचे कर्तृत्व कोणच्या कसोटीवर घासून पाहायचे हें स्पष्ट होईल

(द्रष्टेपणाचे पहिलें लक्षण आपल्या कर्तव्यक्षेत्राची अचूक जाणीव होणे हे होय या आयुष्यात आपल्याला काय करायचे आहे, आपले 'मिशन' कोणतें याची जाणीव एक प्रकारच्या आंतरिक प्रतिभाबलानें द्रष्ट्या पुरुषाला होते आणि त्या मार्गानें निःशंक रीतीने तो चालू लागतो) विष्णुशास्त्री चिपळूणकरांना शाळा-मास्तराची गुरुवाची नोकरी होती सीध्या रीतीने चालल्यास बढती निश्चित होती पण त्याची पर्वा करतो कोण ? भाषारूपी अमोघ साधनाच्या द्वारा समाजमन जागृत व उत्तेजित करणे आणि जनता जागृताचे स्वतंत्र मार्ग चोखाळणे हें आपले जीवित-कार्य हे त्यास समजून चुकलें होते निःशंक मनाने त्यांनी निबंध-माला काढली मानवाच्या ऐहिक सुखवर्धनाच्या दिशा दाखविणें आणि या विचाराच्या आड ज्या वृत्ति येत असतील त्यांचा निरास करणे हे आपलें मिशन अथवा जीवितकार्य आगरकरांनी ठरवून टाकले स्त्रीशूद्रादि दलितांचा उद्धार व त्यांच्या आड येणाऱ्या जातिनिष्ठ मक्तेदारीचा विरोध हें आपलें 'मिशन' ही खूणगाठ जोतिबा फुल्याच्या मनाला पटली आणि तिला ते अनुसरले या पुरुषांनी आपापले जीवितकार्य अचूक ओळखलें आणि त्याप्रमाणें विरोधाची, अडचणींची पर्वा न करता ते बिनधोक चालू लागले हें करू का तें करू अशा संशयात ते पडले नाहींत आज मास्तरकी कर, उद्या लेख लिही, परवा औद्योगिक सुधारणेच्या मागे लाग, तेरवा धार्मिक सुधारणेचा पिच्छा पुरव अशा अनेक गोष्टींची नबडब या मंडळींनीं केली नाही कित्येक लोक अत्यंत बुद्धिमान् असतात, कर्तबगार असतात, देशहिताबद्दलची त्यांची कळकळ उमाप असते, पण त्यांना मिशन नसते अमुक गोष्ट हेंच आपलें जीवितकार्य अशी अंत सूचना त्यांना मिळालेली नसते चिंतामणराव यांचे उदाहरण अशा प्रकारचे होय नाना परीचे उद्योग व अत्यंत निभिन्न प्रकारचे लेखन त्यांनीं केले तुलना करण्याचा

येथें उद्देश नाही. अशा व्यक्तींचाहि समाजाला खूप उपयोग होतो. भिन्न भिन्न प्रकारची व्यक्तित्वे कशी असतात ह्याचे दिग्दर्शन करावें एवढाच हेतु.

केशवसुताच्याबद्दल प्रश्नच नाही काव्य करणें हाच आपला जीवितहेतु ही त्याची निश्चिति शाळेंत असतानाच झाली होती वर्गांत शिक्षकाने त्याना 'दुर्मुखलेला' म्हणताच त्याचें मन निभ्रांत रीतीनें उद्गारलें:—

> माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या, चालावयाचा पुढे
> आहे सुन्दर तो सदा सरसवाङ्निष्यन्द चोहींकडे!

आपल्या हातून सरस काव्यनिर्मिति होणार हें स्वतःचे भविष्य त्यानी स्वतःच वर्तवून टाकले होतें तेवढ्या अल्प वयात आणि विद्यार्थिदशेंत कवितेने त्याचे मन भारून टाकले होते व काव्य-रचनेचा ध्यास त्याना लागला होता याचे प्रत्यतर त्याच्या अपरकविता दैवत या आरभकाळाच्या कवितेवरून मिळतें

हा जो त्याचा जीवितहेतु प्रारभकाळींच निश्चित झाला, त्यापासून ते जन्मात तिळमात्रहि चळले नाहींत त्याचे कित्येक मित्र व नातलग कवितेचे हें वेड सोडून देण्याचा त्याना अनेक वेळा उपदेश देखील करण्यास मागे पुढे पाहत नसत परतु स्वयस्फूर्तीनें ज्याला कविता करण्याची हौस होती तो अमल्या उपदेशाच्या योगाने कविता रचण्याच्या आपल्या अत्यानदाच्या मानसिक व्यवसायापासून कसा परावृत्त होणार? अशी साक्ष केशवसुताच्या बधूनी लिहिलेल्या त्याच्या चरित्रलेखात आढळते सबध जन्मात त्यानीं एक नाटक लिहिलें होते, पण ते देखील गद्यकाव्यच होतें नाटक नव्हतें, अशी माहिती त्याचे मित्र रहाळकर यानी दिलेली आढळते यावरूनहि त्याच्या काव्यमय मनोवृत्तीचाच प्रत्यय येतो. कवितादेवीवर म्हणजेच आपल्या जीवितध्येयावर इतकी अव्य-भिचारिणी निष्ठा ठेवणारा भक्त केशवसुताखेरीज दुसरा क्वचितच निर्माण झाला असेल !

चालू काळाला आणि आगामी काळाला कशाची जरूर आहे हें निश्चितपणें हेरणें हें द्रष्टयाचें दुसरें लक्षण होय द्रष्टयाची नजर पुढें असते मागें नसतें द्रष्टा या शब्दातच हा अर्थ अभिप्रेत आहे आपल्या नियत झालेल्या कार्यक्षेत्रात आजच्या घटकेस काय केलें पाहिजे, उद्या कशाची आवश्यकता भासणार आहे हें हेरून त्या त्या गोष्टी पुरविण्याचा तो यत्न करतो पुन्हा विष्णुशास्त्री चिपळूणकराचें उदाहरण घ्यायचें झालें तर आपणास असें दिसेल की जनतेची मनें जागृत व उत्तेजित करण्यास सुंदर चटकदार व परिणामकारक गद्य हें प्रभावी साधन आहे, तें साधन आपण निर्माण केलें पाहिजे, दक्षिणा प्राईज कमिटीच्या भोवती आणि मेहरबान दैरेक्तर आफ् पब्लिक इनस्ट्रक्शन च्या भोवती घोटाळणारे, थडें, थिजलेलें गद्य आता यापुढें उपयोगाचें नाहीं हें त्यांनीं प्रतिभाबलानें जाणलें, आणि प्रभावशाली, लोकानुरंजक अशा मराठी गद्याचा सुंदर व विशाल राजपथ निर्माण केला. तसेंच ज्याला प्रभावी लोकसेवा करायची असेल त्यानीं स्वतंत्र असलें पाहिजे, राजसेवेची रुपेरी बेडी पायात वागवून हें काम नीटपणें यापुढें करता येणार नाहीं, हें हेरून त्यानीं स्वतः राजसेवेची शृंखला तोडून टाकली त्याच्या मागून सरकारी नोकरीला अव्हेरून देशसेवेस वाहून घेणाऱ्या कार्यकर्त्यांची केवढी परंपरा निर्माण झाली हें कुणास सांगावयास नको

केशवसुतांचें नियत जीवितकार्य [illegible] काव्याच्या क्षेत्रात नवा मनु निर्माण होण्याची त्या काळीं किती आवश्यकता भासत होती, समाजजीवनाच्या अवस्थांतरास अनुसरून काव्यक्षेत्रांत कशा प्रकारचें परिवर्तन घडवून यावयास पाहिजे होतें, आणि तें केशवसुतानी कसें घडवून आणलें ह्याचा विचार करावयाचा झाल्यास पुष्कळच आहे काहीं समर्थ विवेचकानीं तो यापूर्वी केलेला आहे इंग्रजी अमलाच्या सुरवातीपासून इ स १८८५ पर्यंतचें काव्य गद्यापेक्षाहि अधिक प्रमाणात दक्षिणा प्राईज कमिटी व शिक्षणखात्याचे अधिकारी ह्यांच्या भोवतीं घोटाळत होतें दक्षिणा प्राईज कमिटीनें विषय द्यावा आणि त्यावर

पडितानीं किवा नवशिक्षितांनीं काव्ये लिहावीं असा प्रकार चालत असे पुढें नवशिक्षितानीं इग्रजी काव्याचीं रूपांतरें, भाषातरे कर-ण्याचा पायडा पाडला बहुतेक रूपातरें कथनात्मक, वर्णनात्मक काव्याची इग्रजीतल्या भावगीताचीं रूपातरें करण्याचाहि उपक्रम महाजनि प्रभृतींनी केला पण काय ! भावगीताच्या या निर्जीव कलेवरापेक्षा प्रधान कीर्तिकराची तीं देवसेनी–इदिरा ही कथा-काव्यें बरीं असे वाटू लागतें त्यात कथानकाचा व प्रसगवर्णनाचा तरी गोडवा असतो.

तात्पर्य, काव्य कुचबलें होतें चिपळूणकरानीं उद्दाम आत्मा-विष्काराचे चैतन्य गद्यात ओतले, काव्य मात्र चैतन्यदायी आत्मा-विष्काराची अद्यापपर्यंत वाट पहात होतें केशवसुतानीं हें हेरलें, आणि आत्माविष्काराचे चैतन्य काव्यात ओतून काव्याला स्फुरण-शाली बनविलें स्वतःच्या भावभावना, स्वत चे विचारतरग, स्वत ला प्रतीत झालेली जीवनदायी तत्वे याचीं अभिव्यक्ति कर-ण्याकरिता त्यानीं काव्य लिहिलें त्या काळाला आणि त्यानतरच्या काळाला हें पाहिजे होतें

इग्रजी शिक्षण समाजात जमजसें मुरू लागलें, इग्रजी वाङ्मया-चा परिचय जसा अधिकाधिक गाढ होत गेला, तसतसें आग्ल-शिक्षित समाजाचे वैचारिक जीवन बदलत गेलें खुद्द इग्रजी काव्य कित्येक शतकाच्या इतिहासात नाना अवस्थातरातून गेलेले होतें एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत वर्डस्वर्थ, शेली, कीट्स या अल्पकाळापूर्वी होऊन गेलेल्या रोमँटिक संप्रदायांतील भावकवींचा प्रभाव विशेष होता आणि तो आपल्या इकडेहि जाणवत होता त्याच्या काव्याप्रमाणे आत्मलक्षी, विचारप्रधान वा क्लृप्तिप्रधान काव्य इकडे निर्माण होण्याची आवश्यकता भासत होती चिपळूण-करावर ज्याप्रमाणे ॲडिसन, जॉन्सन, मेकॉले या गद्य निबध-काराचा परिणाम झाला, त्याप्रमाणें वर्डस्वर्थ, शेली, प्रभृति भाव-गीतकाराचा, शेक्सपियरादि सुनीतकाराचा परिणाम केशवसुतावर झाला होता हे स्पष्ट आहे पण चिपळूणकराचें गद्य हें जसें मेकॉले

किंवा जॉनसन्चें अनुकरण नव्हे, तो त्याचा स्वतःचा प्राणवान् आविष्कार आहे, त्याचप्रमाणें केशवसुताचें काव्य कुणाचें अनुकरण नसून त्याचा स्वतंत्र चैतन्यपूर्ण आविष्कार आहे. ( जीं भाषांतर किंवा रूपांतर म्हणूनच केलीं आहेत त्या काव्याचा अर्थात् अपवाद समाजवयाचा )

(आणखी एक अधिक खोल असा विचार आहे जुन्या जमान्यांत, इंग्रजी अमलापूर्वी पारमार्थिक भावना आणि ईश्वरविषयक श्रद्धा सर्वांची दृढ होती अथपासून इतिपर्यंत सर्व कवि ह्या भावनेचे वा श्रद्धेचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पोषण करणारे असेच होते तेव्हां कवि म्हणजे समाजमनाला श्रद्धेचा, पारमार्थिक भावनेचा आधार देणारा उपदेशक अशीच कल्पना साधारणपणे रूढ होती) इंग्रजी अमल सुरू झाल्यानंतर ही कल्पना नाहीशी झाली काव्यांत ईश्वर-विषयक श्रद्धेचा किंवा पारमार्थिक भावनेचा मागमूसहि उरला नाही. सरकारचें धर्मविषयक तटस्थतेचें धोरण काव्याला अशा रीतीने भोवलें की, त्याने काव्याचे तात्त्विक आणि भावनात्मक अधिष्ठानच नाहीसें केले पंडिती काव्य पहा, किंवा आंग्ल शिक्षितांचें इंग्रजीवरून उतरलेलें काव्य पहा कोठेंहि व्यावहारिक, ऐहिक, इंद्रियगोचर सृष्टीच्या पलीकडे जाऊं पाहणारा विचार आढळायचा नाहीं ही भकास पोकळी बरीचशी गद्यवाङ्मयांत होतीच, परंतु काव्याच्या प्रांतांत ती अधिक निखालस आणि अधिक जाणवणारी होती. कारण आमचे पूर्वीचें काव्य सर्वच परमार्थानें भरलेलें व ईश्वरी श्रद्धेवर आधारलेलें होते

अर्थात् हीहि गोष्ट याबरोबर लक्षांत ठेवली पाहिजे की, हे अव्वल इंग्रजींतले वाङ्मय ज्या शिक्षिताकरतां निर्माण होत होतें तो शिक्षितांचा समाज बऱ्याच अंशीं ईश्वरी श्रद्धेला व पारमार्थिक भावनेला पारखा झालेला होता पण अव्वल इंग्रजींतली ही स्थिति उत्तरोत्तर बदलत चालली होती इंग्रजी वाङ्मयाचा अभ्यास जसजसा अधिकाधिक गाढ होत होता, ख्रिस्ती धर्मतत्त्वाच्या परिचयामुळें ब्रह्म, प्रार्थना इत्यादि समाजाचा जसजसा उदय होत

होता, तसतशा श्रद्धेच्या व परमार्थाच्या किंचित् छटा शिक्षित समाजाच्या हृदयाकाशात उमटू लागल्या होत्या. आगरकरासारखे विचारपूर्वक अज्ञेयवादी बनलेले सुशिक्षित फार थोडे बाकीचे बहुतेक विचारहीन, श्रद्धाहीन पोकळीमध्ये लोंबकळत असलेले पण काही तरी श्रद्धेच्या आधाराकरता धडपडू लागलेले असे होते

असें दिसतें कीं, केशवसुत स्वत या धडपडणाऱ्या जीवापैकींच एक असावे जुन्या जमान्यातून आलेली ईश्वरी श्रद्धा व भक्ति-भावना ही तर लोपलेली होती पण त्याची प्रतिभा अध्यात्माचा, विश्वात्मकतेचा नव्या चालीनें शोध घेऊ लागली होती या त्याच्या चालीचीं पावलें उमटलेलीं त्यांच्या काव्यात दिसतात प्रतिभेच्या या पदविन्यासाना गूढगुंजन असें म्हणण्याची पद्धत आहे पण ज्यात गूढ काहीं नाहीं अशा स्थलींहि केशवसुतानी आपल्या वेदान्तात सांगितलेला आत्म्याच्या विश्वव्यापकतेचा विचार सुंदर रीतीनें वर्णिलेला आढळतो

वाद्यातुनि त्या निघती नतर
उदात्ततेचे पोषक सुस्वर
तों मज गमले विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजीं
दिक्कालासहि अतीत झालों
जगमीं विलयी अनत उरलों
विसरुनि गेलों अखिला भेदा
एकत असता दिडदा, दिडदा!

केशवसुतानी अगदी अखेरीस जो अभग रचिला त्यात तर पारपरिक भक्तिभावनेस साजेसे गाढ श्रद्धेचे उद्गार काढलेले आढळतात

तुझें नाम मुखीं, ध्यान तुझें डोळा
वृत्ति या चचळा स्थिरावल्या
चिंता भय दु:खें अवघीं दूर झालीं
अनाथांचा वाली जवळी केला.
धिक्कार या जगीं इच्छित न मिळे काही

म्हणुनी तुझे पायी भिक्षादेही
केशवसुत म्हणे देवा दीननाथा
तुझे पायी माथा वाहियेला !

यात पांडुरंग, विठ्ठल अशा ईश्वराच्या विशिष्ट स्वरूपाचा उल्लेख काय तो कमी आहे तो असता तर हा अभंग तुकारामाच्या नांवावर खपून जाण्यास काही हरकत नव्हती

मराठी काव्यातील गूढगुंजनाचे प्रणेते केशवसुत होत, हें सर्वमान्य आहे झपूर्झा म्हातारी, कोणीकडून कोणीकडे, हरपले श्रेय, या कविता गूढगुंजनात्मक म्हणून सांगितल्या जातात व त्यांतील आशयाचें तदनुसार विवेचनहि केलें जातें. येथे सांगावयाचा मुद्दा हा कीं, गूढगुंजन हा केशवसुताच्या आध्यात्मिक अभिव्यक्तिचाच एक भाग आहे विश्वात्म्याशीं एकतानता प्राप्त व्हावी म्हणून त्याच्या जीवाची जी धडपड होत असे किंवा ही एकतानता होत असल्याचे जे भास काही प्रसंगानें त्यांना होत असत त्यांना शब्दाच्या द्वारा व्यक्त करताना जेथें त्यांनीं रूपकाचा, प्रतिकाराचा किंवा गूढ भाषेचा अवलंब केला तेथें गूढगुंजन झालें, इतर ठिकाणी आध्यात्मिक प्रतीतीचें साक्षात् वर्णन त्यांनीं केले आहे असे मानणें सयुक्तिक होईल. सतारीच्या बोलांतले उद्‌गार अशाच तऱ्हेचे होत. कोणीकडून कोणीकडे ही कवितासुद्धा गूढगुंजनी मानण्याचें कारण नाही

गोत्यात अशा आलों कुठून् ?
कोठें जाईन कैसा सुटून ?
असें विचारीं जेव्हां झटून,
भ्रमबुद्‌बुद तो जातो फुटून,

मग अहा ! विभिन्नच दिसे दृष्टि पालटून !

परंपरागत भारतीय तत्त्वज्ञानाची रूपरेषा व परिभाषा ज्याला माहीत आहे त्याला अशा प्रकारच्या उद्‌गारात काहीं गूढ वाटणार नाहीं

तात्पर्य, आध्यात्मिक विचार, आध्यात्मिक प्रतीति किंवा त्या प्रतीतीसाठी धडपड, हें केशवसुताच्या काव्याचें महत्त्वाचें अंग आहे हें अंग त्याच्या द्रष्टेपणाची एक खूण होय कारण काव्यांत आध्यात्मिकतेचा वजनदारपणा आणणें ही त्या कालमानाची जरूरी होती

राजकीय स्वातंत्र्यासंबंधाचे आणि सामाजिक क्रांतीसंबंधाचे विचार केशवसुतांनीं किती तळमळीनें व ओजस्वी रीतीनें व्यक्त केले आहेत हें येथें आणखी एकवार सांगावयास पाहिजे असें वाटत नाही तुतारी, स्फूर्ति, नवा शिपाई, रूढी, सृष्टि आणि कवि' या कविता वाचून देखील एकदा रसिक, केशवसुत ही केवळ काळाच्या ओघाबरोबर निर्माण झालेली व्यक्ति होती असें कसें म्हणू शकतो हें समजत नाही या कवितांतले कांही उद्‌गार प्रेषिताच्या (Prophet) वाणीप्रमाणे अचूक भविष्यदर्शी कसे ठरले आहेत हे पाहिले म्हणजे मन थक्क होतें नवा शिपाई या कवितेंतील पंक्ति पहा

ब्राह्मण नाही, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा
तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा !
मळ्यास माझ्या कुंपण पडणें अगदी न मला साहे !
कोण मला वठणीला आणू शकतो तें मी पाहें !
जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत,
सावलींत गोजिरीं मुलें,
उन्हांत दिसतीं गोड फुलें
बघता मन हर्षून डुलें,
ती माझीं, मी त्यांचा, एकच ओघ आम्हांतुनि वाहे !
नव्या मनूतील नव्या दमाचा शूर शिपाई आहें !
अशी स्थिती ही असे जनीं !
कलह कसा जाईल मिटुनी ?
चिंता वागे हीच मनीं

शान्तीचे साम्राज्य स्थापू काळ बघत जो आहे,
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे !

स्वातंत्र्ययुगातल्या आजच्या भारतीयाचें ब्रीद याहून काय निराळें आहे ? पं. जवाहरलाल नेहरू भारताचें ध्येय व भारतीयांचें ब्रीद म्हणून जे उदंड माक्षेपाने वर्णितात तें हेंच नव्हे काय? खानदेशातल्या एका छोट्याशा गावीं मिडल स्कुलातील पोरें हाकणाऱ्या, दारिद्र्यात पिचणाऱ्या एका मास्तरानें ५७ वर्षांपूर्वी हें लिहिलें आहे हें लक्षात घेतलें म्हणजे आपलें नवल दुणावेल

आत्मलक्षी प्रणयभावनेचा नि:संकोच आविष्कार काव्यामध्यें प्रथम केशवसुतानीं केला ही त्यांची द्रष्टेपणाची धिटाई लक्षात घेण्याजोगी आहे इंग्रजी वाङ्मयांत मोकळेपणीं खेळणाऱ्या प्रणयभावनेशीं तत्कालीन सुशिक्षिताची दाट ओळख झाली होती ती प्रणयभावना आपल्या इकडच्या काव्यामध्यें खेळू लागली पाहिजे, ही त्या काळाची जरुरी होती केशवसुतानी प्रणयकाव्यें लिहिली तीं आपल्या पत्नीशीं केलेला शृंगार चव्हाटयावर मांडण्याकरता नव्हेत. आत्मलक्षी प्रणय देखील काव्याचा उत्कृष्ट विषय होऊ शकतो याचे प्रात्यक्षिक त्यानीं आपल्या प्रणयकवितांच्या द्वारें करून दाखविलें या प्रात्यक्षिकानें प्रणयाच्या सर्व प्रकारच्या आविर्भावाना काव्यप्रांताचा रस्ता मोकळा केला

कवि, कविता, काव्यकारण, काव्यप्रयोजन या विषयावर बऱ्याच कविता केशवसुतानीं लिहिल्या हें कालोचित कर्तव्य अचूक हेरण्याच्या त्यांच्या प्रतिभेचे आणखी एक महत्त्वाचें गमक होय काव्यप्रांतात एक नवी सृष्टि आपण निर्माण करीत आहों, याची जाणीव केशवसुतास होती अशा तऱ्हेचें स्वभावजन्य काव्यच इंग्रजी अमल सुरू झाल्यापासून नव्हतें अर्थात् तें निर्माण होऊं लागलें तेव्हां त्याचें स्वरूप, त्याचें महत्त्व आणि तें निर्माण करणाऱ्याची मनोभूमिका याचें विवरण करणें इष्टच नव्हे, तर आवश्यक होतें हें विवरण काव्यामध्यें केल्यामुळें त्यांत अत्युक्ति व कल्पनाचमत्कृति आली असेल त्यांतील कित्येक विचार वादास्पद असू

शकतील, पण म्हणून अशा विषयावर काव्य करणें हें रोगटपणाचें लक्षण कसे ठरतें ? रोगट कशाला म्हणायचेंच असेल तर केशवसुताच्या पूर्वीची परिस्थिति रोगट होती असे म्हणावे लागेल

शारदेनें जो मत्र दिला कानी

तो ऐकून केशवसुत काव्य करीत असत, तर त्यापूर्वींचे कवि दक्षिणा प्राइज कमिटीनें दिलेला मत्र ऐकून काव्य रचीत या कृत्रिम रोगट परिस्थितीला छेद देण्यासाठीं केशवसुतानी कवीची प्रतिभा, कवीचें कार्य इत्यादि विषयावर उज्ज्वल कल्पनांनीं युक्त असें काव्य लिहिले तें मागून येणाऱ्या कवींना मार्गदर्शक व स्फूर्तिदायक ठरले.

जबरदस्त इच्छाशक्ति हें द्रष्ट्याचे तिसरे लक्षण होय आपल्या कर्तव्यक्षेत्राची अचूक जाणीव जरी झाली आणि त्या क्षेत्रांत कोणते अभिनव कार्य करायचे हे जरी हेरले तरी तें करून दाखविण्याचे सामर्थ्य अगीं असल्याशिवाय त्याचा काय उपयोग ? चालू काळात कोणत्या उणिवा आहेत, त्या कशा भरून काढाव्या, हें पुष्कळ लोक अजमावू शकतील एवढी बौद्धिक शक्ति अनेकात असू शकते; पण उणिवा भरून काढणारी निर्मिति करून मनु पालटविणें यांतच रचनात्मक प्रतिभेची सार्थकता असते दाडगी इच्छाशक्तिच हें कार्य करू शकते. जें केले पाहिजे असें मनाने ठरविलें ते प्रत्यक्ष घडविण्यास मोठें मनःसामर्थ्य लागतें तळमळ, धाडस, धडाडी, चिकाटी या गुणाचा मन सामर्थ्यांत अन्तर्भाव होतो हे मन सामर्थ्य केशवसुतामध्ये होतें हे विवरून सागण्याची आवश्यकता नाहीं समजू लागल्यापासून मृत्यु येईपर्यंत विसापेक्षा अधिक वर्षें दुर्धर आपत्तींना तोंड देत ते आपल्या कल्पनेनुसार कविता लिहीत होते हेळसाड, अवहेलना, दारिद्र्य हेंच त्यांच्या नशिबीं जन्मभर लिहिलें होतें

काळोखाच्या जगामध्यें या । मृत आशाच्या चितावरुनिया
पिशाच माझें भटकत आहे । शाति नसेचि तया
तिमिरीं आम्ही नित्य रखडणें । विवचनातचि जिणें कंठणें

हे त्याचे उद्‌गार हृदय पिळवटून टाकणारे आहेत. या परिस्थितीला सकोचीपणा, हट्टीपणा, मुखदुर्बळपणा इत्यादि त्याचे स्वभावविशेष काही अशीं कारण झाले असतील, पण स्वभाव हा दुरतिक्रम असतो

अमुचा पेला दुःखाचा । डोळे मिटुनी प्यायाचा ।

असा अनुभव नित्य येत असून देखील आपला दुर्दम्य आशावाद कायम टिकवून ते जीवितध्येयाची पूर्ति करीतच राहिले यात त्याच्या वीरोदात्ततेची साक्ष पटते

धार धरिलिया प्यार जिवावर
रडतिल रडोत रांडा पोरें
गतशतकाची पापें घोरें
क्षालायाला तुमची रुधिरें
पाहिजेत रे! स्त्रैण न व्हा तर!

पुढें तीस वर्षांनी सामाजिक व राजकीय क्रांतीसाठी गांधीजींनी राष्ट्राला जी हाक दिली व आत्मयज्ञाला जें आवाहन केलें त्याचेंच पूर्वरूप या उद्‌गारांत व तुतारी या सबंध कवितेंत आढळत नाहीं काय?

अडवतील जरि देव, तरी
झगडू त्याच्याशीं निकरी
हार न खाऊं रतीभरी!

देवदानवा नरें निर्मिले हे मत लोकां कवळूं द्या!
कांठोकांठ भरूं द्या पेला फेंस भराभर उसळूं द्या!
पद्यपंक्तिची तरफ आमच्या करीं विधीनें दिली असे,
टेकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुनिया देऊं कसें!
बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे
उडवुनि देउनि जुलमाचे या करूं पहा तुकडे तुकडे!

असे प्रखर दुर्दान्त उद्‌गार केशवसुतांनींच काढावेत. इतरांचें तें सामर्थ्य नाहीं.

द्रष्टा प्रयोगवीर असतो हे त्याचे चौथे लक्षण मानता येईल. आपले इष्ट हेतु सिद्धीस नेण्यास्तव नाना प्रकारचे प्रयोग तो करीत असतो रूढ चाकोरी सोडून प्रयोगाच्या अनिश्चित व अचूक भविष्यात उडी घेण्यास तो कचरत नाही द्रष्टयामध्ये सर्वश्रेष्ठ प्रयोगवीर गाधीजी होऊन गेले प्रथम आपण स्वत , नतर आपलें कार्यक्षेत्र, नतर आपला देश यास त्यानी प्रयोगशाळाच बनविलें होते अन्न, वस्त्रप्रावरण, रोगोपचार, समाजकारण, राजकारण, शिक्षण, जीवनाचे असे एक क्षेत्र सागता येणार नाहीं की ज्यामध्यें त्यांनी आपले प्रयोग चालविले नव्हते [केशवसुताचे नियत कार्यक्षेत्र काव्य हे होते. त्याची प्रयोगवीरता तेवढ्यापुरतीच कार्यकर्ती ठरली तथापि प्रमाणत पाहिले असता तिचे महत्त्व कमी ठरणार नाही छन्दाच्या बाबतीत अनेक प्रयोग त्यानी केले स्रग्धरा, शिखरिणीसारख्या अवघड अक्षरवृत्तापासून तो जवळजवळ मुक्तछदापर्यन्त पोचणारी रचना त्यानी केली सुनीताचा नवा काव्यप्रकार त्यानी रूढ केला भावगीत ऊर्फ आत्मलक्ष्मी स्फुट-काव्य लिहिण्याचा त्यानी उपक्रम केला हा तर त्याच्या ध्येयाचाच एक मुख्य भाग होय लाभलेल्या अल्प आयुष्यात आणि अल्प फुरसतीत जेवढे प्रयोग करता येतील तेवढे त्यानी केले]

केशवसुताचे काव्यकर्तृत्व कित्येकाना कृत्रिम आणि वरवरचे वाटतें, त्याची रचना क्लिष्ट आणि चमत्कृतिपूर्ण वाटते; त्याचा आवेश पोकळ व फुसका वाटतो हे आरोप केवळ कुत्सितपणानें केलेले नाहीत, प्रामाणिक आहेत, असेच मानणें रास्त. याचा विचार व निरास अनेकानी यापूर्वीच केला आहे असल्या आरोपाची सत्यासत्यता परिणामावरून अजमावता येते. ज्याचे कर्तृत्व वर-वरचे, आवेश पोकळ आणि रचना हठाकृष्ट, त्याचा इतका खोल परिणाम समकालीनावर, मागिलावर होणे शक्य आहे असें मानणे म्हणजे आपला सर्व समाज मूर्खांचा, बावळटाचा बनलेला आहे, अशी कबुली देण्याप्रमाणे होय काव्यक्षेत्रात केशवसुताच्या काव्याइतका परिणाम इतर कोणाच्याहि काव्याचा झाला नाही, हें सत्य निर्विवाद

पुराव्यानें शाबीत होऊं शकतें काव्यात प्रतिपादल्याप्रमाणें त्याचें आचरण होतें कीं नाहीं, त्याच्या काव्यानें सामाजिक क्रांति झाली कीं नाहीं हे प्रश्न अप्रस्तुत आहेत कोणत्याहि साहित्यिकाच्या कृतीला हे निकष लावून तिचें मोल ठरवूं पाहाणें योग्य नाहीं कालिदास शेक्सपियरापासून तों तहत सगळे साहित्यातले मानकरी या कसोटीत नापास होतील आतापर्यंत विवरिल्याप्रमाणें केशवसुत नुसते कवि नव्हते, ते द्रष्टे कवि होते एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात समाजजीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रात जे द्रष्टे पुरुष निर्माण झाले त्यात काव्यक्षेत्रातील द्रष्टा म्हणून घेण्याचा मान त्याचा आहे, तो चिरंतन त्यांचाच राहील

* * *

श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध

# ७ : केशवसुतांचें व्यक्तिमत्त्व

केशवसुताच्या काव्यावर आजवर अनेकांनी लिहिले आहे; व त्यांच्या काव्याचा निरनिराळ्या दृष्टीने विचारहि करण्यांत आला आहे. अगदी अलीकडे प्रा भवानी शकर पडित यांनी केशवसुताच्या काव्यातील निराशेकडे रसिकाचे लक्ष्य वेधलें असून त्याची निराशा वैफल्याच्या भावनेतून निर्माण झाली होती असें ते सुचवू इच्छितात केशवसुताचा जोमदार आशावाद व द्रष्टेपणा याशीं विसगत अशी ही वृत्ति आहे हेंहि त्याना सुचवावयाचें असावें मागें एकदा श्री माडखोलकरानींहि केशवसुताच्यावर स्त्रैणपणाचा आरोप केल्याचें वाचकाना स्मरत असेलच या व अशा प्रकारच्या टीकालेखानी वाचकाच्या विचारास चालना मिळत असली तरी गोंधळ वाढण्याचा सभवहि अधिक असतो मला वाटतें केशवसुताचें काव्य समग्रतेनें समजून घेण्यासाठीं त्याच्या कवितेच्या एकेका अगाचा वेगवेगळा विचार न करता काव्यात प्रकट होणाऱ्या त्याच्या व्यक्तित्वाच्या मूळवृत्तीचा विचार झाला पाहिजे. केशवसुताच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून घेतल्यास त्यांच्या कवितेचे मर्म आपणास अधिक सुस्पष्टपणे कळू शकेल

युरोपीय विज्ञानवाद महाराष्ट्रात इग्रजानीं आणला, आणि त्या काळच्या ब्राह्मणसमाजाला इग्रजी शिक्षण देऊन स्वतःच्या भारतीय समाजाकडे या शास्त्रीय विवेकवादाच्या दृष्टीने पहावयास त्यांनी शिकविले व्यक्तिस्वातत्र्याच्या तत्त्वाची बैठक इहलोकनिष्ठा ही होती मानवी प्रयत्नाच्या अपार शक्तीवर आधारलेलें हें व्यक्तिस्वातत्र्याचें तत्त्वज्ञान विवेकवादाच्या मदतीनें समजून घेताच या नव्या सुशिक्षित समाजाचे डोळे खाडकन

उघडले, या दैववादी, परलोकनिष्ठ, रूढिग्रस्त, जातिभेदावर आधारलेल्या भारतीय समाजाची अतर्घटनाच पूर्णपणें बदलून टाकली पाहिजे अशी त्याची दृढ समजूत झाली जुन्या आणि नव्याचा प्रचंड संघर्ष अशा रीतीनें सुरू झाला घोर रूढिनिष्ठ अशा समाजाला डिवचलें असल्यामुळें हा लढा अतिशय निकराच्या स्वरूपाचा झाला व्यक्ति आणि समाजात, व्यक्ति आणि कुटुंबात, पिता आणि पुत्रात, स्त्री आणि पुरुषात असा हा लढा सर्वत्र व सर्व क्षेत्रात होता सुमारें शभर वर्षे हा लढा सतत आणि अत्युग्र स्वरूपात चालत राहिला

ही सुशिक्षित मंडळी ब्राह्मणच असल्यामुळें त्याना हा लढा घरीं आणि दारीं दोन्ही ठिकाणी करावा लागला हिंदु–ब्राह्मण कुटुंबांतील स्त्रीची दशा ही दासीहूनहि निकृष्ट दर्जाची असल्याचें त्याना आढळून आलें, आणि स्त्रीदास्य-विमोचन हें त्याचे पहिले कर्तव्य ठरले तसेच जातिभेद हा माणुसकीला काळिमा फासणारा आहे हें कळून चुकल्यामुळे तोहि नष्ट करणें हें त्याना आपलें आद्य कर्तव्य वाटले समाजाच्या रूढीवर घणाचे घाव घालून त्याला नुसतें जागवून काय उपयोगाचें? त्याला नवे ज्ञानहि दिले पाहिजे व त्याच्या आधारावर त्याला स्वत चें जीवन बदलविण्यास शिकविलें पाहिजे परतु तसें करण्यास परतंत्र भारतात वाव मिळणें अशक्य होतें. म्हणून भारताला स्वातत्र्य मिळवून दिलें पाहिजे ही प्रबळ इच्छाहि तत्कालीन सुधारकाच्या मनात वास करू लागली आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्वातत्र्य मिळविणें हें आपलें परम कर्तव्य होय या नव्या जाणिवेने भारलेल्या नवशिक्षित वर्गानें जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मोठ्या हिरीरीनें स्वमतप्रतिपादनार्थ संघर्ष करण्यास आरंभ केला. सर्वारभीं सामाजिक सुधारणाकडे या वर्गाचें लक्ष वेधलें जाणें साहाजिकच होतें. म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या चरणापासून विसाव्या शतकाच्या पहिल्या चरणापर्यंत रूढिग्रस्त भारताचे सरंजामी संबंध तटातट तोडून टाकण्यासाठी मोठ्या अटीतटीच्या लढाया देण्यात आल्या

आणि मराठी ब्राह्मण समाज या संघर्षामध्ये पूर्णपणे घुसळून निघाला त्या युगाच्या मानवकल्याणासंबंधीं सर्वोच्च मूल्यानीं अनेक लोक भारले गेले; म्हणून महाराष्ट्रानें त्या काळात एकाहून एक बरचढ नररत्नें निर्माण केलीं केशवसुत हे त्यापैकीच एक होते. केशवसुतानी नवचैतन्यानें मळसळणाऱ्या अशा महाराष्ट्रात जन्म घेतला होता.

या उलट, दुसऱ्याहि प्रकारची घडामोड मराठी समाजांत होत होती ती म्हणजे पांढरपेशा वर्ग दुभंगत होता सर्वस्वाचा त्याग करून समाजहितार्थ झटावें असें ज्याप्रमाणें अनेकाना वाटत होतें त्याचप्रमाणें शिकून चांगलीशी नोकरी मिळवून सुस्थिर आयुष्य घालवावें असेंहि शेंकडा नव्वद टक्के लोकाना वाटत असे इंग्रजी शिक्षणानें समाजक्रांति करणें जसें शक्य होतें तसेंच तें शिक्षण घेऊन उत्तम तऱ्हेनें चरितार्थ चालविणेंहि शक्य होतें तसें व्हावें अशी इंग्रजाचीहि इच्छा होतीच तशीच आर्थिक परिस्थितीहि उदयाला येत होती या नव्यानें सुस्थिर होऊं पाहणाऱ्या मध्यम वर्गाची स्वतःचीं अशीं मूल्यें तयार होत होती व्यवहारात हुशार, चार-चौघात वजन पाडणारा, शिकून वरचा सामाजिक दर्जा मिळविणारा तरुण साहजिकच आदर्श समजला जात होता निव्वळ मानवी सद्गुणाना एकदर व्यवहारात गौणत्व येणें साहजिकच होते अतिशय दारिद्र्यात राहून आईबाप, मुलगा पुढें कमावता होऊन दारिद्र्य दूर करील या एका आशेवर मुलाना शिकवूं लागले मुलें भराभर शिकून नोकऱ्या पटकावूं लागली वरिष्ठाशी नमून व इमानदारीनें वागूं लागली, इंग्रजधार्जिणी मनोवृत्ति आत्मसात् करूं लागलीं, म्हणूनच ती एकदर समाजकारणाकडे मोठ्या उदासीनतेनें पाहूं लागलीं शहाणा - व्यवहारवाद बाळगणारा मध्यम वर्ग जसजसा स्थिर होऊं लागला तसतशी त्याच्यात आणि समाजसुधारकाच्या झुंजार तुकडींत फारकत पडूं लागली। या मध्यमवर्गीयाच्या दृष्टीनें हे सुशिक्षित क्रांतिकारी वेडेपीर ठरले असल्यास नवल नाही.

नव्या सुधारकाची ही नवी तुकडी आणि शहाणा मध्यम वर्ग यांच्यात मोठीच तफावत पडली असली पाहिजे सुधारकानी इंग्रजाकडून विवेकवाद घेतला नवीं व्यक्तिमुक्तीचीं मूल्यें घेतलीं, तर शहाण्या मध्यम वर्गानें त्याच विचारसरणींतून भोगवाद घेतला, व इंग्रजधार्जिणेपणा स्वीकारला. नवसुधारकानें नवज्ञानाच्या प्रकाशात स्वत चे जीवन बघून त्याला बदलण्यासाठी हिरीरीनें, मनस्वीपणानें विचारात, आणि आचारात बदल घडविण्यास सुरुवात केली, तर नोकरपेशा मध्यमवर्गानें अलिप्तपणाची, धडजोडीची, सुवर्णमध्याची वृत्ति स्वीकारली व मवाळपणाला 'युक्तायुक्त-विवेकाचे स्थान देऊन गौरविले. अशा रीतीने इंग्रजी शिकून तयार झालेल्या मध्यम वर्गाला दोन फाटे फुटले त्यांचे मार्ग परस्परविरुद्ध झाले

आणि हे नवशिक्षित सुधारक मध्यमवर्गाचेच असल्यामुळे त्याचे अस्तित्व त्या समाजाला डोळ्यातील खड्यासारखें बोचत असे नवध्येयानें भारलेल्या त्यागी तरुणाच्या कुटुंबातील आणि समाजातील लढा वर विस्तारानें सांगितलेल्या दोन मूल्यांचा, दोन वृत्तींचा, दोन दृष्टिकोणाचा लढा ठरत असे प्रत्येक नवसुधारकाला त्या लढ्याला तोंड द्यावे लागले

केशवसुत हे अशा तरुणांपैकीच एक होते त्याचा एकदर कौटुंबिक आणि सामाजिक लढा वरील दोन मूल्यांचा लढाच ठरत होता तो लढा ते फारच सच्चेपणानें, बाणेदारपणानें लढले असल्यामुळें अतिशय प्रिय अशा आप्तजनांचाहि त्याना विरोध सहन करावा लागला, व त्याची खतहि त्याना अतिशय लागून राहिली परंतु ध्येयदृष्टचा 'दुःखाचा पेला अगदीं अवश्यभावी असल्याचें त्यानीं तितक्याच निर्भय वृत्तीनें ठरवून टाकल्यामुळे तो 'डोळे मिटुनी' प्यायाचे कर्तव्यहि त्यानीं तितक्याच निर्भय वृत्तीनें ठरवून टाकलें होतें ज्याच्यावर जिवापाड प्रेम होतें त्याचाच अपेक्षाभंग करण्याचें कृत्य त्याना करावें लागल्यामुळें त्याची व्याकुळ विव्हलता जागोजाग व्यक्त होते, व त्याच्या ध्येयमार्गावरील

अशीं निरनिराळी द्वंद्वें यामुळें त्याच्या काव्यांतून उत्तम तऱ्हेनें प्रकट होतात.

कर्ते सुधारक आणि केशवसुत यांच्यामध्येंहि एक भेद होता या भेदानेंच केशवसुताची मनोवृत्ति निश्चित केली कर्त्या सुधारकाचें कार्य नजरेंत भरणारें होतें; सर्वांना जाणवणारें असे व्यावहारिक होतें त्याना अनुयायी लाभत, व त्याचा मध्यमवर्गावर दबदबा असे त्याचे कार्य चटकन दिसणारे, तात्कालिक परिणाम करणारे असे म्हणून समाजात त्याना मान्यता असे. त्याच्या मागें उभ्या असलेल्या शक्तीमुळें, त्याचा दरारा वाटत असे परतु केशवसुताचे हेंहि कार्य नव्हते. ते नजरेंत भरण्यासारखें नव्हते त्या कार्यानें अनुयायांचा पाठिंबा मिळणें फारसे शक्य नव्हतें. त्या कार्याचा परिणाम ताबडतोब दृष्टिगोचर होण्यासारखा नव्हता त्यामुळें त्यांच्या ध्येयाला व कार्याला व्यवहारी लोकाच्या दृष्टीनें किंमत शून्य होती आपल्या ध्येयामार्गाचे केशवसुत एकटेच वाटसरू होते. नव मूल्याच्या ध्येयाकडे त्यांनाहि चालायचें व [illegible]नें होतें आणि त्याबद्दल त्यांना सपूर्ण उपेक्षाच सहन

करावयाची होता.

केशवसुताचे ध्येय होतें काव्य करणे, नवें काव्य करणें, सपूर्ण समाजाला पुढे नेईल असा नवसदेश देणारें काव्य करणें, साध्या माणसाच्या तीव्र अनुभूतीना उत्कटतेने वाचा फोडील असे काव्य करणे, आणि त्या दृष्टीनें समाजाच्या गर्भातून फुटू पाहणाऱ्या चैतन्य-लोळाशी त्याना एकजीव व्हावयाचे होतें हेंच त्याचें ध्येय असल्यामुळे आणि या ध्येयाच्या महानतेची त्याना पूर्ण कल्पना असल्यामुळे वाट्याला येणारी सर्व उपेक्षा व उपहास सहन करावयाची त्याची पूर्ण तयारी होती. म्हणूनच ते मध्यमवर्गीय समाजात राहूनहि एकटेच होते---भ्रमिष्ट होते

कल्लोळांच्या क्षोभें गर्जत आहे
त्या सागरतीरीं उभा गडे मी आहें !

केशवसुताच्या कवितेंत 'गर्जणाऱ्या सागराच्या तीरी ते उभे आहेत' ही जाणीव जशी दिसून येते, तशीच त्याचा एकाकी-पणाहि मनाला खोलवर जाणवतो त्याच्या विषण्ण काव्यात त्याचा सपूर्ण एकाकीपणा प्रकट झाला आहे ते दिवाळीत गिरणातीरावर एकटेच जाऊन बसतात, काळोख्या रजनीत हृदयी खती बाळगून ते विमनस्कपणें एकटेच रस्त्यावरून हिंडत असतात, मध्यरात्रींच्या एकातात घुबडाची सोबत त्याना आवडते कारण 'वाटे मनुजाचा कटाळा, दु:ख करित बैसणें आवडे, जेथे राहे अधार' अशी त्याची मानसिक दशा असते आणि पुष्पाची सुकुमारता पाहून

सौकुमार्य तव अजुनी राहे
हसतचि आहे हास्य तुझे हे
परि मम भाळी ढग अश्रूचा--हाय डवरलाहे !

अशी त्याची स्थिति झालेली आहे आणि या आत्यतिक निराश कवितामधून कल्लोळाच्या क्षोभानीं गर्जणाऱ्या सागर-तीरावर कवि एकटाच उभा आहे असे दिसून येतें ।

आणि खरोखरच केशवसुत एकाकी होते ते ज्या समाजांत राहत होते तो 'औचित्याचा फोल विवेक बाळगणारा' शहाणा-व्यवहारवादी समाज होता. केशवसुतानी त्या समाजाकडून कसलीहि अपेक्षा केलेली नव्हती कुटुबातील सर्व मडळी भराभर बरच्या पदावर पोचत असूनहि केशवसुतानीं तिकडे दुर्लक्ष केले समाजात बसून स्वत चा एक फोटोहि त्यानीं कधींच काढून घेतला नाही, कारण त्या मर्दांच्या दृष्टीनें केशवसुत कुचकामाचे, पैसा न कमविणारे, स्वाभिमानाला मुळींच मुरड न घालणारे, नेहमींच स्वत च्या एका विशिष्ट पातळीवर रहाणारे व त्यांच्या प्रत्येक दोषाकडे अतिशय चिकित्सक दृष्टीनें पहाणारे असे असावेत त्यामुळें त्यानी त्याची गणना भ्रमिष्टात केली असणें साहजिकच होतें. आणि अशा स्वाभिमानाला दुखविणाऱ्या आप्तेष्टाच्या समाजापासून दहा हात दूर राहणें केशवसुताना क्रमप्राप्तच होतें

आणि येथें राहणेंहि कवीला जड वाटावे अशी त्याची मन:स्थिति नेहमी होत असल्यास नवल काय ?

(मलाही या पृथ्वीवरिल गमतें गे जड जिणें
(इथें या दु खातें सतत मनुजाला दडपणें
(इथे न्याय–स्थानीं अनय उघडा स्वैर फिरतो
(नरालागीं येथें नरच चरणाही तुडवितो ! !)

आणि अशा वेळीं—

आजवेरी बहु मनोभग झाले। बहुत आशाचे प्राण निघुन गेले
तया शोचाया निर्जनात जावें। एकतारी छेडीत मीं बसावें

अशी निर्जनवासाची कधीं कधी इच्छा होत असणें साहाजिकच आहे आणि याबाबत कवीनें थोडीशी स्वत वर टीकाहि करून घेतली आहे

अस्मदीय हृदयीं ठरलें की। जग हें दुखें भरलें
म्हणुनी सुदरतेला ही। कुसे अम्हा दिसती पाही

(केशवसुताचा हा एकाकीपणा, ही निराशा त्यांनीं जाणूनबुजून, डोळे उघडे ठेवून पत्करली होती. त्याचा जीवनसघर्ष सदोदित जिवत होता हें सिद्ध करणारा हा एकाकीपणा होता ) सच्चा माणूस भाडवलशाही समाजरचनेंत एकाकीच राहतो आणि भारतात भाडवलशाही स्वातत्र्याचे निशाण घेऊन अवतरली नव्हती, तर गुलामगिरीचा गळफास हातात घेऊन आली होती गुलामींत आनद मानणाराना केशवसुताचा ध्येयवाद उपहास करण्यालायक वाटला असणे स्वाभाविक आहे आणि उद्याचे दिव्य स्वप्न हृदयात वागविणारा कलावत अशा समाजात एकाकी न राहिला तरच नवल !

तेव्हां केशवसुताचा एकाकीपणा हा त्याच्या ध्येयवादांतून उद्भवणारा सुस्पष्ट परिणाम होय

केशवसुताच्या एकाकीपणाच्या अनुषगानें त्याच्या कविविषयक कल्पनेकडे वळणें आवश्यक आहे. केशवसुताच्या दृष्टीनें वस्तूना कवीच्या स्पर्शानें सौंदर्य प्राप्त होतें, सर्व मूल्यें जिवत ठेवणारा

कवीच, तो नसेल तर जिणें कवडीमोलावर विकेल सर्व साधारणांना जें व्यर्थ वाटतें त्यातूनच कवि अर्थ शोधून काढील, शब्दशक्तीची तरफ घेऊन जग उलथून देऊन बंड करणारा कवीच; कोणत्याहि महान् ध्येयाला प्रभावी करणारा व पुढील पिढ्यांना युगाच्या स्फूर्तीचा साक्षी राहू शकणारा कवीच, आणि 'भविष्यवाद' वर्तविणारा देखील कवीच केशवसुतांचा कवित्वाचा आदर्श एवढा उत्तुंग होता आणि तो स्वतःच्या काव्यांतून साकार करण्यासाठीं त्यांनीं अक्षरशः जिवाचें रान केले) त्या काळच्या उत्तुंग सामाजिक ध्येयाप्रमाणें हेंहि महान् ध्येयच होतें आणि या ध्येयाप्रीत्यर्थ वाट्याला येणारी निराशा व अपेक्षाभंग हाहि त्याच दर्जाचा समजला पाहिजे कारण त्यामधून असेंच उत्कट महान् व्यक्तिमत्त्व प्रकट होतें

कवितेची आराधना करताना केशवसुतांना कधीकधी अगदीच हताश एकाकी वाटत असल्यास नवल नाही आपल्या हातून कविता-निर्मिति होऊ शकेल की नाही याबाबत त्यांना कधी कधी फारच संशय वाटे. ते म्हणत–

हीन दीन झालों फंदी मी तुझिया नादीं
त्यामुळें परी न मनाला घालितों कधिंहि विषादीं
बूज तुवां या दासाची केली गे नाही अजुनी
दुःख हेंच वाटे, म्हणुनी गातसे अशी गाऱ्हाणी

केशवसुतांची अपेक्षा होती ती हीच !

केशवसुतांचे वैयक्तिक गाढ मित्रत्वाचे संबंध केवळ याच ध्येयवादाच्या आधारावर होऊ शकत असत हें ज्यांना अमान्य असे अशा उपहास करणाऱ्याशीं सुज्ञपणें वागणे केवळ अशक्य होतें त्यांचा लहान भावावर मोठा लोभ, पण त्याच्याकडून त्यांची अपेक्षा पहा–

'बापू ! गड्या ध्वज उभा धरशील काय ?
तूं देशकारण करूं झटशील काय ?
बापू ! जनांत दिवटी धरशील काय ?
स्वातंत्र्य–देव मनसा भजशील काय ?

मित्राच्या खोलीवर गेले तेव्हां खोलीला कुलूप होतें तो नसल्याचें पाहून त्यांना फार दुःख वाटलें, व त्यांची परस्पर मैत्री डोळ्या-समोर साक्षात् उभी झाली ही मैत्री कशा प्रकारची होती ? ते दोन ध्येयासाठीं तळमळणारे जुळे आत्मे होते। त्यांनीं एकत्र बसून अत्यंत उत्कटतेनें ध्येयें पाहिलीं होतीं तीच त्याच्या मैत्रीचा दुवा तें सारें सारें त्याच्या डोळ्यासमोर उभें झाले ते म्हणतात—

देशाविषयीं गोष्टी बोलत येथें
बसलों विसरुनि कितीकदा निद्रेतें
श्वासीं अमुचे श्वास मिळाले तेव्हा
अश्रूमध्यें अश्रु गळाले तेव्हा
तेव्हा आम्हीं म्हटलें ही ऱ्हासाची
रजनी केव्हां विरून जाइल साची
स्वतंत्रतेची पहाट येईल
उत्कर्षाचा दिन केव्हां सुचवील ?

आणि—

कोठें असशिल आता मित्रा माझें ?
करीत असशिल काय काय तीं काजें
देशासाठीं शरीर झिजवायाला
स्फूर्ती आणित असशिल का कोणाला !

ही त्याची मित्राकडून अपेक्षा होती

आम्हा डोळे नसति बघण्या पारतन्त्र्यामुळें हो !
ऐकायाला श्रुतिहि नसती पारतन्त्र्यामुळें हो !

अहोरात्र अशा तळमळीनें वागणाऱ्या कवीच्या वैयक्तिक व्यावहारिक आकांक्षा असतील असें सिद्ध करण्याला कोठेंहि पुरावा सापडत नाहीं त्यांनीं व्यवहारी जगाची पर्वाच कधीं केली नाहीं—

छंद फंद उच्छृंखळ अमुचे स्तिमित जगाला कळू द्या
काठोकाठ भरू द्या पेला फेस भराभर उसळू द्या !

अशीच त्यांची अत्यंत निधडी वृत्ति होती. त्यांची निराशा म्हणजे ध्येयमार्गावर चालतांना होणारी निराशा ! 'मला कीर्ति

मिळाली नाहीं, मला संपत्ति मिळाली नाहीं, मला मान मिळाला नाही' म्हणून रडणारी ती निराशा नव्हती आपली दुर्दशा होणार हें काय त्याना माहीत नव्हतें ? पण या दुर्दशेमधूनच काव्यौघ निघतील अशी त्यांना खात्री होती त्यानी स्पष्टच म्हटलें आहे–

वाणीचे कवि–दुर्दशामधुनिया ते ओघ यावे जसे

कवीनें दुर्दशेचें व्रत अंगीकारलेंच पाहिजे. दुःखाचा पेला प्यालाच पाहिजे कारण बुडाशीं अतिशय मौल्यवान् अनुभवाचा गाळ असतो ना ? तो काव्यात अमृताचें स्वरूप धारण करतो. केशवसुतांच्या काव्यात ही डोळस वृत्ति अगदी सर्वत्र दिसते म्हणूनच ते—

पूजितसे मी कवणाला ? तर मी पूजी अपुल्याला

असें अहंकाराने म्हणू शकतात, आणि प्रीतीसमोर—

पुष्पीं या प्रीति असे
ती 'मी' पण हाणितसे
परविषयीं तन्मयता प्रेरिते उरीं
ने दृष्टि अतरीं

असा अत्यंत नम्र व सखोल अनुभव लिहू शकतात. आणि वरील दोन्ही उताऱ्यांमध्यें तफावत नसून त्याच्या मागें एक एकजिनसी व्यक्तित्व उभें आहे हें मार्मिकांना सांगणें नलगे

अशा या अत्यंत नम्र परंतु माणुसकीचा दृढ अहंकार बाळग-णाऱ्या कवीच्या निराशेमधून तुतारी, शूर शिपाई, काठोकाठ भरू द्या पेला, नैर्ऋत्येकडील वारा, म्हातारी, गोफण, ह्या व ह्यासारख्या अनेक अजरामर कविता निर्माण होऊ शकत होत्या भविष्याचाहि वेध घेणारी तशी प्रतिभा महाराष्ट्रात अजून जन्माला यावयाची आहे नवें काव्य केल्यामुळे रूढिपूजका-कडून होणारा उपहास, व्यवहारीपणाला दूर लोटल्यामुळें होणारी निंदा व स्वतःच्या या वृत्तीमुळें मातापितरे व स्वकीयाना होणाऱ्या दुःखाबद्दल वाटणारी हळहळ व समाजाकडून उपेक्षा अशा तिहेरी आक्रमणांतून अगदीं निःशब्दपणें परंतु अत्यंत बाणेदारपणें मार्ग

काढीत वाटचाल करून मराठी भाषेला अमोल काव्य देणाऱ्या या कवीची खरी प्रकृति समजून त्या दृष्टीनेच त्याच्या 'धिकार या जगी इच्छित न मिळे कांहीं' या व अशासारख्या ओळींचा अर्थ लावला पाहिजे तरच कवीला न्याय होऊ शकेल, त्याची निराशाहि अत्यत स्फूर्तिप्रद होऊ शकेल

या लेखाकात केशवसुताच्या निराशेपुरताच त्याच्या व्यक्तित्वाचा विचार करणें शक्य झालें आहे त्याच्या कवितेच्या निरनिराळ्या पैलूचा विचार करून अनेक नवीन तथ्यें हातीं लागण्याचा सभव आहे परतु तो विचार पुढील एखाद्या लेखावर ढकलणेच भाग आहे त्याच्या निराशेबाबत एवढें आणखी म्हणता येईल की अत्यत निराशमय अनुभवामधूनहि केशवसुताची--

तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजीं

ही अनुभूति जन्म पावत असे

* * *

श्री श्री. वा गद्रे, ( काव्यविहारी ) सांगली

# ८ : माझे गुरु केशवसुत

आधुनिक काव्याचे कुलगुरु कै केशवसुत याना मी गुरुस्थानीं मानीत आलों असून मी स्वत:ला त्याचा सांप्रदायी म्हणवितों सामान्यत अश्रद्धेच्या सद्य काळात गुरु, शिष्य, सप्रदाय वगैरे शब्द म्हणजे बुवाबाजीचाच काहींतरी प्रकार आहे असें वाटण्याचा सभव आहे पण मी ज्या काळात काव्यलेखनाला सुरुवात केली त्या काळात ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिकाना त्या त्या क्षेत्रांत गुरुस्थानीं मानण्याची प्रथा सर्रास रूढ होती आणि ही गुरुभक्ति जाहीर रीतीनें प्रकट करण्यात कोणत्याही साहित्यिकाला कमीपणा वाटत नसे सुप्रसिद्ध मराठी नाटककार कै नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल हे कै. आण्णासाहेब किर्लोस्कराना गुरुस्थानीं मानीत असत आणि आपल्या सगीत नाटकातील नांदीच्या पद्यात त्यानीं ही गुरुभक्ति अनेक ठिकाणीं व्यक्त केली आहे. अगदीं शेवटीं देवलानीं लिहिलेल्या सशयकल्लोळ नाटकातील नांदीच्या एका पद्यात देवलानीं स्वत ला " बलवत्पदनत " म्हणविलें आहे कै कविवर्य गोविंदाग्रज व कै कविश्रेष्ठ केशवसुत याच्या काव्य-प्रकृतींत बरीच भिन्नता आहे. फक्त समाजातील दुष्ट रूढि आणि अन्यायकारक चालीरीती यांविषयी लिहिलेल्या कवितांत गोविंदा-ग्रज हे केशवसुतांचे अनुयायी वाटतात. गोविंदाग्रजाची दसरा ही कविता त्याना केशवसुतांच्या तुतारीवरून सूचलेली होती असें वाटते आणि या कवितेंत गोविंदाग्रजानीं स्वत ला केशवसुताचा " सच्चा चेला " म्हणविले आहे. गडकऱ्यानीं आपलीं नाटकें राम गणेश गडकरी या सपूर्ण नावाने लिहिलेलीं आहेत देवल आणि

खाडिलकर या दोन ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नाटककारांबद्दल गड-कऱ्यांनीं पराकाष्ठेचा आदर व्यक्त केलेला आहे आणि कै नाट्या-साहेब कोल्हटकराना गडकरी आपले नाट्यगुरुच मानीत असत। भावबंधन नाटकातील, गडकरी यानी स्वतः लिहिलेल्या एका नादीच्या पद्यात गडकऱ्यानीं कोल्हटकराबद्दल पुढील उद्‌गार काढले आहेत

" कृपाचि ज्याची कारण केवळ मम पामर वचनानें
वदुनि त्या श्रीपादपदाप्रति धाया यश कायतिं
नव नाटकरचना। करितों सादर रसिकजना. "

कल्पनाचा कुबेर असलेल्या गडकऱ्यासारख्या श्रेष्ठ नाटककाराला आपल्या नाटकाचें असामान्य यश कोल्हटकराच्या कृपेचेंच फळ आहे असें वाटलें हें पाहण्यासारखें आहे. ही श्रद्धा आणि ज्येष्ठाबद्दलचा आदर सध्या दुर्मिळ आहे

सन १९१२ मध्यें मॅट्रिकच्या वर्गात असताना " फुलाची विनति " ही माझी पहिली कविता मी लिहिली या काळात कै नाट्याचार्य देवलाचा सहवास मला दीर्घकाळ लाभला होता यामुळें माझ्या पहिल्या कवितेची रचना स्वाभाविकपणेंच देवला-च्या वळणावर आहे नतरच्या दोन तीन वर्षांत सस्कृत काव्ये आणि नाटकें याच्या अभ्यासामुळें कल्पना व रचना या दृष्टींनी माझी कविता सस्कृतप्रचुर झाली सन १९१५ मध्ये बी ए चा विद्यार्थी म्हणून मी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात प्रवेश केला या कॉलेजच्या प्राध्यापकवर्गात त्यावेळीं कै प्रा डॉ पा दा गुणे व कै प्रा वासुदेवराव पटवर्धन याच्यासारखे रसिक व मराठीसाहित्य-प्रेमी गृहस्थ होते केशवसुताच्या कवितेचे हे दोन्ही प्राध्यापक निःसीम चाहाते होते. राजकीय मताच्या बाबतींत हे दोघेही नेमस्त असले तरी सामाजिक सुधारणेच्या बाबतीत ते कट्टर आगरकर साप्रदायी सुधारक होते त्याच्या सतत सहवासामुळें व शिकवणीमुळें माझीहि सामाजिक मतें बुद्धिवादी व रूढिभजक बनलीं. यामुळें माझ्या काव्यरचनेंतही हळूहळू सक्रमण होत जाऊन केशव-

सुताची विचारसरणी ग्रहण करण्यायोग्य अशी माझी मनोभूमिका बनत गेली याच काळात Palgrave's golden treasury Book IV यातील बायरन, वर्डस्वर्थ, शेली, कीटस्, वगैरे Romantic कवींच्या कवितेचा अभ्यास मला घडून त्यांच्या विचारसरणीनें मी भारून गेलों, आणि स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीन महान् तत्त्वांचा मी पुरस्कर्ता बनलों माझ्या कवितेंतील संस्कृतप्रचुरता नाहींशी होऊन रचना व आशय या दोन्ही बाबतीत माझी कविता वेगळ्या वळणावर गेली सन १९१७ च्या जून महिन्यात मी मुंबईच्या लॉ कॉलेजात नाव दाखल केले आणि याच सुमारास 'केशवसुताची कविता' हा कवितासंग्रह आर्यभूषण छापखान्यानें प्रकाशित केला केशवसुताचे स्नेही व सुप्रसिद्ध मराठी कादंबरीकार कै हरिभाऊ आपटे हे केशवसुताच्या कवितांचे संग्राहक होते या कवितासंग्रहाला स्वत हरिभाऊंची अगर इतर कोणाचीही प्रस्तावना जोडलेली नव्हती स्वत हरिभाऊ अशी विस्तृत व विवेचक प्रस्तावना लिहू शकले असते अगर त्या वेळीं हयात असलेले प्रा डॉ गुणे अगर प्रा पटवर्धन यांपैकी कोणीही अशी प्रस्तावना लिहिली असती असें असताना केशवसुताचा पहिलाच कवितासंग्रह कोणाच्याही प्रस्तावनेशिवाय का प्रकाशित झाला हें अद्यापही मला गूढ आहे केशवसुतांच्या कवितांची त्या काळात मी अनेक पारायणे केली आणि या अभ्यासामुळें यानंतरची माझी कविता अंतर्बाह्य केशवसुती वळणाची बनली आणि केशवसुतांना मी गुरुस्थानी मानू लागलो सन १९१८ च्या डिसेंबर महिन्यात "कै केशवसुतास" व "केशवसुतांची कविता वाचून" या दोन कविता मी लिहिल्या आणि पुढें त्या 'मनोरंजन' मासिकात प्रसिद्धही झाल्या काव्यविहार या माझ्या पहिल्या काव्यसंग्रहात या दोन्ही कविता समाविष्ट आहेत काव्यविहारमधील सन १९१७ पूर्वीच्या प्रेमकविता आणि सन १९१७ नंतरच्या 'सवाल' वगैरे केशवसुती वळणाच्या कविता पाहिल्या म्हणजे माझ्या वरील विधानाचा प्रत्यय येईल मी केशवसुत सांप्रदायी कसा झालों हें स्पष्ट व्हावें म्हणूनच मी हें वैयक्तिक स्वरूपाचें निवेदन केलें आहे

आशय, अभिव्यक्ति व रचना या तिन्ही बाबतींत पूर्वीच्या मराठी कवितेंत केशवसुतानी आमूलाग्र क्राति केल्यामुळें केशवसुत हे आधुनिक काव्याचे कुलगुरु आहेत ही गोष्ट बहुताशीं मान्य आहे बहुताशी म्हणण्याचे कारण म्हणजे केशवसुताच्या बाबतीत असे काही मत्सरी टीकाकार निघाले व अद्यापही आहेत की त्याच्या मतें केशवसुत हे थोर कवि नाहीत आगरकरी विचाराना ओबडधोबड पद्यरूप देणारे ते एक सामान्य कवि आहेत अशा दुराग्रही व मत्सरी टीकाकाराची सख्या अत्यल्प असल्यानें त्याची टीकाही उपेक्षणीय आहे सन १९१७ मध्ये केशवसुताची कविता सग्रहरूपानें प्रसिद्ध झाली, तेव्हापासून आजतागायत त्याच्या कवितेबद्दल अितकें विपुल लिहिलें गेले आहे की एवढा ऊहापोह अितर कोणत्याही आधुनिक कवीबद्दल झाला नसेल काव्यलेखनाच्या प्रारभकाळात केशवसुतानी काही सस्कृत व इग्रजी कवितांची भाषातरे व रूपातरे केली त्यापैकी Poe कवीच्या Raven कवितेचें 'घुबड' हे त्यानी केलेलें रूपातर मुळाहून सरस वठले आहे असे मत काही टीकाकारानी व्यक्त केले आहे केशवसुताच्या अनेक कवितात इग्रजी कवीचे विशेषत Romantic इग्रजी कवीचे विचार आलेले आहेत. पण ही सर्वच रूपातरे नाहींत इग्रजी कवितातील विचार आत्मसात् करून त्यामुळे मिळालेल्या बुद्धिवादी दृष्टीनें इकडील सामाजिक व राजकीय परिस्थितीचे अवलोकन करून केशवसुताच्या मनात उद्भवलेले तरग त्याच्या अशा कवितात तळमळीने व्यक्त झाले आहेत यामुळें हे विचार काव्यातील मूळ भावनाशीं मिसळून एकजीव झाल्यासारखे वाटतात केशवसुतानीं बऱ्याच निसर्गवर्णनपर कविता लिहिलेल्या आहेत पण निसर्गाच्या बाबतींत त्याची वृत्ति आग्लकवि वर्डस्वर्थ सारखी आहे बालकवीप्रमाणे ते निसर्गाशी एकरूप होऊन अगर निसर्गदर्शनानें स्वत ला विसरून निसर्गात रगून गेलेले दिसत नाहींत निसर्ग हा मानवाहून श्रेष्ठ आहे अशा भावनेनें निसर्गाकडे पाहणारे आणि निसर्गापासून काहीं बोध घेऊ इच्छिणारे असेच

केशवसुत आपणास त्याच्या बऱ्याच निसर्गवर्णनपर कवितात दिसतात बालकवि अगर टिळक याच्या इतकी केशवसुताची निसर्गप्रीति उत्कट नसून, प्रेमविषयक, तत्त्वचिंतनपर, अशा कविताची पार्श्वभूमि म्हणूनच केशवसुतानी निसर्गवर्णन केलेलें आढळतें म्हणून केशवसुताच्या काव्यसभारात निसर्गवर्णपर कवितांना महत्त्वाचें स्थान नाहीं केशवसुतानी प्रेमविषयक बऱ्याच कविता लिहिल्या आहेत आपल्या स्वतःच्या प्रेमभावना स्वतःच्या म्हणून व्यक्त करणाऱ्या काव्याचे पहिले लेखक केशवसुतच होते पण केशवसुताची प्रेमकविता स्वानुभवापेक्षां कल्पनेवरच आधारलेली असावी असें वाटतें गोष्टी घराकडिल त्या' या कवितेंत केशवसुतानी आपल्या पत्नीचा उल्लेख अगदीं शेवटी ओझरताच केला आहे हा उल्लेख पाहिला म्हणजे कै कविवर्य तांबे आपल्या संसारांत जसे रंगून गेलेले दिसतात तसे केशवसुत दिसत नाहीत. स्वतःच्या संसारापेक्षा समाजाच्या किंबहुना विश्वाच्या संसाराकडेच केशवसुताचे अधिक लक्ष दिसतें आपले (समकालीन कवि तांबे अगर नंतरचे कवि गोविंदाग्रज अगर माधव जुलियन याच्या प्रमाणें केशवसुतानी प्रेमभावनेला आपल्या कवितेंत विशेष महत्त्व दिलेले दिसत नाहीं त्याच्या काव्यात प्रेम आहे पण तें प्रेयसीचे प्रेम नव्हे, विश्वप्रेम आहे सामाजिक विषयावर केशवसुतानी बऱ्याच कविता लिहिलेल्या आहेत. अस्पृश्यता, बेकारी, स्त्रियाची परवशता, विधवावर होणारा जुलूम आणि रूढीचे प्राबल्य यावर ज्या कवितात केशवसुतानी कडाडून हल्ला केलेला आहे, त्या तुतारी, स्फूर्ति, नवा शिपाई वगैरे गाजलेल्या कविता याच विभागात आहेत अशा कवितावर आगरकराच्या विचारांची दाट छाप आहे) तथापि व्यक्तिश आगरकराचा उल्लेख केशवसुताच्या एकाही कवितेंत नाही केशवसुताच्या वरील कविता आगरकरी वळणाच्या असल्या तरी आगरकराचे विचार त्यानी फक्त पद्यमय केले असें म्हणता यावयाचें नाहीं. भोवताली समाजस्थिति पाहून केशवसुताचें मन तळमळून व उन्मळून

या सर्व कविता स्फुरलेल्या आहेत यामुळे त्यांतील आवेश उसना वाटत नाही, आतरिक जिव्हाळा हा या सर्व कवितांचा आत्मा आहे केशवसुताच्या चिंतनपर कवितात काहीं कविता गूढगुंजनपर ( Mystic ) आहेत आयुष्याच्या शेवटी शेवटीं मुळातच विरक्त व तुटक असलेली केशवसुताची वृत्ति अधिकच विरक्त झाली असावी, असें त्यानी उत्तरकालात लिहिलेल्या कवितावरून वाटतें या काळात केशवसुताची दृष्टि लौकिकाकडून अलौकिकाकडे अधिकच गेलेली आढळते विश्वाचा आधार असलेलें काहींतरी अमर व चिन्मय तत्त्व आहे, त्या चिन्मय व आनंदमय तत्त्वाचा शोध घेण्याच्या प्रयत्नात ते असावेत असे त्याच्या झपूर्झा, कोणी-कडुन कोणीकडे, व हरपलें श्रेय या कवितावरून वाटते मात्र जग हें मिथ्या आहे, संसार असार आहे, असल्या निवृत्तिपर वेदान्ताला केशवसुताच्या मनात केव्हाही थारा असावा असें वाटत नाहीं कवि, कविता व कवितेचें प्रयोजन अशा विषयावर केशव-सुतानी सुमारे चौदा कविता लिहिलेल्या आहेत त्याच्या एकूण कवितांच्या मानानें ही संख्या अवास्तव आहे व केशवसुताच्या रोगट मनोवृत्तीचे हे द्योतक आहे असे प्रा माधवराव पटवर्धनाना वाटलें, पण मला तसें वाटत नाही केशवसुतानी पूर्वीच्या मराठी कवितेंत आमूलाग्र क्रांति केली, ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे एवढी संख्या अवास्तव वाटू नये केशवसुताच्यापूर्वी मराठी कविता एका ठराविक चाकोरीतून जात होती केशवसुताच्या कवितेची वेगळीच चाल पाहून "कविता अशी असावी तशी असू नये असा उपदेश काहीं लब्धप्रतिष्ठितानी त्याना केला असण्याचा संभव आहे अशा उपदेशकाना त्यानी कविता आणि कवि या कवितेंत ठणठणीत उत्तर दिलें आहे या बाबतीत आम्ही कोण ही केशवसुताची कविता विशेष उल्लेखनीय आहे या कवितेबद्दल टीकाकाराची जितकी भिन्नभिन्न मतें व्यक्त झालीं आहेत तितकी इतर कोणत्याहि कवितेबद्दल व्यक्त झाली नसावीत, 'केशवसुत' या टीकापर ग्रंथाचे समतोल वृत्तीचे लेखक प्रा रा श्री जोग

याच्या मतें अर्थगौरव, रचनासौष्ठव आणि समुचित शब्दयोजना या तीनही बाबतीत केशवसुताच्या इतकी चागली कविता एकादी दुसरीच असेल, पण कै प्रा माधवराव पटवर्धन व श्री ग त्र्य माडखोलकर यानी याच कवितेवर टीकेचा गहजब केलेला आहे कवींचे माहात्म्य सागणाऱ्या या कवितेंत प्रा पटवर्धनाना अफाट व क्लिष्ट अत्युक्ति आढळली, तर श्री माडखोलकराना हा एक मानसिक विकृतीचा प्रकार वाटला. वरील तिन्ही विद्वानाच्या मनाची तुलना केली तर प्रा जोगाचे मनच मला ग्राह्य वाटतें आम्ही कोण या कवितेंतील आम्ही म्हणजे कृष्णाजी केशव दामले असें समजणे म्हणजे केशवसुताच्या हेतूचा विपर्यास करणें होय आम्ही हा बहुवचनी शब्द केशवसुतानी प्रतिभावान् कवि-वर्गाबद्दल वापरलेला आहे, स्वत बद्दल नव्हे भृग या कवितेंत केशवसुतानीं स्वत चा उल्लेख मी गण मात्रा जुळणारा असा केला आहे वा व पटवर्धन याना उद्देशून लिहिलेल्या कवितेंत "कविता करिता मला न येई असे विनम्र उद्गार त्यानी काढले आहेत हे उद्गारही प्रा. पटवर्धनाना अवास्तव वाटतात काही टीका-काराना या उद्गारात न्यूनगड आढळतो विनम्र वृत्तीला फाजील न्यूनगंड म्हणावयाचे तर 'तितीर्षुर्दुस्तर मोहादुडुपेनास्मि सागरम्' असें म्हणणाऱ्या कालिदासालाही न्यूनगडाची बाधा झाली होती असे म्हणावयाचें काय ? आम्ही कोण या कवितेंत केशव-सुतानी कविश्रेष्ठाची जी महती सागितली आहे त्यात अवास्तवता अगर अत्युक्ति मुळींच नाहीं रामदासानीं कवि हे आधार सकल सृष्टीशीं हे उद्गार ज्या भावनेनें काढले आहेत तीच भावना आम्ही कोण या कवितेंत व्यक्त झाली आहे. आम्ही कोण या कवितेचें सुदर रसग्रहण नागपूरच्या विदुषी टीकाकार प्रा सौ. कुसुमावती देशपाडे यानीं केलेलें 'पासग' या पुस्तकात समाविष्ट आहे याच पुस्तकात "केशवसुताच्या काव्यदृष्टीतील उत्क्रांति" हाही त्याचा लेख समाविष्ट आहे या लेखात 'आम्ही कोण' या कवितेबद्दल प्रा कुसुमावतीबाईनीं म्हटलें आहे कीं, आम्ही या

सर्वनामात कवि या सामान्यनामाबरोबर ज्याच्या अंगुलिस्पर्शानें वस्तूवस्तूला सौंदर्य प्राप्त होतें असे प्रतिभाशाली शिल्पकार, चित्रकार नि:शब्दाच्या ओसाडीत जे सुराचें, नादाचें, संगीताचें विश्व वसवतात असे संगीतकार किंवा सुर व असुर यांच्या कल्पना व श्रद्धा निर्माण करणारे व्यासवाल्मिकीसारखे आद्य ऋषि या सर्वांच्या अभिधानाची सामान्यनामे समाविष्ट आहेत व या सर्वांना वगळले तर जीवन कवडीमोल होईल, असा इषारा त्यांनी देऊन ठेवला आहे। इतका व्यापक अर्थ स्वत केशवसुतांना अभिप्रेत असेल अगर नसेल, परंतु कवीला ज्याची जाणीव देखील नसते, असे ध्वनिवैभव त्याच्या वाग्योजनेंत उमटून जाते असेही प्रा कुसुमावतीचें म्हणणें आहे हे विधान मान्य करूनही मला असें म्हणावयाचें आहे की, प्रा कुसुमावती म्हणतात तितका व्यापक अर्थ आम्ही कोण ही कविता शब्दश घेतली तरी सहज निघत नाही असा अर्थ काढावयास शब्दार्थांची अकारण ओढाताण करावी लागते ती न करता आम्ही कोण या कवितेंतील आम्ही म्हणजे कवी असाच अर्थ घेणें उचित होईल केशवसुतांचे टीकाकार कै प्रा राजवाडे, श्री वर्तक व कै प्रा माधवराव पटवर्धन यांना आम्ही म्हणजे कवि एवढाच अर्थ घ्यावासा वाटला व माझेंही मत तसेंच आहे.

**विश्वीं या प्रतिभाबलें विचरितों चोहींकडे लीलया**
**दिक्कालांतुनी आरपार अमुची दृष्टी पहाया शके**

या ओळी फक्त कवीलाच सार्थपणें लागू पडतात शिल्पकार, चित्रकार किंवा संगीतज्ञ यांना त्या लागू पडणार नाहीत " जे न देखे रवी तें देखे कवि" ही म्हण म्हणूनच पडली आहे

**पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया**
**सौंदर्यातिशया अशी वसतसे जादू करामाजि या**

या ओळीत 'पाणि' या शब्दाचा अर्थ वाच्यार्थानें हात असा न घेता पाणिस्पर्श याचा अर्थ लक्षणेनें Poetic tunes असा घेणेंच सयुक्तिक होईल 'आम्ही कोण' या कवितेंत कवि हा शब्द

केशवसुतानी कोठेच वापरलेला नाहीं हें खरें आहे तथापि स्वतः कवि असलेल्या केशवसुताना तो शब्द मुद्दाम वापरण्याची जरुरी नव्हती आणि कवि, कविता व कवितेचे प्रयोजन याबद्दल अनेक कविता लिहिणाऱ्या केशवसुताना इतर प्रतिभावंताची दखल घेण्याचे काहीच कारण नव्हतें

**फोलें पाखडितां तुम्ही निवडितों तें सत्त्व आम्ही निके**

या ओळीतील तुम्ही म्हणजे सामान्य जनता आणि आम्ही म्हणजे कवि असा अर्थ सहज घेता येतो.

**शून्यांमाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरे**
**पृथ्वीला सुरलोकसाम्य झटतो आणावया कोण ते**

या ओळीतील शून्यामाजि म्हणजे आकाशाच्या पोकळीत आणि सुराच्या वसाहती म्हणजे स्वर्ग, नंदनवन वगैरे देवाचे निवास असाच अर्थ घेणें उचित होईल सुराच्या म्हणजे tunes असा अर्थ ओढून ताणून घेण्याचें कारण नाही कारण दुसऱ्या ओळीतील सुरलोक म्हणजे खात्रीनें स्वर्ग होय आणि पृथ्वी आणि स्वर्ग याचीं तुलना केशवसुतानी अनेक कवितात केलेली आहे वा व पटवर्धन यास कवितेत केशवसुतानी स्पष्ट म्हटलें आहे कीं

**आम्हा शिकीव सुवचीं सुर व्हावयाला**
**पृथ्वीस सांग अमरावति जिंकण्याला**

यातील अमरावती म्हणजे आम्ही कोण मधील सुराची वसाहत होय यावरून पाहिले तर आम्ही कोण या कवितेंतील आम्ही म्हणजे सरळ प्रतिभावंत कवीचा वर्ग होय हे उघड आहे कोणत्याही कवितेचा अर्थ अधिक व्यापक झाला तर हवाच आहे पण कवितेंतील शब्दावरून तसा अर्थ सरळ निघाला पाहिजे शब्दाची अकारण ओढाताण करून असा अर्थ काढू पाहणें वाजवी नाही केशवसुताच्या 'स्फूर्ति' या कवितेंतही कवि शब्द कोठेच नसून आम्ही हा शब्द मात्र अनेकदा आला आहे एके ठिकाणीं केशवसुतानीं "**पद्यपवितची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे**" असें स्पष्ट म्हणून आम्ही म्हणजे कवि हेंच दर्शविलें आहे.

कारण पद्यपक्तीची तरफ कवीशिवाय कोणाच प्रतिभावताच्या हातीं असणें शक्य नाही वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की आपल्या अनेक कवितातील आम्ही हा शब्द केशवसुतानी कवि या अर्थींच वापरला असून आम्ही कोण या कवितेंतील आम्हीं शब्दही त्याच अर्थानें वापरला आहे प्रा कुसुमावतींनीं त्याचा लावलेला अर्थ हठाकृष्ट आहे, म्हणजे शब्दाची विनाकरण ओढाताण करून तो काढावा लागतो वास्तविक असे करण्याची काहींच जरूरी नाहीं कारण आम्हींचा अर्थ कवि असा घेतला म्हणजे प्रतिभावान् कवीचे माहात्म्य यथार्थपणें वर्णिता येतें आणि तेंच केशवसुताना करावयाचें होतें

सन १९२१ मध्यें श्री ग त्र्य माडखोलकर याचे ‘आधुनिक कवि पचक’ हें पुस्तक प्रसिद्ध झालें आधुनिक कवीसबधाचें विशेष परिश्रम घेऊन लिहिलेलें तें विवेचनपर असें पहिलेंच पुस्तक होतें सदर पुस्तकात केशवसुत, टिळक, विनायक, गोविदाग्रज व बालकवि या पाच प्रमुख कवीच्या काव्याबद्दल माडखोलकराचे टीकापर लेख आहेत वरीलपैकी गोविदाग्रज व बालकवि हे वस्तुतः केशव-सुताच्या नतरच्या पिढींतील कवी असून उभयताच्या काव्यरचनेला केशवसुताच्या मृत्यूनतर बहर आला होता या दोन कवीच्या ऐवजीं तांबे व चद्रशेखर या केशवसुताच्या समकालीन कवींच्या काव्या-बद्दलचे टीकालेखन माडखोलकराच्या पुस्तकात समाविष्ट होणें अधिक उचित झालें असतें. पण माडखोलकरांचे पुस्तक प्रसिद्ध झालें त्यावेळी ताबे व चद्रशेखर हे कविवर्य महाराष्ट्रीय रसिकाना विशेष परिचित नव्हते म्हणूनच त्याचा समावेश आधुनिक कवि-पचकात झाला नसावा केशवसुत, टिळक, विनायक, ताबे व चद्र-शेखर हे पहिले कविपचक घेतले तर उत्कटता, क्रातिवादित्व आणि ओजस्विता या गुणाच्या दृष्टीनें केशवसुतानाच या कवि-पंचकात पहिले स्थान द्यावे लागेल असें मला वाटतें [ताबे याच्या कवितेंतील नादमाधुर्य आणि गेयता, टिळकाच्या कवितेंतील भक्ति-वात्सल्य आणि प्रसाद, विनायकाच्या कवितेंतील ओघवती रचना,

आणि चंद्रशेखराच्या कवितेंतील गोडवा आणि पदलालित्य हे गुण केशवसुताच्या कवितेंत नाहींत हें मान्य करूनही मी असें म्हणू शकेन कीं, केशवसुताच्या कवितेंतील ओज आणि क्रांतिवादित्व हे गुण वरीलपैकी एकाही कवीत नाहीत आणि यातच केशवसुताचें श्रेष्ठत्व आहे) वरील कविपंचकापैकी केशवसुत आणि तांबे हे दोनच कवि संप्रदायप्रवर्तक असल्यानें या दोघाच्या गुणविशेषाची अधिक चर्चा करणे जरूर आहे. सुप्रसिद्ध मराठी टीकाकार प्रा श्री के क्षीरसागर यानी मुंबई येथील साहित्य संमेलनात वाचलेल्या निबंधात हे स्पष्ट केलेंच आहे कीं केशवसुत आणि तांबे हे दोन्ही कवि सौंदर्यवादी आहेत अगदीं अलीकडे लोकसत्तेंत प्रसिद्ध झालेल्या आपल्या लेखात केशवसुताना त्यानीं सौंदर्यवादाचे प्रणेते म्हणून संबोधिले आहे हें खरें असलें तरी केशवसुत आणि तांबे याच्या काव्यप्रकृति भिन्न आहेत (केशवसुत हे समाजनिष्ठ अगर विश्वनिष्ठ सौंदर्यवादी कवि असून तांबे हे आत्मनिष्ठ सौंदर्यवादी कवि आहेत ओज आणि क्रांतिवादित्व हे केशवसुताचें वैशिष्ट्य आहे, तर आत्मनिष्ठता आणि गेयता हे तांबे याचे वैशिष्ट्य आहे) केशवसुताच्या काव्यात आवेश आणि स्फोटकता आहे तशी ती तांबे याच्या कवितेत नाहीं तांबे याची कविता क्रांतिवादी नाहीं असें मी म्हणताच तांबे याच्या रुद्रास 'आवाहन' या कवितेकडे अंगुलिनिर्देश केला जाईल हे मी जाणून आहे पण कोणताही कवि एकाद्या क्रांतिवादी कवितेनें क्रांतिवादी होऊ शकत नाही. त्या कवीचा पिंडच क्रांतिवादी असावा लागतो तांबे याचा पिंड क्रांतिवादी नाहीं शिवाय तांबे याची रुद्रास आवाहन ही कविता खऱ्या अर्थानें क्रांतिवादी नाहीं असेही मला म्हणावयाचे आहे या कवितेत "रंकाला किरीट दे आणि भूपाला करटी दे" अशी मागणी रुद्राजवळ तांबे यानी केली आहे म्हणजे किरीट व करटी याच्या फक्त स्थानाची अदलाबदल त्यानी मागितली आहे भिकारी राजा झाला आणि राजा भिकारी झाला तरी राजा व भिकारी या दोन्ही संस्था राहणारच; पण ही क्रांतिच

नव्हे कुसुमाग्रजासारखा क्रांतिवादी कवि म्हणेल की राजाचे मुकुट वितळवून लोकशाहीची नाणीं पाडावीत आणि गरिबांना भरपूर अन्नवस्त्र देण्यासाठी त्याचा उपयोग करावा वर मी म्हटलेंच आहे की केशवसुत आणि तांबे या थोर कवीच्या काव्यप्रकृतीच स्वभावतः भिन्न आहेत म्हणून त्यांच्या काव्याची तुलनाच करणें योग्य नाही [तथापि तुलना करावयाची झाली तर असें म्हणता येईल कीं केशवसुताची कविता कड्यावरून उड्या घेऊन खड-काळ प्रदेशातून घोंघावत जाणाऱ्या जलौघासारखी आहे, तर तांबे यांची कविता आपल्याच गाण्यात गुग होऊन झुळझुळत जाणाऱ्या निर्मळ निर्झरासारखी आहे केशवसुताची कविता पुढे येईल त्याचा चुराडा उडवीत जाणाऱ्या प्रचंड रणगाड्यासारखी आहे तर तांबे यांची कविता गुळगुळीत डामरी रस्त्यावरून जाणाऱ्या रोल्सराईस गाडीसारखी आहे केशवसुताची कविता ऐन दुपारचा मार्तंड तर तांबे यांची कविता आल्हादक ज्योत्स्ना आहे केशवसुताची कविता रुद्राचे तांडव नृत्य आहे तर तांबे यांची कविता संगमरवरी भूमीवरील नाजुक पावलाचें सताल नर्तन आहे. केशवसुताची कविता सुवासिक केवडा आहे तर तांबे यांची कविता टपोरें जाईचे फूल आहे शोभेच्या दारूची उपमा द्यावयाची तर केशव सुताची कविता बाण अगर औटगोळ्याप्रमाणे स्फोटक आहे तर तांबे यांची कविता चंद्रज्योतीसारखी आल्हादक आहे तिच्यात सौंदर्य आहेच पण स्फोटकता नाही हे दोन्ही कवी आपापल्या परीने थोरच आहेत] फक्त त्यांची भिन्न काव्यप्रकृति दाख-विण्यासाठी वरील विवेचन मी केलें आहे

केशवसुताची कविता सन १९१७ मध्यें संग्रहरूपानें प्रकाशित झाल्यावर तिचे पहिले सहृदय टीकाकार कै प्रा डॉ पां दा गुणे हे होते डॉ गुणे यांचा परीक्षणात्मक लेख मनोरंजन मासिकाच्या आक्टोबर १९१७ च्या अंकात प्रसिद्ध झाला व या लेखामुळेच महाराष्ट्रीय वाचकांना केशवसुताच्या काव्याचा प्रथम परिचय झाला या लेखात डॉ गुणे यांनीं असें मत व्यक्त केले आहे

कीं "अफाट कल्पनाशक्ति, प्रचंड निरीक्षण, पराकाष्ठेची सहृदयता, प्रासादिक वाणी, भाषेवरील प्रभुत्व, तिला वाटेल तसे लववावयाचें सामर्थ्य व आपणाला, आपल्या देशबांधवांना सृष्टीचा, परमेश्वराचा उदात्त संदेश सांगावयाचा आहे ही दृढ भावना, ही महाकवि होण्याला लागणारी सामग्री केशवसुत यांच्यामध्यें होती" डॉ गुणे यांच्या अभिप्रायातील प्रासादिक वाणी आणि भाषेवरील प्रभुत्व या गुणांच्या बाबतीत मतभेदाला जागा असली तरी इतर गुणांच्या बाबतीत मतभेद होऊ नये यानंतर सन १९२१ मध्यें प्रसिद्ध झालेल्या आधुनिक कविपंचक या ग्रंथात श्री ग त्र्यं माडखोलकर यांनीं केशवसुतांच्या कवितेंतील काव्यगुणांची भरपूर स्तुति केलेली आहे पण याच माडखोलकरांचे मत सन १९३५ च्या सुमारास विरोधी बनलें त्यांना केशवसुत हे प्रणयपीडित व गलितोत्साह वाटू लागून त्यांनी केशवसुतांवर मानसिक विकलतेचा व विकृतीचा आरोप केला आहे श्री माडखोलकरांच्या मतपरिवर्तनाचा विस्तृत व यथार्थ परामर्श प्रा रा श्री जोग यांनीं आपल्या केशवसुत या ग्रंथात घेतलेला आहे दरम्यानच्या काळात प्रा वै का राजवाडे, रहाळकर, वर्तक वगैरे टीकाकारांनीं केशवसुतांच्या काव्याबद्दल लिहिलेले आहे या सर्वांत प्रा राजवाड्यांचें विवेचन मला तर्कशुद्ध वाटतें सन १९३१ मध्यें प्रकाशित झालेल्या ' अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक प्रथम खंड " या पुस्तकात कै प्रा माधवराव पटवर्धन यांचा केशवसुतांच्या काव्यावरील विस्तृत टीकानिबंध प्रसिद्ध झाला आहे त्यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या केशवसुतांच्या काव्यावरील टीकालेखांचा भरपूर परामर्श प्रा पटवर्धनांनीं या लेखात घेतलेला असून अत्यंत चिकित्सक पद्धतीनें केशवसुतांच्या कवितेवर लिहिलेला हा पहिलाच विस्तृत निबंध होता असें म्हणावयास हरकत नाहीं माधवरावांच्या या लेखाबद्दल प्रा सौ कुसुमावती देशपांडे यांनीं ' पासंग या पुस्तकातील ' आम्ही कोण ' या टीकालेखात म्हटलें आहे कीं "केशवसुतांविषयीं पद्धतशीरपणे गैरसमजूत

उत्पन्न करून देण्याचा प्रयत्न जर कोणी केला असेल तर तो माधवराव पटवर्धनानीं त्याचीं कारणें किंवा हेतु काहीही असोत, त्याच्या टीकेचा रोख मात्र असा वाटतो हे निःसशय " माधवरावांचा टीकालेख म्हणजे केशवसुतांविषयी गैरसमज उत्पन्न करून देण्याचा पद्धतशीर प्रयत्न होता असें मला म्हणावयाचें नाहीं कदाचित् माधवरावाचें तसे प्रामाणिक मतही असू शकेल मात्र त्याच्या केशवसुतावरील टीकालेखाविषयीं मला म्हणावेसें वाटते कीं अनेक ठिकाणीं त्याची टीका अवास्तव आहे कित्येक ठिकाणी ती कापुसपिंजी व शवच्छेदनपद्धतीची आहे आणि या सर्वच लेखात रसिकतेपेक्षा पांडित्याचाच भाग अधिक आहे. केशवसुताच्या आम्ही कोण, भृग, वगैरे कवितावरील विवेचन या दृष्टीने पाहण्यासारखें आहे प्रा पटवर्धनाच्या केशवसुतावरील सर्व आक्षेपाचा समतोल व योग्य परामर्श प्रा जोग यानीं आपल्या केशवसुत या ग्रंथात घेतलाच आहे प्रा जोगाचा हा ग्रथ त्याच्या चिकित्सक पद्धतीप्रमाणे केशवसुताच्या काव्याचे समतोल विवेचन करणारा असून पूर्वीच्या भल्याबुऱ्या सर्व टीकाचा परामर्श प्रा जोगानी त्यात घेतलेला आहे या ग्रथात मला एकच वैगुण्य आढळलें तें म्हणजे समतोलपणा राखण्याच्या भरात कित्येक ठिकाणीं आढळणारा मताच्या ठामपणाचा अभाव हें होय केशवसुताच्या अभ्यासकाला प्रस्तुत ग्रथाचें बहुमोल साहाय्य होईल एवढी भरपूर सामग्री प्रा जोगाच्या या ग्रथात ठेचून भरलेली आहे सन १९४६ मध्यें कर्नाटक प्रकाशक सस्थेनें पाच कवी हें पुस्तक प्रसिद्ध केलें या पुस्तकाला प्रा म वि राजाध्यक्ष याची सुदर व मार्मिक प्रस्तावना जोडलेली असून, केशवसुताच्या कवितापूर्वी त्याचाच काव्यपरिचयलेख आहे सदर प्रस्तावनेंत आणि परिचयलेखात प्रा राजाध्यक्षांनी केशवसुतांच्या कवितेचें योग्य मूल्यमापन केलेलें असून प्रा. माधवराव पटवर्धनासुद्धां पूर्वीच्या सर्व आक्षेपकाना समर्पक उत्तर दिलेलें आहे केशवसुताच्या काव्यावर जे योग्य, अयोग्य टीकालेख आजपर्यंत प्रसिद्ध झाले

आहेत त्या सर्वांत प्रा राजाध्यक्षांइतके केशवसुतांचें योग्य मूल्य-मापन कोणाही टीकाकारानें केलेलें नाहीं असें मला वाटतें केशव-सुतांच्या कवितेची रचना कोठें कोठें खडबडीत आहे हें माझ्या सारखा त्यांचा कट्टर सांप्रदायिकही नाकारूं शकणार नाही पण केशवसुतांच्या झुजारव तेजस्वी वृत्तीला रोगट अगर विकृत म्हणणे म्हणजे ऐन दुपारीं आपल्या प्रखर तेजानें जगाला दिप-विणाऱ्या मार्तंडाच्या किरणाना रोगट म्हणण्याइतके हास्या-स्पद आहे केशवसुतांची कविता नादमधुर नाहीं पण कड्यावरून उडी घेणाऱ्या प्रपातापासून निर्झराचें मजुळ संगीत का अपेक्षावे ? जलप्रपाताच्या रौद्र संगीतांत वेगळेंच काव्य आढळत नाही काय ? हें रौद्र संगीत ऐकता ऐकता श्रोता एकतान होऊन त्याची अपूर्झावृत्ति होतें हेंच केशवसुतांच्या कवि-तेचें श्रेष्ठत्व होय अगदी अलीकडे केशवसुतांच्या पन्नासाव्या स्मृतिदिनाच्या निमित्तानें काही टीकालेख प्रसिद्ध झाले आहेत त्यात ता ९।११।१९५५ च्या लोकसत्तेच्या अंकात श्री पंडित आवळीकर या तरुण कवीचा टीकालेख प्रसिद्ध झाला आहे कै माधवराव पटवर्धनासारख्या चोखदळ टीकाकारानें ज्या तुतारी कवितेला प्रगतीची एक आर्ष ऋचा म्हणून संबोधिलें आहे त्या तुतारी कवितेवर श्री आवळीकरानी विकृत टीका केली आहे केशवसुतांच्याच काय कोणाही कवीच्या काव्याचा फेरविचार जरूर करावा, मात्र तो करताना अवधान सुटू नये

सन १९१८ च्या डिसेंबर महिन्यात मुंबईच्या लॉ कॉलेजात विद्यार्थी असताना कै केशवसुतास ही कविता मी लिहिली ती या लेखाच्या शेवटी मुद्दाम उद्धृत केली आहे ही कविता लिहिली तेव्हा केशवसुतांचे 'सच्चे चेले' कै. कविवर्य गोविंदाग्रज हयात होते. केशवसुतांच्या निधनानंतर अनेक लहानथोर कवींनीं त्यांच्या पवित्र स्मृतीला कवितासुमनें वाहिली. खाली उद्धृत केलेली कविता लिहून मीही त्या स्मृतिपूजकांत सामील झालों खालील कविता सामान्यच आहे पण माझे गुरु केशवसुत यांच्या पवित्र-

स्मृतीला मी भक्तिभावानें वाहिलेलें तें भावपुष्प आहे आणि याच दृष्टीनें रसिकांनी या कवितेकडे पहावें अशी माझी विनति आहे.

"कै. केशवसुतास –"

जइ काळाचा पडदा पडला
आयुष्याचा अंक सपला
जनता वदली आपण मेला
वेडी जनता मर्म यातलें तिजला कळलें नाही
स्वैर वृत्तिचा आत्मा तुमचा
करि कटाळा जड देहाचा
तोडुनि टाकी पाश जगाचा
तेव्हापासुनि दिव्य तुतारी फुकत हिंडत राही.
वरुनी वरुनी जनता पाही
तिला तुतारी कळली नाहीं
गोविंदाग्रज पुढती येई
विशद करोनी दावित जगता काय तुतारी आहे
खडबडुनी जग जागें झालें
इकडे तिकडे पाहु लागलें
पुरें जगाला आता पटलें
जिथें पहावें तिथें "तुतारी" ताना छेडिन आहे
तेव्हापासुनि जनात सगळें
नवस्फूर्तिचें वारें भरले
जिकडे तिकडे काव्य पसरले
किती 'तुतारीभक्त' जाहले त्यातिल हा मी एक
कविता जों मी वाचित राही
ओळीओळींमध्यें नवाई
घडीघडीला उमगुनि येई
सतत माधुरी सेवन करितों हरपत नाहीं भूक

ज्या मार्गांतुनि आपण गेला
ज्या मार्गावरि तुमचा चेला
तोच मार्ग मी अंगिकारिला
धाष्टर्च खरोखर कृपा असू दे सदैव माझ्यावरती
दिव्य तुतारी पुढें ठेवुनी
नवस्फूर्तिनें रचुनी गाणीं
सदा जगाच्या पुढें गाउनी
चराचरातुनि अणुरेणूतुनि उठविन काव्यस्फूर्ति.

*     *     *

श्री वामन नारायण देशपांडे, खामगाव

# १ : केशवसुत : कल्पित कथांचे निर्माते

केशवसुताच्या कवितेवर आतापर्यंत अनुकूल-प्रतिकूल इतके लिहिलें गेलें आहे कीं, तिच्या संबधीं महत्त्वाचें नवीन असें सांगण्या-सारखें फारच थोडें उरलें असेल असें मला वाटतें. या लहानशा लेखांत असाच एक उरलेला, पण किरकोळ नवीन मुद्दा मांडा-वयाचा आहे.

केशवसुताच्या काव्यसंग्रहातील पुढील अकरा कविता विचारात घेण्याजोग्या आहेत. (१) स्वप्न, (२) सृष्टि, तत्त्व आणि दिव्य दृष्टि; (३) स्वर्ग पृथ्वी आणि मनुष्य, (४) फुकट दवडलेला तास, (५) दिव्य ठिणगी, (६) कल्पकता, (७) शब्दानो ! मागुते या ! (८) क्षणात नाहींसे होणारे दिव्य भास, (९) चिन्हीकरण, (१०) मूर्ति भंजन आणि (११) तहान आणि भूक आरभीं नव्हती या आकरा निरनिराळ्या छोट्या छोट्या कल्पित कथा ( Myths ) आलेल्या आहेत त्यावरून केशवसुत हे कथांचे निर्माते (Myth maker) होते, याविषयीं खात्री पटते, आणि आधुनिक मराठी कवितेच्या या युगप्रवर्तक जनकाबद्दलचा आदर दुणावतो केशवसुताच्या वरील अकरा कवितापैकी क्रमांक २ ते १० या कवितांना प्रा रा श्री जोग हे 'केशवसुत' या ग्रंथात 'रूपक' वा क्वचित् 'रूपककथा' म्हणून संबोधितात हें खरें; परंतु त्याच्या कडे-व उर्वरित दोन कवितांकडेहि- मी ज्या दृष्टीनें पहातों, त्या दृष्टीनें ते पाहतात, असें वाटत नाहीं म्हणून हे चार शब्द लिहिण्याचे मी योजलें आहे.

या लेखात 'कल्पित कथा' हा शब्दप्रयोग 'Myth' या इंग्रजी शब्दाचा मराठी पर्याय म्हणून वापरण्यांत येत आहे. इंग्रजी 'Myth'

शब्दाचें 'पौराणिक कथा' व कोणत्याहि 'कल्पित कथा' असे दोन अर्थ होतात (पहा–The Imperial Dictionary of the English Language By Dr. John Olive, Vol. III, Page 234) यापैकी दुसरा अर्थ येथें अभिप्रेत आहे. कवि हे परपरागत पौराणिक कथाचा उपयोग तर करतातच; पण कित्येक विशेष प्रतिभासपन्न कवि स्वतःच्या कल्पित कथाहि नव्यानें निर्माण करतात या कल्पित कथाचा उद्देश विशिष्ट प्रमेय, भावभावना, अनुभव–वगैरेचें सुरस रीतीनें प्रकटीकरण करणे हा असतो या कल्पित कथा नेहमींच सपूर्ण असतील असें नव्हे. कधी त्या सपूर्ण असतील, तर कधी त्याचा काही अश मात्र देण्यात आलेला असेल कल्पित कथा अखड अथवा खडित असणें हें त्या त्या कवितेंतील प्रतिपाद्य विषयावर अवलबून राहील तसेच ही कल्पित कथा सबध कवितेतून अखेरपावेतो अनुस्यूत केलेली असेल, किंवा तिचा केवळ दृष्टाता-दिकापुरताहि उपयोग केलेला असेल या ठिकाणी एक फरक दृष्टी-समोर ठेवावयास पाहिजे तो हा की, कल्पित कथा ग्रथित केलेल्या सर्वच कविता आख्यानपर (Narrative) काव्याच्या सदरात बसू शकणार नाहीत कारण, त्याचा भर कथानकावर नसून प्रमेया-दिकावर असतो

पाश्चात्याच्या काव्यसमीक्षेंत कल्पित कथा रचणाऱ्या कवीचा तो गुण आवर्जून नमूद करण्यांत येतो. येथें सहज आठवलेलें कवि-श्रेष्ठ रिल्के (१८७५–१९२६) याचे उदाहरण देतो रिल्केच्या Sonnets to Orphans या काव्याचा मूळ जर्मन भाषेवरून इग्रजी पद्यानुवाद J. B. Leishman यानीं केलेला आहे या पचावन्न सुनीतें असलेल्या काव्याच्या पूर्वार्धातील आठव्या सुनीतात Lamentation वर चेतन गुणाचा आरोप करण्यात येऊन चिमुकली खडित कल्पित कथा निर्माण केलेली आहे तिच्यावरून शेवटच्या टीपामध्यें Leishman लिहितात –

"The simpee image of Lamentation as nymph presiding over a spring is immediately extended into one of a vast

Miltonic figure, preparing, in some cosmic laboratory, a clear, hard precipitate from the waters of all human weeping ..Rilke here reveals himself as the great myth maker of modern times. . " (Page 152) रिल्केच्या 'Sonnets to Orphans' या काव्यभर 'Lamentation ची कल्पित कथा अनुस्यूत केलेली नसून फक्त एका सुनीतापुरताच तिचा आविष्कार झालेला आहे

युरोपीय साहित्यांत रिल्केपूर्वी कल्पितकथाचा वापर इतर कुणी केलेला नाही असें अर्थात्च नाही. इंग्रजी कवीपैकी उदाहरण द्यावयाचें,तर शेलेकडे अंगुलिनिर्देश करतां येईल. शेलेनें ग्रीक पौराणिक कथाचा तर सढळ हातानें उपयोग केलाच, परंतु त्याने काही स्वतंत्र कल्पित कथा देखील निर्माण केल्या आहेत एकंदरीनेंच myth बद्दल शेलेला इतके जबरदस्त आकर्षण होतें कीं, त्यापासून त्याची कित्येक भावगीतेंहि सुटलेलीं नाहींत, अशा अर्थाचे विधान एका समीक्षकानें केलेलें आहे, तें सत्यपूर्ण आहे

रिल्के व शेले यांच्या उदाहरणावरून युरोपीय साहित्यात कल्पित कथाची किती विपुल निर्मिति होते आणि त्याची तिकडे किती कदर होते, याची कल्पना येईल

मराठी भाषेंत केशवसुतांच्या आधीं कल्पित कथा निर्माण करण्याचा प्रयत्न अजिबात झाला नसेल, असे धाष्टर्याचें विधान मी करू इच्छित नाहीं किंमानपक्षी दृष्टांतादिकाचा वापर करताना तरी अशा कल्पित कथाची निर्मिति झाली असणें अगदी शक्य आहे मराठीचा पहिला युगप्रवर्तक कविश्रेष्ठ जो ज्ञानेश्वर, त्याच्या 'ज्ञानेश्वरी' त अशी स्थळे सापडण्याचा संभव आहे केशवसुतांचा आपणास जो गौरव करावयाचा आहे, तो त्यांनी मराठींत हा प्रकार पहिल्यानें आणला म्हणून नव्हे, तर त्यांनी उच्च काव्यप्रतिभेचे हेंहि अंग दुर्लक्षिलें नाही, म्हणून त्यांचा गौरव करावयाचा आहे. आधुनिक कवितेला साजेल अशाच नवीन धर्तीनें केशवसुतांनी कल्पित कथाचा उपयोग केला आहे हें उघड आहे त्यांनीं

पौराणिक कथांचाहि अनादर केला नसल्याची प्रतीति त्याच्या कचाप्रत देवयानी व राजा शतनु या कवितांवरून येईल

आरंभीं केशवसुतांच्या अकरा कवितांचा नामनिर्देश केला आहे त्यावरून असा निष्कर्ष काढायचा नाहीं की, या जातीच्या त्यांच्या एवढ्याच कविता आहेत त्यांच्या सदृश स्वरूपाच्या आणखी काहीं कविता खासच आहेत तथापि मला मात्र रुचिभेदानुसार या अकरा कविता विशेष उल्लेखनीय वाटल्या, म्हणून मीं त्या विवेचना-साठीं निवडल्या. या अकरा कविता अनुवादित नसून त्यांतील कल्पित कथांचें श्रेय सर्वस्वीं केशवसुतांकडेच जातें, असेंहि तूर्त गृहीत धरू या

प्रस्तुत अकरा कवितांपैकीं क्रमांक २ ते १० या नऊ कवितांना प्रा. जोग रूपकात्मक म्हणतात पहिली व अकरावी या कविता तशा नाहींत, तेव्हा कल्पित कथांचें रूपकात्मकता हें व्यवच्छेदक लक्षण समजतां येत नाहीं खेरीज, स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य या-सारख्या चेतनगुणाचा आरोप करण्यांत आलेल्या आधुनिक कवितांबावत साचेबदपणा असलेली रूपक वगैरेंची जुनी साहित्य-शास्त्रीय परिभाषा शक्य तोंवर न वापरलेली बरी ! पहिल्या स्वप्न या कवितेंत स्वप्नांतील का होईना, पण प्रसंग वर्णिलेला असल्यानें ती कल्पित कथा मानतां येते. अकराव्या तहान आणि भूक कवितेला 'चमत्कृतिपूर्ण कल्पना' असे प्रा जोग म्हणतात, तथापि तीहि छोटीशी कल्पित कथाच होय 'चमत्कृति' 'क्लृप्ति' इत्यादि शब्द संकुचित अर्थानें वापरून चांगल्या कवितांना सुद्धा काव्यदृष्ट्या गौण ठरविण्याची कै माधवराव पटवर्धन यांची टीकापद्धति प्रा जोग यांना मान्य नसूनहि ते क्वचित् त्यांचें, जाणून वा नेणून अनुकरण करतात हें आश्चर्य आहे !

१ स्वप्न –प्रीतीनें पंख दिल्यामुळें कवि एका ताऱ्यावर उड्डाण करतो व तेथें त्याची प्रियाहि येऊन ती परस्परास भेटतात, परंतु तारा पायाखालून निसटून जाताच स्वप्नभंग होऊन कवीला स्वतःचेच हात छातीला मिठी घातलेले दिसतात ! –या कवितेला

त्रा जोग विनोदी म्हणतात, पण ती प्रेमनैराश्य दर्शविणारी गभीर कविता वाटते.

२ सृष्टि, तत्त्व आणि दिव्य दृष्टि—मोठ्या पहाटेस कवि टेकडीवरून सृष्टिशोभा पाहत असता त्याला ' पश्यामि असा गभीर ध्वनि ऐकू आला, कवीने ' कुत्रासि ' विचारताच ' सर्व-वस्तुषु ' असें उत्तर मिळाले, नतर जवळच्या धोंड्यात कवीला सौंदर्य भासमान झाले व त्यानें त्यातून सुदर मूर्ति निर्माण केली. या कवितेंत विश्वामध्यें सर्वत्र सौंदर्य भरलेलें असून तें प्रतिभावताला गोचर होतें हे तत्त्व सांगितले आहे

३. स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य—मानवोत्पत्तीपूर्वी स्वर्ग व पृथ्वी जवळजवळ होती पृथ्वीनें आपल्या मळीपासून मानव निर्मिला, पण तो मातेशीच कृतघ्न झाल्यामुळे स्वर्ग रागावून दूर निघून गेला व तेव्हापासून पृथ्वी झुरत आहे !—मानवाच्या चुकीमुळें स्वर्ग दुरावला व तो पृथ्वीवर मानवाला पुन आणता येईल, हा या कवितेचा प्रतिपाद्य विषय होय

४ फुकट दवडलेला तास – घड्याळात पडलेल्या ठोक्या-बरोबर कवीजवळून कुणीतरी गेले त्याच्या पाठीवर ज्वालानी फुकट दवडलेला तास ही अक्षरे लिहिलेलीं होतीं, कवीला दुःख झालें, पण आशा व कविता या बहिणी जवळ येऊन त्यानी त्याला नवीन रचना करण्यास प्रोत्साहन दिलें —या कवितेंत केशवसुतानी आशेला कवितेची बहीण मानलें आहे, तेव्हा तिच्या पुरतें तरी ते आशावादी काव्याचे पुरस्कर्ते दिसतात असा निष्कर्ष काढता येतो

५ दिव्य ठिणगी—इह लोकातील अधार दूर करण्यासाठी कवि स्फूर्तीच्या यानात बसून तेजाच्या उगमाकडे निघाला त्याला एका वेदीमध्ये दिव्य चिरन्तनी ज्वाला दिसली. त्या ज्वालेनें कवीकडे एक ठिणगी धाडली, ती त्यानें हृदयात स्थापिली व तो पृथ्वीवर परत आला, कवीनें या ज्वालेसाठीं केलेल्या त्यागाची लोकांना कल्पना नाही, फार का[illegible] त्यानें पृथ्वीवर [illegible] आणलें,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. (८०९२)

त्याचाहि ते धिक्कार करतात ! —ही कविता काव्यरचनेसबंधीं आहे स्वर्गातून दिव्य ठिणगी आणण्याची कल्पना ग्रीक पुराणातील प्रॉमिथियसच्या कथेवरून केशवसुताना सुचली असावी

६ **कल्पकता**—एका दुर्गम पर्वतावर बसून देवी कल्पकता अद्‌भूत वस्त्र विणीत आहे, सूर्य—चद्राची किरणें, इद्रधनुष्य वगैरे सुदर व भव्य वस्तु तिनें त्या वस्त्रात विणल्या, नतर तेथें आलेल्या वृद्ध पृथ्वीला तिनें तें वस्त्र नेसविलें त्याबरोबर पृथ्वी म्हणाली, "आता मला वरण्यासाठीं स्वर्ग आपण होऊन येईल !"—या कवितेतील कल्पकता म्हणजे केवळ काव्यातील प्रतिभा नसून शास्त्रादिकातील सर्वच प्रकारची प्रतिभा होय, हा प्रा जोग याचा अभिप्राय यथार्थ आहे कारण, आरभींच्या केशवसुताच्या गद्य टीपेंत न्यूटन व एडिसन या शास्त्रज्ञाचा स्पष्ट उल्लेख आहे

७ **शब्दानो ! मागुते या !** — शारदेचा देव्हारा उचलून नेणाऱ्या शब्दानी तो कवि-हृदयात स्थापन केला, कवीनें कल्पपुष्पें शारदेला वाहिलीं, शब्दाच्या कूजनानें मोहून गेल्यामुळें कवीचें व्यावहारिक जगाकडे दुर्लक्ष झाले, म्हणून जगानें त्याला शाप दिला, त्यामुळे चितारनीनें कवि—हृदय तप्त होऊन गाणारे शब्द उडून गेले व देव्हारा मात्र शिल्लक राहिला, म्हणून शारदा-स्तवन करण्यासाठी कवि शब्दाना पाचारण करतो —शब्दावाचून काव्यरचना अशक्य आहे हे साधे तत्त्व या काव्यात मांडलें आहे

८ **क्षणात नाहींसे होणारे दिव्य भास**— आत्माराम वनात हिडत असता त्याला दुरून एक सुदर स्त्री दिसली, तिला मोहून तो तिच्या मागून जाऊ लागला, तेव्हा ती कुणी नवीनच असल्याचे त्याला आढळलें, तिनें त्याच्याकडे वळून पाहताच त्याचे देहभान हरपलें व ती गुप्त झाली, इतक्यात आकाची हाक ऐकून आत्माराम घरीं परतला, काहीं काळानें तो पुन. त्याच स्थळीं फिरत आला असता त्याला ही मागील गोष्ट आठवली, पण त्या सुदरीचे रूप व नाव मात्र त्याला स्मरे ना, मग तो दु खानें स्वत शीं उद्‌गारला, मी काहीं तरी सुदर पाहिलें हें खरें, पण

मला दिसलेले सर्व भास मी जर धरू शकलों, तर पृथ्वीचा स्वर्ग बनवीन!"—कवि, चित्रकार व गायक यास भासमान, होणारे सर्व सौंदर्य त्याना आपल्या कलेत ओतता येत नाहीं, या अर्थाची केशवसुताची टीप कवितेच्या आरंभी आहेच सर्व कलावंतास येणारा हा अद्‌भुत अनुभव मराठींत या कवितेमध्यें प्रथमच निवेदन केला गेला, असें म्हटल्यास तें अन्यथा ठरू नये! या दृष्टीनें या कवितेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे

९ **चिन्हीकरण**— ध्यान नामक सुंदर व निवांत कुंजाच्या दाराशी मूर्ति नामक उपवर वधू विराजत असून तिच्याबरोबर भावशर्मा आहे, मूर्ति लग्नाला फार उत्सुक आहे, तेथें कवीचा आत्मा उपाध्याय होऊन आला, त्यानें स्फूर्तिज्वालेवर जीविताचा होम करून त्या दोघाचें लग्न लावलें, पुढें त्याना जीं बालकें झालीं, तींच कवीच्या क्लृप्ती (कल्पना) व विचार होत—येथें 'मूर्ति' म्हणजे शब्द व 'भावशर्मा' म्हणजे भावना शब्द व भावना याच्या संयोगानें काव्यनिर्मिति होते हेंच 'चिन्हीकरण' होय मात्र ही काव्यनिर्मिति होण्यास कवीला आपल्या जीवितसर्वस्वाचा होम करावा लागतो! ही कविता केशवसुतानी रूपकपर करण्याचा अट्टाहास केला आहे तिच्या बोजडपणाचें इतर कारणाबरोबर हेंहि एक कारण आहे.

१० **मूर्तिभंजन**— या मूर्ति फोडून आतील संपत्ति फस्त करू; आम्ही डोंगरातील आडदांड लोक आहोंत, आम्हांला फक्त संपत्तीची चाड आहे, 'कैदाशीण' कूट प्रश्न घालून बसली असून ती आम्हाला खाऊन टाकील, तिच्या उदरात जावयाचें नसल्यानें आम्हाला हा खटाटोप करणें प्राप्त आहे, आतील संपत्तीसाठीं आम्ही मूर्ति फोडू, पण त्या जोडूनहि देऊ, आम्ही मूर्ति कधीं विकणार नाही, मूर्ति विकणारे तेच खरे चोर, हरामखोर आहेत आम्ही नाहीं! रूढीतील निर्जीवपणा नको, त्यातील उपयुक्तता तेवढी हवी, हा त्या कवितेचा वर्ण्य विषय आहे. या कवितेंतील

सोमनाथावरील स्वारीसारख्या मूर्तिभंजकाच्या स्वारीची कल्पित कथा त्याच्या भाषणाच्या द्वारां प्रकट करण्यात आली आहे

११ लहान आणि भूक– फार प्राचीन काळची गोष्ट : त्या वेळीं तहान व भूक निरनिराळीं नव्हतीं, अन्न व मुख ही एकाच ठिकाणीं होती, कामाचा विषय दूर नव्हता, कारण स्त्री व पुरुष एकाच देहात वसत होतीं; तेव्हा हात व पाय नव्हते, स्वर्ग व पृथ्वी एकत्रित होती, म्हणून दु:ख नव्हते ! जेव्हा विश्वात एकच चित् तत्त्व स्फुरत होतें व त्याला बहुविध होण्याची इच्छा झाली नव्हती, तेव्हाची परिस्थिति वर्णन करणारी ही त्रुटित कल्पित कथा आहे.

याप्रमाणे मला नमुनेदार वाटलेल्या केशवसुताच्या अकरा कवितांतील कल्पित कथा व त्यांचे प्रतिपाद्य विषय आहेत या सर्वच कल्पित कथा एकसारख्या सुंदर आहेत असे नाहीं तथापि त्यावरून कल्पित कथा रचण्याच्या केशवसुताच्या घाटणीची कल्पना येईल विशिष्ट प्रमेयादिकांचे प्रकटीकरण करण्यासाठीं समर्पक कल्पित कथा रचणे हे कार्य सोपें नसून तें केवळ प्रतिभावंतालाच साध्य होणारें आहे सृष्टि, तत्त्व आणि दिव्य दृष्टि, स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य, दिव्य ठिणगी, कल्पकता व क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास या कवितांत आलेल्या कल्पित कथासारखी सरस निर्मिति करून केशवसुतांनी याहि बाबतीतलें आपलें प्रतिभाशालित्व सिद्ध केलें आहे आधुनिक मराठी कवितेच्याच जनकाला 'कल्पितकथांचे निर्माते' ( Myth maker ) ही नवी पदवी देण्यास कुणालाहि आनंदच वाटेल

* * *

डॉ. वि म कुलकर्णी, एम् ए , पीएच्. डी , सोलापूर

# १० : केशवसुत आणि निसर्ग : कांहीं विचार

केशवसुताच्या एकूण काव्यसृष्टींत सृष्टिविषयक किंवा निसर्गविषयक कविता बऱ्याच आहेत त्या अनेक दृष्टींनी महत्त्वाच्या आहेत या त्यांच्या काव्यविभागाचे पृथक् परिशीलन अनेक टीकाकारानीं आपापल्या दृष्टिकोणातून केलेले आहे व त्यातील गुण-दोषदर्शन, विशेषतः दोषदर्शन जोरदारपणे केलें आहे 'केशवसुतानी वर्डस्वर्थसारख्या इग्रजी कवीच्या कविता वाचून तशा कविता मराठींत लिहावयास सुरवात केली निसर्गविषयक तत्त्वज्ञानहि त्यानी तिकडूनच घेतले खरे सौंदर्य निसर्गातच आढळतें, तें मानवी कृतींत सापडणें शक्य नाही हाच विचार त्या तत्त्वज्ञानात आहे केशवसुत हे निसर्गाच्या सान्निध्यात बहुधा खिन्नमनस्कच राहतात निसर्गातील वस्तूचे विविधागी सौंदर्य त्यानीं सूक्ष्मपणें अनुभविलें असें वाटत नाहीं" इ एक ना दोन अनेक आरोपाचा भडिमार केशवसुताच्या निसर्गविषयक कवितावर झालेला आढळतो परतु केशवसुतांना प्रतीत झालेले निसर्गदर्शन नेमके कसें आहे व त्याची कोणत्या स्वरूपाची प्रतिक्रिया त्याच्या कवनात प्रकटली आहे या भूमिकेवरून त्याच्या काव्याकडे पाहिलें तर वरील टीकामताइतकी घोर निराशा आपल्या पदरात पडत नाहीं. किंबहुना त्यातील काहींचा फोलपणा स्पष्टपणें ध्यानात येतो परतु हें होण्यासाठीं केशवसुतांच्या सृष्टिविषयाला प्राधान्य मिळालेल्या कवितांचें स्वरूप थोडें तपशीलवार तपासणें आवश्यक आहे

निसर्ग म्हटला की तो सुंदर असावा व साहजिकच निसर्गाविषयींची कविताहि 'सौन्दर्यपूर्ण' असावी, असा आपल्याकडे एक रूढ सकेत अनेकदां दिसतो तो सर्वस्वी बरोबरच आहे असें वाटत

नाहीं. निसर्गाला असें स्वतःसिद्ध सौन्दर्य अर्पण करणें म्हणजे, काव्यापुरतें बोलावयाचे तर, वस्तुनिष्ठ सौन्दर्यालाच फार महत्त्व देण्यासारखें आहे व्यक्तिवादी कवि हा तर विश्वातल्या सर्व चराचर वस्तूकडे स्वत च्या व्यक्तिमत्त्वातून पहातो अर्थात् त्याच्या मानसविश्वात चाललेल्या भावलहरींच्या खेळात निसर्गातील वस्तूनाहि स्थान आहे पण त्याला सदासर्वकाळ त्या केवळ सुदरच वाटाव्यात असे अपेक्षिणें चुकीचे आहे [निसर्ग म्हटला की तो सौन्दर्यानें नटलेलाच हवा अशा रूढ कल्पनेच्या दडपणाखाली कृत्रिम आनदाची कविता न रचता, त्या त्या वस्तुदर्शनाची मनावर झालेली बरीवाईट प्रतिक्रिया केशवसुत प्रामाणिकपणे व्यक्त करतात आणि यातच त्याच्या काव्याचे, निसर्गकाव्याचेंहि, मोठेंपण साठविलेलें आहे असें म्हणता येईल] कोलरिजनें निसर्गासबधी काढलेले पुढील उद्गार केशवसुताच्या बाबतीतहि सार्थ ठरणारे आहेत.

"O Lady, we receive but what we give,
And in our life alone does Nature live"

केशवसुत हे सृष्टीकडे आकर्षित होतात, सृष्टीला दिव्य व श्रेष्ठ मानतात आणि तिच्यापासून स्फूर्ति घेऊ इच्छितात हें खरेंच आहे 'उगवत असलेल्या सूर्यास' या कवितेत ते म्हणतात, 'अनुकरण करीं मी गाउनी या खगाचे ' सृष्टीपेक्षा सुदर आपणाला गाता येणार नाहीं किंवा सायसमयी ती जे मृदु उच्छ्वास सोडते तसे उछ्वास कोणा कवीच्या कन्यकेस सोडता येणार नाहीत असे त्यानीं अन्यत्र म्हटलें आहे 'एक खेडे' या कवितेंतील भावप्रकटनामागे निसर्गाविषयींची आदराची भावनाच प्रमुख आहे उच उच देवळापेक्षा सृष्टीच्या साधेपणातच देवत्वाचा साक्षात्कार होईल तिथला साधेपणा हाच सुखदायक आहे द्रव्याची लालसा, कीर्तीची हौस ही तेथें महत्त्वाची वाटणार नाहीं इत्यादि विचार या कवितेत सहजपणें प्रकट झाले आहेत तथापि उपरोक्त पूर्ववयातील कवितापेक्षाहि नतरच्या कालखडांत त्यानीं रचिलेल्या कवितांत सृष्टिविषयींच्या जिव्हाळ्याच्या भावना उत्कटपणें व्यक्त झालेल्या दिसतात

। केशवसुत हे निसर्गातल्या द्युतिसपन्न वस्तूशीं आत्मीयतेचें नातें जोडतात हें विशेष ध्यानात घेण्याजोगें आहे । अर्थात् हें नातें जोडताना ते काहीं कृत्रिम क्लृप्तीचा अवलब न करता, एखाद्या घटनेचे, एखाद्या स्वानुभूतीचे अकृत्रिम रीतीनें निवेदन करतात व त्यामुळे, कवित्वाला हानि न पोचता त्याचें विचारसत्य आपणापर्यंत येऊन पोचतें। 'दूर कोठें एकला जाउनीया' ही कविता या दृष्टीनें पाहण्याजोगी आहे एकदा एका तारकेनें आपल्याशी भगिनीचें नाते जोडल्याचा रम्य उल्लेख या कवितेंत आला आहे व कवीचे दिव्यत्व तिनें गौरवपूर्वक मान्य केल्याचेंहि सागितले आहे 'दिवा आणि तारा' या कवितेंतहि ज्ञाते, भविष्यवादी आणि कवि हे ताऱ्यासारख्या तेजस्वी वस्तूपासूनच स्फूर्ति घेतात असा उल्लेख आला आहे

जेथें ओढे वनराजी । वृत्ति रमे तेथें माझी
कारण काहीं साक्ष तिथें । मम त्या श्रेयाची पटते

असें केशवसुतानी 'हरपलें श्रेय' या कवितेंत म्हटलें आहे व या दोन चरणात त्यांच्या निसर्गाविषयींच्या दृष्टिकोणाचे सार साठलें आहे असें म्हणता येईल

'भृग'ही केशवसुताची एक महत्त्वपूर्ण कविता आहे या कवितेमध्ये केशवसुताचा सृष्टिविषयक दृष्टिकोन अधिक स्पष्ट होतो ही कविता इग्रजीमधील skylark वगैरेसारख्या काही कवितांच्या अनुकरणातून निर्माण झाली असावी असें म्हटलें गेलें आहे तथापि येथील भ्रमरस वृत्ति व उत्कट भावाभिव्यक्ति खासच लक्षणीय व स्वतत्र आहे 'गा तू गा नादी भ्रमरा । मी गणमात्रा जुळणारा' असें कवीनें म्हटलें आहे किंवा याहीपेक्षा अधिक अधिक्षेप स्वतःचा केला आहे तो खोटा किंवा कृत्रिम वाटत नाही. भृगाची आनदी वृत्ति कवीला मोठी आदर्श वाटते

असमदीय हृदयीं ठरले । कीं जन हें दुःखें भरले
म्हणुनी सुदरतेलाहि । कुसें आम्हा दिसतीं पाही

असें सरळ कारण सागूनच कवीनें भ्रमराच्या तल्लीन वृत्तीची तारीफ केली आहे. आपणाला जी इष्ट गोष्ट साधत नाही ती

भ्रमरास सांगते, यास्तवच तो त्यास म्हणत आहे की, **प्रीति चारुता आणि आनंद** याचे मधुर छंद आळवीत रहा  सृष्टीच्या अंतर्यामीं हेच *भाव मग्न* राहिले आहेत, हा सौंदर्यवादी कवीस साजेसा महत्त्वाचा विचार केशवसुत येथें सूचित करतात व आपणालाहि भृंग्याप्रमाणे वेलींमधून कलिकावरून झुलता येईल तर काय बहार होईल असा अंतरींचा भाव व्यक्त करतात  येथें कवीच्या असुखी आंतरवृत्तीचें प्रकटन उत्तम प्रकारे झाले आहे हें सारें केवळ इंग्रजी कवितेच्या अनुकरणातून निपजलें आहे असें वाटत नाहीं

सुरम्य स्थळी विहार करीत असता, तेथें प्रतीत होणाऱ्या दिव्य सौंदर्यावरील निष्ठा या कवीला आपल्या पाशांनी बद्ध करते; निसर्गरमणीय स्थळ कवीच्या मनाला पुढें जाऊं देत नाही हें कविता आणि प्रीति या कवितेंत स्पष्ट झाले आहे  उल्हासानें नाचणाऱ्या मुलांतही केशवसुतांना निसर्गसदृश दिव्यता आढळली हें पुढील दोन चरणांत सहजीं प्रकट होत आहे  ते म्हणतात–

फुलें, तारका, ते दवाचे तुषार
तशीं मुग्ध ही बालकें दिव्य फार !

अशा स्थळीं मन गुंतल्यामुळे कवीचें पाऊल पुढें पडेना  त्यावेळीं त्याच्या बरोबर असलेल्या त्याच्या मित्रानें तुला कविता सुचली म्हणून थांबलास काय, असें विचारले, तेव्हां त्याने ' प्रीती मला भुलविले–नच हालवे रे !'' असे उद्गार काढले प्रा रा श्री जोग यांनी प्रस्तुत कवितेविषयी लिहितांना असें म्हटले आहे की, ' स्वतः कवीनें प्रीतीचा अर्थ संदिग्धच ठेवला आहे ' पण एकूण कवितेचा आशय ध्यानात घेतल्यास येथें प्रीति म्हणजे त्या रमणीय स्थळाचें आकर्षण–निसर्गप्रीति–हा अर्थ अगदीं उघड आहे !

कवीची निसर्गप्रीति ' नैर्ऋत्येकडला वारा ' या कवितेंतहि दिसून येते. केशवसुतांच्या आयुष्याचीं आरंभींचीं पंधरा वर्षे कोंकणच्या रम्य वातावरणातच गेलीं  तेथील कांहीं संस्कार त्यांच्या मनावर उमटले असले पाहिजेत  या संस्काराचें प्रतिबिंब

वरील कवितेंत दिसतें. तथापि, इतर कवितांप्रमाणें येथेंहि वर्णना-करिता वर्णन मुळींच नाहीं हा कवि त्याच्या अवलोकनात येणारी प्रत्येक गोष्ट स्वत'च्या व्यक्तिमत्त्वातून पाहतो. स्वत'चा त्या गोष्टीबद्दलचा मानसिक भाव हा प्रमुख मानतो. वास्तविक सृष्टींत हा थोर कवि निजभावाची ज्योत लावतो व त्यामुळें त्याच्या काव्याला नवीन कळा प्राप्त होते हें 'नैर्ऋत्येकडचा वारा' या कवितेवरूनहि सहज पटावे या कवितेंतल्या वर्णनादिकात कांही मान्यवर टीकाकाराना अनेक काव्यदोष आढळले आहेत परतु संपूर्ण कवितेंत केशवसुताची सोज्वळ निजभावाची ज्योत सारखी तेवते आहे व तिजमुळेंच या दोषाकडे कानाडोळाच करावा असे वाटल्याशिवाय रहात नाहीं

नैर्ऋत्येकडला वारा आल्यावर कवीला साहजिकच तो ज्या आपल्या जन्मभूमीवरून वहात येतो तिची स्मृति झाली त्या स्मृतीच्या आधारें त्याचें मन मागें गेले. अर्धोन्मीलित नेत्रानी तो तिकडचें सारे विश्व पाहू लागला – त्याच्याशीं तन्मय होऊ लागला तिथले ते उच्च पर्वत आठवताच त्याना कवीनें स्वर्गापर्यंत उच्च चढणाऱ्या महात्म्याच्या मनाची उत्कृष्ट उपमा दिली (हा श्लोक उत्कृष्ट उपमेऐवजी दूरान्वयदोषासाठीच उल्लेखिला जातो!) जन्मभूमीच्या परिसराचें स्वाभाविक चित्र कवीनें पुढीलप्रमाणें अत्यत सुदर रीतीनें रेखाटलें.

जागोजाग विराजती चळजलें पाटस्थळें तीं किती,
केळी, नारळि, पोफळी, फणस ते, आंबे तिथें शोभती
पक्षी त्यावरुनी नितान्त करिती ते आपुलें कूजित,
स्वप्नीं हें बघता फिरूनी, मन हें होतें समुत्कठित

त्या रम्य प्रदेशातून येणारा तो वारा आपल्या आईवडिलांचे आशीर्वाद आपणापर्यंत आणून पोचवीत आहे अशी रम्य कल्पना पुढें आढळते प्रिय आप्त मडळी आठवताच कवीचें मन गहिवरून आले आहे पत्नीची श्वासानीं लिहिलेलीं पत्रेहि या वाऱ्याबरोबर कवीला मिळत आहेत व तिच्या मीलनसुखाच्या आठवणी

त्याच्या मनात जाग्या होत आहेत शेवटीं कवीला आपल्या गावा-जवळ पसरलेला बिस्तीर्ण समुद्र आठवतो पण तो समुद्रसुद्धां काहीं आठवणींनीं साद्र झालेला आहे। तेव्हा प्रवास करणाऱ्या बालवयातील कवीला देवतानी झोप आणण्यासाठीं गाणीं म्हटली होती, आता तशी झोप मिळेल का अशी आस व्यक्त करून कवि आताच्या निराश व व्याकुळ मनःस्थितीस साजेसा भाव शेवटी प्रकट करतो जीवित हें शोकसकुल नाटक आहे असे यावेळीं वाटत असल्यानें चिरनिद्रा लाभली तरी बरेंच असा उत्कट निराशेचा भाव कविमनात जागृत होतो या भावव्यक्तीं-तील प्रामाणिकता व जिव्हाळा रसिकमनाला जाऊन भिडतो यात नवल नाही 'सध्याकाळ' या कवितेंतहि केशवसुताची स्वतःची उदास वृत्तीच शेवटीं प्रकट झाली आहे सध्याकाळचा समय हा सर्वांना सुखी करणारा व प्रणयीजनाना विशेष उत्कंठित करणारा खरा, परतु आपण घर सोडून दूर असल्यामुळें प्रणयीजनाच्या दूरत्वामुळें आपली अशी उदास वृत्ति रहाणे स्वाभाविकच आहे अशा आशयाचे विचार कवीनें व्यक्त केलेले आहेत

'पुष्पाप्रत' ही (१८९२ सालची) कविता सृष्टींतल्या दिव्य-त्वाचें व सापेक्षतया कवीच्या अशान्त, कष्टी मनःस्थितीचे वर्णन करणारीच आहे ही कविता 'निसर्गविषयक' अशी मानून तिचा विचार करण्यापेक्षा एक स्वतत्र व कवीचा मनोभाव व्यक्त कर-णारी म्हणूनच तिचा विचार करणें युक्त आहे एक सुदरसें फूल पाहून कवीच्या मनात उसळलेले भावतरगच तिच्यात प्रमुख आहेत — एक काळ असा होता कीं जेव्हा फूल आणि कवि याची मैत्री होती तो मुग्ध माधुर्यानें भरलेला सुखाचा काळ होता आता मात्र कवीच्या भाळीं अश्रूचा ढग डवरला आहे फूल हें रम्य धुक्याच्या अद्भुत सृष्टींत आपले डोळे उघडतें, तो भास्वान् सूर्य त्याच्यावर तेजाची वृष्टि करतो, त्याचे जिणें सर्वतोरम्य आहे . परतु कवीची आजची सृष्टि मात्र याच्या अगदीं उलट झाली आहे मृत आशाच्या चितावरून त्याचें

पिशाच्च जणू भटकत आहे, त्याला शांति नाहीं. कवितेचा शेवट मोठा मार्मिक व करुणरम्य आहे आपल्या मनात जी आशा-स्वप्नें नाचत असतात त्यात तरी फुलाची सुंदर मूर्ति नित्य दिसत राहो असें कवि शेवटीं म्हणत आहे ही कविता अशा रीतीनें उत्कट भावाविष्कृति करणारी आहे तिच्यात दोष कोणासहि गवसू नये पण " स्वतःची निंदा करण्याची मनोभूमिका " घेऊन ही कविता लिहिली आहे असा शेरा तिजसबंधीं काहीं टीकाकारांनी दिला आहे व या कवितेंत प्रकट झालेल्या मनोवृत्तीला " हळवी मनोवृत्ति " असेंहि संबोधिलें आहे कविता पुढें ठेवून पाहिल्यास वरील विचार सुतराम् पटत नाहीत

प्रस्तुत संदर्भांतच उल्लेखिण्याजोगी एक कविता म्हणजे 'फुल-पाखरू' हिचा विषय 'पुष्पाप्रत' या कवितेसारखाच आहे निसर्ग आणि मानव यांच्या परस्परसंबंधाविषयीच्या कवीच्या काहीं कल्पना येथें स्पष्टपणें प्रतीत होतात कलिकावरून-फुला-वरून स्वानंदात मग्न असलेलें फुलपाखरू निर्बंध रीतीनें पुष्पपराग सेवीत हिंडत आहे, परंतु आम्ही मानवांनीं मात्र नेहमी अंधारातच रखडावे, विवंचनातच जिणें कंठावे असें चाललें आहे ! आम्ही मानव चिन्ताग्रस्त बनतों व अकालीच मृत्युमुखाकडे जातों, पण फूल हें नेहमी सौख्याच्या सृष्टींतच रहातें असा विचार केशव-सुतांनीं या कवितेंत सांगितला आहे फुलपाखराचे 'मरण' कोणी कधीं पाहिलें आहे काय ? असा सूचक प्रश्नहि त्यांनीं विचारला आहे येथे फुलपाखरू हें सौंदर्याच्या — सुगंधाच्या सृष्टीत रमणाऱ्या, रमू शकणाऱ्या जीवाचें प्रतीक आहे हे उघड आहे या कवितेच्या अन्तीच केशवसुतांच्या त्या चिरस्मरणीय ओळी आल्या आहेत—

जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे
गाणे मनात मग होय सवेंचि जागें ।
गातों म्हणूनि कवनी फुलपाखरातें
व्हायास सौख्य मम खिन्न अशा मनातें ॥

केशवसुतांच्या सृष्टिविषयक दृष्टिकोणाचा वा सृष्टिकाव्याचा अर्थ उलगडावयाचा असेल तर या चार ओळी नेहमींच ध्यानात ठेवावयास हव्यात यात त्यानीं आपले दिव्यत्वाबद्दलचे आकर्षण, रम्य वस्तूवरील निष्ठावन्त प्रेम, त्या प्रेममय स्थितीत निर्माण होणारे काव्य व तदनुषगानें खिन्न मनाला मिळणारा दिलासा याचें थोडक्यात पण उत्तम प्रकारे वर्णन केलें आहे अर्थात् त्याचे मन खिन्न असताना त्यानीं ती खिन्नता न लपविता आपला आत्मभाव प्रामाणिकपणे प्रकट केला यातच कवि म्हणून त्याची थोरवी आहे

केशवसुताचा निसर्गविषयक दृष्टिकोण स्पष्ट करताना, नेहमीं, त्याच्या 'सृष्टि आणि कवि' या कवितेचा उल्लेख करण्यात येतो व तिच्यातील विचार केशवसुताचे म्हणून उद्धृत केले जातात जीवनाचें रहस्य सृष्टींत प्रकट होतें, शोधता येतें व सृष्टीला दैवत मानणारा कवि तिच्यापासूनच स्फूर्ति घेऊन नवनवीन काव्य लिहितो असा आशय असलेली ही कविता—

प्रत्येक मेघ वरता फिरता नभात ।
एकेक शब्द लिहितो मम पुस्तकात
किंवा
पुष्पामध्ये प्रकट होय न जें जराही ।
सृष्टींत एकहि रहस्य असें न काही

इत्यादि सुभाषितवजा वचनाकरिता प्रसिद्ध आहे. तथापि हीं केशवसुताचीं मतें नसून तीं अिमर्सनचीं होत कारण The Apology या त्याच्या कवितेचें,ही कविता म्हणजे जवळ जवळ शब्दश भाषांतर आहे अर्थात् केशवसुतानीं या कवितेच्या आशयाशीं अत्यंत समरस होऊन तिचे भाषांतर केलें आहे एवढे फार तर आपणास म्हणता येईल. एरव्हीं केशवसुताचा निसर्गविषयक दृष्टिकोण 'सृष्टि आणि कवि' या कवितेपेक्षा त्याच्या वर उद्धृत केलेल्या किंवा तत्सदृश अशा कवितातूनच शोधणें उचित होईल.

* * *

प्रा म वा धोंड, एम् ए, धारवाड.

# ११ : केशवसुतांच्या काव्यांतील विसंगति !

केशवसुताच्या काव्यातील 'जगद्द्रुमाचें पिकलें पर्ण । गलित असे मी अगदीं जीर्ण' किंवा "काळोखाच्या जगामधें या । मृत आशाच्या चितावरुनिया । पिशाच्च माझें भटकत आहे—शांति नसेचि तया ।" किंवा "अमुचा पेला दुःखाचा, डोळे मिटुनी प्यायाचा" यासारखे वैरागाचे, अगतिकतेचे व हताश वृत्तीचे आणि "नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई मी आहे । कोण मला वठणीला आणू शकतो तें मी पाहे" किंवा "बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे । उडवुनि देउनि जुलुमाचे या करू पहा तुकडे तुकडे" किंवा "आम्ही नव्हतो अमुचे बाप । उगाच कां मग पश्चाताप।" यासारखे उत्साहाचे, आवेशाचे व बंडखोरपणाचे उद्गार यातील विरोध जाणवून त्याची मीमासा करण्याचा प्रयत्न अनेक टीकाकारानी केला आहे पुढील उताऱ्यावरून त्याची काहीशी कल्पना येईल

"केशवसुताच्या कविता" च्या १९३८ च्या आवृत्तींत न चि केळकर लिहितात "एक वाईट उपमा द्यावयाची तर मी असे म्हणेन की कवि हा सरळ रस्त्यानें आडमुठेपणानें दौड मारणाऱ्या गाढवासारखा नसून, धन्याबरोबर रस्त्यानें चालत असता मधून मधून बाजूच्या हिरवळीवर जाऊन क्रीडा करून बागडून परत रस्त्यावर येऊन धन्याची पाठ शिवणाऱ्या कुत्र्यासारखा आहे असें मानल्याशिवाय एकाच कवीच्या निरनिराळ्या कवितेंतून प्रकट होणाऱ्या विविध मनोवृत्तींचा ग्रथ सुसगत लावता यावयाचा नाहीं."

'केशवसुत' या ग्रथात रा श्री जोग लिहितात, "वस्तुत निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या मनोवृत्तीमध्यें निरनिराळे

उद्गार त्यांनी काढले आहेत ते तेवढ्यापुरते खरे समजावेत तेहि कित्येक वेळा काव्यपरिणामाकरिता काढलेले असतात. त्या उद्गारावरून त्यांच्या नैराश्याचा विकास अथवा त्याची वाढ कशी होत गेली, हे ठरविणें मात्र धोक्याचे आहे त्यामुळें सत्य समजेल असे नाही" 'केशवसुताच्या कवितेंतील निराशा' या महाराष्ट्रसाहित्यपत्रिकेंतील (वर्ष २५ अक १०३) लेखात भ. श्री. पडित लिहितात, "केशवसुताच्या वृत्तीत व वाणीत आरभी आरभी जो उत्साह, जो अभिनिवेश, जो आत्मविश्वास आणि जो आशावाद सचार करीत असताना प्रत्ययास येतो, तो पुढें पुढें मद मद पडत गेला आहे" "केशवसुताचे व्यक्तिमत्त्व आणि त्याची निराशा" या महाराष्ट्र साहित्यपत्रिकेंतील (वर्ष २७ अक १०८) लेखात शरच्चद्र मुक्तिबोध लिहितात, "त्याची निराशा म्हणजे ध्येयमार्गावर चालताना होणारी निराशा! मला कीर्ति मिळाली नाही, मला सपत्ति मिळाली नाही, मला मान मिळाला नाही म्हणून रडणारी ती निराशा नव्हती." केशवसुताचे स्नेही न श रहाळकर यानी तर 'भिकार या जगी। इच्छित न मिळे काही। म्हणुनी तुझे पायीं। भिक्षादेही' या पंक्ति असलेली कविता केशवसुताची नसावी अशी शका व्यक्त केली आहे (अर्वाचीन मराठी वाङमयसेवक, पृष्ठ १२८)

केशवसुताच्या काव्यातील परस्परविरोधी उद्गाराची ही जी बहुविध मीमासा झाली आहे त्यावर चर्चा करण्यापेक्षा काव्यात विसगति केव्हा व कशी निर्माण होऊ शकते या प्रश्नाचा जरा जास्त विचार करणे फायद्याचे होईल कुणाहि कवीचें समग्र काव्य म्हणजे कांही तात्त्विक विवेचनाचा ग्रथ नव्हे कीं ज्यात एका प्रकरणातील विधानाशी विरोधी विधान दुसऱ्या प्रकरणात येता कामा नये जोपर्यंत प्रत्येक कवितेंत कवि आपली अनुभूति प्रामाणिकपणें व्यक्त करीत असतो तोंपर्यंत विसगतीचा प्रश्नच उपस्थित होऊ शकत नाही परतु जेव्हा कवि शब्द, नाद, यमक, प्रास, सकेत, सप्रदाय, एखादी नवी टूम इत्यादीच्या नादीं लागून

स्वत च्या अनुभूतीशीं इमान न राखतां रचना करू लागतो तेव्हा त्याच्या काव्यात विसगति निर्माण होते ‘वाङमयीन महात्मता, या निबधात कै बा सी मर्ढेकर यानीं ‘हे काय असे होईल साशक घपापें ऊर’ या माधवजुलियन याच्या गज्जलात अशा प्रकारची विसगति उत्कृष्टपणें दाखवून दिली आहे त्या स्वरूपाची विसगति केशवसुताच्या काव्यात आढळून येत नाहीं निरनिराळ्या वेळीं लिहिलेल्या निरनिराळ्या कवितातील परस्परविरोधी उद्गार वेंचून त्यात विसगति पहावयाची ठरवली तर ‘उत्तररामचरिताच्या पहिल्या अकात,

स्नेह दया तथा सौख्य यदि वा जानकीमपि
आराधनाय लोकस्य मुञ्चतो नास्ति मे व्यथा

असे आवेशाचे उद्गार काढणाऱ्या रामाचा तिसऱ्या अकांतील,

दलति हृदय गाढोद्वेग द्विधा तु न भिद्यते
वहति विकल कायो मोह न मुञ्चति चेतनाम् ।

हा शोक किंवा

आनदी आनद गडे । इकडे तिकडे चोहिकडे
ही उल्हासाची कविता लिहिणाऱ्या बालकवीची
कोठुनि येते मला कळेना, उदासीनता ही हृदयाला
काय बोचतें तें समजेना हृदयाच्या अतर्हृदयाला

ही खिन्नता विसगत म्हणावी लागेल !

परतु या प्रकारची विसगति प्राय सर्वच चागल्या कवींत आढळून येत असता केशवसुताच्या काव्यातीलच विसगतीवर एवढी चर्चा व्हावी याला तसेच विशेष कारण आहे. केशवसुत हे मुख्यत: क्रातिकारक कवि म्हणून ओळखले जातात त्याच्या भक्ताच्या मते ते ‘समाजाच्या आचारविचारात क्राति घडवून आणणारे तत्त्ववेत्ते कवि होते ” असा कवि जेव्हा वैफल्याचे, निराशेचे, अगतिकतेचे उद्गार काढतो तेव्हा “ आपला हिरो पडला ” की काय अशा शकेनें गडबडून त्याचे भक्त “ ते त्याचे क्रीडेंतील उद्गार ! ” “ काव्यपरिणामाकरिता काढलेले उद्गार

ते, खरे नव्हेत काही ! " " त्याच्या ध्येयवादातूनच अपरिहार्य-पणें उद्भवणारी निराशा आहे ती !" किंवा " त्याची नव्हेच ती कविता!" अशा प्रकारचें दुबळें समर्थन करण्यास पुढें सरसावतात

परतु या समर्थनाची खरोखरच काहीं जरुरी नाही केशव-सुताच्या काव्यात सामाजिक जाणीव व वैयक्तिक अनुभूति असे दोन प्रवाह ठळकपणें दिसून येतात त्याच्या सामाजिक आश-याच्या कवितांना निराशेचा वा निरुत्साहाचा चुकूनहि स्पर्श झालेला नाहीं 'तुतारी' 'नवा शिपाई' 'स्फूर्ति' 'गोफण' इत्यादि सर्वच सामाजिक आशयाच्या कवितात सुसगत विचारसरणी व ऊर्जस्वल भावना व्यक्त झाल्या आहेत परस्परविरोधी उद्गार यात चुकूनहि आलेले नाहीत आणि आले असते तर ते खपलेहि नसते त्याच्या वैयक्तिक अनुभूति व्यक्त करणाऱ्या कवितात मात्र आशानिराशा, उत्साहनिरुत्साह, हर्षविषाद अशा परस्परविरोधी भावना व्यक्त झालेल्या आढळतात परतु याच कवितांचा स्वतंत्र-पणे विचार केला कीं त्यातील विरोध सहज समजू शकतो

वैयक्तिक अनुभूति व्यक्त करणाऱ्या कवितात केशवसुत मुख्यत: तीन दु खानी व्यथित झालेले आढळतात ती म्हणजे (१) प्रापचिक स्थिति (२) काव्यविषयक आणि (३) आध्यात्मिक

केशवसुताची प्रापचिक स्थिति कष्टमयच होती त्याना आर्थिक सुस्थिति कधी लाभली नाही एवढेच नव्हे तर शिक्षण व नोकरी याकरिता त्याना बडोदा, वर्धा, नागपूर, पुणें, मुबई, फैजपूर, भडगाव, धारवाड असें वणवण हिंडावे लागलें

वन न करी वणवण करितो जम कोठें नीट बसेना

असें त्यानीच आपल्या दुःस्थितीचें वर्णन केलें आहे त्यातच परीक्षेत अनेकदा आलेलें अपयश आणि 'किरकिरी' प्रकृति! मग

जन्मा येउनि मी उगा शिणविलें आई ! तुला हाय गे !
नाना भागविले तुला फुकट मी मत्पोषणी हाय रे !
वार्धक्यी सुख राहिले, विसरणें तुम्हास कोणीकडे !
झालों कष्टद मात्र—या मम शिरीं का वीज ती ना पडे ?

किंवा

आजवेरी बहु मनोभग झाले
बहुत आशाचे प्राण निघुनि गेले

यासारखे हताश उद्गार त्याच्या काव्यात मधून मधून आढळले तर त्यात अस्वाभाविक तें काय ?

त्याची काव्यविषयक दु खें दोन प्रकारचीं होती कवितासुदरी प्रसन्न होत नाही म्हणून ते बरेचदा व्याकुळ झालेले दिसतात. त्यांच्या काव्यविषयक कल्पना व अपेक्षा फार मोठ्या होत्या. त्या नेहमीच साध्य होणें शक्य नव्हतें या कारणाने ते व्यथित होत. त्याचप्रमाणे आपल्या उत्तमोत्तम कवितांचेंहि जनतेकडून योग्य तें कौतुक होत नाही या कारणानेंहि ते खिन्न होत हीं त्याची दु खें.

हाय ! हाय ! हे विफळ जिणे तव सहवासावांचुनी
निघू की निवटू मनुजातुनी ।
प्रीतिविषय तो जर का परका प्राण्याला जाहला
तयाचा जन्महेतु खुटला !

किंवा

ज्याला मी मुकलो विषाद मजला त्याचा मुळीही नसे
जें पृथ्वीवर आणिले जन तया धिक्कारिती हा ! कसे !

यासारख्या उद्गारात व्यक्त झाली आहेत.

अलौकिकाच्या ओढींतून त्यांचें आध्यात्मिक दु ख उद्भवलें आहे 'क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास' किंवा 'हरपलें श्रेय' यामुळें होणाऱ्या व्यथा या आध्यात्मिक व्यथा 'उदात्त बुद्धीला संसारात राम नसल्यामुळे लागलेली चिरतनाची ही ओढ आहे या हरपलेल्या श्रेयाचे नक्की रूप सागणें कठीण आहे परंतु त्याला ज्या अर्थी 'श्रेय' म्हटलें आहे त्या अर्थी प्रापचिक वा काव्यविषयक आकाक्षाहून तें वेगळें असावे, हें निश्चित परतु त्याबरोबर हेंहि खरें कीं तें श्रेय त्याच्या ध्येयाशीं म्हणजे काव्याशी काही सूक्ष्म सबधानी जोडलें गेलेलें आहे या त्याच्या आध्यात्मिक व्यथा

दिलें हिरण्मय
हाती मृण्मय
हा हत विनिमय
परत मला मम मिळे कसें ?
न परि हरपलें तें गवसे !

यासारख्या उद्गारात व्यक्त झालेल्या आहेत

याप्रमाणें केशवसुताची दुःखाची, वैकल्याची वा निराशेची भावना प्रापंचिक, काव्यविषयक वा आध्यात्मिक बाबतींतच व्यक्त झालेली आहे, सामाजिक बाबतीत नाही परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं त्यांना या तिन्ही बाबतीत दुःखाचाच अनुभव आला कित्येक प्रापंचिक, काव्यविषयक वा आध्यात्मिक अनुभूति अत्यंत सुखाच्याहि झालेल्या आढळून येतात प्रपंचातील कष्टात पत्नीचे प्रेम हा केशवसुतांना मोठाच विसावा होता कारण

कालें आणिक कष्टदशेनें
क्षीणत्वाला होतें जाणें
सगळ्याचेंही परी प्रीतिचा
जोम वाढतो उलटा साचा !

या प्रीतीचे गोडवे त्यांनीं विविध प्रकारें गायिले आहेत काव्य-लेखनांतहि स्वतःच्या सामर्थ्याचा साक्षात्कार त्यांना बरेच वेळा होत असे त्यातूनच आम्ही कोण ?, प्रतिभा वगैरेसारख्या तेजस्वी कविता निर्माण झाल्या आहेत

पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे,
टेंकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुनिया देऊ कसे !

यासारख्या उद्गारात त्या सामर्थ्याचा आत्मप्रत्यय व्यक्त झालेला दिसतो त्याचप्रमाणें,

आता जात असे दुरी शिथिलता अस्मत्समाजातुनी

अशी केव्हा केव्हा होणारी जाणीवहि उत्साहजनक होत असे, आणि आत्म्याची तळमळ 'हर्षखेद ते मावळले' अशा उन्मनी अवस्थेंत किंवा

चिंता भवदुःखें अवधीं दूर झालीं
अनाथाचा वाली जवळी केला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थळप्रत.
प्रा अनुक्रम. नोंद 20684 दि ..... १९...
क्रमांक ..... ना दि ..... ......

या ईश्वरभक्तीनें शांत होत असे.

याप्रमाणे वैयक्तिक अनुभूति व्यक्त करणाऱ्या त्याच्या कवितांत आशा निराशा, उत्साह निरुत्साह, हर्ष विषाद अशा परस्परविरोधी भावना व्यक्त झालेल्या असल्या आणि सुखापेक्षा दु खाच्या अनुभूति केव्हांही जास्त तीव्र असल्यामुळें निराशा, निरुत्साह व विषाद व्यक्त करणाऱ्या कविता जास्त परिणामकारक वठल्या असल्या तरी केशवसुताचा मोठेपणा हा की त्यानी आपल्या वैयक्तिक दु खाचा परिणाम आपल्या सामाजिक तत्त्वज्ञानावर होऊ दिला नाही. ज्याची प्रकृति अशक्त व अनुभव दु खी त्याचें तत्त्वज्ञानहि दुबळें व नैराश्यपूर्ण होण्याचा सभव विशेषच असतो परतु केशवसुताचे सामाजिक तत्त्वज्ञान अत्यत ओजस्वी असेंच आहे त्याच्यावर दुबळे-पणाची वा नैराश्याची एवढीशीहि छाया पडलेली नाही आपल्या दु खाची झळ आपल्या जवळच्या माणसानाहि लागू नय म्हणून

> खाणें आणि पिणें, विनोद करणें, गाणेंहि वा खेळणें,
> जैसे ज्यास रुचेल त्यापरि तुम्ही या उत्सवी वागणें,
> मी सध्यासमयी खुशाल गिरणातीरावरी बैसुनी
> कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी !

असे बाजूला सरणारे केशवसुत त्या दु खाचा परिणाम आपल्या विचारावर होऊ नये म्हणून सावध राहण्यास कसे विसरतील ? याहूनहि विशेष म्हणजे

> आमुचा पेला दु:खाचा
> डोळे मिटुनी प्यायाचा
> पिता बुडाशी गाळ दिसे
> त्या अनुभव हें नाव असे !
> फेंकुनि द्या तो जगावरी
> अमृत होऊ तो कुणातरी

अशा उदात्त विचाराने आपल्या 'मृत आशाच्या चिते' च्या प्रकाशात त्यानीं समाजाला अचूक मार्गदर्शन केलें. हीच त्याच्या परस्परविरोधी उद्गारातील सगति

* * *

श्री भ श्री पंडित, एम्. ए , अमरावती

# १२ : केशवसुतांच्या कवितेंतील निराशा

केशवसुताच्या कविताचे कालानुक्रमाच्या दृष्टीनें सूक्ष्म निरीक्षण व जागरूक परिशीलन केलें तर असें स्पष्ट दिसतें की तिच्यात आरंभापासून अंतापर्यंत दोन प्रवाह समांतर वाहात आहेत एकाचा सूर प्रोत्साहक, तर दुसऱ्याचा करुण आहे किंबहुना केशवसुताच्या वृत्तीत व वाणीत आरंभी आरंभी जो उत्साह, जो अभिनिवेश, जो आत्मविश्वास आणि जो आशावाद संचार करीत असताना प्रत्ययास येतो, तो पुढें पुढें मंद मंद पडत गेला आहे सुरुवातीस 'अशी असावी कविता म्हणून, तशी नसावी कविता म्हणून, सांगावया कोण तुम्ही कवीला, अहांत मोठे पुसतो तुम्हाला ?'–असा टेंचाचा प्रश्न करणारे केशवसुतच पुढे 'द्या उत्तेजन हो कवीस न करा गाणें तयाचे मुकें, गाण्यानें श्रम वाटतात हलके हेंही नसें थोडकें।' असे नरमाईचे उद्‌गार काढ-ताना आढळतात देवदानवा नरें निर्मिलें' असा अगोदर अभिनिवेश प्रकट करणारे केशवसुत नंतर 'प्रेमानें परमेश्वरास भजतो जो निर्मले मानसें, लोटी निर्मल सौख्यसिंधुलहरी त्याचेवरी जीवित किंवा 'केशवसुत म्हणे, देवा दीननाथा ! तुझे पायी माथा, वाहियेला' अशी श्रद्धा व्यक्त करतात 'माझ्या दुर्मुख-ल्या मुखामधुनिया चालावयाचा पुढें, आहे सुंदर तो सदा सरस-वाङ्‌निष्यंद चोहीकडे, तुम्ही नाहि तरी सुतादि तुमचे ध्यातील तो प्राशुनी' असे आधी आत्मविश्वासाचे व कालांतरानें खरे ठरलेले बोल बोलणारे केशवसुतच शेवटी 'एक शब्द बोलेन जरी, सकला कुंठित करिन तरी, अशी आगळी, परी बावळी, आहे दुबळी' असे शंकेकुशंकेचे शब्द मुखावाटें काढतात; 'काय निराशा असे बरें ?– बुजगबाहुलें जगातले' असें अधूनमधून

आपल्या मनाला बजावणारे केशवसुत अखेरच्या कवितेंत ‘ भिकार या जगी, इच्छित न मिळे काहीं’ असे निराशेचे उद्‌गार काढतात. हें असें का, याचा विचार होणे आवश्यक आहे ‘ हरपलें श्रेय ’ हें केशवसुताचें शेवटचें गीत, त्यासबधी स्पष्टीकरण करताना त्यानीं आपल्या एका पत्रात You can guess my state of mind from my piece in the last issue of मनोरजन (हरपलें श्रेय) A crab in the heart! But, alas! where is the restorative ? असे निराशेचेच उद्‌गार काढले आहेत केशवसुताच्या व्यक्तिमत्त्वाला दोन बाजू होत्या किंवा ज्या इंग्रजी कविताचा त्यानी अभ्यास केला होता त्यापासून त्यानीं हा निराशावाद उसना घेतला होता येवढ्या मीमासेनें अभ्यासकाचें समाधान होण्यासारखें नाही केशवसुत मधून मधून जीवनाकडे हताश नजरेनें का पाहात याची साधार मीमासा झाली पाहिजे येथें तसा अल्प प्रयत्न केला आहे

केशवसुताच्या अलौकिक प्रतिभेनें कवितेचे नवे नवे प्रात निर्माण केले, तुतारी, नवा शिपाई, गोफण, स्फूर्ति, निशाणाची प्रशसा इत्यादि पौरुषपूर्ण काव्यें त्यानी आपल्या ओजस्वी वाणीनें गाइलीं, नव्या युगाचें दर्शन प्रथमच त्याच्या कवितेंत झाले, आणि म्हणून ते आधुनिक कवितेचे प्रवर्तक होत याविषयी हुज्जत घालीत बसण्याचें काही कारण नाहीं परतु विवक्षित प्रकारच्या उदासीन मनोरचनेमुळे, तऱ्हेवाईक स्वभावामुळें आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे त्याच्या कवितात एक करुण कहाणी गुफली गेली आहे हेहि विसरून चालणार नाही त्याच्या जीवन-चरित्राविषयी तपशीलवार अशी माहिती फारशी उपलब्ध नाही असे म्हणण्यात अर्थ नाही. सात शतकापूर्वीच्या प्राचीन कवीच्या चरित्राचें व काव्याचे जर आस्थापूर्वक सशोधन होतें, तर मग १९०५ सालीं केवळ ५० वर्षांपूर्वी दिवगत झालेल्या, केशवसुताचें सुसूत्र व विश्वसनीय चरित्र का लिहिलें जाऊ नये ? वास्तविक केशवसुताना अवघ्या ३९ वर्षांची आयुर्मर्यादा लाभली होती, त्यानी १७ वर्षे काव्यलेखन केलें आणि त्या अवधीत केवळ १३२

कविता लिहिल्या या कविताचा त्याचे दोघे बघु कै मोरो केशव व कै सीताराम केशव दामले यानी पुरविलेल्या माहितीच्या आधारे विचार केला तर,केशवसुताच्या कवितेतील करुण विभागावर बराच उजेड पडतो मोरोपतानीं पुरविलेली माहिती १९०५ च्या काव्यरत्नावलीच्या ‘ साल अखेर ’ मध्ये ग्रथित झालेली आहे सीतारामपतानी दिलेली माहिती २ ऱ्या, ३ ऱ्या व ४ थ्या आवृत्तीच्या आरभी जोडलेली आहे

केशवसुताच्या या जीवनविषयक माहितीवरून असे दिसतें की, ते जात्याच अशक्त व किरकिरे होते केशवसुतानी आपल्या या किरकिरेपणाचा उल्लेख

देवी सागरिका ! तुम्ही तर आता तीं गायनें गाइजे
त्याच्या धुद अफूगुणें किरकिऱ्या बाळास या आणिजे
निद्रा दीर्घ–

या ओळीत केला आहे लहानपणापासूनच खेळण्याखिदळण्याकडे अगर बोलण्याभाडण्याकडे त्याची प्रवृत्ति नसे ते काहीसे एकलकोंडे, माणुसघाणे आणि वरवर पहाणारास तरी अबोल व दुर्मुखलेले दिसत ते विद्यार्थी असताना वर्गात सस्कृतचे अध्यापक कै वामन शिवराम आपटे यानी त्याना दुर्मुखलेला म्हटले त्याबरोबर त्यानी त्याना

–याचे तोड कुरूप हें विधिवशात् गाईल काव्यें नवीं
तेणे सर्वहि डोलतील जन हे हर्षें कदाचित् भुवीं ! –
विद्यासस्कृत त्या तुझ्या, क्षणभरी, मस्तिष्कतत्तूवरी
येता नम्र विचार हा तुज भला होता किती तो तरी

असा उलट टोमणा हाणला तो प्रसिद्धच आहे (पहा रत्ना. फेब्रु १९२६) केशवसुताच्या बालपणीच या उद्गारात बाणेदारपणा व आत्मविश्वास असला तरी थोडाफार सताप व दर्प आहे हें दृष्टीआड करता येत नाही या श्लोकाची भाषाच या विधानाची साक्ष देईल अशक्त माणसें सतापी असतात, हा अनुभव कुणास नाही ? केशवसुताच्या अनेक कवितात सताप आविर्भूत झाला आहे

'मुलास ओढपणाऱ्या एका पतोजीस' 'त्यानी मूर्ख, क्रूर व खाटीक अशा शेलक्या व मोजक्या शिव्या संतापाच्या भरात बहाल केल्या आहेत 'तुतारीं'तहि त्यानी क्रोधाला वश होऊन प्रतिगामी पक्षाला उद्देशून 'थु त्याचेवर जोडे हाणुनि' व 'धिक्कार अशा मूर्खालागुनि' असे तिखट उद्गार काढले आहेत तुकाराम-महाराजाच्या अभगात आणि आगरकराच्या निबधात अशा तऱ्हेचा फटकळपणा पुष्कळदा दृष्टीस पडतो तो स्वाभाविक आहे यात शका नाही परतु केशवसुताच्या कवितेविषयीं लिहिताना, उत्साह हा जो वीररसाचा स्थायीभाव, त्याऐवजीं क्रोध या क्षणिक विकारालाच चुकून उत्साह मानण्यात येतें आणि सतप्त वाणी-लाच ओजस्वी समजण्यात येतें, ही केव्हाहि भूल आहे केशव-सुताचा एकलकोंडेपणा व माणुसघाणा स्वभाव 'दिवाळी'त उघड झाला आहे ही सुदर कविता नोव्हेंबर १९०० च्या मनो-रजनात आलेली आहे तिच्यावर स्वतः केशवसुतानी शके १८२२ असा निर्देश केला आहे त्यावरून आणि वर्णनावरून हें साल सुगीचे व सणासुदींचें गेले असें दिसतें या वर्षी दिवाळीनिमित्त केशवसुताचे आप्त त्याच्याकडे एकत्रित झाले असावेत असे वाटते एका श्लोकात चिमखड्या बोबड्या 'बनी' चा उल्लेख आहे. घरात जिकडे तिकडे आनदीआनद आहे त्या आनदाची ओझरती झुळूक लागूनच कीं काय, केशवसुत

आता भार नसे कुणास, पण तो शिक्यास भारी असे
हाता काम नसे, परतु पडतें तोंडास तें फारसे
कोणा मार नसे, तरी पण शिरी तो सोगट्याच्या बसे
कोणा त्रास नसे, परतु नयना तें जागरें होतसे ।

असा काहींसा खुसखुशीत विनोदहि करतात, परतु दुसऱ्या क्षणालाच त्यांची विषण्ण वृत्ति जागृत होते आणि पुढील शब्दात ते आपली एकातप्रियता बोलून दाखवितात :—

खाणें आणि पिणें, विनोद करणे गाणेंहि वा खेळणे
जैसे ज्यास रुचेल त्यापरि तुम्ही या उत्सवीं वागणें;

मी सध्यासमयी खुशाल गिरणातीरावरी बैसुनी
कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी !

१९०२ साली केशवसुताच्या मातुश्री उज्जैन येथें मोरोपंत याच्या घरीं निवर्तल्या त्या वेळी केशवसुताचे कुटुंबीय तेथें एकत्रित झाले होते त्या सर्वांचा ग्रुपफोटो घ्यावा म्हणून केशवसुताच्या बधूनीं विचार केला परतु केशवसुत फोटो काढण्याला तयारच होत ना आमच्यासारख्याचा फोटो काढून काय करावयाचे आहे? असें म्हणून त्यानी आपल्या सर्व आप्ताच्या इच्छेला हरताळ फासला केशवसुताच्या चरित्रातील या प्रसगावरून त्याचा स्वभाव कसा तऱ्हेवाईक व माणुसघाणा होता तें दिसून येतें अलिप्तता व एकात याबद्दल बाळपणापासूनच आवड असल्यामुळे केशवसुत पुढें चिंतनशील बनले असावे

केशवसुताच्या जीवनविषयक माहितीवरून लहानपणापासूनच आनदाचा व आल्हादाचा असा काळ त्याच्या वाट्यास कधी फारसा आला नाही असें दिसतें घरच्या गरिबीमुळे पुढील अभ्यासासाठी कुमारकालातच त्याना आपले आईवडील, बहीण-भाऊ व पत्नी याना कोकणात सोडून देशावर यावें लागलें देशावर आल्यावरहि दुर्दैवाने त्याचें बस्तान एके ठिकाणीं बसलें नाही. बडोद्याहून नागपुरास आणि नागपुराहून पुण्यास असा प्रवास व त्रास त्यास सहन करावा लागला पुण्यास केशवसूत पोचले तो काळ १८८५ चा जनजागरणाचा होता केशवसुत त्यामुळें प्रभावित झाले, आणि 'दाते यास', 'गावीं गेलेला मित्र,' 'भारतीयाचे उद्गार' अशा काही देशभक्तिपर ऊर्जस्वल कविता त्यानी लिहिल्या पुणे सुटल्यावर या विषयावर केशवसुतानीं एकहि कविता लिहिली नाहीं हें लक्षात घेण्यासारखे आहे म्हणूनच बहुधा 'पुण्यप्रदेशा'तील त्याच्या 'कोणी' मित्रानें त्याच्यावर

माता ही सुजला स्वभूमि सुफला, तीच्यापरी लेकरा
खायाला पुरतें पहा नच मिळे की हाल आहे पुरा.
झाकायास तनूस वस्त्रहि न तें आता पुरेसें मिळे,
या वेळेस कसे कवे ! तुज सुचे गाणें न मातें कळे !

अशी मर्मभेदक टीका केली असावी केशवसुताचा स्वभाव विलक्षण हळवा व प्रेमळ होता असें गोष्टी घराकडील मी, सिंहावलोकन व नैऋत्येकडील वारा या कवितावरून दिसतें केशवसुताचा कुमार-काल म्हणजे आपल्या जुन्या एकत्र कुटुंबव्यवस्थेंतील स्थित्यतराचा काळ होता पोटापाण्याच्या सोयीसाठी कुटुबातील चार कर्ती माणसें चार दिशांना जाऊन विभक्त होत होती. प्रेमाचे पुराणे पाश तोडता तुटत नव्हते आणि गहन गुते सोडता सुटत नव्हते त्यात पुन्हा केशवसुताना अकालींच जबाबदारीची जाणीव प्राप्त झाली होती केशवसुताच्या काहीं कवितात दु:खाचे जे उद्गार आढळतात त्याचा उगम त्यांच्या या हळुवार वृत्तीत आणि आपल्या-वरील जबाबदारीच्या तीव्र जाणीवेत आहे शिवाय त्याचा स्वभाव मनमोकळा नसल्यामुळें आप्तात व त्याच्यात अपसमज निर्माण होत असावे व खटके उडत असावे असे वाटतें केशवसुताना मॅट्रिक व्हायलाच दोन वर्षे लागली त्याचे पाठचे बधु मोरोपत हे डेक्कन कॉलेजात 'बी ए ' त पोचले तेव्हा कुठें १८८९ सालीं केशवसुत मॅट्रिक झाले त्यानतर त्याना कॉलेजचे शिक्षण घेता आलें नाही. त्या काळच्या सामाजिक वहिवाटीला अनुसरून केशवसुताचें लग्न यापूर्वीच वयाच्या चवदाव्या वर्षी १८७४ साली झाले होतें तेव्हा त्यानी बिऱ्हाड थाटावे असा वडिलाचा लकडा त्याच्यामागें लागला परतु १८९३ साली वडील वारले तोंपर्यंत केशवसुत मुबईस एखाद्या मिशनस्कूलमध्यें, ज्ञानोदय कचेरींत अगर कमिसरिएट ऑफिसात हगामी नोकऱ्या करीत होते वडील वारल्यावर मग त्यानीं मुबईस मोठ्या कष्टानें बिऱ्हाड केलें पचवीस-तीस रुपये महावारीच्या हगामी नोकरींत केशव सुतासारख्या तीव्र जाणीवेच्या मनुष्याची कुचबणा झाली असल्यास नवल नाहीं आपण आपल्या नातलगाना हातभार लावू शकत नाही म्हणून ते मनात कुढत असावेत प्रेमळपणामुळे घराची त्याना विलक्षण ओढ होती आणि म्हणूनच त्यानी आपल्या स्वकीयाना अनुलक्षून पुढील उद्गार काढले असावेत–

तातास या बघुनिया हृदयात खातें,
होऊन हें हृदय विव्हळ सर्व जाते !
त्याचा खरोखर न मी क्षण पुत्र शोभें !
ते सर्वदा जरि म्हणे मज पुत्र लोभें !
मत्कारणें स्तवुनि देव, निजावयातें
आलीस तू खचित गे असशील माते !
मोठे त्वदीय उपकार, जरा तरी ते
जातील का फिटुनिया तव पुत्रहस्तें !
जन्मा येउनि मी उगा शिणविले आई ! तुला हाय गे !
ताता ! भागविलें तुला फुकट मीं मत्पोषणी हाय रे !
वार्धक्यीं सुख राहिले, विसरणें तुम्हास कोणीकडे !
झालों कष्टद मात्र—या मम गिरी का वीज ती ना पडे ?
बधूचीहि मला तशीं पवन हा आशीर्वचें आणितो,
चिंताग्रस्त तदीय पाहुनि मुखा अश्रूस मी गाळितों !
भाऊ रे ! तुजलागि लाविन कधी मी हातभारा निज ?
तूतें सेवुनि मी सुखें मग कधीं घेईन का रे निज ?

केशवसुताच्या ठिकाणीं सोंगढोंग नव्हतें त्यामुळें त्याचे हे आत्मपर उद्‌गारहि अतःकरणाचा ठाव घेतात परंतु या उद्‌गारात केशवसुताच्या औदास्याचे मूळ आहे हें लक्षात घेतले पाहिजे आपल्या ठिकाणच्या कमजोरपणाची आणि कमतरतेची त्याना वारंवार जाणीव होत असे आणि ते निराश होत त्याना मधून मधून आपल्या कुढेपणाचा पश्चात्तापहि होत असे, आणि म्हणूनच ते

किती घसरलो ! – किती चुकुनि शब्द ते बोललों ! –
करूनि भलतें किती पतित हत हे जाहलो !
स्वयें बहकुनी उगा स्वजनमानसें टोचिलीं ! –
वृथा स्वजनलोचनीं अहह ! आसवे आणिलीं !

असे दु:खाचे उद्‌गार आपल्या मुखावाटें बाहेर काढीत केशवसुत घरवेडे ( Home-sick ) होते घर सोडताना प्रत्येक प्रसंगीं

त्याच्या डोळयास पाणी येई कोणी साधा विरोध केला तरी देखील त्याना वाईट वाटे असे अश्रुपाताचे उल्लेख त्याच्या अनुक्रम ४, ८, १०, १५, ४२, ४९ व १०० या कवितामध्ये आले आहेत मात्र या अश्रूचा उगम प्रेमाच्या पोटीं आहे. प्रेमाच्या पाशात गुरफटलेले केशवसुत ज्यावेळी त्याची महती

पाशाविण या कोठें कांहीं नाहीं, पाशाकरिता चाले अवघें काहीं,
पाशातुनि या सुटता सुदर तारे, तेज तयाचे विझूनि जाई सारे

या प्रत्यक्ष दिसणाऱ्या दृष्टाताने वर्णन करतात त्या वेळी मनास अत्यत आनद होतो परतु ते जेव्हा

प्रीती या जगतात कटकयुता ही एक वल्ली असे,
शूलारोपणयूप त्यावरिल ही कीर्तिध्वजा की दिसे,
तेव्हा या जगतीं नकोत मजला ते भोग भोगायला,
वाटे नाटक शोकसकुल असे जीवित्व हें याजला

असे म्हणतात, तेव्हा मात्र केशवसुताच्या मनाची ठेवणच मुळीं उदासीनतेची होती असें विधान करण्याशिवाय गत्यतर राहात नाही सतापानतर अनुताप असतो, पण तो निर्भेळ शातीचा व समाधानाचा असतो केशवसुताच्या सतारीत ती आत्मशाति व ते आत्मसमाधान आहे वैतागलेल्या कवीच्या कानावर दिडदा दिडदा असे सतारीचे स्वर पडताच कवीचा सताप होतो तो स्वत चेंच वर्णन करतो

ऐकुनि ते मज जो त्वेष चढे, त्यासरशी त्या गवाक्षाकडे
मूठ वळुनि मी हात हिसकला, पुटपुटलोंही अपशब्दाला
म्हटले—आटप, आटप मूर्खा ! सतार फोडुनि टाकिसी न का?
पिरपिर कसली खुशालचदा, करिसि दिडदा दिडदा दिडदा ?

परतु पुढें त्याला 'धीर धरी रे धीरा पोटीं असती मोठीं फळें गोमटी' हा उपदेश पटतो. आणि 'तम अल्प व द्युति बहु' हा अनुभव येतो, त्यामुळें त्याचा 'अह' नाहीसा होतो, तो सारे भेद विसरतो आणि 'तो मज गमलें विभूति माझी, स्फुरत पसरली विश्वामाजी' या अनुभूतीचा आनद यथेच्छ घेतो व अशीं 'शातच

वारे शातच तारे, शांतच हृदयी झालें सारें !'' असें सागतो हा एक स्पृहणीय अपवाद वगळल्यास केशवसुताच्या कोणत्याहि कवितेंत आत्मतृप्ति व तदनुषगिक शाति व सतोष याचें दर्शन घडत नाहीं आप्ताना उद्देशून लिहिलेल्या प्रेममय कवितातहि केशवसुत हिरमुसलेले व उदास दिसतात याचे कारण त्याचा कुढा व अबोल स्वभावच होय

केशवसुतानीं मुलींना उद्देशून निजलेल्या मुलीस व फुलाची पखरण या दोन उपदेशपर कविता लिहिल्या आहेत त्यातहि त्याची दृष्टि विशुद्ध आनदाची नाहीं निजलेल्या मुलीस ते म्हणतात कीं, तुझें कौमार्य सपून तू ससारी झालीस की मग या जगात तुझी दशा अनिश्चित होईल आणि पुढें ते आपली शका 'ज्या हृया आज अजाणतेपण असे गाली तुझ्या शोभते, त्या गाली कटु जाणतेपण पुढें ओढील ना नागर !' या भयाकुल शब्दानीं प्रकट करतात त्याचप्रमाणे फुलाच्या पखरणींत ते म्हणतात कीं,

सकाळ जाइल सपून,
मग तापेल तें ऊन
मग धदे कराल,
पण, फुलें हीं विसराल ?
सुख कसे पावाल ?

तात्पर्य, केशवसुताची मानवी जीवनाकडे पाहण्याची दृष्टिच मुळीं निर्मळ व निरामय आनदाची नव्हती

१८९० ते १८९७ पर्यंत जवळ जवळ सात वर्षे केशवसुत मुबईस होते मुबईसारख्या पहिल्या प्रतीच्या शहरात जरी त्याची आर्थिक स्थिति सुधारली नाही तरी त्याना वाचनाची सामग्री मात्र भरपूर सापडली. केशवसुत अमेरिकन मिशनच्या शाळेंत मास्तर होते की काय ठाऊक नाहीं, परतु एमर्सन, एडगर पो, लाँगफेलो इत्यादि अमेरिकन कवींवर त्याचा बराच भर दिसतो एमर्सन तर त्याचा अत्यत आवडता कवि होता तुतारीची कल्पना आणि घार घरलिया प्यार जिवावर, रडतिल रडोत राडा पोरें,

गतशतकांचीं पापें घोरें, क्षाळायाला तुमचीं रुधिरें, पाहिजेत रे ! स्त्रैण न व्हा तर' ही विचारसरणी त्याना एमर्सनच्या Heroism मधील पुढील विचारावरून सुचली असावी :–

We have a great many flutes and flageolets, but not often the sound of any fife. The violation of the laws of nature by our predecessors and our contemporaries are punished in us also Unhappily, no man exists who has not on his own person become to some amount, a stock-holder in the sin, and so made himself liable to a share in the expiation

केशवसुताच्या कवितेंत गुलामगिरीच्या प्रथेविषयी जो तिटकारा आढळतो, ( कविता अनु० १९ पहा ) आणि मजुराविषयी व अस्पृश्याविषयीं जो जिव्हाळा दृष्टीस पडतो त्याचा वारसा मिशनकडून बहुधा आला असावा केशवसुताच्या कवितेवर सुरुवातीपासूनच इंग्रजी कवितेची पकड होती, ती मुंबईच्या मुक्कामात आणखी घट्ट बसली केशवसुताच्या कवितेंतील निसर्गासंबंधीची आत्मीयताहि अशीच इंग्रजी काव्याकडून आली आहे एकांतप्रिय केशवसुत चिंतनशील बनले हें आपण मागेच पाहिलें आहे निसर्गाच्या सान्निध्यात त्याचें हें चिंतन शब्दात साकार झालें केशवसुत वारले त्यावेळीं 'मनोरंजना'च्या मित्राना निरनिराळ्या कवींनी जी पत्रें पाठविली, त्यात रेव्हरंड टिळक यानी २९।११।०५ रोजीं असें लिहून कळविलें कीं, 'कृष्णाजी केशव दामले याच्या निधनाचें वर्तमान आपल्या पत्रावरून समजले फार वाईट वाटले माझ्या मतें आपल्यातला वर्डस्वर्थ गेला ' श्री रहाळकर यानीं आपल्या ३।१२।०५ च्या पत्रात लिहिले कीं, 'आज आमच्या महाराष्ट्राचा कीटस् गेला !' परंतु बऱ्याच नंतर लिहिलेल्या 'केशवसुत कसले मेले' या कवितेंत कै गोविंदाग्रज म्हणतात त्याप्रमाणे आपल्या निसर्गविषयक कवितात केशवसुत हे 'अवतरुनी फिरुनी गेले' असेच वाटतात वर्डस्वर्थप्रमाणें

केशवसुतांच्या निसर्गविषयक कवितात सखोल व व्यापक तत्त्वज्ञान नाही, किंवा काव्यमय नीतिशिक्षणहि नाही उलट शेलेप्रमाणें 'स्वतःची कटु जाणीव आणि तदनुषंगिक निःश्वास' मात्र आहेत 'जेथें ओढे वनराजी, वृत्ति रमे तेथें माझी, कारण काही साक्ष तिथें, मम त्या श्रेयाची पटते,' किंवा 'असे सुंदरता अढळ जरी कोठें, तर करी ती सृष्टीत मात्र वास असे केशवसुत सांगतात खरे, परंतु आपल्याच नादात गुंग असणाऱ्या 'भृंगा'ला ते 'अस्मदीय हृदयी ठरलें, की जग हें दुःखें भरलें ! म्हणुनी सुंदरतेलाहि कुसें आम्हां दिसती पाही '— असा आपला कटु अनुभव निवेदन करतात हाच अनुभव त्यांनी अन्यत्र 'अमुचा पेला दुःखाचा, डोळे मिटुनी प्यायाचा, पितां बुडाशीं गाळ दिसे, त्या अनुभव हें नाव असे', या शब्दात, किंवा 'भोगाची अवशिष्टें तुसें, घशात खुपती, लागे पिसें – या चरणात कथन केला आहे 'पुष्पा'स पाहून त्यांना आपल्या निरागस, निष्कपट निष्पाप बाल्याची आठवण येते, त्यांना वाईट वाटतें, आणि ते स्वतःच्या वाढत्या वयाची आणि चिरतरुण व 'चिररुचिर' फुलाची तुलना करूं लागतात, तों दोघातलें जमीन अस्मानाचें अंतर त्यांच्या लक्षात येतें सुंदर फुलाच्या सान्निध्यात केशवसुत 'स्वत'ला विसरत नाहीत याचें राहून राहून आश्चर्य वाटतें त्यांच्या मनाची घडणच अशी की, त्या आनंदाच्या क्षणीहि त्यांना आपल्या कष्टमय जीवनाची जाणीव कायम राहते 'काळोखाच्या जगामधें या, मृत आशांच्या चितावरुनिया पिशाच माझें भटकत राहे शांति नसेचि तया, तसें आपलें हार्दिक दुःख ते पुष्पास सांगतात, आणि 'भृंगे तुझें स्तोत्र सुरेख गाती' तेव्हां 'ऐकूनि ते सर्व पळोनि ग्वती अशी आपली मनीषा प्रकट करतात. 'मृत आशांच्या चिते'ची ही कल्पना महत्त्वाकांक्षी व मनस्वी केशवसुतांच्या मनात अगदी आरंभापासून होती असे दिसतें बालपणापासून कधीच त्यांच्या आशा आकांक्षा तृप्त झाल्या नाहींत ते सदैव अस्वस्थ, त्रस्त व भ्रांतचित्तच राहिले तेव्हां ते

तरी, स्वपथा जातात सोडूनिया,
कुणी तारे तेजस्वि फार व्हाया,
तधीं तेजाचा लोळ दिसे साचा,
परी अग्नी तो त्याचिया चितेचा

असे उद्गार काढतात, तें अगदी स्वाभाविक आहे केशवसुत आपलें एक खेडें सोडून देशावर उगीच आले नव्हते त्याना आपल्या मुखातून काव्याचा सरसवाङ्निष्यद प्रवाहित करावयाचा होता, आशेची, प्रेमाची आणि वीररसाचीं गाणी गावयाचीं होती, आणि तुतारी फुकून आपल्या बाधवाना जागृति आणावयाची होती. केशवसुतानी ही आपली कामगिरी केली खरी पण स्वत च्या हयातीत तिचा प्रभाव त्याच्या नजरेस पडला नाही आणि त्यामुळें ते हताश झाले फुलपाखरावर केशवसुत कविता लिहितात, तीहि आपल्या खिन्न मनाला तोष व्हावा म्हणून लिहितात फुलपाखराला पाहूनहि त्याना तीच आपल्या दुःखमय जीवनाची जाणीव होते ते म्हणतात की, तिमिरीं आम्ही नित्य रखडणें विवचनातचि जिणे कठणें, पण या फुलपाखराला मात्र 'उद्या' चा विचार नाही की ग्रीष्माचा कडकपणा मला सतावत नाहीं, 'आज' आणि 'उद्या' याचा विचार आम्ही करतों, 'आम्ही' तिमिरा' तून येतो आणि तिमिरात जातों,' 'आम्ही सुदरतेंत कुसें पाहतों' इत्यादि केशवसुताच्या विचारावर शेलेच्या

We look behind and after
And pine for what is not
Our sincerest laughter
With some pain is fraught
Our sweetest songs are those that
tell of saddest thought.

या सर्वश्रुत पद्यपक्तीची छाया पडलेली आहे हे उघड आहे हे विचार व्यक्त करताना केशवसुतानी, अधार, तिमिर, चिता, खत इत्यादि त्याच्या आवडीचे शेलके शब्द वापरले आहेत

त्यांपैकीं 'खती' हा शब्द तर पुढे "अनेक लेखकानीं" आपल्या लेखात वापरला आहे 'वातचक्रा' तहि केशवसुत त्रासलेले दिसतात

मीहि कशाला येथ रहावे ? काय असे ज्या मी चिकटावे ?
जगद्द्रुमाचें पिकलें पर्ण, गलित असे मी अगदी जीर्ण

असे त्रागयाचे उद्गार ते काढतात तेव्हा विशिष्ट प्रकारच्या उदासीन मनोरचनेमुळें निसर्गाच्या सान्निध्यातहि केशवसुताना विशुद्ध आनंद होत नसे असा निष्कर्ष काढल्यास तो चूक ठरेल का? केशवसुताच्या झपूर्झा, सतारीचे बोल, म्हातारी, कोणीकडून ग कोणीकडे व हरपलेलें श्रेय या पाच कविता तात्त्विक आहेत. यापैकी पहिल्या दोन कविता अपवादभूत म्हणून सोडल्यास बाकीच्या तिन्ही कवितात केशवसुताची वृत्ति औदास्याचीच आहे सतारीत अभेदाच्या जाणिवेनें 'अणूहूनी थोकडा, तुका ब्रह्मांडा-एवढा' ही संतप्रणीत अनुभूति कशी आली त्यासंबंधीचें विवेचन आहे ते मागें आलेंच आहे झपूर्झामध्यें अविकृत मन स्थितीतील अनुभवानंदाचें वर्णन आहे 'सूर्य चंद्र आणिक तारे, नाचत सारे, हे प्रेमभरें, खुडित खपुष्पे फिरती जिथें'— अशा त्या तिथें तुम्हाला जर जावयाचे असेल तर 'धरा जरा निसगपणा' असें त्यात कवीनें स्पष्ट सांगितलें आहे. 'कोणीकडून? कोणीकडे' मध्यें मात्र केशवसुतानीं पुढें मागे न काहीं दिसे, सतत डोहीं नौका फसे, गोत्यात अशा आलों कुठून? कोठें जाइन कैसा सुटून?— मग वदे हरे राम रे, करावे कसें—असें आपल्या भ्रांत मनःस्थितीचेंच चित्र काढलें आहे, आणि इहलोकातील ऋण फेडून पुन्हा आपल्याला आपल्या खऱ्या घरी परत जावयाचे आहे असें जुन्या वेदांत्याचें उत्तर दिले आहे म्हातारी व हरपले श्रेय यातहि काहींसा हाच विचार मांडला आहे आपल्याला व्यक्तातून अव्यक्तात किंवा अपरोक्षातून परोक्षात जावयाचे आहे, आपल्याला येथे चुकल्याचुकल्यासारखें वाटत आहे, कारण जें, आपल्या हक्काचें आहे तें हरपलें आहे, तें कुणीतरी आपल्यापासून हिसकून घेतलें आहे, उदात्त बुद्धीला संसारात राम नाहीं, कारण तिच्या

हक्काचे जें असतें त्यासाठीं तिला झुरावे लागतें, असा स्पष्टीकरणात्मक खुलासा स्वत केशवसुतांनी या कवितेवर केला आहे केशवसुतांच्या या कवितेवर जशी वर्डस्वर्थच्या "Intimations of Immortality from Recollections of Childhood" या कवितेची छाया आहे, तशीच एमर्सनच्या Immortality या निबधाची छाया आहे एमर्सननें वृद्धावस्थेतील वर्डस्वर्थची मुद्दाम भेट घेतली होती त्याच्या या निबधात वर्डस्वर्थच्या कवितेमधील विचाराची बरीचशी उजळणी झाली आहे शिवाय त्यानें या निबधात नचिकेता व यमधर्म याची उपनिषदातील सर्वप्रसिद्ध कथा सांगितली आहे, वर्डस्वर्थच्या कवितेचें सूत्र एका टीकाकारानें सूत्रबद्ध करून परतु सुस्पष्ट रीतीनें सांगितलें आहे. तें असे :—

The poet in manhood seeks to base his belief in the future life on the recollections of the thoughts that came to him as a boy ' वर्डस्वर्थला ही कविता कोलरिजच्या लहान सहा वर्षांच्या मुलाला पाहून स्फुरली हें प्रसिद्धच आहे लहान बालकाप्रमाणें निरागस, अनघ व अव्याज दुसरें काही नाहीं तेव्हा बालपणातील विशुद्ध व निरामय आनद हाच खरा स्वर्गीय इहलोकात आपण त्याच्यापासून दुरावतों वर्डस्वर्थच्या The glory and the freshness of a dream या कवितेंतील

It is not now as it hath been of yore ,
Whither is fled the visionary gleam ?
Where is it now the glory and the dream
Heaven lies around us in our infancy

या ओळीत तोच सकेत आहे केशवसुताना हरपलेल्या श्रेयात तेंच मागावयाचें आहे परतु वर्डस्वर्थच्या कवितेचा शेवट जसा निश्चित व निश्चित आहे, तसा तो केशवसुताच्या कवितेचा नाहीं. केशवसुताच्या कवितेंत 'तळमळ तळमळ' बाकी आहे जीव पाखडण्याचें थांबलेलें नाही, वर्डस्वर्थच्या कवितेच्या शेवटल्या भागाचें सार एका टीकाकारानें थोडक्यात सांगितलें आहे —-

The glory of the setting Sun is the glory of our lives if we have lived righteously in the eye of God When the sun of our life sets, it will rise again in the other world that endures forever and is known to us as heaven केशवसुताना ‘ दीपशिखेवरि पतग तो, प्रेमे प्राणाहुति देतो ’ ही कल्पना एमर्सनच्या ‘There are thoughts beyond the reaches of our souls We are not less drawn to them, The moth flies to the flames of lamp ’ या विचारावरून सुचली असावी वर्डस्वर्थला पारलौकिक विचार आठवतात आणि तो चितनशील बनतो खरा पण तो ‘ससृतिविमुख’ होत नाही, केशवसुत तसे होतात हा दोघात फरक आहे

बाल्य व स्वर्ग या दोन वस्तु अव्याज आनदाचे प्रतीक मानून केशवसुतानीं आपल्या अनेक कवितात त्याचे गोडवे गायिले आहेत, परतु ते गाताना ते स्वत चा प्रौढपणा आणि इहलोकातील दुःखें याची जाणीव कायम ठेवतात, हें बरोबर वाटत नाहीं कारण त्यामुळें त्या कल्पनांपासून निर्मळ अशा अनिर्वचनीय आल्हादाची प्राप्ति होत नाहीं ‘म्हातारी’ ला पाहून त्याची ‘ वत्सला ’ तिला धरण्यासाठी खेळू खिदळू लागते, तिच्याबरोबर केशवसुत तन्मय होत नाहींत आपल्या चित्तावरचें ‘ ससृतीचे दडपण ’ निघाले असे ते मागतात खरे, परतु लगेच असे गाऱ्हाणें करतात --

थाब, थाब! जाशी अशी का ? फिर ये गे मजशी  
वयस्कता माझी म्हणुन जर करिसी इतराजी,  
तर माझी सोनी पाहुनी, ये गे परतोनी!  
मज वय विसरू दे, मुग्ध–मधु–बाल्यी उतरू दे ।  
ते दिन पुष्पाचें, कोंवळ्या किरणीं खेळाचे!  
हे दिन–हाय ! –  
हे दिन चिंताचे परतु लटिकें हसण्याचे ’

The lover of Nature is he who has retained the spirit of infancy even in the era of manhood असें एमर्सन म्हणतो, त्याचप्रमाणें ‘ प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवीचा असे ’

असें केशवसुतहि म्हणतात खरें, परतु प्रत्यक्ष त्याना तें जोपासता येत नाही, असें 'म्हातारी' वरून दिसतें, अनुक्रमाक ४३, ६०, ६५, १००, ११७ व १३१ या कवितात केशवसुताची बाल्या-विषयींची आवड व्यक्त झाली आहे स्वर्गाविषयींची कल्पना अनु-क्रमाक १४, १९, ३६, ४१, ४३, ४६, ४८, ५१, ५९, ६३, ६५, ६६, ६७, ६८, ७६, ७९, ८८, ९१, ९३, ९८, १०० ११२, ११३, ११७, ११८, १२६, १२९ व १३१ या कवितात कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात आली आहे कोणताहि पवित्र, उदार, उदात्त व आल्हादक विचार आत्यतिकतेनें व्यक्त करण्यासाठीं केशवसुतानी 'स्वर्ग' या प्रतीकाचा उपयोग केला आहे. कवीच्या महतीचें वर्णन करताना त्यानीं --

राही तो तर देव भूमिवरती येतात हिंडावया
जाता, स्वर्ग सवें धरेस उतरे त्यालागि धुंडावया

असा त्याचा उपयोग केला आहे, तर स्वतच्या अनुभूतीचें वर्णन करताना 'स्वर्ग धरेला चुबायला, खालीं लवला, मजला गमला' असा त्याचा उपयोग केला आहे; आणि क्षणिक आभास शब्दात साकार करता येत नाहीत असें सागताना --

हा! हा! हे जर भास सर्व धरिता येतील माते, तर
पृथ्वीचा सुरलोक की बनवुनी टाकीन मी सत्वर

असा त्याचा उपयोग केला आहे बाल्याच्या कल्पनेपेक्षा स्वर्गाच्या कल्पनेंत केशवसुत विशेष रमत असें वाटते कारण ती कल्पना व्यक्त करतांना त्यानीं क्वचित्‌च दुःखाचा उद्‌गार काढला आहे

चिर-सुदर व चिर-तरुण निसर्ग, दुरावलेलें बाल्य आणि कल्पने-तला स्वर्ग यापासून निर्माण होणाऱ्या केशवसुताच्या कवितेंतील नैराश्याचें स्वरूप त्याच्या 'कोणीकडून गऽ कोणीकडे' व 'हरपलें श्रेय' या तात्त्विक कवितापासून निर्माण होणाऱ्या नैराश्यापेक्षा निराळें आहे. काल्पनिक नैराश्यांत केवळ रम्य हुरहूर आहे पण तात्त्विक नैराश्यात उत्कट तळमळ आहे केशवसुतानी आपल्या-कडील सत-साहित्याचा फारसा परिचय-परामर्ष करून घतला

नव्हता फारसा म्हणण्याचें कारण असें की 'तत्त्वत बघता नामा वेगळा', 'तुझें नाम मुखी' किंवा 'सतारीचे बोल' अशा कांही कांही कवितावरून त्याची 'ग्यानबा तुकोबा'च्या वाङमयाशी थोडीफार तोंडओळख असावी असें वाटतें 'हरपलें श्रेया'मधील कल्पना तर त्याना उघडउघड वर्डस्वर्थ व एमर्सन याच्याकडून स्फुरली आहे एमर्सननें उपनिषदें-वेदादि पौरस्त्य साहित्याचा आस्वाद भाषांतराच्या माध्यमानें घेतला होता वर्डस्वर्थनेंहि आपल्या Ode मध्यें पुनर्जन्माच्या पौरस्त्य कल्पनेचा उपयोग केला आहे तिच्या संबधीं एक टीकाकार लिहितो—

'But we are to remember that the poet never asserts as a fact that he bel:ves in a past existence The idea is a very old one and is a feature of some religions, such as Buddhism, and the poet suggests it for a poetic purpose.'

केशवसुतानीं आपल्या तत्त्वज्ञानाचा अथवा संत–साहित्याचा प्रत्यक्ष आस्वाद घेतला असता, तर त्याच्या 'आत्मिक तळमळी'ची परिणति शातींत व तुष्टींत झाली असती 'सतारीच्या बोला'त 'जड तें खोटें हे मात्र कसे, तें न कळे, मज जडलेच पिसे, काय करावे, कोठे जावे, नुमजे मजला की विष खावे!'–अशी त्याची स्थिति झाली खरी परंतु 'अखिल भेदा'चा विसर पडताच म्हणजेच 'अद्वया'चा प्रत्यय येताच 'शातच हृदयी झालें सारें' असा तिचा समाधानाचा शेवट झाला

बाल्य व स्वर्ग या कल्पनाच्या जोडीलाच केशवसुताच्या काव्यात वेडेपणाची एक चमत्कारिक कल्पना जागजागी दृष्टीस पडते या विलक्षण कल्पनेंचे मूळहि त्याच्या इंग्रजी वाङमयाच्या परिशीलनात असावे Poets are mad आणि Poets are born; they are not made हीं इंग्रजी वचनें सर्वश्रुत आहेतच या वचनाच्या जोडीला The true poem is the poet's mind या एमर्सनच्या सिद्धांताचा केशवसुताच्या मनावर पगडा बसला असावा असें वाटतें एमर्सनच्या Poetry आणि Imagination या निबंधातील

काव्यविषयक विचार केशवसुतांनी चांगलेच आत्मसात् केले होते 'Great wits to madness nearly are allied Doth serve to make our poverty our pride,' किंवा ॲरिस्टॉटलप्रणीत 'No great genius was, ever without some mixture of madness, nor can anything grand or superior to the voice of common mortals be spoken except by the agitated soul' आदि विचार त्यांना एमर्सनकडून प्राप्त झाले होते

काव्याचा आस्वाद व आनंद कळावयाचा असेल तर 'थोडे वेडे व्हा वेडे' असे केशवसुतांचे मित्र कै प्रि वा ब पटवर्धन यांनीही मनोरंजनात एक लेख लिहून म्हटलें आहे ही कल्पना त्याकाली अनेक साहित्यसेवकांना प्रिय होती असे दिसतें केशवसुतांनी तर तिचा अतिरेक केला आहे त्यांनी एके ठिकाणी 'आम्ही कवि काव्यदेवतेची अमिष्ट मुलें आहोंत आणि निर्जीवांतला जीव पहाण्यासाठी आम्ही जन्मास आलों आहोंत' असे उद्‌गार काढले आहेत, तर दुसऱ्या ठिकाणी 'व्यर्थी अधिकचि अर्थ वसे, तो त्यास दिसे, ज्या म्हणति पिसे' असा सिद्धांत शब्दांत मांडला आहे एकदा कवीला 'विचित्र पुतळा' म्हटलें आहे, तर दुसऱ्यादा 'मी एकला फिरतसे बहुवार रानी, या लागुनी न समजा मजला अडाणी' असा त्यांच्या लोडांनं ममजतीचा इशारा वदवला आहे आणखी एका कवितेंत तर 'डोक्याच्या भ्रमणाचा' व 'विक्षिप्तपणा' चा उल्लेख केला आहे. 'वेडा' हा शब्द केशवसुतांनीं काव्यविषयक तादात्म्याचा द्योतक म्हणून प्रयुक्त केला खरा, पण पुढें तो शब्द वापरून अनेकांनी स्वतःचें हसें करून घेतलें.

१८९७ च्या सुमारास केशवसुत मुंबई सोडून खानदेशांत फैजपूर, भडगाव यासारख्या आडवळणाच्या गावी गेल्यावर त्यांना ग्रंथसंग्रह दुर्मिळ झाला तो विकत घेण्याइतपत त्यांची ऐपत नव्हती आणि त्यामुळें 'कविता हीच सुंदरी आहे, तिनें आपणास वेडा केलें आहे' या एकाच विषयावर त्यांनी 'रुष्ट सुंदरीस', 'सुंदरी दर्शन', 'मनोहारिणी', वियोगामुळें', 'वियुक्ताचा उद्‌गार', 'स्मरण

आणि उत्कंठा' व 'फिर्याद' या कविता लिहिल्या अशरीरिणी कवितेस मानवी रूप देऊन तिच्यासाठी झुरावयाचें हा प्रकार अद्भुतरम्य खरा हाच प्रकार चंद्रशेखर व दत्त याच्या काव्यांतहि आढळतो परंतु ती अप्रसन्न आहे अशा भावनेनें स्वतःच्या मनाला टोंचणी लावून घ्यावयाची हा प्रकार मात्र उचित वाटत नाही केशवसुताच्या कवितेंत निराशेची जी एक छटा दिसते तिचें कारण त्यानीं मुद्दाम आपण होऊन उत्पन्न करून घेतलेले हें एक काल्पनिक दुःख आहे

कवि, त्याचा अधिकार, त्याचें विश्व, त्याचें कवित्व, त्या कवित्वाचे महत्त्व यासबधीं केशवसुताचे विचार जितके मौलिक व अभिनव तितकेच उदार व उदात्त आहेत सृष्टि आणि कवि, कविता आणि कवि, पटवर्धन यास, कवितेचें प्रयोजन, भृग, कवि, शब्दानो! मागुते या, धूमकेतु आणि महाकवि, सृष्टि आणि कवि, काव्य कोणाचें? क्षणात नाहींसे होणारे दिव्य भास, आम्ही कोण? इत्यादि कवितातून ते इतस्ततः विखुरलेले आहेत केशवसुताच्या विचारात, आचारात आणि उच्चारात विसंगति नव्हती ते महत्त्वाकांक्षी होते त्याच्या ठिकाणीं पराकाष्ठेची चिकाटी आणि तीव्र बुद्धिमत्ता वास करीत होती ते खेडचातच राहिले असते तर मग मात्र त्यांचे––तरी नसतों मी दरिद्री धनानें

तरी नसतों मी क्षुद्र शिक्षणानें
तरी होतीं तीं स्वर्गसुखें थोडीं
तरी नसती कीर्तिची मला चाडी

हे उद्गार सार्थ ठरले असते, आणि त्याच्या 'लहानग्या गरजा' या खेडचातच सहजगत्या भागून गेल्या असत्या परंतु मागें सांगितल्याप्रमाणें ते 'स्वपथ सोडून फार तेजस्वी होण्याला निघालेले नारे' होते त्याना काव्याचा 'सरसवाङ्निष्यंद' चोंहीं बाजूंस वाहावयाचा होता, त्याना पुढल्या पिढीचे साक्षी व्हावयाचें होतें; आणि आज तसे ते झालेहि आहेत परंतु त्यांना जिवतपणीं कीर्तीचा लाभ झाला नाही केशवसुत चारचौघासारखे मानवच

होते तेव्हा त्याना लोकेषणा असल्यास नवल तें काय ? पटवर्धन व आपटे याना उद्देशून त्यानी ज्या कविता लिहिल्या आहेत त्यात त्यानीं त्या दोघाना कीर्तीचा लाभ व्हावा अशी इच्छा प्रकट केली आहे तेव्हा त्याना ती असणे साहजिकच होतें कारण त्यानी आपलें सारें जीवन कवितेस समर्पण केलें होतें,कवितेच्या निदिध्यासात त्याचे ससाराकडेहि दुर्लक्ष होई, 'क्षणात नाहीसे होणारे दिव्य-भास' या कवितेंत त्यानी स्वत स 'आत्माराम' म्हटलें असून 'ससारा'स 'अक्काबाई' म्हटले आहे: तिच्या फेन्यात आपल्या काव्यसमाधीचा भग कसा होतो याचें सुदर शब्दचित्र त्यानीं त्या कवितेंत रेखाटलें आहे कवितेच्या निदिध्यासात केशवसुताचे वर्तनहि एखाद्या वेळीं एखाद्या विदेही आत्म्याला शोभावे असें होत असावे असें वाटतें कारण १९०५ 'सालअखेर' मध्ये काव्य रत्नावलीकार लिहितात की, 'त्याची वृत्ति व्यवहारी दृष्टीनें विचित्र व विक्षिप्त असे, आणि याच योगाने कित्येक त्याना वेडसर समजत, परतु मूळची त्याची वृत्ति तशी नव्हती हें आम्ही स्वानु-भवाने सागतों दोन तीन वेळ त्याचा आमचा भेटीचा प्रसग आला पण त्याच्यात सकोचवृत्तीशिवाय आम्हास दुसरें काहीं आढळून आले नाही धारवाडास जाताना तुम्ही आमचेकडे मडळीसुद्धा एक दिवस उतरावे म्हणून आम्ही त्यास विनती केली, पण केवळ सकोचवृत्तीनें त्यानीं ती अमान्य केली केशवसुताच्या या सकोच-वृत्तीचे चित्र त्याचे मित्र सुप्रसिद्ध कवि विनायक यांनीं मनोरंजनाला ४-१२-५० ला पाठविलेल्या पत्रात पुढीलप्रमाणें चितारलें आहेः- 'केशवसुताची राहणी साधी, वर्तन पवित्र, विचार काव्यमय आणि भाषाशैली मनोवेधक होती तो बोलताना नेहमी खालीं पाहून बोले, तथापि केव्हा केव्हा तो मान वर करून पाही, तेव्हां त्याचे पाणीदार '-- हे पाणी खरोखर अलौकिक होतें-- डोळे श्रोत्याच्या हृदयाचा वेध घेऊन टाकीत.' केशवसुताचे बधु कै. सीता-रामपत यानीं आपल्या भावाच्या या वृत्तीचें वर्णन करताना--

संसारी या क्षणभरि न तें लक्ष त्याचें कधींहि
गेलें, योग्यापरि सतत तो मुक्त जैसा विदेही

असे उद्गार काढले आहेत (पाहा का. र फेब्रु १९०६). केशवसुतांचे परिचित श्री वा वा गर्दे यांनी केशवसुतांच्या या 'वर्तना' चें वर्णन अशा प्रकारें केले आहे –

संसारी त्वा पथिक जनसे केधवा आचरावें
केव्हां त्वा बा ! निजमनि जगत्संशयें भ्रांत व्हावें
या वृत्तीचें तव सुकवनी गूढ बा ! व्यक्त झालें
त्वत्पद्यानीं परिचित कवि–मर्म जाणोनि घाले

( पाहा मनो पु ११ भा. ७ )

केशवसुतांना कवितेचा कसा निदिध्यास लागला होता हें यावरून स्पष्ट होईल परंतु या निदिध्यासातून त्यांनीं निर्माण केलेल्या कवितेचे चारदोन मित्रांपलीकडे कुणी फारसें कौतुक त्यांच्या हयातींत केलें नाहीं त्यांच्या कुटुंबियांनाहि या नादाने त्यांनी संसाराकडे दुर्लक्ष करावे हें पसंत नव्हतें त्यामुळे साहजिक अगोदरच विषण्ण असणारी केशवसुतांची वृत्ति अधिक विषण्ण झाली असावी असें वाटतें

कै हरिभाऊ आपटे व कै प्रि वासुदेवराव पटवर्धन हे दोघेही मर्मज्ञ व रसज्ञ केशवसुतांच्या कवितेचे चाहते व भोक्ते ! या दोघांच्याहि रसिकतेवर व वाङ्मयीन गुणावर स्वतः केशवसुतांनी कविता रचलेल्या ! केशवसुतांच्या पश्चात् १९१७ मध्यें प्रथम हरिभाऊंनी त्यांची समग्र कविता पुस्तकरूपानें प्रसिद्ध करून आपले मित्रऋण फेडलें परंतु या आवृत्तीवर केशवसुतांचें संपूर्ण नावहि नाहीं ! मग कवितांचें रसिकावलोकन तर दूरच राहिले याच सुमारास हरिभाऊंनीं रवींद्रनाथांच्या गीतांजलीला मराठी पेहराव चढवला होता आणि त्याला कवीचें चरित्र व काव्याचे आलोचन यांची जोड दिली होती त्याप्रमाणे त्यांनी ती केशवसुतांच्या कवितासंग्रहास का दिली नाहीं याबद्दल कै डॉ गुणे यांनीहि आश्चर्य प्रकट केलें आहे (पहा मनो पु २३. भा ४). केशव-

सुताच्या कवितेची दुसरी आवृत्ति कै सीतारामपत दामले यानीं जून १९२१ मध्यें काढली तिला डे व्ह ट्रा. सोसायटीनें ६५० रुपयाचें बक्षीस दिलें होतें तेव्हा वासुदेवराव पटवर्धन हे एक परीक्षक होते त्यानी दिलेला अभिप्राय असा आहे—

'स्वतत्र स्फूर्तीचीं स्पष्ट लक्षणें, अतर्भेदी प्रतिभा, वाणी काव्य-स्फूर्तीला अनुरूप, रसपरिपोषास अनुकूल भाषेचे व काव्याचे दोष नाहींत असें नाहीं कवितेंत वैचित्र्य आहे, स्वातत्र्य आहे, ओज आहे, जोर आहे, आत्मप्रत्यय आहे, आषकाचे वेड आहे, देश भक्ताचा कळवळा आहे, स्वयस्फूर्तीचा विलास आहे, तत्त्वान्वेषाची भेदकता आहे, वागर्थांची सयुक्तता आहे' (पहा रत्ना जाने २६) हरिभाऊ आणि वासुदेवराव हे केशवसुताच्या मागें जवळपास १५ व २० वर्षे विद्यमान होते परतु या पलीकडे आपल्या या आवडत्या कवीसबधीं त्यानीं एकहि ओळ लिहिलेली नाहीं, असे का ? दोघा खेरीज इतरहि अनेक रसिक केशवसुताच्या कवितेचे भोक्ते होते केशवसुताच्या हयातीतच श्री. रहाळकर यानी त्याना उद्देशून लिहिलेली कविता नोव्हेंबर १९०२ च्या मनोरजनात आली होती कै काशीताई हेरलेकर या त्यावेळी 'सुवासिनी' या नावानें कविता लिहीत त्याच्या केशवसुताविषयींच्या आदरासंबधीं पूर्वीं एकदा लिहिलेच आहे १८९८ च्या मनोरजनाच्या एप्रिल व मे च्या जोड अकात 'अलीकडील कवीत आमचे बधु दामले याचा नबर वर आहे कै दत्तानीं 'अर्वाचीन कवितेसाठीं केशवसुताची कविता घेतली होती (पहा सुविचार समागम मार्च १८९९) कै चद्र-शेखरानी केशवसुत वारले त्यावेळी कै मित्राना धाडलेल्या आपल्या ३–११–१९०५ च्या पत्रात मनोरजनाचा डिसेंबरचा अक आला व त्याचें पहिलें पान उघडून पाहताच काळ्या रेघाची चौकट दिसली काय आहे म्हणून पाहिलें तो केशवसुताचा मृत्यु शिव ! शिव ! अर्वाचीन कवींतला एक चागला कवि काळानें गिळकृत केला ! फार वाईट झालें !' असा, आपला आदर व्यक्त केला होता तात्पर्य, केशवसुताच्या कवितेला रसिक नव्हते असे नाहीं.

परंतु तो काळच मुळी साहित्याला अनुकूल नव्हता. चारदोघा आस्थेवाईक रसिकाखेरीज त्या काळी साहित्याची फारशी बूज नव्हती

केशवसुताच्या ‘अशी असावी कविता फिरून, तशी नसावी कविता म्हणून’ किंवा ‘त्याला मान नसे, नसो, पण आता त्याची अपेक्षा नसे, हें कोणी म्हणता विषाद अहिसा मन्मानसाला डसे’ अथवा ‘ज्याला मी मुकलों विषाद मजला याचा मुळीही नसे, जें पृथ्वीवर आणिले जन तया धिक्कारिती हा कसे’ या उद्‌गारावरून त्याच्या कवितावर टीका होत असावी आणि त्याना ती विव्हल करीत असावी असें दिसतें ‘कविता आणि कवि’ ही तरुणवयातील बेपर्वाईची कविता केशवसुतानी कै वामन दाजी ओक याना अनुलक्षून लिहिली आहे की काय काहीं कळत नाही ओकाची आणि केशवसुताची नागपूराच्या मुक्कामात कदाचित् गाठहि पडली असावी त्याकाळी कै हरि माधव पडित आणि वामनराव ओक याच्या हातीं ‘विविध–ज्ञान–विस्तारा’ ची सपादकीय सूत्रें होतीं हे दोघेहि मोठे काव्यमर्मज्ञ व रसिक होते यावेळीं नागपुरास विद्यार्थी असलेल्या पटवर्धनानीं पुढे ‘कै हरि माधव पडित याचा मृत्यु’ या आपल्या कवितेंत या दोघाना ‘काव्याचे कलेजे व कद’ म्हणून सबोधिलें आहे (पहा अभिनवकाव्यमाला भाग ३ रा. कवि ‘वसत’) ओक हे काव्यपरीक्षणाच्या बाबतीत मोठे विचक्षण होते. कै माधवानुजाची त्याच्यावर एक कविता आहे कै रेव्हरड टिळक हेही ओकाना मान देत कवीनें आपल्या नावाने आपली कविता प्रसिद्ध करू नये, कारण नामनिर्देशानें कवीची व त्याच्या काव्याची किमत कमी होते असें त्याचे मत होतें (पहा टिळकाची कविता बालोद्यान पृ ९७) कविता आणि कवि या अगदी साध्या व सरळ कवितेंत केशवसुतानी मध्येंच स्वभावभूयिष्ठ जिच्यात माधुरी अशी तुम्हाला कविता रुचे जरी’ असा एक अगडबब शब्द वापरला आहे हा शब्द ओकाचा आवडता होता कारण १८८५

च्या विविधज्ञानविस्ताराच्या एप्रिल, मे, जून जुलैच्या जोड अकात कै कीर्तिकराच्या इंदिरा काव्याचे परीक्षण करताना त्यानीं तो वापरला आहे केशवसुताच्या ‘ शब्दानो । मागुतें या ।’ या या कवितेंतील नूतन ’ हा शब्द कै. तात्यासाहेब केळकर याना चिंत्य वाटत होता. पण तो १८८२ साली प्रसिद्ध झालेल्या ‘ कपोत चरित्रात ’ असीरकर नावाच्या कवींनी आणि ‘कन्या’ या आपल्या कवितेंत ओकानीं योजिला आहे ओकाची कविता ‘अर्वाचीन मराठी कवितें ’ त आहे १८८५ च्या सुमारासच केशवसुतानी कवितालेखनास प्रारभ केला तेव्हा विविधज्ञानविस्तारात प्रसिद्ध होणारी महाजनि, कीर्तिकर, मोगरे इत्यादिकाची काव्यें त्याच्या दृष्टीसमोर होती यात शका नाही. इग्रजी कविताची रूपांतरे करण्याची स्फूर्ति त्याना महाजनींची तसली रूपातरें वाचून झाली असावी ‘ गावीं गेलेल्या मित्राची खोली ’ आणि ‘ भृग ’ यावर अनुक्रमें ‘ जलधरमाला वृत्ताच्या चालीवर ’ आणि ‘मणिबधाच्या चालीवर’ असे जे निर्देश आहेत ते केशवसुतानीं उघड उघड कीर्तिकराच्या ‘ इंदिरे ’ वरून घेतले आहेत आपल्या कविताना विविधज्ञानविस्तारात स्थान मिळावे असें केशवसुताना वाटत असे आणि त्यात खरोखर वावगें असे काहीहि नव्हतें मोगऱ्याचीं स्फूर्तिहीन काव्ये त्यात प्रसिद्धि पावतात तर मग आपली उत्स्फूर्त काव्यें त्यात का येऊ नयेत अशी त्याची शका असे, असें कै सी. के दामले यानी त्याच्या चरित्रात नमूद केले आहे तेव्हा केशवसुताच्या विषण्णतेचे कारण त्याच्या कविताची बूज काही जणाकडून झाली नाहीं हेंहि असणें शक्य आहे ‘ दुर्मुखलेला ’ या आपल्या कवितेंत केशवसुतानी ‘ विद्यासक्त ’ या प्रयोगानें जसा कै वामनराव आपट्याना टोमणा दिला आहे तसाच तो ‘ स्वभावभूयिष्ठ ’ या प्रयोगानें कै वामनराव ओकाना हाणला असावा असा माझा अदाज आहे

केशवसुताच्या कवितेंत काव्यदोष व भाषादोष आहेत असें वासुदेवराव पटवर्धनानी नमूद केलेंच आहे तेव्हा त्यावर टीका

झाल्यास वस्तुत विषाद वाटण्याचे काहीं कारण नाहीं परंतु प्रतिकूल टीका कुणास प्रिय असते ? तेव्हा केशवसुताना तिच्यामुळें वाईट वाटणें स्वाभाविक होतें केशवसुतांना इंग्रजी कवितांची ओढ पराकाष्ठेची होती त्यानी त्यातील भाव, विचार व कल्पना मराठींत मांडण्याचा प्रयत्न केला परंतु तो काळ साहित्याच्या क्षेत्रात संक्रमणाच्या स्वरूपाचा असल्यामुळे त्याना बेमालूम रूपांतरें साधली नाहीत Doth then the world go thus, doth all thus move ? या Drummond च्या कवितेचे त्यानी 'जायाचे जग कां असेंच ? सगळे ऐसेंच का चालणें ' असें रूपांतर केलें आहे वास्तविक त्यातील भावार्थ ' जगाची ही राहटी तशीच रहाणार की काय असा आहे याच कवितेच्या शेवटच्या श्लोकात त्यानी ' बा साधु आणीक असाधु' याचे, समप्रकर्षी युग आण साचे' असा उदार विचार मांडला आहे पण त्यासाठी साधु आणि असाधु [illegible]
भाषेच्या दृष्टीनें हास्यापद आहेत वस्तुतः त्याना या शब्दानीं 'श्रीमत व अनाथ हे अर्थ सूचित करावयाचे आहेत काव्य कोणाचें ? या कवितेत केशवसुतानीं आपल्या एका कल्पित मित्राच्या मुखानें स्वतःच्या काव्यासबंधी पुढील शंका प्रकट केली आहे तो मित्र केशवसुताना विचारतो कीं,

" काव्य लिहिलें हें सत्य तू असून, नव्हे माझे, हें नव्हे तें म्हणून सांगसी तर परकीय कल्पनातें, तुवा योजिले घेउनि योजिलें, गमे मातें यावर " नव्हें ऐसेंहि" असें उत्तर देऊन केशवसुत त्याच्या शंकेचें" समाधान करतात खरें, परंतु त्याच्या अनेक कवितात आपल्या समाजाच्या दृष्टीनें विसदृश वाटणाऱ्या अशा कल्पना आणि भाषेच्या दृष्टीनें चमत्कारिक वाटणारे प्रयोग आले आहेत F. Lyle च्या Cupid and Campaspe या कवितेचे 'मदन आणि मदनिका' हें रूपांतर बेमालूम व्हावे म्हणून त्यानी मुळात जेथें पत्त्याच्या खेळाचा उल्लेख आहे, तेथे सोंगट्याचा खेळ घातला आहे, कारण त्या काळीं पत्ते आजच्या इतके सार्वत्रिक झाले नव्हते परंतु Herrick

च्या Daffodiles and To Blossoms चे 'जास्वंद आणि पारिजातक' असे महाराष्ट्रीकरण करताना त्याना अवधान राहिलें नाही, आणि 'मरून मातीतच या पडाल, अज्ञात ऐशा थडग्यात जाल' या ओळी तें लिहून गेले. या ओळीतील 'थडग्याच्या'च्या उल्लेखामुळें महाराष्ट्रीकरण बरोबर झालें नाही, 'A wit's a feather' यावरून सुचलेली 'कीर्ति म्हणजे काय रे--एक पीस, शिरी लोकाच्या त्यास चढायास' ही कल्पनाहि आपल्या समाजाच्या दृष्टीनें हास्यास्पद आहे कारण विजयाचे चिन्ह म्हणून पिसे टोपीत खोवण्याची चाल आपल्यात नाही 'कचाप्रत देवयानी'मधील 'घालून निराशेचें अंडें, आशा अहा ! उडुन गेली' हा कल्पनाहि पुराणकाळातील कथेत व केशवसुताच्या सोवळ्या जमान्यात हास्यास्पदच होती. तेव्हा केशवसुताच्या या कल्पना टीकेचा विषय झाल्या असल्यास आश्चर्य नाही शब्दयोजनेच्या बाबतीतहि केशवसुत चोखदळ नव्हते. 'मंदिर' हा शब्द त्यानी 'हवेली' या अर्थानें प्रयुक्त केला आहे. 'तुतारी'च्या आवाजाला ते 'किंकाळी' म्हणतात वस्तुत: किंकाळी मनुष्य घाबरला की फोडतो समाजास जागृत करावयास निघणाऱ्या माणसाने 'किंकाळी' कशास फोडावयाची ? आपल्या चपल बुद्धीच्या लहान भावानें कुलदीपक व्हावे ही कल्पना ते 'बापू ! जनात दिवटी धरशील काय ?' या भाषेनें व्यक्त करतात तेव्हा त्यावर टीका व्हावी यात अयोग्य तें काय होतें ? केशवसुतानीं भाषा कमावलेली नव्हती आणि त्यामुळें असे दोष होते कदाचित् चारचौघात कवितेचा विषय चर्चेस निघाला असताना अशा प्रकारची टीका होत असावी असें वाटतें. कारण केशवसुतानीं आपल्या एका पत्रात 'कवि संमेलना'संबधीं पुढील मत प्रकट केलें आहे –

' As to the idea of an annual gathering of poets:– Practical men meet periodically for practical purposes Poets as dreamers should sit aloof, listening to the ethereal voice of silence and trying to render it into their uncouth vernaculars, whenever the Muse favours them. Some two

or three congenial spirits may at times come together to sip the rainbow drops of the necter, but more would certainly spoil its flavour– That is my idea (पहा मनो पु ११ भा ७)

प्रतिकूल आर्थिक परिस्थिति हेहि केशवसुताच्या निराशेचे एक कारण होतें केशवसुतानी आपल्या 'दिवाळी' या कवितेंत––

लक्ष्मीपूजन ते द्वितीय दिवशीं रात्रौ जधीं होतसें
सोने आणि बह्या धनीजन तधी माडून अर्चीतसे,
साध्याला विसरून लोक धरिती भक्ति कसे साधनीं–
ये हा आशय अर्थहीन कविच्या चित्तात तें पाहुनी !

असा एक विचार माडला आहे, आणि त्यात आपल्या अर्थहीनतेचा स्पष्ट निर्देश केला आहे 'निशाणाची प्रशसा' आणि 'कवितेचे प्रयोजन' या कवितात त्यानी जीवनाला समर म्हटलें आहे, परतु 'हें समर' जिकावयाचे असेल, तर 'अर्था'सारखे अमोघ अस्त्र हवे हे त्यानीं इतर अनेक नामवत साहित्यिकाप्रमाणें लक्षात घेतले नाहीं वैचारिक साहित्य आणि स्वयपाकाचें साहित्य याच्या द्वद्वात साहित्यिकाचे कसे हाल होतात याचा अनुभव कुणास नाही ? कविता-लेखन हा केशवसुताच्या विरगुळयाचा एकमेव विषय होता, परतु त्याना उभ्या आयुष्यात स्थैर्य असें कधीच लाभलें नाही शिक्षणासाठी त्याना बडोदें, नागपूर, पुणे अशी त्रिस्थळी यात्रा करावी लागली पोटासाठी त्याना मुबई, कल्याण, सावतवाडी, फैजपूर, भडगाव व धारवाड या ठिकाणीं पायपिटी करावी लागली १९०२ च्या सुमारास ते धारवाडास गेले या वेळी ते चाळिशीच्या घरात होते कवितेपासून त्याना कीर्तीचा अथवा सपत्तीचा लभ्याश झाला नव्हता अजून आपण किती भटकणार या विचारानें ते त्रस्त झाले ज्या कवितेला त्यानी आपलें सर्वस्व दिलें, तिच्यावरच त्यानी 'फिर्याद' गुदरली, आणि तीत आपलें अत करण उघडे केलें––

जिने मला वेडा केले तिच्यावरी ही फिर्याद !
ध्यास तिचा घेऊन फिरलों शून्य दिशा रानोमाळ
तिचेवरी गाणीं वेडी गाईली क्रमाया काळ !

स्वप्नातचि केव्हा भेटे नेते तों स्वर्गद्वारी,
लोटिते मागुती खालीं भूतलावरी अधारीं।
तेणें मी विव्हल भारी ससारी परि करमेना
**धन न करीं, वणवण करितों जम कोठें नीट जमेना।**
तरि तिलाच चित्त ध्याते
निद्रेविण रजनी जाते
आप्तवर्ग म्हणती " यातें—
कुठली ही जडली व्याद "
जिनें मला वेडा केले तिच्यावरी ही फिर्याद।
हीन दीन झालो छदी फदी मी तुझिया नादी
त्यामुळें परी न मनाला घालितों कधीहि विषादी,
बूज तुवा या दासाची केली गे नाहीं अजुनी,
दु ख हेंचि वाटे म्हणुनी गातसें अशी गाऱ्हाणी।

या कवितेंत केशवसुताचा कवितेचा निदिध्यास, ससृतिविमुखता, प्रतिकूल आर्थिक परिस्थिति, अस्थैर्य, आप्ताचा रोष आणि असफलता या साऱ्याचा स्पष्ट उल्लेख आहे तेव्हा केशवसुताच्या कवितेतील निराशा त्यावरून सहज उमगेल।

केशवसुताच्या कवितेंत निराशा आहे त्यामुळें त्याच्या कवितेला कमीपणा येतो अथवा कवि म्हणून त्याची थोरवी कमी होते असे मुळीच नाही त्याच्या कवितेंत निराशेप्रमाणें आशाहि आहे तुतारी, स्फूर्ति, नवा शिपाई, गोफण, निशाणाची प्रशसा इत्यादि त्याच्या कवितात ओज आहे तें वाचकाच्या नसात नवरक्ताचा सचार करते आणि त्याला पुरुपार्थास प्रवृत्त करते नव्या मनूचा साक्षात्कार प्रथम केशवसुताच्या कवितेंत झाला म्हणून ते आधुनिक कवितेचे प्रवर्तक होत याबद्दल वाद नाही परतु त्याच्या कवितेचा अभ्यास करताना तिची फक्त एकच बाजू पुढें माडण्यात येते. अभ्यास सर्वांगीण हवा म्हणजे सर्व बाजू नीट रीतीनें लक्षात येतात हा महान कवि अनुकूल परिस्थितीत वाढला असता तर त्याचें काव्य विशाल, व्यापक व विस्तृत झालें असतें तें तसे कां झाले नाहीं हें दाखविण्याचा हा एक लहान साधार प्रयत्न आहे

*   *   *

प्रा म ना अदवत, एम् ए जळगाव

# १३ : केशवसुतांचें क्रांतिकारकत्व

केशवसुताच्या क्रातिकारकत्वासबधीं विविध मतें आज प्रचलित असलेलीं दिसतात. केशवसुतानी समाजाच्या आचारविचारात क्राति केली या मतापासून तें ' केशवसुतानीं काव्यक्षेत्रात उत्क्राति घडवून आणली, क्राति नव्हे ' या मतापर्यंत परस्परविरोधी अशी मतें टीकाकारानीं केशवसुताच्या काव्यासबधीं माडलीं आहेत व तीं सिद्ध करण्याचा प्रयत्नहि त्यानी केला आहे श्री. वर्तक यानीं तुतारीचे पडसाद या पुस्तकात केशवसुतानी रूढी-विरुद्ध बड पुकारून सामाजिक आचारविचारात क्रान्ति घडवून आणली असें मत प्रतिपादन केलें आहे व त्याच दृष्टिकोनातून त्याच्या पुष्कळशा महत्त्वाच्या कवितांचा त्यानी विचार केला आहे. डॉ माधवराव पटवर्धनाना केशवसुतानीं रूढी व जुलूम याचा निषेध व स्वातत्र्य आणि क्राति याचा पुरस्कार केला हें मान्य आहे, पण हीं तत्त्वे त्याच्या कृतीत–काव्यकृतींत कितपत उतरली याचा त्याना प्रश्न पडला आहे. प्रा. जोगाना त्याचें सामाजिक क्रान्तिकारकत्व मान्य नाहीं, पण काव्यक्षेत्रात मात्र त्यानीं क्राति केली असल्याचें ते मान्य करतात, आणि बाळकृष्ण अनत भिडे हे केशवसुताना तेंहि श्रेय देण्यास तयार नाहींत त्याच्या मतें काव्यात जो काही बदल त्या काळात घडून आला त्याचें स्वरूप क्रातीचे नसून उत्क्रातीचेच होतें किंबहुना ज्ञानेश्वरा-पासून आजपर्यंत मराठी कवितेंत झालेले सर्वच बदल त्याना उत्क्रातीच्या स्वरूपाचे वाटतात अशा या मतामताच्या गलबल्यात केशवसुताच्या भूमिकेसबंधी व त्याच्या काव्यातील क्रातिकारकते-सबधीं सामान्य वाचकाच्या मनात सभ्रम उत्पन्न झाला असल्यास नवल नाहीं

पण त्यातहि केशवसुतानीं मराठी काव्यक्षेत्रांत क्राति केली, नव्या आशयानें व नव्या अनुभूतीनें नटलेली नव्या वळणाची कविता मराठीमध्यें प्रथम आणली या मतासबधी आज तरी मत-भेद नाहीत बा अ भिडे यानीं आपल्या विवेचनात सागितल्या-प्रमाणें केशवसुताच्या काव्यातून आलेला बदल क्रमविकासाच्या तत्त्वाप्रमाणे झालेला आहे असें दिसत नाहीं केशवसुताच्या पूर्वी श्री. महाजनी यानी जरी इंग्रजी वैणिकाचीं भाषातरें केली असलीं तरी स्वत त्यानीं वैणिकें किंवा सुनीतें रचलीं नाहीत केशव-सुताच्या काव्यापासून आशय व अभिव्यक्ति या दोन्हीहि बाबतीत जी नवीनता मराठी काव्यात आली ती केशवसुतानी जाणीवपूर्वक आणली हे विसरून चालावयाचे नाहीं, केशवसुतानी मराठी काव्याचें अन्तरग बदललें—पूर्वी मराठी काव्यात न येणाऱ्या विविध भावना व विचार त्यानी काव्यात आणावयास सुरुवात केली कवि आपल्या काव्यातून या वेळेपासूनच आत्मप्रकटीकरण करू लागला निसर्गाकडे पहाण्याची पूर्वीची तपशिलाची दृष्टि जाऊन तो निसर्गाला सखा मानू लागला व त्यात दिव्य चैतन्य त्याला आढळू लागलें प्रेमाकडे पहाण्याच्या दृष्टिकोनातहि बदल घडून आला व शारीरिक आकर्षणाकडून अशरीरिणी प्रेमाकडे कविता झुकू लागली सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञान त्यात येऊ लागलें अशा अनेक रीतीनीं केशवसुताच्या काव्यापासून मराठी कवितेचे अन्तरग तर बदललेच, पण कवितेच्या बहिरगामध्ये सुद्धा मूलभूत बदल घडून येऊ लागला गणवृत्ताकडून कविता हळू हळू मात्रावृत्ताकडे व मात्रावृत्ताकडून ती छदाकडे झुकली व छदातहि कवि अनेकविध प्रयोग करू लागला सुनीतासारखा नवीन काव्य-प्रकार मराठीत आला हे सर्व बदल क्रातिकारक समजावयाचे नसले तर क्राति या शब्दाचा अर्थच बदलला पाहिजे केशव-सुताना काव्यक्षेत्रातील क्रान्तिकारकत्व देण्याबाबत आज त्यामुळें फारसे दुमत नाही प्रश्न फक्त येतो सामाजिक क्रान्तीविषयीं केशवसुताना काव्यक्षेत्रात ज्याप्रमाणें क्रान्तिकारक म्हणता येतें

त्याप्रमाणें सामाजिक क्षेत्रातहि त्याना क्रान्तिकारक म्हणता येईल काय ? याच प्रश्नाबद्दल आज खरा वाद आहे

केशवसुताना सामाजिक क्षेत्रातील क्रान्तिकारकत्व नाकारतांना नेहमीं असा एक प्रश्न विचारण्यात येतो कीं त्याच्या काव्यानें समाजात क्राति कितपत घडवून आणली ? केशवसुताची कविता वाचून समाज जागृत झाला काय ? त्याची 'तुतारी' वाचून समाजानें रूढीविरुद्ध बड पुकारलें काय ? जर ते फारशा लोकाकडून वाचलें गेलें नसले आणि जर त्यामुळें समाजात क्रान्ति होऊं शकली नसली तर त्याना क्रान्तिकारकत्व कसें व का द्यावयाचें ? आगरकराचे लेख जितक्या लोकाकडून वाचले गेले त्यापेक्षा कितीतरी कमी लोकाकडून केशवसुताच्या कविता वाचल्या गेल्या तेव्हा केशवसुताना क्रान्तिकारक कवि असे कसें म्हणावयाचे ? अशा स्वरूपाचा आक्षेप घेताना मूल्याची थोडी गल्लत होत आहे हें लक्षात ठेवावयास हवें केशवसुताना क्रान्तिकारक ठरवावयाचे तें कोणत्या आधारावर ? त्याच्या कवितेंतील भूमिकेवरून कीं त्याच्या कवितेच्या वाचकवर्गावरून ? केशवसुताच्या काव्याचा किंबहुना एकदर काव्याचाच वाचकवर्ग त्यावेळीं फार कमी होता हा केशवसुताचा दोष म्हणावयाचा की काय ? सामाजिक रूढीविरुद्ध संतापानें बड उभारताना 'किती वाचक आपलें काव्य वाचतील ? ' असा विचार कवीनें करावयाला हवा होता कीं काय ? काव्य करताना कवीची कोणती भूमिका होती हा एकच विचार कवीला क्रान्तिकारक ठरविताना पुरेसा होत नाही काय? कवीनें आपल्या काव्यातून सांगितलेलें तत्त्वज्ञान त्या काळातील लोकाना आकलन झालें नाही तर तो दोष कवीचा समजावयाचा कीं काय ?

कोणत्याहि कवीचे मूल्यमापन त्याच्या अनुभूतीच्या तीव्रतेवरून व त्याच्या भूमिकेवरून ठरविलें पाहिजे केशवसुताच्या सामाजिक कवितांचा त्या दृष्टीनें विचार करता क्रान्तिकारक ही

पदवी नि·सशय त्याना द्यावी लागेल ज्या काळात केशवसुतानीं तुतारी वगैरे कविता रचल्या तो काळ नीट लक्षात घ्यावयास हवा राजकीय व सामाजिक या दोनहि प्रकारच्या चळवळींना या काळात जोर आला होता राजकीय सुधारणेचे अध्वर्यु लोकमान्य टिळक होते पारतन्त्र्याविरुद्ध चीड निर्माण करावयाची, परकीय सत्तेविरुद्ध लोकामध्यें प्रक्षोभ निर्माण करावयाचा व आपल्या हक्कासंबधी लोकाना जागृत करावयाचे हें कार्य त्यानीं मोठ्या हिरीरीनें आरभलें होतें. सामाजिक सुधारणेचें ककण हातात बाधून रूढीविरुद्ध बडाचा झेंडा उभारण्याचें कार्य प्रिन्सिपॉल आगरकर करीत होते या दोन्ही सहकाऱ्याचें अतिम उद्दिष्ट एक असले तरी त्याची साधनें भिन्न होती परकीय सत्तेखालीं दडपली गेलेली जनता लोकमान्य टिळकाना दिसत होती तर अज्ञानावर आधारलेल्या रूढीनें पिळवटून गेलेल्या जनतेचें चित्र पाहून आगरकराचें अत करण तिळतिळ तुटत होतें त्यामुळें दोघेहि आपापल्या मार्गानें जनतेमध्यें जागृति उत्पन्न करण्याचे प्रयत्न करीत होते महाराष्ट्रातील तरुणाना चेतना देणाऱ्या त्या काळच्या या दोन महान् प्रेरणा होत्या त्या दोन्हीहि प्रेरणाचा परिणाम केशवसुताच्या मनावर होणें अगदी अपरिहार्य होतें पण त्यातल्या त्यात आगरकराच्या व्यक्तिवादाचा परिणाम केशवसुताच्या मनावर अधिक झाला रूढीरूपी राक्षसीच्या तावडीत सापडलेल्या जनतेच्या चित्राचा ठसाच त्याच्या मनावर अधिक स्पष्टपणें उमटला व त्यातूनच त्याची सामाजिक कविता निर्माण झाली

तुतारी ही त्या सर्व कवितात अग्रेसर म्हणावयास हवी कारण याच कवितेंतून केशवसुतांनी मोठ्या त्वेषानें रूढीविरुद्ध बडाचे निशाण उभारले आहे

> रूढी जुलूम याची भेसूर
> सतानें राक्षसी तुम्हांला
> फाडुनि खाती, ही हलवेला

जल्शाची का ? पुसा मनाला
तुतारिनें या सावध व्हा तर !

असें म्हणून मोठ्या आवेशानें ते जुन्या अज्ञानमूलक रूढीवर तुटून पडतात व या जुन्या अनिष्ट रूढी टाकून नव्या रूढींचा स्वीकार करा असें आपणाला सांगतात

जुनें जाउ द्या मरणालागुनि
जाळुनि किंवा पुरुनी टाका
सडत न एक्या ठायीं ठाका
सावध ऐका ! पुढल्या हाका
खांद्यास चला खांदा भिडवुनी

असा त्यांचा आदेश आहे 'आपल्यामधील सघशक्ति पार नाहीशी झाली आहे, तींत पडलेले खोल खदक भरण्याकरिता आपले जीव दिले पाहिजेत, धर्माचे अवडबर माजवून जे नीतीला अडथळे आणतात त्यांना एवढें कळत नाही की ज्या ठिकाणी नीति असते त्याच ठिकाणीं धर्माचे पाऊल स्थिर होतें; नियम हे मनुष्याकरिता असतात, मनुष्य नियमाकरिता नसतो आणि जर नियमांना बंधनाचें स्वरूप येऊन ते आपल्या प्रगतीस अडथळा करू लागले तर ते झुगारून द्यायला हवेत असे सांगून ते शेवटीं म्हणतात,

हल्ला करण्या तर दंभावर–तर बंडावर,
शूरांनो ! या त्वरा करा रे
समतेचा ध्वज उंच धरा रे
नीतीची द्वाही पसरा रे '
तुतारिच्या या सुराबरोबर !

तुतारीतून हा अज्ञानमूलक व अन्याय्य रूढीवर चढविलेला हल्ला किती त्वेषानें व पोटतिडिकीनें चढविला आहे याची कल्पना कविता वाचताना सहज येते समाजातील अन्यायमूलक चाली पाहून उफाळलेला सर्व त्वेष या काव्यातून एकाद्या रसरसलेल्या ज्वालामुखीप्रमाणें बाहेर पडला आहे सामाजिक व धार्मिक

विषमतेविरुद्ध त्यानी पुकारलेलें हें बड किती जळजळीत भाषेंत आविष्कृत झाले आहे हें त्यातील विधवेसबधींच्या, अस्पृश्या-सबधीच्या ओळी वाचताना स्पष्ट होतें. किंबहुना देवावर हल्ला करावयासहि त्यानी यात कमी केलें नाहीं रक्त पिणाऱ्या असुरा-पेक्षा लोकाचे अश्रु प्राशन करणारे देव हे कितीतरी अधम होत असें ते म्हणतात

तुतारी कवितेंतील आशय असा क्रान्तिकारक आहे आणि त्या आशयाची अभिव्यक्तीहि तितकीच परिणामकारक आहे केशव-सुताच्या ज्वलत भावनाचे प्रतिबिंब यात पडलेलें दिसून येतें. त्यातील तत्त्वज्ञानहि तितकेंच महत्त्वाचे आहे यातील विषमते-विरुद्ध बड, समतेची ग्वाही, माणसासाठीं नियम असल्यानें त्याचे गुलाम बनण्याची अनिष्टता आणि जुन्यातूनच निघणाऱ्या पण नवे असलेल्याचा स्वीकार इत्यादि यात येणारे विचार मौलिक आहेत जुन्या सन्तवाङ्मयातून आविष्कृत होणारा मानवता-धर्मच जणू नव्यानें 'तुतारीं' तून प्रकट होत आहे असे म्हणणें अतिशयोक्तीचे ठरेल असे वाटत नाही

याच रूढीविरुद्ध बंड पुकारताना व नव्या विचाराचा पुरस्कार करताना 'देवदानवानीं जरी अडविले तरी त्याच्याशीं लढण्याची व रतिभरहि हार न जाण्याची' भाषा ते बोलतात व 'देवदानवा नरें निर्मिले हें मत लोका कवळू द्या' असें त्याच्या काळात अगदी क्रान्तिकारक ठरणारे विधानहि ते करतात पद्यपक्तीची तरफ जनताशीर्षावर टेकवून प्रचलित अन्याय्य रूढीवर व विषमतेवर आधारलेले जग उलथून देण्याची भाषाहि 'स्फूर्ति' मध्यें बोलावयास ते कमी करीत नाहीत

'मूर्तिभजन' ही लहानशी कविता सुद्धा या दृष्टीनें विचारात घेण्यासारखी आहे 'मूर्ति फोडा धावा। धावा फोडा मूर्ति। या काव्यातील मूर्ति म्हणजे रूढी मूर्ति ज्याप्रमाणें देवकल्पनेचें प्रतीक असतें त्याप्रमाणे रूढीहि त्या त्या वेळी माणसाला योग्य वाटणाऱ्या भावनाचे आचारामधील प्रतीक असतात पुढें त्या भावना निघून

जातात व आचार मात्र रूढ होतो म्हणूनच

'कोडें घालूनिया बैसली कैदासीण
उकलिल्यावीण खाईल ती ।।'

अशी त्या रूढीची अवस्था होते. कारण रूढी उपचार म्हणून राहिली तरी ती ढोंगीपणाला प्रोत्साहक म्हणून हानिकारकच. म्हणून ती रूढिरूपी मूर्ति फोडून टाकू, पण ती फेकून न देता त्यातील इष्ट भाग घेऊन आम्ही ती पुन्हा नवीन जोडू पण त्या रूढीवर उपजीविका करणाऱ्या स्वार्थी लोकाप्रमाणें ती विकणार नाही या कवितेंतील आशयहि किती ओजस्वी रीतीनें प्रकट झाला आहे हें कविता वाचताना सहज लक्षात येतें

पण केशवसुत 'नवा शिपाई' या कवितेंत त्याहिपुढें गेले आहेत त्याचा 'नव्या युगाचा नव्या दमाचा शूर शिपाई' अतिशय व्यापक भूमिकेवरून जगाकडे पहात आहे तो जातिभेदाच्या पलीकडे गेला आहे. 'जिकडे जावें तिकडे माझी भावडें आहेत। सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत' अशी त्याला खूण पटते आहे आपल्यामध्येच विश्व पाहून तो त्या विश्वाची पूजा करतो आहे 'लहान-मोठें' 'साधु-अधम' 'दूर-जवळ' हे सर्व भेदभाव त्याच्या बाबतीत गळले आहेत लोक स्वत भोवतीं अहंकाराचें वेष्टण घालून जगात कलह कसा माजवितात हें पाहून त्याला दु ख होत आहे व जगात शान्तीचे साम्राज्य स्थापन करण्याची त्याची इच्छा आहे' नव्या काळाचा प्रेषित अशा या नव्या शिपायाने सांगितलेले हे तत्त्वज्ञान म्हणजे विश्वात्मक देवाची नवी आवृत्तिच आहे मानवतावादाचे हे उज्ज्वल स्तोत्र आहे. आपल्या काळाच्या कितीतरी पुढें केशवसुत होते याची ही कविता फार चागली साक्ष देईल

याशिवाय 'अत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' या कवितेंत सामाजिक विषमतेबद्दल व 'मजुरावर उपासमारीची वेळ' या कवितेंत आर्थिक विषमतेबद्दल त्याना वाटणारी चीड व्यक्त होते. गोफण या कवितेंत तर 'कठीण शब्द' या धोंड्याचा 'आलस्यात

बसणाऱ्यावर ' ' पूर्वीच्या आर्यांचा बडिवार गाऊन आपलें षढत्व दाखविणाऱ्यावर ' ' थप्पड बसली असता गाल चोळणाऱ्यावर' व ' आपल्या मुलाना ' गरिवी ' शिकवणाऱ्यावर चागलाच मारा केला आहे केशवसुताना अशा व्यक्तीबद्दल वाटणारी चीड या छोट्या कवनात फार परिणामकारक रीतीनें व्यक्त झाली आहे

केशवसुताच्या वरील प्रमुख काव्याचा विचार केला तर केशवसुताची भूमिका सामाजिक सुधारणेबाबत किती अनुकूल आहे याची आपणाला कल्पना येईल केशवसुताचे सारें व्यक्तित्व या कवितातून साकार झालेले दिसतें सामाजिक जीवनात सलणारी शल्यें त्यानी अतिशय जळजळीत शब्दात या भावनातून पुढे माडली आहेत या सर्व सामाजिक तत्त्वज्ञानामागें व रूढी-विरुद्ध पुकारलेल्या बडामध्ये अनुभूतीचा जिवतपणा आहे त्यामुळें भावनाचा ज्वालामुखी त्याच्या काव्यातून रसरसलेला दिसतो. ' तुतारी ' सारख्या कवनाचा त्याच्या समकालीन व त्याच्या नतरच्या पिढींतील कवीवर जो परिणाम झाला तो यातील जिवत व रसरशीत भावनामुळेंच म्हणूनच गद्यामध्यें आगरकरानी जे सागितलें तेंच पद्यामध्ये सागण्यापलीकडे केशवसुतानीं निराळें काहीं केलें नाहीं ' असें म्हणण्यात त्याच्यावर अन्याय होतो. आगरकराच्या तत्त्वप्रणालीचा त्याच्या सामाजिक सुधारणेच्या तळमळीचा आणि त्याच्या व्यक्तित्वाचा केशवसुतावर परिणाम झाला होता हें खरें आहे पण म्हणून त्याच्या तत्त्वप्रणालीचा फक्त अनुवाद केशवसुतानी केला असे म्हणता येत नाही आगर-कराइतकीच केशवसुताना अन्याय्य रूढीविरुद्ध चीड वाटत होती व आगरकराइतक्याच तळमळीनें त्यानी ती माडली आहे किंबहुना ' नवा शिपाई ' या कवनात केशवसुत एक पाऊल पुढेंहि गेले आहेत तेव्हा केशवसुताच्या सामाजिक क्रातिविषयक कविता म्हणजे केवळ आगरकराचे अंध अनुकरण नव्हे — तर त्याच्या व्यक्तित्वाचा तो स्वतत्र आविष्कार आहे केशवसुताचीच तत्त्व-प्रणालि पुढें रे. टिळक, गोविंदाग्रज किंवा बालकवि याच्या कवनात

आली असून केशवसुताचा तो जोम, तो द्वेष व ती पोटतिडीक त्याच्या सामाजिक कवनात दिसत नाहीं त्यामुळें त्याना क्रांति-कारक ही पदवीहि कुणी देत नाही केशवसुतांनाच ही पदवी यथार्थपणें दिली जाते यच्च्यामागें हेंच रहस्य आहे

केशवसुताच्या काव्यानें सामाजिक क्रांति कितपत घडून आली हा प्रश्नही त्याना क्रांतिकारक कवि ठरविण्याच्या दृष्टीनें गौण आहे असे मला वाटलें कोणत्या वाङमयानें किती क्रांति घडून येते याचे मोजमाप कुणाला ठरविता येत नाहीं किंवा तें काव्य किती जणाकडून वाचलें जातें यावरून त्याची यशस्विताही कुणी ठरवीत नाहीं कवि आपल्या भूमिकेशी कितपत प्रामाणिक आहे आणि आपल्या भावना त्यानें कितपत परिणाम-कारक रीतीनें व्यक्त केल्या आहेत यावरून कवीच्या यशाचे मोजमाप केलें जाते केशवसुतानीं आपल्या सामाजिक कवनातून व्यक्त केलेल्या भावना त्याच्या अनुभूतीतून स्फुरल्या आहेत त्याच्या रूढीविरुद्ध उभारलेल्या बडाच्या भाषेंत त्याचा सात्त्विक संताप आहे आणि समतेच्या व विश्वबंधुत्वाच्या कल्पनेमागें त्याची प्रामाणिक तळमळ आहे म्हणूनच त्याच्या सामाजिक कवनातील ओळीओळीतून भावनाचा प्रक्षोभ दिसून येतो ते फार थोड्यानीं वाचले असेल तर तो दोष कवीचा नाही. ज्या देशात साक्षरतेचे प्रमाणच अतिशय अल्प आहे त्या देशात काव्याच्या वाट्याला असे किती वाचक येणार ? आणि त्या अर्थानें केशवसुताच्या काव्यानें समाजात क्रांति झाली नाहीं असें म्हटलें तरी आगरकराइतकेंच तळमळीनें व त्वेषानें सामाजिक अन्यायाना वाचा फोडण्याचे कार्य केशवसुतानीं आपल्या कवितेंतून केले हें विसरता येणार नाहीं केशवसुताच्या काव्याची भूमिका क्रांतिकारकाची होती, केवळ अनुकरण करणाऱ्याची नव्हती हें आपणाला मान्य करावयास हवें केशवसुताच्या काही काव्यात क्रांतिकारक विचार आहेत हे प्रा जोग याना मान्य आहे, पण त्यानीं समाजात क्रांति न झाल्यास केशवसुताना क्रांतिकारकत्व बहाल करणें हें मात्र त्याना

मान्य नाहीं काव्यात सामाजिक सुधारणेचा विषय प्रथम आणण्याचे श्रेय फक्त ते केशवसुताना देतात पण कुणीहि कवि विषय ठरवून कविता करीत नाहीं तो विषय त्याच्या अनुभूतींतून, त्याच्या भावनिक प्रक्षोभातून आपोआपच बाहेर येत असतो तेव्हां केशवसुतानी सामाजिक विषयावर कविता करण्याचें ठरवून कविता लिहिली नाहीं. ती अपरिहार्यपणे त्याच्या व्यक्तित्वातून स्फुरली. त्यात व्यक्त झालेल्या क्रातीच्या विचारावर त्याच्या व्यक्तित्वाचा ठसा उमटलेला आहे म्हणूनच केशवसुताना क्रातिकारक कवि असें म्हणायचें

केशवसुतानी आगरकराप्रमाणे सामाजिक सुधारणेचा तपशील दिला नाहीं अशी प्रा जोगाची तक्रार आहे पण तीहि तितकीशी योग्य नाही केशवसुत हे आगरकराप्रमाणें निबध लिहावयास बसले नव्हते निबधात तपशील आवश्यक असतो तर कवितेंत सूचकतेनें तो व्यक्त करावयाचा असतो सामाजिक विषमता अन्याय्य रूढी, इत्यादि गोष्टींबद्दल कवि आपला भावनिक प्रक्षोभ व्यक्त करील, पण तपशील भरण्याचे काम कवीचे नाहीं. लोकाच्या भावना चेतविण्याचे व त्याना जागृत करण्याचें कार्य कवि करीत असतो. सूचकता व सयम हेच कवितेचे मुख्य गुण अन्याय्य रूढीविरुद्ध बड पुकारून समतेचा ध्वज उच धरण्याचे व नीतीची द्वाही पसरविण्याचें कार्य त्यानीं केलें आहे इतर रुक्ष तपशील भरणें हें कवीचें काम नाहीं

केशवसुतानी जे क्रातिकारक विचार आपल्या कवितेंतून आविष्कृत केले त्याचा परिणाम त्याच्या समकालीन व त्याच्यानतरच्या पिढीतील कवीवर किती झाला हें त्या कवींच्या कविता वाचताना लक्षात येईल 'तुतारी मडळ' या नावानें ओळखलें जाणारें मडळ त्याच्या मृत्यूनतर निघालें होतें व त्या मडळात रे टिळक, बालकवि, गोविंदाग्रजासारखे कवि होते ही एकच गोष्ट केशवसुताच्या क्रातिकारक कविताची यशस्विता पटवून देण्यास पुरेशी आहे. केशवसुताच्या काव्यातील क्रातिकारक विचाराचे

स्फुल्लिंग त्याच्यानंतरच्या प्रत्येक प्रमुख कवीच्या अंतःकरणांत पडलेले आढळतात अर्थात् केशवसुताच्या सामाजिक कवनांतील जिवंतपणा आणि पोटतिडीक त्याच्या नंतरच्या कवींच्या काव्यांत येऊं शकली याचीं कारणें निराळीं होतीं 'बी' सारख्या तत्त्व-चिंतनशील कवीवरहि केशवसुताच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम झाला होता हें त्याच्या कविता वाचतांना सहज लक्षांत येतें

आजहि 'समता' शांति व विश्वबंधुत्व यांचा पुरस्कार करणाऱ्या व क्रांतीची भाषा बोलणाऱ्या मानवतावादी काव्यावर केशवसुताचीच छाप आहे हें 'कुसुमाग्रज' 'अनिल' 'विन्दा करंदीकर' इत्यादि कवींचीं काव्यें वाचतांना लक्षांत येण्यासारखें आहे 'सर्वत्र भावडें पाहणारा व 'शांतीचें साम्राज्य विश्वावर स्थापन करण्याची इच्छा करणारा' केशवसुताचा 'नवा शिपाई' आज पुन्हा जागा झाला आहे अन्यायाबद्दल व विषमतेबद्दल तो चीड व्यक्त करीत आहे, आणि जग उलथून देण्याची भाषा तो पुन्हा बोलत आहे 'मानव तेहि, मानव आम्ही' असें मानवतेचें नवें नातें आज ते जोडूं इच्छीत आहेत, व जगांतील अन्याय व विषमता नष्ट करण्यासाठीं भैरवाला, महाकालीला, किंवा रुद्राला आवाहन देत आहेत केशवसुतांनी पुरस्कारलेला नवा मानवताधर्म आज काव्यांतून पुन्हा डोकें वर काढीत आहे केशवसुत स्वर्गवासी होऊन आज पन्नास वर्षं झालीं असलीं तरी त्याच्या विचारप्रणालीचा पगडा अद्यापि थोडाहि कमी झालेला दिसत नाहीं त्याच्या क्रांतिकारक व ओजस्वी विचारांतून स्फूर्ति घेऊन आजचे कवि मानवतावादी तत्त्वज्ञानाचा मोठ्या हिरीरीनें पुरस्कार करीत आहेत. केशवसुताच्या काव्यांतील मोठेपणा यांतच आहे

म्हणून तत्कालीन समाजांत केशवसुताच्या काव्यांनीं किती क्रांति केली यावर केशवसुताच्या काव्याचें व त्याच्या यशापयशाचें मोजमाप होणें केशवसुतावर अन्याय करण्यासारखें आहे. केशवसुताची भूमिका, त्याच्या काव्यांतून आविष्कृत झालेलें त्याचें व्यक्तिमत्त्व व कोणत्याहि काळांत कविमनाची व रसिकमनाची पकड घेणारी

त्याची उज्ज्वल तत्त्वप्रणालि यावरच त्याचा मोठेपणा व त्याचे क्रांतिकारकत्व अवलंबून राहील आणि काव्याचा इतिहास पहातां 'क्रांतिकारक' हें विशेषण केशवसुतांना यथार्थपणें लागू करण्यास कोणीहि जाणता रसिक प्रत्यवाय करील असे वाटत नाहीं. काव्याच्या क्षेत्रात तर त्यांनी क्रांति केलीच, पण सामाजिक क्षेत्रा-तहि क्रांति घडवून आणण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या कवितेनें स्वीकारली. आगरकरांनीं निबंधाच्या द्वारें, व हरि नारायण आपटे यांनीं कादंबरीच्या द्वारें जें कार्य केलें तेंच केशवसुतांनी काव्याच्या द्वारें केलें आणि त्यामुळें त्यांची योग्यता त्या दोघांच्या मानानें कोणत्याहि प्रकारें कमी नाहीं याची जाणीव आपण ठेवली पाहिजे

आणि म्हणूनच आक्षेपक कांहींहि म्हणोत, केशवसुतांचे क्रांति-कारकत्व हें निर्विवाद आहे

* * *

श्री सीताराम केशव दामले

# १४ : केशवसुत - काव्यदर्शन

कवित्व म्हणजे काय व उत्तम कवित्व कोणतें यास बधीं नानाप्रकारचे मतभेद आहेत पाश्चात्य रसिकाच्या, पडिताच्या व विद्वानाच्या कवित्वासबधी कल्पना व आपल्याकडील रसिकाच्या याच बाबतीतील कल्पना फार भिन्न आहेत सस्कृतमध्यें काव्याची मीमासा करणाराच्या कल्पना काहीं बाबतींत पाश्चात्य रसिकाच्या कल्पनाशी जुळतील, परतु महाराष्ट्रातील जुन्या रसिकाच्या कवितेसबधीं कल्पना या पाश्चात्याच्या आणि आधुनिक सुशिक्षित वर्गाच्या कल्पनापेक्षा फारच निराळ्या आहेत भिन्नरुचित्वाच्या या भेदामुळेंच केशवसुतासारख्या सर्वस्वी पाश्चात्य धर्तीवर कविता रचणाऱ्या नव्या कवीच्या कवितेबद्दल त्याच्या हयातीमध्यें महाराष्ट्रात एकाही विद्वानानें प्रशसा केलेली आढळत नाहीं त्याच्या मृत्यूनतर पधरावीस वर्षांनी आधुनिक विद्वानाना त्याच्या कवितेंतील सौंदर्य व माधुर्य कळू लागलें जुन्या व नव्या पिढीतील रसिकाच्या कवितेबद्दलच्या या विलक्षण मतवैचित्र्याबद्दल व रुचिवैचित्र्याबद्दल एकदर लढा कशा स्वरूपाचा आहे तो जरा स्पष्ट करून सांगितला पाहिजे

पाश्चात्यामध्यें ॲरिस्टॉटलसारख्या प्राचीन तत्त्ववेत्याची कवितेची कल्पना आधुनिक युरोपिअन रसिकवर्गापेक्षा निराळ्या प्रकारची असल्याचे दिसतें Truth and Seriousness म्हणजे सत्य आणि गाभीर्य हे कवितेचे मुख्य गुण म्हणून ॲरिस्टॉलनें प्रतिपादले आहेत. इतिहासातील सत्यापेक्षादेखील कवितेंतील 'सत्य' (truth) जास्त शुद्ध, उदात्त आणि गभीर पाहिजे असें ॲरिस्टॉटलचें म्हणणे आहे. इंग्लडमधील वाङ्मयाच्या क्षेत्रातील एक मोठे आचार्य डॉ जॉन्सन म्हणतात कीं, 'Poetry is metrical

composition, it is the art of uniting pleasure with truth by calling imagination to the help of reason, and its essence is invention'

( कविता ही छंदोबद्ध शब्दरचना आहे. विचारशक्तीच्या किंवा विवेकबुद्धीच्या मदतीस कल्पनाशक्तीला बोलावून जेव्हा सत्य आणि मनोरंजन यांची सांगड घालण्यात येते तेव्हा ती कला कवितेच्या स्वरूपाला पोहोंचते कल्पनाशक्तीची भरारी हा तर कवितेचा अंतरात्माच होय ) मिल्ल म्हणतात, "ज्या शब्दामध्यें व विचारामध्यें मनोभावना स्वभावत च उचंबळून येतात त्याच शब्दाना व विचाराना कविता हें नांव आहे " मेकॉले म्हणतात, "कल्पनाशक्तीवर एक भ्रमपटल ज्या शब्दरचनेनें उभारण्यात येतें अशी शब्दरचना म्हणजे कविता होय " कवि शेले म्हणतो, 'कल्पनाशक्तीचे प्रत्यक्ष बाह्यस्वरूपदर्शन म्हणजे कविता होय " कालरिज म्हणतात, " कविता म्हणजे सायन्सच्या अगदीं उलट अशी विद्या आहे कवितेचे ध्येय केवळ मनोरंजन किंवा (मौज) Pleasure हें आहे, सत्याशीं कवितेला काहीं कर्तव्य नाही." वर्डस्वर्थची व्याख्या याच्याहून फारच उलट आहे. परंतु त्याची विस्तृत व्याख्या अशी आहे It is the breath and finer spirit of all Knowledge, the impassioned expression which is in the countenance of all science.' सर्व संकलित ज्ञानाचा मधुगंध आणि शुद्ध अंतर्ज्योति म्हणजे कविता होय सर्व शास्त्राच्या भालप्रदेशावर विलसणारे भावनोद्दीपक असे जें तेज तेंच कविता. ) मॅथ्यू आर्नाल्डची जीवितक्रमाची चिकित्सा किंवा चर्चा अशी व्याख्या पूर्वी दिलीच आहे " It is simply the most delightful and perfect form of utterance that human words can reach It is nothing less than the most perfect speech of man, that in which he comes nearest to being able to utter the truth It is a criticism of life under the conditions fixed for such criticism by the laws of poetic truth and poetic beauty.

( मनुष्याच्या शब्दाना जें अत्यत आल्हादकारक आणि परिपूर्ण-तेचे स्वरूप प्राप्त होणें शक्य आहे तें शब्दब्रह्म म्हणजेच कविता होय अशा शब्दरचनेच्या साहाय्यानेंच माणसाला सत्याची वाच्यता करता येते काव्यमय सौंदर्य व काव्यमय सत्य यानीं आंखून दिलेल्या मर्यादेनें मनुष्याच्या जीवितयात्रेची जी विचिकित्सा तीच कविता होय ) रस्किन महाशय म्हणतात, The suggestion by the imagination of noble grounds for the noble emotions (उदात्त भावनासाठी कल्पनाशक्तीकडून जी उदात्त भूमिका सुचविण्यात येते तीच कविता होय ) प्रो कोर्टहोप म्हणतात, The art of producing pleasure by the just expression of imaginative thought and feeling in metrical language. (छंदोबद्ध रचनेनें मनोभावना व कल्पनामय विचार याचें योग्य प्रदर्शन करून ज्या कलेच्या योगाने आल्हाद उत्पन्न करतां येतो ती कला म्हणजे कविता होय ) वरील निरनिराळ्या दहा बारा व्याख्या मि वुईल्यम हेन्री हडसन, लडन युनिव्हर्सिटीचे एक लेक्चरर, याच्या Introduction to the Study of Literature या ग्रथातून आम्ही उतरून घेतल्या आहेत. या व्याख्या इतक्या विविध आहेत कीं त्या सर्व वाचल्यावर एकाद्या साधारण वाचकाचे मन गोंधळून जाण्याचा सभव आहे परतु पाश्चात्याच्या या अनेक व्याख्यामध्यें एक प्रकारची विविधता असली तरी कित्येक बाबतीत एकवाक्यता देखील आहे. कवितेमध्यें pleasure किंवा मनोमय आनद हा असलाच पाहिजे, असें साधारण सर्व व्याख्याकाराना सम्मत आहे आमच्याकडे सस्कृतात काव्य हें रसात्मक असलेंच पाहिजे अशी स्पष्ट भाषा आहे. काव्य हें नवरसानीं युक्त असावें वगैरे आपल्याकडील कल्पना सर्वांच्या परिचयाच्या आहेत मराठीमध्ये मात्र इग्रजी शिक्षणाचा प्रसार होण्यापूर्वीं कवितेसबधी साधारण कल्पना व समज बरेच एकागी होते व त्याचा परिणाम अद्यापि महाराष्ट्रातील जुन्या बहुजन

समाजाच्या मनावर असल्यामुळें आधुनिक कवितेला इग्रजी शिकलेल्या मडळींच्या बाहेर फारसें मानीत नाहींत फक्त भक्ति, ज्ञान, वैराग्य यांचा उपदेश, जुन्या वीराच्या कथा व आख्यानें व देवादिकाच्या अवतारकार्याचें रसभरित वर्णन हेच काय ते कवितेचे खरे व योग्य विषय होत असा जुन्या महाराष्ट्रीय जनतेचा समज आहे कावळा, चिमणी, घुबड, भुगा याच्यावर कसली कविता रचावयाची आहे आणि कोणी रचली तर ती काय कविता झाली ? असे उद्‌गार काढणारे चागले जाणते लोक आहेत परतु असा केवळ पुराणप्रिय विचार बाजूला ठेवला आणि कवितेचे भोक्ते व अभिमानी असे जे सध्या हजारो आधुनिक सुशिक्षित लोक आहेत त्याच्या दृष्टीनें विचार केला म्हणजे नव्या प्रकारच्या कवितेमध्येंही अनेक वाखाणण्यासारखे गुण आहेत हें कबूल करावे लागेल.

श्रीसमर्थ रामदासस्वामीनीं कवितेचे तीन निरनिराळे प्रकार सागितले आहेत त्यामध्यें आधुनिक कवीची कविता ही सर्व धीट व पाठ या दोन प्रकारामध्येंच समाविष्ट होईल १. धीट २ पाठ आणि ३ प्रासादिक हे समर्थांनीं केलेले कवितेचे तीन भेद आहेत त्यामध्यें धीट व पाठ या प्रकाराचें लक्षण समर्थांनी पुढीलप्रमाणे केलें आहे ––

धीट म्हणजे धीटपणें केलें । जें जे आपुल्या मनास आलें
बळेंच कवित्व रचिलें । या नाव धीट बोलिजे
पाठ म्हणजे पाठातर । बहुत पाहिलें ग्रथातर
तयासारिखा उतार । आपणहि केला
शीघ्राचीं कवित्व जोडिलें । दृष्टि पडिलें तेंच वर्णिलें
भक्तिवाचुन जें केलें । त्या नाव धीटपाठ
कामिक रसिक शृगारिक । वीरहास्य प्रस्ताविक
कौतुक विनोद अनेक । या नाव धीटपाठ

अशी धीटपाठ कवितेचीं लक्षणें सागून श्रीसमर्थ म्हणतात––

"कवित्व नसावे धीटपाठ । कवित्व नसावें खटपट
कवित्व नसावे उद्धट । पाषाड मत
भक्तिहीन जें कवित्व । तेंच जाणावे ठोंबें मत
आवडीहीन जें वक्तृत्व । कटाळवाणें

धीटपाठ कवितावर नापसंतीचा शिक्का मारून नतर प्रासादिक कवित्व तेवढें उत्तम व तेंच कवींनीं रचावे आणि वाचकानीं वाचावे असा आपला अभिप्राय समर्थांनी व्यक्त केला आहे प्रासादिक व खरें कवित्व कोणतें व त्याचें ध्येय व कार्य कोणतें याविषयी समर्थांचे विवरण पुढीलप्रमाणे आहे·——

नाना प्रसग नाना विचार । नाना योग नाना विवर
नाना तत्त्वचर्चासार । या नाव कवित्व
नाना साधनें पुरश्चरणें । नाना तपे तीर्थाटणें
नाना सदेह फेडणें । या नाव कवित्व
जेणें अनुताप उपजे जेणें लौकिक लाजे
जेणें ज्ञान उपजे । या नाव कवित्व
जेणे ज्ञान हें प्रबळे । जेणे वृत्ति हे मावळे
जेणें भक्तिमार्ग कळे । या नाव कवित्व
जेणें होय समाधान । जेणें तुटे ससारबधन
जया मानिती सज्जन । तया नाव कवित्व

म्हणजे भक्तिमार्ग, वैराग्य, ज्ञान, याचा उपदेश ज्याच्यामध्यें असेल व भगवद्भक्ति आणि ससाराविषयीं विरक्ति ज्यानें वाढेल तेंच कवित्व चागलें व बाकीचें म्हणजे कामिक, शृगारिक, हास्य-विनोदात्मक हें सर्व कवित्व गौण प्रकारचे अतएव निंद्य होय अशी समर्थ रामदासाची स्पष्ट शिकवण आहे अर्थात् या शिकवणीचा पगडा महाराष्ट्राच्या मनावर पूर्वापार असल्यामुळें आधुनिकाना प्रिय असे जे कवितेचे प्रकार म्हणजे मुख्यतः समर्थांच्या लक्षणाप्रमाणें धीटपाठ कवितेचे प्रकार ते जुन्या विद्वानाना पसत न पडावे हें स्वाभाविक आहे समर्थांच्या शिकवणीप्रमाणे आधुनिक कविता गौण व निंद्य प्रकारची ठरते. त्याचप्रमाणें आधुनिकांच्या मता-

प्रमाणें केवळ भक्ति, व ससारपाशातून मुक्ति- इतक्याच गोष्टी शिकविणारी कविता ही अजिबात कवितेच्या क्षेत्रातच येऊ शकत नाहीं असें स्पष्ट सांगण्यास कित्येक आधुनिक विद्वान् कचरणार नाहींत कवित्वासबधीं इतक्या परस्परविरोधी कल्पना प्रचलित असल्यामुळेंच केशवसुताच्या कवितेला मान्यता मिळण्यास इतका कालावधि लागला

कवितेचे कार्य कोणतें, कवितेचे स्वरूप कसे असावें, कविता कशाला म्हणावे, उत्तम कविता कोणती, अधम काव्य कोणतें या अनेक गोष्टींविषयी मोठमोठ्या रसिक म्हणविणारामध्यें आणि विद्वानामध्यें असा विलक्षण मतभेद आहे जुन्या काळच्या कविते-विषयीच्या कल्पना व सध्याच्या म्हणजे विसाव्या शतकांतील मोटार-एरोप्लेनच्या युगातील व इग्रजी राज्यातील कल्पना या फारच भिन्न आहेत. श्रीसमर्थ रामदासाच्या दासबोधातील विवेचनाप्रमाणें सरस, श्रेष्ठ, उत्तम आणि प्रासादिक म्हणून जी कविता ठरेल ती सध्याचे आग्लविद्याविभूषित तरुण, रसिक विद्यार्थी टाकाऊ म्हणून हातात देखील धरणार नाहीत उलट आधुनिकाच्या दृष्टीनें जी उत्तम व सरस कविता म्हणून वाखा-णली जाईल ती जुन्या पडिताच्या अभिप्रायाप्रमाणे फारच हीन दर्जाची कविता म्हणून ठरण्याचा सभव आहे

कवितेचें ध्येय किंवा उद्दिष्ट कोणतें, हें नक्की ठरलें म्हणजे त्या ध्येयावरून कविता सरस किंवा नीरस अशी ठरविण्याला आपल्याजवळ एक कसोटी राहील परतु कवितेच्या ध्येयाबद्दलच निरनिराळ्या किंवा परस्परविरोधी कल्पना पाश्चात्य व पौरस्त्य रसिकामध्यें व विद्वानाच्या मनामध्यें वसत असल्यामुळें कवितेच्या योग्यतेबद्दल फारच विलक्षण आणि भिन्न भिन्न मतें प्रचलित असल्याचे दृष्टोत्पत्तीस येतें

एक गोष्ट स्पष्टपणें नमूद केली पाहिजे की, आपण कवितेचे मोठे भोक्ते आहों असें समजणारापैकी अनेक लोक केवळ अरसिक व खऱ्या कवित्वाचा रसास्वाद घेण्याला सर्वस्वी नालायक असतात.

कित्येकांची कवितेसंबंधीं आवडनिवड पूर्वग्रहदूषित असते मोरोपंत व वामन अशा जुन्या मराठी कवींची कविता तेवढीच कविता होय व जुनीं वृत्तें टाकून निराळ्या स्वतंत्र वृत्तामध्यें कोणी काव्यरचना करतील ते कवि या नांवाला पात्रच नाहींत असे मानणारा एक जुन्या विद्वानांचा वर्ग आहे अशा मंडळींना केशवसुतांची कविता टाकाऊ वाटेल यांत संशय नाहीं व नवल देखील नाही. जुन्या मंडळींपैकीं कित्येकांचें असे प्रामाणिक मत असल्यास त्यांना नांवे ठेवण्यांत देखील हशील नाहीं कविता ही एक ललितकलांपैकीं मुख्य कला आहे ती एक Fine art आहे संगीत किंवा गायनवादनाचा पुष्कळांना शोक असतो पाश्चात्यामध्ये गायनवादन आहे तसेंच तें पौरस्त्य लोकांतही आहे. परंतु हिंदुस्थानांतील संगीत युरोपियनास आवडत नाहीं व इंग्रज लोकांचें संगीत किंवा गायनवादन फारसें उच्च दर्जाचें आहे असे हिंदी तज्ज्ञांना वाटत नाही त्याचप्रमाणें जी पक्वान्नें आपण हिंदी लोक अगदीं मिटक्या मारीत व जिभल्या चाटीत खाऊं, तीं डुकरा-बोकडाचें मांस खाणाऱ्या व मद्याचीं पिपे पिऊन फस्त करणाऱ्या युरोपियनांना चवदार किंवा रुचकर वाटत नाहीत जी चित्रकला विवक्षित लोकांना किंवा देशाला प्रिय असते ती दुसऱ्या एखाद्या देशांतील लोकांना तितकी सरस किंवा उच्च दर्जाची वाटेलच असा निश्चय नसतो बऱ्याच अंशीं हा आवडीनिवडीचा प्रश्न आहे. त्याचप्रमाणें अगदी नवीन, चमत्कारिक व तऱ्हेवाईक पद्धतीनें जर एकादा कवि कविता रचूं लागला तर जुन्या तऱ्हेच्या विद्वानास ती पसंत पडणार नाही हें मानवी मनोरचनेच्या घटनेचा विचार केल्यास सर्वस्वी सुसंगत व सुसंघटित आहे 'पुराणमित्येव न साधु सर्वं। न चापि काव्यं नवमित्यवद्यं हा कालिदासानें घालून ठेवलेला सिद्धांत या बाबतींत सदोदित ध्यानांत ठेवणें श्रेयस्कर होय पूर्वकालच्या विद्वानांना व पंडितांना असें वाटतें कीं, बरेंचसे भारूड लिहिलें म्हणजे लाख दीडलाख श्लोक खरडले, आणि भारदस्त, दुर्बोध व लांबलचक अशा वृत्तामध्यें दहावीस सर्गांमध्यें विभागलेले

असे धीरोदात्त पराक्रमी पुरुषासबधी महाकाव्य रचिलें म्हणजे त्याचा लेखक महाकवि म्हणवून घेण्याला पात्र होय एकाद्या कवीनें हृदयाला हलवून सोडणारे किंवा हृदय विदीर्ण करून टाकणारे असे शोकरसात्मक दहावीस श्लोक लिहिले किंवा नैसर्गिक सौन्दर्याचे वर्णन करताना विशेष निरीक्षणशक्ति प्रदर्शित केली व निसर्गदेवतेचे वर्णन महाकाव्यामध्यें न करताना त्रोटक अशा दहावीस कडव्याच्या गीतामध्यें केलें तर अशी तुटपुंजी कविता करणारा लेखक कवि या नावास पात्र नाहीं असेंच पुराणप्रिय पडित आपलें मत देईल कविता म्हणजे काय, काव्य म्हणजे काय आणि कवि कोणाला म्हणावें यासबधी पूर्वीच्या व हल्लीच्या कल्पनामध्यें फारच विलक्षण मतभेद आहे छदोबद्ध अशी पद्यरचना किंवा श्लोकरचना म्हणजे कविता अशी कवितेची व्याख्या कित्येक जुन्या साप्रदायातील पडित करतील "वाक्य रसात्मक काव्यम्" रसात्मक जें वाक्य तें काव्य होय ही सस्कृत व्याख्या फारच व्यापक व समाधानकारक आहे यात सशय नाहीं या व्याख्येप्रमाणें गद्यवाक्य देखील काव्य या शब्दानें दर्शविलेल्या उच्च पदवीस जाऊ शकेल. इग्रजीत देखील कित्येक ग्रथकारास Prose-poets म्हणजे गद्यकवि म्हणण्याचा प्रघात पडत आहे गद्य रचनेमध्यें सुद्धा काव्यरचनेचे स्वारस्य ज्याच्या प्रतिभासपन्न लेखनशैलींतून उतरतें अशा लेखकाला Prose-poet म्हणण्याचा परिपाठ आहे विशेषत कार्लाईलची ग्रथरचना इग्रजीमध्यें झाली तेव्हापासून या कल्पनेचा प्रादुर्भाव झाला कारण कार्लाईलचें इग्रजी गद्य हे मोठमोठ्या कवींच्या छदोबद्ध काव्यरचनेला मागें टाकील इतकें सरस व हृदयस्पर्शी आहे परंतु कविता व कवि हे शब्द गद्यग्रथाना व गद्यलेखकाना लावण्याचा प्रघात अद्यापि इग्रजीमध्यें देखील रूढ झालेला नाही तेव्हां हृदयस्पर्शी अशी पद्यरचना म्हणजे कविता होय अशी साधारण व्याख्या केली तर ती सुसबद्ध व न्यायशास्त्राच्या कसोटीलाही उतरण्यास हरकत पडणार नाही असे वाटतें.

केशवसुत हे मराठी कवितालेखनपद्धतीमध्ये क्रांति करणारे असे एक स्वतत्र वृत्तीचे कवि असल्यामुळें त्याच्या रचनापद्धती शिष्ट-

समत होण्याला बराच कालावधि लागावा यांत आश्चर्य नाहीं. परंतु कवितेचे बाह्यस्वरूप म्हणजे ती कोणत्या वृत्तात रचिली अथवा ती यमकबद्ध आहे कीं यमकविरहित आहे, हा कवितेच्या गुणदोषांपैकी फारच गौण असा भाग आहे "किं कवेस्तेन काव्येन किं काण्डेन धनुष्मतः । परस्य हृदये लग्ने न घूर्णयति यच्छिर:" दुसऱ्याच्या हृदयावर आघात केल्यानंतर ज्या काव्याच्या योगानें मस्तक भणाणून जात नाही, मनोवृत्ति उचंबळून जात नाहीत, किंवा ज्या धनुष्यावरून सुटलेल्या बाणानें शत्रूचें डोकें थरारत नाही अशा कवितेचा किंवा धनुष्याचा उपयोग काय ? असा एका संस्कृत कवीनें मोठा मार्मिक प्रश्न विचारून खरी कविता कशाला म्हणतात याची सर्वांस पटेल अशी एक प्रकारें काव्यमय व्याख्या छंदोबद्ध शब्दरचनेनें लिहून ठेविली आहे या संस्कृत कवीच्या व्याख्येनुसार जर केशवसुताच्या कवितेची योग्यता ठरवू लागलें तर केशवसुताच्या कवितांपैकीं तीन चतुर्थांश कविता वरिष्ठ दर्जाचीच ठरेल यात शंका नाहीं परंतु कित्येकाना शब्दसौष्ठव, पदलालित्य, यमक, प्रास, उपमा, उत्प्रेक्षा वगैरे ठराविक अलंकार आणि नियमबद्ध व रेखीव छंदोबद्ध शब्दरचना हींच कवितेचीं विशेष महत्त्वाचीं अगें वाटतात अशा रूढिबद्ध पंडिताना केशवसुताची कविता ही कविता या नावाला देखील शोभणारी नाहीं असे वाटतें त्याच्या दृष्टीनें त्याचें मत समर्थनीय असेल, परंतु रसिकपणा हा काही केवळ एका विवक्षित पद्धतीच्या कवितेंतील गुण ज्याना प्रिय वाटतात त्या पंडिताना व टीकाकारानाच नसतो किंवा कवित्व कशास म्हणावयाचें हें ठरविण्याचा अधिकार किंवा मक्ता त्याना कोणी दिला नाही. अशा जुन्या प्रकारच्या रसिकांसाठीं केशवसुताची काव्यरचना नव्हतीच असे ते स्वत म्हणत असत जानन्तु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः असेंच उत्तर केशवसुतानीं वर उल्लेखिलेल्या टीकाकारांना दिलें असतें आम्ही कोण ? असा प्रश्नरूपी मथळा घेऊन या प्रश्नाला उत्तर म्हणून केशवसुतानीं जे तीन चार श्लोक रचिले

आहेत त्यामध्यें कवींची योग्यता व थोरवी केवढी दाडगी आहे याचें त्यानीं फारच थोडच्या शब्दामध्यें परतु मोठचा गभीर व भारदस्त रीतीनें दिग्दर्शन केलें आहे

**आम्ही कोण म्हणूनि काय पुससी ? आम्ही असूं लाडके**
**देवाचे, दिधलें असे जग तयें आम्हांस खेळावया**
**विश्वीं या प्रतिभाबलें विचरतों चोहींकडे लीलया**
**दिक्कालांतुनि आरपार आमुची दृष्टी पहाया शके**

कवि हे देवाचे लाडके आहेत, त्याची दृष्टि दिक्कालाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सर्व भूत, भविष्य, वर्तमान याचें एक-समयावच्छेदेकरून निरीक्षण करू शकते, व कवींना जगातून हाकून दिलें तर या जगाचें जिणें कवडीमोल होऊन जाईल व तारागणे देखील कलाहीन व तेजोहीन होतील, अशी कविप्रतिभेची थोरवी त्यानी वर्णन केली आहे कवि म्हणजे केवळ शब्दाशीं, यमकाशीं व प्रासानुप्रासाशी वागडणारा एक गारुडी व शब्द-चमत्कारानीं वाचकाना थक्क करून टाकणारा जादूगार इतकी क्षुद्र कल्पनाच ज्या टीकाकाराच्या मनामध्ये वसत असेल त्यांना केशवसुताची कविता नीरस व टाकाऊ वाटल्यास कोणाला वाईट वाटण्याचें कारण नाही कविता म्हटली कीं, तिच्यामध्यें जाडे जाडे सस्कृत शब्द पाहिजेत, पदलालित्य पाहिजे लांबलचक यमकें व प्रासानुप्रास साधले पाहिजेत, व व्याजोक्ति, उत्प्रेक्षा, अर्थातरन्यास, श्लेष अित्यादि अलकारशास्त्रज्ञानी सांगितलेले अलकार खेचून भरलेले असले पाहिजेत व लाबलचक सर्ग बनवून त्याचें एक मोठें बाड तयार झालें म्हणजेच तें महाकाव्य होय आणि असें मोठें विस्तृत महाकाव्य रचणाराच महाकवि या अभिमानास्पद पदवीस योग्य असा लेखक होय, इत्यादि कल्पना ज्याच्या मनामध्यें दृढबद्ध होऊन बसल्या आहेत त्या घालवून टाकण्याचा कोणीं कितीहि प्रयत्न केला तरी तो सिद्धीस जाणार नाही तेव्हा जुन्या कवितेच्या अभिमान्याकडून केशवसुताच्या कवितेला मान्यता मिळविण्याच्या भानगडीत पडण्याचा निरर्थक खटाटोप कोणीं

करूच नये हें उचित होय अिंग्रजी भाषेंतील मिल्टन या महा-कवीची कविता डॉ जॉन्सन या गाढ्या पंडिताला व रसिकाला फारशी पसत पडत नसे तथापि केवळ डॉ जॉन्सन याला मिल्टनच्या काव्याची महती मान्य नव्हती म्हणून काहीं मिल्टनची थोरवी कधीं कमी झालेली नाहीं त्याचप्रमाणे केशवसुताची कविता एका विवक्षित आवडीनिवडीच्या पंडिताना किंवा टीकाकाराना रुचत नसली किंवा पसत पडत नसली तरी त्या कवितेची थोरवी व योग्यता इतराना पसत पडणार नाही असे नाही उलट जुन्या कवितेच्या शिळ्या व नियमबद्ध रूक्षपणाला कटाळलेले असे जे नव्या विचाराचे सुशिक्षित लोक आहेत त्याच्यामध्यें केशवसुताच्या कविते-विषयीं इतका आदर उत्पन्न झालेला आहे कीं, एका नवीन काव्यरचनेचे आद्यजनक किंवा आद्यप्रवर्तक अशा प्रकारचा मान त्याना आज मोठमोठ्या पंडिताकडून व रसिकवराकडून मिळत चालला आहे प्रख्यात कवि गोविंदाग्रज किंवा कै राम गणेश गडकरी आणि इतर आधुनिक कवि यानीं तर केशवसुताची स्थापना आपल्या नव्या कवितापथाच्या आद्यगुरूच्या पीठावर केली असल्याचें स्पष्ट दिसून येत आहे

ज्याची सर्व कविता सकलित केली तर १५०।२०० पृष्ठापेक्षां जास्त पृष्ठें भरत नाहीत त्याला महाकवि किंवा मोठा कवि कसे म्हणावे, अशी कित्येकाना मोठी अडचण पडते. महाकवि म्हटला कीं, त्याच्या सकलित काव्यग्रथाचें वजन तागडीमध्यें निदान दहा पाच शेर तरी भरले पाहिजे, अशा प्रकारच्या महत्त्वमापनाच्या नियमाने जर कवीच्या ग्रथाची योग्यता ठरवावयाची असेल तर केशवसुत हे महाकवि या सज्ञेला कदापि पात्र ठरावयाचे नाहींत हें कोणालाही कबूल करावे लागेल इंग्लिश भाषेमध्यें ग्रे नावाचा कवि आहे त्याची सर्व काव्यसपत्ति दोनशें अडीचशें पृष्ठाच्यापेक्षा जास्त नाहीं, परतु ग्रे कवीच्या एका Elegy या हृदयगम छोट्या कवितेमुळें आणि Ode on a Distant Prospect of Eton College अशा चटकदार त्रोटक स्फुट श्लोकानींच त्याचे नाव इंग्रजी वाङ्-मयातील श्रेष्ठ श्रेष्ठ कविमडळामध्यें कायमचें अजरामर होऊन

गलें आहे तेव्हा कवितेची लाबीरुदी किती आहे अशा प्रकारचें मोजमाप करून, किंवा कवीच्या काव्यसग्रहातील ओळी दशसहस्त्र किंवा लाख पाऊण लाख भरतात कीं नाही याची मोजदाद करून काही कोणा कवीची योग्यता ठरवावयाची नसते. काचेचे मणी भाराभर किंवा खडीभर गोळा केले आणि मुक्ताफळे फक्त एकाद्या लहानशा चिमकुल्या डबीमध्यें मावतील इतकींच पैदा केली, तरी ज्याप्रमाणें डबीतील पाचपन्नास मौक्तिकाची किमत भाराभर काचेच्या मण्यापेक्षा जास्तच ठरेल, त्याप्रमाणें श्रेष्ठ कवीच्या सरस कवितेंतील दहापांच ओळींची योग्यता नीरस व टाकाऊ अशा कवितेंतील हजारो श्लोकापेक्षा उच्च ठरेल हें खऱ्या काव्यज्ञ रसिकाना सागावयास नको केशवसुताच्या स्फुट कवितापैकीं शेकडा पाऊणशें तरी चुटके अत्यत उच्च दर्जाच्या कविप्रतिभेचे द्योतक आहेत उगाच वायफळ कविता रचण्यामध्यें ज्यानीं आपली कवित्वशक्ति कधीच निरर्थक शिणविली नाही अशा थोड्या कविकोटींतील केशवसुत हे एक नमुनेदार कवि होत लाबलचक सृष्टिवर्णने किंवा एकादी पौराणिक कथा पद्यरचनेंत गोवली कीं कवीला शेंकडों किंवा हजारों पद्यपक्ति एकामागून एक लिहिता येतील अशा पद्यरचनेला काही मोठी स्फूर्ति किंवा प्रतिभा पाहिजे अशातला भाग नाही परतु साध्या गोष्टींमधूनच उच्च कल्पनेच्या जोरावर त्रिकालबाधित अशा सत्तत्त्वाचेच प्रासादिक वाणीनें व गभीर शब्दानीं साधारण समजुतीच्या माणसास पटेल असें स्पष्टीकरण करणें हेंच उच्च दर्जाच्या कवितेंतील मर्म आहे वास्तविक पाहिले तर कविता आणि तत्त्वज्ञान या दोहोंचेंही उद्दिष्ट एकच आहे सत्याच्या पायावरच दोहोंची उभारणी झाली पाहिजे व सत्यशोधन हेंच ज्याप्रमाणे तत्त्वज्ञानाचे ध्येय किंवा उद्दिष्ट असतें त्याप्रमाणेच कवितेचे सर्वोत्तम व उदात्त ध्येय म्हणजे सत्य, न्याय आणि धर्म या गोष्टींचा सदुपदेश ओजस्वी शब्दरचनेनें सामान्य जनतेला करणें हेंच असलें पाहिजे कवितावाचन म्हणजे एक केवळ करमणुकीचे साधन होय, असा कित्येकाचा समज असला

तरी तो अज्ञ जनाचा समज आहे. सत्य, न्याय, धर्म नीति व परमेश्वरावर श्रद्धा अशा प्रकारच्या ज्या अत्युच्च कल्पना मनुष्याच्या आत्मिक व मानसिक उन्नतीला अत्यत आवश्यक आहेत त्याचेंच प्रतिबिंब कवितेच्या आरशामधून वाचकाच्या मनावर पडले तरच ती कविता श्रेष्ठ दर्जाची ठरेल. जीव आणि शिव हे एकच आहेत आणि प्रत्येक माणसाच्या वैयक्तिक आत्म्याची ताटातूट परमात्म्यापासून झाल्यामुळे मनुष्य प्राण्याची सर्व मानसिक धडपड परमात्म्याशीं पुनरपि सलग्न होण्यासाठी चालली आहे, हें तत्त्वज्ञानाचे अतिम व गूढ प्रमेयच अत्यत उच्च दर्जाच्या कवितेमधून प्रस्थापित होत असतें केशवसुताची हरपलें श्रेय ही कविता अनेक वाचकाना Mystic अशा स्वरूपाची वाटते परतु त्या कवितेमध्ये Mystic असें काहींच दिसत नाहीं तत्त्वज्ञानातील अत्यत उदात्त सिद्धान्त व प्रमेयें या कवितेमध्ये काव्यमय भाषेंत गोविलेली आहेत. मनुष्याच्या मनाची धडपड ही सारखी का चाललेली आहे ? या प्रश्नाला उत्तर हरपले श्रेय या चुटक्यामध्यें कवीनें देण्याचा प्रयत्न केला आहे केशवसुत हे एक Mystic Poet गूढार्थाची काव्यरचना करणारे कवि असा साप्रत कित्येकाचा निराधार गैरसमज झालेला क्वचित् पाहण्यात किंवा ऐकण्यात येतो केशवसुताच्या कवितेचे जे १२५–१५० त्रोटक चुटके उपलब्ध आहेत त्यामध्यें Mystic अशा नावानें ज्याचा उल्लेख करता येईल असे दोन तीनच फार झाले तर असतील, बाकी सर्व कविता स्पष्ट व सरळ अर्थाची आहे कवीच्या कवितेमध्ये फार गूढ व खोल अर्थ भरलेला असला तरच तो उत्तम कवि असाही कित्येकाचा समज आहे. कवीच्या शब्दानीं जो प्रथमदर्शनी उघड उघड अर्थ आपल्या ध्यानामध्यें येतो तोच खरोखर त्या शब्दाचा अर्थं नसून कांहीं तिसराच गूढार्थ त्या शब्दानीं व्यक्त करण्याचा कवीचा स्वतःचा उद्देश होता, अशा प्रकारें गूढार्थ समजावून सागण्याचा प्रयत्न करण्याची कित्येक मर्मज्ञ म्हणवून घेणाऱ्या लोकाची प्रवृत्ति असते परतु केशवसुताच्या ३–४ कविता वगळल्या तर त्याच्या

बाकीच्या सर्व कविता स्पष्ट अशा अर्थाच्याच आहेत, त्यांमध्यें गूढ किंवा Mystic असें कांहीं नाहीं

केशवसुताच्या कवितेच्या एकदर १३०–१४० प्रकरणापैकीं बरीच प्रकरणे ही अनेक इग्रजी कवीच्या स्फुट प्रकरणावरून सुचलेली असावीं हें इग्रजी वाङ्मयाचे अध्ययन करणाऱ्या कोणाही विद्यार्थ्याला कळून येईल. वर्डस्वर्थ, कीट्स्, टॉमस मूर, लॉंगफेलो, मिसेस हेमन्स या कवींच्या कित्येक कवितातील कल्पना ज्याना आधारभूत आहेत अशी प्रकरणें केशवसुताच्या कवितेंत बरीच आढळतील असें विधान केलें म्हणजे केशवसुताची सर्व कवित्व-शक्ति उसनवारीची होती असें मात्र कोणाला म्हणता यावयाचें नाही कारण जरी एकादी कल्पना पूर्वीच्या अन्य कवीच्या काव्यग्रथातून असली तथापि नवीन कवीची स्वत.ची अशी हिंमत असली की, जुन्या कल्पनेवरच नव्या शब्दाचें किंवा नव्या रचनेचे असे कोंदण किंवा आच्छादन घालीन की ती जुनीच कल्पना जास्त उठावदार होईल, तर या नव्या कवितेला अत्यत उच्च दर्जाची स्वयभू किंवा स्वयप्रकाशित कविता असेंच नाव देणें योग्य होईल. एकाद्या जुन्या कवीच्या कवितेवरून सुचलेली कल्पना नव्या कवीच्या कवितेंत गोंविली गेल्यानें टाकाऊ होते असें नाहीं इग्रजी वाङ्मयाशीं परिचय झाल्यामुळें ज्याप्रमाणे अलीकडच्या बहुतेक लेखकाना व ग्रथकाराना या पाश्चात्य वाङ्मयातील कल्पना उचलून घ्याव्याशा वाटतात, त्याचप्रमाणे केशवसुतानीं अनेक कल्पना पाश्चात्य कवींच्या काव्यग्रथावरून उचलल्या असल्यास त्याने त्याच्या कवित्वशक्तीस कमीपणा येतो असे मानण्याचे काहींएक कारण नाहीं 'काट्यावाचुनी गुलाब नाही' (There is no rose without thorn)हें त्याच्या कवितेवरचें एक सूचक वाक्य एका इग्रजी म्हणीचे भाषातर आहे; इतर देखील कित्येक ठिकाणी इग्रजी कवींच्या विचाराचे व कल्पनाचें रूपातर केशवसुताच्या स्वतत्र अशा कवितांमध्यें सुद्धा दिसून येतें उदाहरणार्थ, **नरेंच केला हीन**

किती नर! हा 'तुतारी' या कवितेंतील एक चरण म्हणजे प्रख्यात कवि वर्डस्वर्थ याच्या

Much it grieved my heart to find
What man has made of man

या कल्पनेकरून सुचला असावा असे म्हणण्यास हरकत नाहीं त्याचप्रमाणें 'घुबड' ही कविता एडगर पो या कवीच्या Raven या कवितेवरून सुचल्याचें कवीनें स्पष्टपणे सागूनच ठेवलें आहे बर्न्स, कीट्स्, शेले, टॉमस मूर, वर्डस्वर्थ, कोलरिज, लाँगफेलो या कवींच्या काव्यग्रथाचे अध्ययन केशवसुतानीं अल्प वयातच चागले लक्षपूर्वक केलें असल्याचें त्याच्याशीं झालेल्या संभाषणावरून देखील प्रस्तुत लेखकाला विदित आहे

प्रथम प्रथम केशवसुत हे ठराविक शिष्टसमत वृत्तामध्येंच आपळी कविता लिहीत असत आणि यमकें साधण्याचाही थोडा खटाटोप करीत परतु पुढें पुढें त्याच्या स्वतत्र विचारसरणीला शोभतील अशीं स्वतत्र वृत्तें किंवा चालीच त्यांनी निर्माण केल्या. परतु इग्रजी कवितेचा जास्त जास्त व्यासग होत चालला तसतशी त्याची स्वातत्र्यप्रियता वाढत जाऊन त्यानी यमकविरहित Blank verse कविता रचण्याकडे आपलें लक्ष पुरविलें तथापि अगदी बिलकुल यमक नाहीं अशी त्याची कविता थोडी आहे काहीं काहीं कवितातून त्यानीं इग्रजी पद्धतीवर पहिला व चवथा चरण याचे यमक व दुसरा आणि तिसरा याचे यमक साधिले आहे असे यमक साधलेली इग्रजीतील विशेष वाखाणण्यासारखी काव्यरचना म्हणजे टेनिसनचे In Memorium हें काव्य होय उदाहरणार्थ, पुढील श्लोक पाहा

I sometimes hold it half a sin
To put in words the grief I feel;
For words like nature, half reveal
And half conceal the soul within.

तुतारी या सुप्रसिद्ध कवितेमध्यें पहिला व पाचवा चरण याच्या

अखेरचे यमक साधलें आहे व मधल्या तीन चरणाचें यमक जुळविले आहे. उदाहरणार्थ –

**जुनें जाऊ द्या मरणालागुनि**
**जाळुनि किंवा पुरुनी टाका**
**सडत न एक्या ठायीं ठाका**
**सावध ! ऐका पुढल्या हाका**
**खांद्यास चला खादा भिडवुनि**

सॉनेट या विशिष्ट इग्रजी पद्याच्या धर्तीवर ' मयूरासन आणि ताजमहाल ' या प्रकरणात त्यानी चवदा ओळीचा चटकदार चुटका किवा सॉनेट रचिलें आहे परतु ही सॉनेट रचण्याची पद्धति इग्रजीमध्यें देखील विशेष चटकदार अशी सर्वांनाच वाटत नाही. शेक्सपीअर, मिल्टन, वर्डस्वर्थ, या विख्यात कविवरानी सॉनेट्स म्हणजे चतुर्दशपद्या रचिल्या म्हणून बहुतेक इग्रजी कवि थोडीबहुत सॉनेट रचितात वर्डस्वर्थ कवीनें तर सॉनेटच्या प्रशसापर असें एक सॉनेट रचिलें आहे व

Scorn not the Sonnet; Critic you have frowned
Mindless of its just honours; with this key
Shakespeare unlocked his heart

अशी सॉनेटची स्तुति केली आहे परतु मराठीमध्यें सॉनेट सारख्या चतुर्दशपद्या विशेष सरस, चटकदार किंवा हृदयगम अशा खुद्द केशवसुताना देखील रचितां आल्या नाहीत. तेव्हा इतर कवीनीं त्याचे अनुकरण करण्यात हशील नाहीं

केवळ बाह्य स्वरूपामध्यें इग्रजी कवितेशीं केशवसुतांचें तादात्म्य झालेलें कधी कधी दिसतें तर कधीं कधी इग्रजी कवितेंतील विचाराशी सदृश असे विचार किंवा उद्गार त्यांच्या कवितेंत इतस्ततः सर्वत्र पसरलेले दिसतात. उदाहरणार्थ–

But for the unquiet heart and brain,
A use in measured language lies.
The sad mechanic exercise,
Like dull narcotics numbing pain.

या टेनिसनच्या श्लोकातील कल्पनेशीं "गाण्यानें श्रम वाटतात हलके हेंही नसे थोडके" या 'कवितेचें प्रयोजन' या प्रकरणातील कल्पनेचे बरेंच साम्य आहे हें कोणासही कबूल करावे लागेल. कवितेविषयी, कवीच्या थोरवींविषयीं व स्वत च्या कवित्वशक्ती-संबधी अभिमान केशवसुताच्या अत करणामध्यें सदैव जागृत असे ज्या पंतोजीनें दुर्मुखलेला असे त्याना म्हटलें त्याच्या तोंडावर काहीं केशवसुतानीं एकादे उर्मटपणाचें उत्तर दिलें नाही परंतु ज्या तोंडाला आज तुम्ही "दुर्मुखलेलें" म्हणून हिणवीत आहा त्याच या दुर्मुखलेल्या शिष्याच्या तोंडातून कवितेचा सारखा-कधीं न आटणारा किंवा कोरडा न पडणारा काव्यौघ व शब्दौघ अव्याहत वाहावयाचा आहे असें उत्तर आपल्या गुरुजीस त्यानीं आपल्या कवितेंमध्ये देऊन ठेविलें आहे त्या कवितेंतील एक म्हणजे शेव-टला श्लोक फारच जोरदार व स्वाभिमानाने केवळ ओतप्रोत भरलेला असल्यामुळें तो समग्र उद्धृत केल्याशिवाय राहवत नाही.

**माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या चालावयाचा पुढें**
**आहे सुन्दर तो सदा सरसवाङ्निष्यन्द चोहींकडे**
**तुम्ही नाहिं तरी सुतादि तुमचे धातील तो प्राशुनी**
**कोणीही पुसणार नाहिं कवि तो होता कसा आननीं**

केशवसुतानीं स्वत च्या कवित्वशक्तीविषयी १८८६ सालीं लिहून ठेविलेलें हें भविष्य अक्षरश खरें ठरलेलें पाहण्याचा सुयोग आज जवळ जवळ पस्तीस वर्षांनी येत आहे कारण महाराष्ट्रातील सुशिक्षित तरुण पिढीच्या विद्वज्जनवृंदामध्यें आधुनिक मराठी कविमंडळाचें श्रेष्ठस्थान केशसुतानाच एक मतानें देण्यात येतें अनेक कवींना अशा प्रकारें आत्मविश्वासाचे उद्गार काढ-ण्याचा प्रसंग येतो आणि पौरस्त्य व पाश्चात्य अशा दोन्ही दिशा-कडील कवींच्या ग्रथातून प्रसंगवशात् आत्मप्रौढीचे, आत्मश्लाघेचे किंवा आत्मविश्वासपरिपूर्ण शब्द सहजासहजीं निघून जातात आता जगन्नाथपडितासारखे कित्येक कवि फारच घमेंडखोर असतात. व स्वत ची प्रौढी खुशाल मोकळेपणानें व अतिशयोक्ति-

पूर्ण शब्दानीही सागण्यास ते कमी करीत नाहींत. केशवसुतानी अशा प्रकारचा अतिप्रसग कोठेंच केलेला नाही. फक्त एक दोन ठिकाणींच त्यानीं आत्मविश्वासपर उद्गार काढले आहेत.

केशवसुताच्या निरनिराळ्या कवितापैकीं विशेष सरस अशा कविता कोणत्या असा प्रश्न कोणीं केल्यास पाच दहा निरनिराळ्या प्रकरणाची नावें निरनिराळे वाचक सागतील. भिन्नरुचित्वाचा हा परिणाम आहे परंतु त्याच्या सात आठ कविता निर्विवाद रीतीनें सरस ठरतील कोणत्याही प्रकारच्या रसिक वाचकास त्या नीरस वाटावयाच्याच नाहींत. हरपले श्रेय, झपूर्झा, तुतारी, सतारीचे बोल, स्फूर्ति, गोफण, नैर्ऋत्येकडील वारा, घराकडील गोष्टी, म्हातारी इत्यादि प्रकरणें कोणत्याही वाचकाच्या अत करणाला चटका लावून सोडल्याशिवाय राहणार नाहींत त्याच्या झपूर्झा या अत्यत उदात्त काव्याची केवळ टर व टवाळी करण्याकडे कित्येकाची प्रवृत्ति झालेली पाहण्यात येते या काव्याशिवाय इतर कित्येक चुटके देखील मोठे उदात्त विचारानीं भरलेले आहेत मुळामुठेच्या तीरावर या कवितेंत स्पष्ट शब्दानीं ध्वनित केलेल्या गोष्टीपेक्षां त्या शब्दातून निघणाऱ्या करुणरसपूर्ण कथानकाच्या अनुमानावर सोपविलेल्या स्वरूपाचा एकदर परिणाम फारच हृदयद्रावक आहे केशवसुताच्या कवितेत हा एक विशेष गुण आहे की, त्याच्या कवितेंतील एकेका चरणातून निष्पन्न होणाऱ्या बहारीच्या कल्पनावर एकेक विस्तृत काव्य लिहिता येण्यासारखें आहे इतकी भरभक्कम व भरीव अशी त्याची वाणी आहे. त्याच्या एक तुतारी या लहानशा कवितेमध्यें कै. आगरकर वगैरे सर्व सुधारक लेखकाच्या निबधातील व सुधारणाप्रिय वक्त्याच्या शेंकडों भाषणातील वक्तृत्व व सारसर्वस्व भरलें आहे तुतारी या कवितेच्या इतकी जोमदार आणि मनोवृत्ति उचबळून टाकणारी कविता मराठी वाङ्मयातच काय परंतु कोणत्याही भाषेंतील वाङ्मयामध्यें क्वचितच सांपडेल या तुतारीमध्यें स्वप्राणाचा—प्राणवायचा फुकर

घालून ती मी इतक्या जोरानें वाजवीन कीं त्या आवाजानें दशदिशा दणाणून जातील अशी प्रतिज्ञा तुतारी काव्याच्या पहिल्याच कडव्यामध्यें कवीनें केली आहे इतर कोणत्याही वाद्याच्या वाजविण्यानें माझा सदेश–माझा 'मेसेज' जितक्या जोरानें जनतेच्या कर्णरध्रावर आदळला पाहिजे तितक्या जोरानें तो आदळणार नाहीं; वीणा, सतार, सारगी, बाजा, आलगुज, सनई असल्या मजुळ वाद्याच्या आवाजानें माझें म्हणणें लोकाना जागृत करणार नाहीं, अनेक शतकाच्या दीर्घकालच्या निद्रेमध्यें लोळत पडलेल्या व कर्णरध्रें बुजून गेल्याप्रमाणें अर्धवट बधिर झालेल्या आमच्या या समाजाला जागृत करण्याला मजुल ध्वनीचा उपयोग होणार नाहीं, म्हणून कर्णकठोर, कर्कश परतु कर्णरध्रें व हृदयें–पाषाणासारखी मठ्ठ हृदयें–फोडून टाकण्याला समर्थ अशी भेसुर तुतारी (Trumpet) म्हणजे मोठा कर्णा किंवा रणशिंग मला आणून द्या आणि मी तें इतक्या जोरानें फुकतों की, त्याचा आवाज कानीं पडताच निद्रिस्त असें अज्ञानी जग खडबडून उठून जागें होईल व डोळे चोळावयास लागून स्वकर्तव्याकडे अखेर उघडलेल्या डोळ्यानीं पाहावयास लागेल अशी खात्री आपल्याला आहे म्हणून ही तुतारी मी फुकीत आहे असे कवीनें जोमदार शब्दानीं जाहीर केले आहे

रूढी जुलूम याची दुर्मद
सन्तानें राक्षसी-हत हा ?
खादाड तुम्हां खातात पहा !
जल्शाचा का समय असे हा ?
तुतारिनें या व्हा तर सावध !

अशा प्रकारें तुतारीच्या या निनादानें जागे होण्यास सागून देवावर दैत्य अन्याय करीत आहेत तरी देवाच्या बाजूनें लढण्याला तयार व्हा, देवांच्या बाजूला कुमक करा, असें आव्हान कवीनें सज्जनास केलें आहे. त्याचप्रमाणे सतारीचे बोल ही अत्यत सरस कविता ज्याच्या हृदयाची कवीच्या मनोवृत्तीशीं तन्मयता

करून टाकणार नाही असा सहृदय वाचकच सापडणे शक्य नाहीं. कवि सतार छेडीत बसणाऱ्या खुशालचद माणसावर प्रथम रागावला परतु सतारीवर वाजणाऱ्या निरनिराळ्या गती ऐकता ऐकता त्याचा राग व त्याच्या मनातील निराशा, खेद व दु.ख ही सर्व विलयास जाऊन शातरसपरिपूर्ण अशी सतारीवर वाजलेली गत अखेर ऐकून कवि तन्मय होऊन गेला त्याच्या मनावर शातीचें आवरण पसरलें, अशा प्रकारचे आपल्या मनोवृत्तीचें फारच थोड्या कालामध्यें होत गेलेलें स्थित्यतर कवीनें फारच चटकदार रीतीनें वर्णन केलें आहे आपल्या हृदयाचें अतश्चित्र इतक्या थोड्या शब्दानीं परतु परिणामकारक रीतीनें वठविण्याला अत्युच्च प्रकारची प्रतिभाशक्तीच लागते. केवळ शब्दाचें भारूड रचून चऱ्हाट वळीत बसणाऱ्या शाब्दिक श्रीमंतीचा पसारा मांडणाऱ्या कवीच्या हातून सतारीचे बोल या कवितेसारखी कवितानिष्पत्ति होणें शक्य नाहीं.

झपूर्झा म्हणजे काय असें पुष्कळ लोक विस्मयानें किंवा विस्मयाचा आव आणून कुचेष्टेनें विचारीत असतात झपूर्झा म्हणजे अत्यानदाची तल्लीन मन स्थिति होय. हर्ष खेद मावळल्या-नतर, प्रकाश आणि अधार याच्यातील भेदभाव नष्ट झाल्यावर जी काही कल्पनातीत अशी स्थिति मनुष्याच्या चिच्छक्तीला प्राप्त होते त्या अवस्थेंतील काही अनुभव म्हणजे समाधीमध्यें प्राप्त होणारा ब्रह्मानदाचा जवळ जवळ अनुभव शब्दामध्यें सागण्याचा प्रयत्न ‘ झपूर्झा ’ या गूढ काव्यामध्यें केलेला आहे अर्थात् झपूर्झा या काव्याचा रसास्वाद घेण्यास खरोखर समर्थ असा ‘ हजारातूनी एकादा ’ च सापडणार हें उघड आहे व तें कवीनें सागूनही ठेविलें आहे. या कवितेमध्यें शब्दानीं व्यक्त करण्यास जवळ जवळ अशक्य अशा कल्पना कवीनें फारच कौशल्यानें व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे ज्ञाताच्या कुपणावरून उड्डाण करून अज्ञाताच्या किंवा अज्ञेयाच्या (Unknowable) अफाट प्रदेशात सचार करण्याला जेव्हा चिद्धनचपला अशी मनुष्याची चिच्छक्ति

उद्युक्त होते तेव्हा तिला जीं दिव्य गीतें ऐकल्यासारखा भास होतो तो झपूर्झा या शब्दानें कवीनें निर्दिष्ट केला आहे झपूर्झा म्हणजे अत्यानंदाची सीमा मुली " जा पोरी जा" असे म्हणत जेव्हा खेळ खेळतात तेव्हा उत्तरोत्तर तेच तेच शब्द फार जलद म्हणता म्हणता अखेर "जा पोरी जा" या शब्दाचें "जा पुरी जा" "जपूर्जा" "झपूर्झा" अशा उच्चारामध्यें पर्यवसान होतें व घाईघाईनें व शीघ्र गतीनें हे शब्द उच्चारताना खेळ रंगात आला म्हणजे जवळजवळ देहभान विसरल्याप्रमाणें मुली या खेळात दंग होऊन नाचतात, बागडतात–तशी अवस्था नाचत गुंगत,फिरके आणि गिरके मारताना अज्ञाताच्या अफाट प्रदेशामध्यें मनुष्याच्या चिच्छक्तीची होते तिची थोडी कल्पना शब्दानी वाचकाना करून देण्याचा हा कवीचा प्रयत्न आहे. अशा प्रकारचे प्रयत्न यशस्वी रीतीनें करण्याला अत्यंत उच्च दर्जाची कल्पनाशक्ति व प्रतिभा कवीच्या ठिकाणी असावी लागते ज्या वाचकाना इतक्या उच्च दर्जाची कविता समजण्याची रसिकता किंवा बुद्धिमत्ता नसते ते वाचक "झपूर्झा" सारख्या गूढार्थाच्या कवितेला वेडप्याचे अर्थशून्य गाणें असें नाव ठेवतात, परंतु "झपूर्झा" ही कविता सर्वसाधारण वाचकाच्या बुद्धीच्या टप्प्याच्या पलीकडची असल्यामुळें पुष्कळाना तिच्यातील स्वारस्य समजले नाहीं तर त्यात त्याचा दोष नाहीं परंतु कित्येक कवितेचे भोक्ते म्हणविणारे स्वयंमन्य पंडित जेव्हा 'झपूर्झा' या उदात्त कवितेची टवाळी करण्यास प्रवृत्त होतात तेव्हा'**अरसिकेषु कवित्वनिवेदन शिरसि मा लिख मा लिख मा लिख**' असे उद्गार काढूनच स्वस्थ बसणें भाग आहे

केशवसुताच्या परिणत प्रतिभेच्या अवस्थेमध्ये जीं उत्तमोत्तम गीतें त्याच्या लेखणींतून उतरलीं त्यामध्ये हरपलें श्रेय हें अखेरचें गीत होय "हरपलें श्रेय" या कवितेंतील कल्पना फारशी गूढ नाहीं, परंतु कित्येकाना या उदात्त कवितेमधील स्वारस्य न कळल्यामुळे ते या कवितेची देखील हेटाळणी करण्यास प्रवृत्त होतात हरपलें श्रेय म्हणजे प्रत्येक विचारी मनुष्याच्या

आत्म्याला जी तळमळ या मर्त्यलोकीं लागते तिची कहाणी आहे. मनुष्याचा आत्मा हा या मृत्युलोकींचा कायमचा रहिवासी नसून परमात्म्यापासून काहीं अज्ञात कार्यकारणपरंपरेनें तो चुकून किंवा तुटून या लोकीं नश्वर व जडदेहामध्ये गुरफटून गेलेला असतो, व या देहामधून सुटून पुनरपि परमात्म्याशी केव्हा सलग्न होऊन जाईन अशी तळमळ त्याला लागली म्हणजे या मर्त्यलोकीच्या कोणत्याही गोष्टीनें त्यास समाधान वाटेनासे होतें व आपलें जें कांही हरपले आहे तें पुनरपि मिळत नाहीं अशी जाणीव त्यास लागल्यानें त्याची तळमळ सारखी वृद्धिंगतच होत असते या तळमळ लागलेल्या अवस्थेंतील अनुभव–म्हणजे मुमुक्षूचे "हरपलें श्रेय" या कवितेमध्यें सांगितलेले आहेत आत्म्याला माहेरची आठवण होते म्हणजे काय? तर या मर्त्यलोकीं त्याला झालेला त्रास हा कष्टमय सासुरवास आहे असें त्याला वाटतें व या मर्त्यलोकीच्या त्रिविध तापांतून कष्टमय कालक्रमण चाललें असताना आत्म्याला "चुकचुकल्यापरि वाटे अंतरि" असे होतें हें बद्धावस्थेंतून मुमुक्षूच्या अवस्थेमध्यें गेलेल्या कोणाही विचारी माणसाला स्वानुभवानें अवगत असतेंच अशा या अवस्थेमधील विचारवान् माणसाची मन:स्थिति रेखाटण्याचा प्रयत्न या कवितेंत कवीनें केला आहे तो सर्वतोपरि सरस वठला आहे वास्तविक पाहिलें तर आत्म्याच्या तळमळीचे व अवस्थेचें वर्णन यथायोग्य शब्दानीं करणे अत्यंत दुर्घट आहे "माझे मज लाभेल कधीं?" अशी तळमळ आत्म्याला सारखी लागून राहिली म्हणजे इहलोकींच्या सर्व गोष्टी त्याला असार वाटू लागतात व या असार गोष्टीत व लुटुपटीच्या संसारात आपण कसे निमग्न होऊन गेलों याचे त्याचे त्यालाच आश्चर्य वाटू लागतें आत्म्यावर स्त्रीत्वाचा आरोप कवीनें केला आहे तो कविकल्पनेला अनुरूपच आहे जे सहृदय वाचक केशव-सुताची ही कविता आम्ही निर्दिष्ट केलेल्या विचारसरणीला धरून वाचतील त्याना त्या कवितेंत भ्रमिष्टपणा भरलेला नसून ती स्वानुभवानें ओतप्रोत भरलेली आहे असें दिसून येईल.

केशवसुताच्या कित्येक कविता आत्मचरित्रात्मक आहेत किंवा स्वतःच्या अनुभवाबद्दल त्या लिहिल्या गेल्या आहेत एव खेडें, नैर्ऋत्येकडील वारा, गोष्टी घराकडिल त्या, या कविता अशा प्रकारच्या होत त्यावरून त्याना आपल्या मातृभूमीसबधीं व स्वजनासबधी किती आदर, पूज्यबुद्धि व प्रेमभाव वाटत असे तें स्पष्ट दिसतें "माल्यकूट" म्हणजे मालगुड हें केशवसुताचें जन्मस्थान होय. "जगदुद्धरा" नदी हें नाव मात्र त्यानी कोंकणातील खेडच्या "जगबुडी" नदीला का दिलें असावे तें कळत नाहीं खेडच्या नदीचें नांव जगबुडी आहे परतु जग बुडविणारी असें आपल्याच गावच्या नदीला न म्हणता बुडल्यानतर जगाचा उद्धार करणारी असें आपल्या गावच्या नदीला स्तुतिपर नाव त्यानीं दिलें असावे "मृत आशाच्या चितावरुनिया। पिशाच माझें भटकत आहे–शाति नसेचि तया" हें त्याच्या स्वतःच्या मनःस्थितीचें हुबेहुब वर्णन आहे. त्याच्या लेखणीतून उतरलेला अखेरचा अभग फारच करुण वाणीनें लिहिलेला असून त्याच्या आयुष्यातील कटु अनुभवाचें एकीकरण त्या अभगामध्यें झालेले दिसतें "भिकार या जगीं इच्छित न मिळे काहीं। म्हणुनी तुझे पायी भिक्षादेही। केशवसुत म्हणे देवा दीनानाथा। तुझे पायीं माथा वाहियेला॥ हे त्याच्या ओजस्वी लेखणींतून उतरलेले दयाघन परमेश्वराची करुणा भाकीत असलेले अखेरचे शब्द होत या अभगानतर त्यानीं कोणतेंच कवित्वलेखन केलेलें नसावें असें त्याच्या हातच्या वहीवरून दिसतें

* * *

प्रा अ ना देशपांडे, एम् ए नागपूर

# १५: केशवसुतांच्या कवितांतील उपमानसृष्टि

केशवसुताच्या कवितेचा सूक्ष्म अभ्यास ज्या अनेक मार्गांनीं होणें शक्य आहे त्यापैकीं फक्त एकाच मार्गाचें केवळ किंचित् दिग्दर्शन करण्याचा हा एक लहानसा व नम्र प्रयत्न आहे अनुवादित आणि आधारित कविता वगळून त्याच्या स्वतंत्र कवितात जी उपमानें वापरण्यात आली आहेत त्याची येथें नोंद करण्यात आली आहे अर्थात् हें उघडच आहे की साम्यावर आधारलेल्या अलकारांतूनच हीं उपमानें निवडण्यात आलीं आहेत. या उपमेय-उपमान सृष्टीच्या स्थूल अवलोकनातून सहज लक्षात येणारे काहीं ठळक निष्कर्ष शेवटीं दिले आहेत.—

| कवितेचें नाव | उपमेय | उपमान |
|---|---|---|
| १ प्रियेचें ध्यान | वियोग | भूत |
| २ जयाजीराव शिंदे | कीर्ति | ध्वज |
| व तुकोजीराव होळकर | कुल | १ दीप, २. वृक्ष |
| ३ सृष्टि आणि कवि | सृष्टीचें रडणें | वृष्टि |
| | सृष्टीचा श्वास | मरुत |
| ४ कविता आणि कवि | कवि, | युवा, |
| | कविता | युवती |
| ५ अपर कविता दैवत | कवि | भृंगा; |
| | प्रिय पत्नी | कळी, |
| | वियोगाची कवनें | भृंग्याचा गुंजालाप |
| ६ दुर्मुखलेला | सकृत्दर्शनी निष्प्रभ वाटणारा कवि व त्याचे काव्य; | १ मुग्या, २ राखेचीं ढिपळे |
| | | १ आकाशात उडणारे पक्षी |
| | प्रभावी कवि व त्याचें प्रभावी काव्य | २ जग जाळून टाकणारा असा भडकलेला अग्नि |
| ७ नाहीं ज्यापरि डोंगळा कधिहि तो गेला झणीं साखरे | प्रियकर | १ डोंगळा २ मार्जार ३ कृष्ण ४ भिक्षु ५ तप्त ६ हंस ७ मलयानल ८धाराधर ९ इंद्र-धनुष्कर १० मद्यासक्त नर ११ भृग १२ राहू |

| कवितेचें नाव | उपमेय | उपमान |
|---|---|---|
| | प्रेयसी | १ साखर २ साथ ३ दहयाडी ४ दक्षिणा ५ गंगाजळी ६ विसिनी ७ वनिका ८ पर्वती ९ मेघालि १० मद्याची कुपी ११ कमलिनी १२ सुधाधारा |
| ८ एका भारतीयाचे उद्गार | सद्य स्थिति | पश्चिमेची कांति |
| | स्वोत्कर्ष | रवि |
| | ऱ्हास | निबिड रजनी |
| | पारतंत्र्य | अंधकार |
| | परवशपणा | निशा |
| | स्वातंत्र्य | धुमणी |
| | (पारतंत्र्य) | पजर |
| ९ एक खेडें | कीर्ति | १ शिंग २ पीस |
| १० गावीं गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून | मैत्री | वल्ली |
| | ऱ्हास | रजनी |
| | स्वतंत्रता | पहाट |
| | उत्कर्ष | दिन |
| | विरह | अग्नि |
| | आशा | जलधारा |
| ११ गोष्टी घराकडिल मी वदता गड्यारे | घड्याळाची 'टकटक' | टाळ कुटणें |
| १२ आगबोटीच्या काठाशीं समुद्राच्या शोभेकडे पहात उभ्या असलेल्या एका तरुणीस | अब्धीच्या लहरी | हृदयात उठणाऱ्या कल्पित |
| | सिंधूच्या चपल लहरी | देहांत अनवरत उडणाऱ्या नाड्या |
| | धरणी | वनिता |
| | दिनमणी | (धरणीचा प्रियकर, पति) |
| | दिनकर प्रभेच्या लालीनें खुलणारे जलधर | १ त्रिदशललनांचे क्रीडाशैल २ अमर मिथुनांची केलिद्वीपें |
| | आकाश | उदधि |
| | अनल | नौका |

| कवितेचें नांव | उपमेय | उपमान |
|---|---|---|
| | अधर | प्रवाल |
| | रदन | मोती |
| | पद | पंकज |
| १३ रा ब. पटवर्धन नागपूर यास | प्रगल्भ नारी | पुनव |
| | व्रीडायुक्त मुग्धा | बीजेची कोर |
| | एका कवीचे आरंभीचें मुग्ध बोल | पतीचें नांव घेतांना युवतीच्या वरौठ्यातून निघणारा अव्यक्त ध्वनि |
| | कवि | नरजातीचे नेत्रकर्ण |
| १४ प्रीति | प्रीति | नंदनवनांतल्या कल्पलतेची हृदयांत पडलेली बीजें |
| १५ समृद्धि आणि प्रीति | सरित्पतीवर शोभणारें एक सुरेख द्वीप | वैकुंठाहून आपल्या ताताच्या घरी परत आलेली इंदिरा |
| | उद्यान | नंदनवन |
| | आयु | स्वप्न |
| १६ मजुरावर उपास मारीची पाळी | पिता | पक्षी |
| | (मुले) | पिलें |
| १७ प्रयाणगीत | प्रीति | वस्त्र विणणारी स्त्री |
| | जग | वसन |
| | प्रेम करणारा नर | १ मेघ, २ रवि |
| | प्रिया | १ वीज २ पूर्व दिशा |
| १८ रा रा. बळवंत आप्पाजी दाते यास | चिंता | ग्रीष्म |
| | वक्तृत्व | वज्र |
| १९ कवितेचें प्रयोजन | शांति | घर |
| | प्रयत्न | हाट |
| | प्रीति | निकुंज |
| | जीवित्व | रण |
| | ज्याच्यातील शिथिलता नष्ट होत चालली आहे असा समाज | खुटचा पिळून ज्याच्या तारा ताणलेल्या आहेत असें वाद्य |
| २०. माझा अंत | स्वरसंपदा अशी रम्यबाला | वीज |
| | ज्याने तिला पाहिलें असा | वृक्ष |

| कवितेचें नांव | उपमेय | उपमान |
|---|---|---|
| | पुरुष | |
| २१ कविता आणि प्रीति | मुग्ध बालकें | १ फुलें २ तारका ३ दवाचे तुषार |
| २२. स्वप्न | मेघवेष्टित तारक | आशेच्या किरणानें युक्त अशा चिंता |
| २३ सिंहावलोकन | आयुष्यांतील घालविलेले काही प्रसंग | १ रुचिर प्रदेश २ तटिनीतट ३ वनस्थली |
| २४ दिव्य ठिणगी | स्फूर्ति | यान |
| | काव्यनिर्मितीची प्रेरणा | ज्वालेची ठिणगी |
| २५. प्रियेला सादर केलेली पुष्पमाला | कुसुमितवनाचीशोभापहाण्यासाठीं उत्सुक झालेला नायक | शाळेंतून घरीं येण्याविषयीं उत्सुक झालेला बाळ |
| | वेलीवरील फुलें | नायिकेच्या ओच्यांत असलेली अपत्यें |
| | विपिन | सदन |
| | स्वप्न | मुलाचे शब्द |
| | सुगंध | नायिकेचें प्रेम |
| | कविता देवीस वरणारा विश्वात्मा | नायिकेस जवळ घेणारा नायक |
| २६ भृंग | सृष्टि | कवयित्री |
| | विरल तमानें युक्त असें अरुणतेज | कवीच्या हृदयांतील उज्ज्वलता व अधुकता |
| | कलिका | कवयित्रींच्या कल्पना |
| | भृंग्याचे गान | सृष्टीचें कवन |
| | मानवी कवि | दुसऱ्यानें पढविलेले बोल बोलणारा पिंजऱ्यातील शुक |
| २७ कल्पकता | कल्पकता | दुर्गम भूशिखरावर बसलेली व दिव्य वस्त्र विणीत असलेली देवी |
| | पृथ्वी | वृद्ध स्त्री |
| २८ रूढि सृष्टि कवि | रूढि | दुष्ट राणी |
| २९ कवि | मज्जा | फुलें |

| कवितेचें नांव | उपमेय | उपमान |
|---|---|---|
| ३० फुलांची पखरण | सुंदर सकाळ | मुलीचें माहेर |
| | आशा | वेल |
| | गाणीं | त्या वेलीला आलेलीं फुलें |
| ३१. पर्जन्याप्रत | खद्योतिका | रात्रीच्या दिवटया |
| ३२ स्फुट | सुस्तनी विलोलनयना | शरास फेकीत येणारा धन्वी |
| | प्रथम मन आकर्षून घेणारी पण परिणामी दुःख देणारी सुखें | काटयानीं युक्त असा गुलाब |
| ३३. पुष्पाप्रत | अश्रूचा ढग | अश्रूचा ढग |
| ३४ शब्दानो ! मागुते या | चित्त | भूमि |
| | हृदय | वन |
| | आशा | मेघालि |
| | चिता | अनल |
| ३५ पण लक्षात कोण घेतो ? च्या कर्त्यास | भामिनी | भूपृष्ठस्थित आद्यदैवत |
| | रूढिका | राक्षसी |
| ३६. चिरवियुक्ताचा उद्गार | विरहानतर प्राप्त होणारे प्रेयसीच्या मीलनाचे सुख | १ वृष्टीनतर साजिरी शरद व चद्रकांति याची भेट<br>२ तीव्र शिशिरामागून येणारा रम्य वसत<br>३ सूतिक्लेशानतरचे तान्हुल्याचे सुख<br>४ पाणी ओसरल्यानतर सागराला येणारी भरती<br>५ खग्रास ग्रहणानतरचा मोक्षकाल व द्युत्याविकृति<br>६ कृष्णानतर शुक्लपक्ष व चढती कौमुदी |
| | आशा तन्तु उत्कण्ठा ज्वलन | ७ गाढ रजनीमागून सुरेख प्रातःकाल |
| ३७ आहे जीवित काय ? | जीवित | १ नि सार भास २ स्वप्न ३ कालप्रवाहावरील बुडबुडा |
| | | काल प्रवाह |

| कवितेचें नाव | उपमेय | उपमान |
|---|---|---|
| | | सौख्यसिंधु |
| | | आनंदनिधान शैलशिखर |
| ३८ खाणावळींतील घृतधारा | घृतधारा | १ सुवर्णाची वल्ली |
| | | १ नभातून भूमीवर उतरणारी चपला |
| ३९ तुतारी | अवकाश | ओसाडी |
| | | रूढीचीं राक्षसी सतानें |
| | सुधारणेच्या मार्गांत येणारी संकटें | १ रविकिरणाचा चूर करणारी ढगें |
| | | २ मोहर गळून पिकावर पडलेली कीड |
| ४० झपूर्झा | प्राप्तकाल . | विशाल भूधर |
| | मानवी प्रयत्नाचा स्पर्श न झालेलें असें उच्च सुखाचें क्षेत्र | नागरल्याशिवाय राहिलेली भूमि |
| ४१ प्रीति आणि तू | विरह | अग्नि |
| ४२ धूमकेतु आणि महाकवि | महाकवि | धूमकेतु |
| | विश्रांति | तम |
| ४३ चिन्हीकरण | मूर्त वस्तू | वधू |
| | भावशर्मा | वर |
| | कवीचा आत्मा | उपाध्याय |
| | स्फूर्ति | ज्वाला |
| | कवीच्या क्लृप्ति व विचार | वरील जोडप्याला झालेलीं मधुर बालकें |
| ४४ विद्यार्थ्यांप्रत | सच्छील | रत्न |
| ४५ उत्तेजनाचे दोन शब्द | (अचूक प्रयत्न) | बर्चीचा अचूक मार |
| | (अनुकूल परिस्थिति) | तप्त लाल लोखंड |
| | (कठीण साधना) | उच्च घाट |
| ४६ सृष्टि आणि कवि | सुम | नक्षत्र |
| ४७ स्फूर्ति | क्लृप्ति | नौका |
| | व्योम | सागर |
| | उडु | रत्न |

| कवितेचें नांव | उपमेय | उपमान |
|---|---|---|
| | पद्मण्कित | तरफ |
| ४८ कांट्यावाचूनि गुलाब नाहीं | सुखदुःख एकत्र असणें | छायाप्रकाश एकत्र असणें |
| ४९ मूर्तिभजन | मूर्ति | ( बाह्योपचरयुक्त रूढि ) |
| | आंतील संपत्ति | (तिच्यांतील सत्वांश) |
| | डोंगरीचें आडदांड | (सुधारक) |
| | कोंडें घालून बसलेली कैदाशीण | (रूढि) |
| | मूर्ति विकणारे | (रूढीवर उपजीविका चालविणारे) |
| ५० नैर्ऋत्येकडील वारा | पर्वताचीं शिखरें | आस्वर्गांत चढणारी महात्म्याचीं मानसें |
| | दगडांतून धबधबा वाहणारे निर्झर | कविदुर्दशेतून येणारा वाणीचा ओघ |
| | जुने मराठी किल्ले | पडके इतिहासपत्र |
| | तरंगतांडव | अज्ञेयावर खेळणारें क्षणिक अस्तित्व |
| | प्रीति | कंटकयुता वल्ली |
| | कीर्ति | शूलारोपण यूपावरील ध्वजा |
| ५१ कवितेच्या हृदयीं जसे गुंगती | प्रियकराच्या अंतर्यामांत प्रेयसीच्या सौंदर्याचा होणारा विकास | १ कवीच्या हृदयांत गुंगणारे कवितेचे मधुबोल<br>२ गायकमतींत झुकणाऱ्या ताना |
| | प्रियकराच्या चित्तव्यापारांत प्रेयसी खेळते | १ अलीच्या गुंजारवीं खेळणारी मधुलोलुपता<br>२ कोकिलगानीं डोलणारी वसंतशोभासक्ति |
| ५२ मनोहारिणी | मनोहारिणी अशी स्त्री | सृष्टिलतेची फुललेलीकलिका |
| | तिची गौर कांति | शशिकांति |
| | तिच्या लावण्याची प्रभा | विजेचें तेज |
| | तिच्या कपाळावरील उज्ज्वलता | कुंतलावरणाखालीं पहुडलेल्या तारकेचा प्रकाश |

| कवितेचें नाव | उपमेय | उपमान |
|---|---|---|
| | सौंदर्याची व शालीनतेची पुतळी | रामायणमूर्ति |
| ५३ नवा शिपाई | जातीयतादीची सकुचित बधनें मानणारा | कूपातील मडुक |
| | अहस्फूर्तीचें केद्र | तिळ |
| | जडाचे वेष्टन | त्यावर चढविलेले पाकाचे कण |
| ५४ प्रणयकथन | प्रियकर | १ जलाशय २ निधी |
| | प्रेयसी | १ झरी २ नदी |
| | जड हस्ताची मर्यादित कृति | शुक्तिपुट |
| | मनोगत | रत्नाकर |
| ५५ वियोगामुळें | प्रेयसी | सुधा |
| | प्रेयसीचे गुण | इक्षुखड |
| | प्रेयसी विषयीच्या प्रियकराच्या कल्पित | माडीवर असलेलीं मुलें |
| ५६ पद्यपक्ति | आमुचें आयुष्य | दु:खाचा पेला |
| | अनुभव | त्याच्या बुडाशीं बसलेला गाळ |
| ५७ वातचक्र | जगत | द्रुम |
| | मी (कवि ?) | पिकलें पर्ण |
| ५८ कोणीकडून कोणी कडे ? | सशय | डोह |
| | भ्रम | बुद्बुद |
| ५९ दिवाळी | दुष्काळ | दैत्य |
| | सस्य | सृष्टीचा हिरवा शालू |
| | दीपाच्या पक्ती | गगनातून खालीं उतरलेल्या तारा |
| ६० म्हातारी | म्हातारी | १ मूर्त यदृच्छा २ गधर्वाचें सूक्ष्म विमान ३ अज्ञातातला मूर्त ध्वनि ४ खपुष्प |
| ६१ वियुक्ताचा उद्गार | प्रियकर | १ गिरी २ लब्धि ३ आकाश ४ ध्रुव ५ चित्रोल्लास ६ स्वर्लोक ७ तरणी ८ पुरुष |

| कवितेचें नांव | उपमेय | उपमान |
|---|---|---|
| | प्रेयसी | १ वसुधरा २ वेला ३ क्षितिज रेषा ४ उत्तरा ५ छायासखी ६ सुरधुनी ७ श्रुतिदेवता ८ प्रकृति |
| ६२ स्मरण आणि उत्कठा | प्रियकर | १ शुकराज २ सहकार ३ मानसहस ४ नाविक |
| | प्रेयसी | १ सारिका २ जातिलता ३ विहार पुष्करिणी ४ क्रीडासिधुमधील तरी |
| | प्रीति | सरिता |
| ६३ फिर्याद | उत्कठा | अनल |
| | दया | अब्धि |
| ६४ कचाप्रत देवयानी | दु:ख | पक |
| | देवयानी | धेनु |
| | परुषोत्तरें | शल्यें |
| | निराशा | अड |
| | आशा | (पक्षीण) |
| | विरह | अग्नि |
| | प्रियजन | रत्न |
| | अन्यजन | काच |
| | नायक | शलभ |
| | नायिका | ज्योति |
| ६५ प्रतिभा | नाश पावणारे दानव | पतग |
| ६६ गोफण केली छान | कठिण शब्द | धोडा |
| ६७ हरपलें श्रेय | श्रेयशोधनार्थ धडपडणारी उदात्त बुद्धि | १ स्वपतिचितेवर उडी घेणारी सद्‌गतिविमुख सती २ दीपशिखेवर उडी घेऊन प्राण देणारा पतग |

या कोष्टकातून सूचित होणारे कांहीं ठळक निष्कर्ष .–

१ अनुवादित आणि आधारित कविता वगळल्यास, केशवसुताच्या स्वतंत्र कवितांत लहान मोठ्या अशा एकूण ३१७७ ओळी आहेत यापैकीं त्यांनीं फक्त २५३ ठिकाणीच उपमानाचा उपयोग केलेला आहे म्हणजे स्थूलमानाने असें म्हणता येईल कीं त्यांच्या शभर ओळींपैकीं फक्त आठ ओळी अलंकारानी विभूषित झालेल्या आहेत याचा अर्थ असा कीं या कविश्रेष्ठाच्या प्रतिभेचा अलंकारिकतेकडे फार कमी ओढा आहे साधारणाच्या लक्षात न येणारे असे मूर्त, अमूर्त वा मूर्तामूर्त वस्तूतील सादृश्य वा विरोध सहज स्फुरणे वा मुद्दाम हुडकून काढणें, यातच बऱ्याच कवींच्या कल्पनाशक्तीचे बळ साठविलेलें असतें केशवसुताच्या प्रतिभेला मात्र हा सादृश्यविरोधाच्या शोधाच्या खेळात रमण्याचा चाळा जडलेला नव्हता. मनाच्या अधिक उच्चतर व्यापारात तिच्या सामर्थ्याचें रहस्य सामावलेलें होतें

१ दोनशे साठ उपमानापैकी जवळजवळ एकशेवीस उपमानें निसर्गाशी संबंधित आहेत. पौराणिक स्वरूपाचीं फक्त दोन आहेत (१) प्रियकर–कृष्ण (२) सौंदर्याची व शालीनतेची पुतळी– रामायणमूर्ति देवदेवता संबंधविषयक सहा आहेत (१) प्रियकर–राहू (२) दिनकर प्रभेच्या लालीनें खुलणारे जलधर– १ त्रिदश ललनांचें क्रीडाशैल २ अमर मिथुनांचीं केलिद्वीपें, (३) द्वीप–इंदिरा (४) भामिनी–भूपृष्ठस्थित आद्यदैवत (५) म्हातारी–गंधर्वाचे सूक्ष्म विमान. ऐतिहासिकतेशीं संबंधित असलेलें उपमान फक्त एकच आहे. (१) जुने मराठी किल्ले–पडकें इतिहासपत्र सामाजिक आणि कौटुंबिक जीवनाशीं संबंधित असलेलीं अशी पंचवीस आहेत. (१) श्रेयशोधनार्थ धडपडणारी उदात्तबुद्धि–स्वपति चितेवर उडी घेणारी सती (२) आमुचें आयुष्य–दु खाचा पेला (३) प्रेयसीविषयीच्या प्रियकराच्या क्लृप्ति– माडीवर असलेलीं मुलें. (४) अहंस्फूर्तीचे केंद्र–तीळ (५) जडाचे वेष्टन–तिळावर चढविलेले पाकाचे कण (६) कँदाशीण–रूढि (७) मूर्ति–निरर्थक

बाह्योपचारयुक्त रूढि (८) डोंगरींचे आडदाड–सुधारक (९) मूर्ति विकणारे–रूढीवर उपजीविका करणारे (१०) मूर्त वस्तु–वधू (११) भावशर्मा–वर (१२) कवीचा आत्मा– उपाध्याय (१३) विरहानंतरचें मीलन–सूतिक्लेशानंतरचें तान्हुल्याचें सुख (१४) पृथ्वी–वृद्ध स्त्री (१५) सुंदर सकाळ– मुलीचें माहेर (१६) विपिन–सदन (१७) कुसुमित वनाची शोभा पाहण्याविषयीं उत्सुक झालेला नायक–शाळेंतून घरीं येण्याविषयीं उत्सुक झालेला बाळचा (१८) वेलीवरील फुलें– नायिकेच्या ओच्यात असलेलीं अपत्यें (१९) प्रयत्न–हाट (२०) शांति–घर (२१) प्रीति–वस्त्र विणणारी स्त्री (२२) कवि–युवा (२३) कविता–युवति (२४) प्रियकर– मद्यासक्त नर (२५) प्रेयसी– मद्याची कुपी भौतिक शास्त्राच्या ज्ञानावर आधारलेलें एकच उपमान आहे आणि तें 'पद्यपक्तिची तरफ' या रूपकात आलेलें आहे कधी कधीं व्याकरणातल्याहि कल्पनाना उपमानें बनविण्याचा प्रयत्न करण्यात येतो केशवसुताच्या कवितात असाहि प्रयत्न दुर्मिळ आहे.

३ बरीचशीं उपमानें सांकेतिक व परंपरागत स्वरूपाची आहेत. उदाहरणार्थ कुल–वृक्ष, ऱ्हास–रजनी, पारतंत्र्य–अंधकार, पद–पंकज, बालकें–फुलें, विरह–अग्नि, सुम–नक्षत्र, दया–अब्धि, काहीं उपमानें कवीच्या स्वतंत्र प्रतिभेची निदर्शक आहेत. उदाहरणार्थ, प्राप्तकाल–विशाल भूधर, अवकाश–ओसाडी, पद्यपक्ति–तरफ. काही ठिकाणी मूर्त उपमेयाकरिता अमूर्त उपमान वापरलेलें आहे, उदाहरणार्थ, पर्वताची शिखरें–आस्वर्गात् चढणारी महात्म्याचीं मानसे निराशा–अंड, कीर्ति–१ शिंग २ पीस यातील उपमानें कांहीशी चमत्कारिक वाटण्यासारखीं आहेत कुसुमित वनाची शोभा पाहण्यासाठी उत्सुक असलेला नायक–शाळेंतून घरीं येण्यास उत्सुक असलेला बालक प्रेयसीचे गुण–इक्षुदंड, सिंधूच्या चपल लहरी–देहांत अनवरत उडणाऱ्या नाड्या, अशा कांहीं सादृश्यातील औचित्य पटणें कठीण आहे.

४ थोडक्यात निष्कर्ष हा कीं अलंकाराची समर्पक आणि चोख-दळ योजना हें कांहीं केशवसुताच्या कवितेचें मुख्य वैशिष्ट्य नाहीं, तें तिच्या अन्य गुणातच शोधलें पाहिजे. सरस आणि प्रभावी कादंबरी किंवा पर्यायानें कोणतीहि ललित वाङ्मयीन कृति निर्माण करण्या-करता निर्मात्याजवळ जाज्वल्य मनोवृत्ति असावी लागते ही वृत्यंतर्गत जाज्वल्यता, प्रयत्नशील जीवनदृष्टि आणि श्रेयाच्या शोधाची उत्कट व जिवंत तळमळ हीं केशवसुतांच्या व्यक्तित्वाची आणि त्याचबरोबर त्यांच्या कवितांचीहि गौरवार्ह वैशिष्ट्यें आहेत ही सर्व रसिकजनमान्य गोष्ट येथें नुसती नमूद करणें पुरें आहे

* * *

विद्वद्रत्न डॉ रा प्र पारनेरकर, पीएच् डी, इंदूर

# १६ : हृद्गत

"शान्तीचे साम्राज्य स्थापू बघत काळ जो आहे ।
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे ।।"

अर्वाचीन कविकुलगुरु केशवसुताचा व माझा परिचय माझे बालवयातच पूर्वऋणानुबंधामुळें झाला असें म्हणावे लागतें प्रथम ज्या वेळी 'केशवसुताची कविता' हा त्याचा कवितासग्रह माझे हातीं आला त्या वेळी माझें वय पधरा वर्षांचे आतच होतें आणि कविता म्हटली की, अन्वयार्थापेक्षा त्या वेळीं माझी दुसरी कल्पना नव्हती पण अशा बालवयातच माझ्या मनाची पकड केशव-सुताच्या कवितेनें घेतली त्या वेळीं काव्य म्हणून जरी मला काहीं समजत नव्हतें तरी मी प्रयत्नपूर्वक हा कवितासग्रह माझे मालकीचा करून घेऊन त्या वेळीं मला आवडणाऱ्या कवितांची सारखीं पारायणें करीत होतों फुलपाखरू, दवाचे थेंब, विद्याप्रशस्ति, म्हातारी, फुलाची पखरण, गुलाबाची कळी, दिवस आणि रात्र, मुलास सोडवणाऱ्या पतोजीस इत्यादि प्रकारच्या त्या कविता होत त्या वेळीं या कविता वाचताना माझें मन भारावून जाई, आणि मी इतका तद्रूप होऊन जाई की, कविता म्हणताना माझा स्वर किती वाढला आहे याचें मला भान राहात नसे अर्थातच तीर्थरूपांपैकीं कोणी एकाद्यानें हटकलें म्हणजे मी भानावर येई. आणि या असल्या प्रसगातूनच ह्या मोठ्या माणसाला लहान मुलाचें मन कसें समजतें व तो त्याचें हुबेहूब वर्णन कसें करतो, तर इतर मोठ्या माणसाप्रमाणे हा लहान मुलास सारखा कवितेंतून का होईना उपदेशच केवळ कसा करीत नाहीं, इत्यादि प्रकारचे साश्चर्ययुक्त प्रश्न

माझे मनांत येत असत क्षणातच तें सारें मी विसरून जाई विचार-पूर्वक या प्रश्नाचा छडा लावण्याची कुवत त्या वेळीं तरी माझे बुद्धीचे ठिकाणीं नव्हती वर्ष दोन वर्षांच्या पुढील कालावधींतच या माझ्या अतिपरिचित कवितांचें वाचन जवळजवळ बदच पडलें त्या मी बुद्धचा वाचल्या तरी त्यात मौज वाटेनाशी झाली

मला आवडतील अशा नव्या कविता मी पुस्तकात शोधू लागलो, आणि त्या वेळीं ज्या माझे सहज नजरेंत भरल्या त्याचे-शीहि माझे काही काळ चागलेंच गूळपीठ जमलें दुर्मुखलेला, अत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न, मजूरावर उपासमारीची पाळी, सुभाषित, आहे जीवित काय ?, धृतधारा, दोन बाजी, विद्या-र्थ्याप्रत, उत्तेजनाचे दोन शब्द, घडचाळ, स्फूर्ति, दिवाळी, नवा शिपाई, ह्या साऱ्या कविता या वेळींहि मला यथार्थत्वानें कळत होत्या असें मुळीच नाहीं पण त्या वेळी मी त्या अनेक वेळा म्हणत असे आणि काव्यविषयाला अनुरूप अशा भावनाचे उद्दीपन माझे ठिकाणी होऊन मी कधीं कधीं विचारमग्न होत असे केशवसुत त्या वेळीं जर आपल्याला भेटते तर–! असाहि एक विचार त्या वेळी मधूनमधून माझे मनात येई पण ते जर मला त्या वेळीं भेटले असते तर मी त्या वेळीं त्यास काय विचारणार होतो हें मात्र मला आज सागता यावयाचें नाही एक गोष्ट मात्र मला आज निश्चित सागता येईल ती ही की, केशवसुताचा आणि माझा परिचय झाल्यापासून माझे वाढत्या वयाबरोबरच माझा त्याच्याविषयीचा लोभहि आजवर सारखा वाढतच आहे आज जरी मी त्याची कविता रोज वाचीत नसलों तरी वर्षाकाठी का होईना पण एकदा तरी त्याचा कवितासग्रह चाळण्याची लहर मला येतेच

अवस्थासुलभ असा प्रीतिविषय जेव्हा माझे मनात हळुहळू आपले स्थान पटकवू लागला, तेव्हा त्याचे सुरवातीचे काळात मुळामुठेच्या तीरावर, कचाप्रत देवयानी, आगबोटीच्या काठाशी समुद्राच्या शोभेकडे पहात उभ्या असलेल्या एका तरुणीस, खिडकीकडे मौज पहावयास, मयूरासन आणि ताजमहाल, स्फुट ६२ या सदरातील–

"जैसा जैसा नवयुवतिहृन्मन्दिरीं कामदेव,
वागू लागे, हळुहळु तसा हट्ट काठिण्यभाव
दूरी सारी तिथुनि, मग ते राहण्याला स्तनात,
येती, अर्थात कुच तरिच हे पीन काठिन्ययुक्त "।

या प्रकारच्या विकसन, इत्यादि कविता मला आवडत. मी ह्या त्यावेळी अनेक वेळा वाचीत असे, पण ह्या वाचून मला आनद अगर समाधान तर कधीच वाटत नसे उलट क्षुब्ध अशा मन स्थितीचा काहीं काळ मी अनुभव करी अगर उदासी येत असे परिणामीं जरी असें होई तरी ह्या कविता वाचण्याचा मोह मात्र मला अनिवार होत असे याच विषयाच्या माझ्या दुसऱ्या व तिसऱ्या अवस्थेत केशवसुताच्या साऱ्याच प्रणयकविता माझ्या हृदयाच्या तारेशी आपला स्वर देत, इतकेच नव्हे तर काहीं वेळा तर, माझ्या हृदयाचा तो हुबेहूब फोटोच आहे असे सुद्धा मला वाटे. पण हें बऱ्याच अशी सारे कल्पनेचेच साम्राज्य असावयाचें असें जरी असले तरी मला त्यावेळी 'केशवसुत' हे एक 'मजनू' आहेत असे श्रद्धापूर्वक वाटत असे या सुमारास केशवसुतावरील काहीं टीकावाङमयहि माझे वाचण्यात आलें होतें त्यात कवितेच्या गुणापेक्षा दोषाचीच यादी अधिक भरत होती परतु केशवसुताविषयीची माझी आस्था त्यायोगे तिळप्राय देखील कमी झाली नाहीं

माझा काव्याचा आणि कवितेच्या तत्राचा थोडा अधिक अभ्यास झाल्यावर मला स्वत ला केशवसुताची भाषा, कवितेचे तत्र इत्यादि गोष्टी जाणवू लागल्या काही काळ श्रद्धेला हादरा बसल्यासारखें झालें. तरीसुद्धा अधुनमधून मी कविता चाळीतच असे. पण रसग्रहणाची माझी शक्ति मला कमी झाल्यासारखी जाणवे आपल्यातलें काहींतरी हरवल्यासारखें वाटे मध्यतरीचा असा काळ निदान पाच वर्षांचा तरी गेला असावा या काळात मी बरेंच काव्य वाचले खरे, पण याच काळात माझें कवितेचें वेड बरेंच सपुष्टात आल्यासारखें झालें होतें काव्य समजू लागणें हा रसिकतेला एक शापच आहे किंवा काय असा एक प्रश्न त्या वेळीं

माझेसमोर सारखा दत्त म्हणून उभा असे जे एकदा आपण कवितेंत अनुभविलें तें आता आपणास अनुभविता येत नाही, याची चांगलीच जाणीव होत होती. आपण होतों तेच बरे होतों, उगीच या नसत्या फंदात पडलों, कशाला आपण हें सारे वाचलें वा अभ्यासिलें, असा पश्चात्ताप होई कारण केशवसुत म्हणतात ना–'गाण्यानें श्रम हारतात, इतुकें हेंही नसे थोडके।' याचा एकदा मींच केलेला अनुभव मला येईनासा झाला होता खरोखरीच काव्य अगर कविता वेडा होऊन वाचण्यात जी एक मौज अगर ब्रह्मानंद सहोदर म्हणतात तो आहे, तो जाणत्याला नाहीं. विवाहोत्सुक भाबड्या मुलाला मुलीचे ठिकाणीं जी एक सौंदर्याची प्रचीति अगर आकर्षणाची सहजसुलभ जाणीव होत असते ती मुलाचें लग्न करू इच्छिणाऱ्या जाणत्या बापाला होत नाहीं म्हणून मला कोणी काव्यशास्त्राचा अगर टीकावाङ्मयाचा अभ्यास करूच नाही असें मात्र म्हणावयाचें नाही, तर जो आपली सदभिरुचीची वाढ करताना आपलें वेड तसेच जोपासू शकेल तो धन्य नाहीतर विवाहसुख उत्तम उपभोगता यावें म्हणून आधी द्रव्यार्जन आणि मग लग्न यातच माणसाची पहिली चाळिशी उलटावी तसला प्रसंग !

माझें वैवाहिक जीवन मोठें बहारीचे, अगदीं मनासारखें तेव्हा प्रियपत्नीच्या पवित्र मांगल्यपूर्ण सहवासात माझ्या रसिकतेला पुन्हा बहर आला रसिकता चांगलीच पोसली गेली आणि फोफावली म्हणतात ना 'सोने में सुगंध' त्याप्रमाणें केशवसुताच्या कांही कवितानी आमचे वैवाहिक जीवनात प्रसंगविशेषीं तसली कामगिरी बजावली आहे त्यासाठी मी केशवसुताचा किती ऋणी आहे म्हणून सांगू ! कविवर्यांनीं मराठी कवितेचे प्राङ्गणात जसें ध्रुवपद मिळविलें आहे तसेंच माझ्या या साध्या छोट्याशा जीवनात त्यानीं आपलें स्थान अढळ करून ठेविले आहे जीवनात कवीचें कोणतें स्थान आहे, त्याचें महत्त्व किती आहे, हें मला केशवसुतामुळे चांगलेंच लक्षात आलें आहे.

श्री केशवसुतांचा आणि माझा याप्रमाणें अति जिव्हाळ्याचा संबध असल्यामुळें त्याच्या काव्याचें टीकात्मक समालोचन, त्याचे स्मारक ग्रथातून करावे, ही कल्पना मला स्वतःला मानवली नाहीं आणि तसल्या पाडित्याचा अभिनिवेशहि आज माझे ठिकाणीं शिल्लक नाहीं

कलोपासना म्हणून केशवसुतानीं कवितेला आपलीशी केल्याचें त्याचे काव्यावरून वाटत नाही, तर जीवनाविष्काराचें साधन म्हणूनच त्यानीं कवितेला हाताशीं धरल्याचें दिसतें. त्याचे काव्य-सग्रहात इ स. १८८५ पासून ते १९०५ पर्यंतच्या त्याच्या कविता ग्रथित केल्या आहेत या सुमारें २० वर्षांच्या कालावधींत त्याचे वैयक्तिक जीवनात महाराष्ट्रात आणि सबध भारतवर्षांत ज्या काहीं हृदयस्पर्शी घटना घडल्या आणि त्याचा कविमनावर जो परिणाम अगर सस्कार झाला तो त्याचे कवितातून उत्कटत्वानें पाहावयास सापडतो उसनें काहीच आणावयाचें नाही, जें हृदयापासून निघेल तेंच लिहावयाचे असा त्यानीं आपले कवितेला 'दडक' घातलेला दिसतो

'हृदयातून न जे बोल
निघती, ते सगळे फोल!'

हे त्याचेच उद्‌गार आहेत ते कविता कां व कशा करीत याचें उत्तर त्याचेच शब्दात पहावयास सापडतें.

"जे रम्य तें बघुनिया मज वेड लागे।
गाणे मनात मग होय सवेच जागें।"

अशा रीतीनें त्याची काव्यनिर्मिति होत असल्यामुळें 'सहजता' हा गुण त्याचे काव्यातून प्रामुख्यानें आढळतो त्याबरोबरच हृदयातलें शब्दात उतरविताना कधीं कधीं मोठी खटपट करावी लागते या सहजतेमुळेंच त्याचें काव्य हृदयस्पर्शी असें झालें आहे.

'म्हणून मानवचित्ताची उंचावर जी धाव
तीचें चिन्हच तू, तुजला निशाण सार्थच नाव

मिळमिळीत ज्याची कविता न असें रडगीत
खचित जगेलचि त्या कविची तुझ्यावरी रे प्रीत
ससारा मी समर गणीं उचलुनी म्हणूनी निशाण
साद घालितो—"योद्धे हो ! झटुनि भिडुनि द्या प्राण ! "

या कवितेंत केशवसुताची मानवस्वभावाची, जीवनाची आणि ससाराची पण कल्पना काय आहे हें पहावयास सापडते व म्हणूनच नवा शिपाई, स्फूर्ति, गोफण, तुतारी यासारख्या कविता लिहिल्या गेल्या देशहिताची तळमळ त्याच्या काव्यातून अनेक प्रसगी आपणास पहावयास सापडते

राजकीय स्वातत्र्याबरोबरच समाजाची सुव्यवस्थित घडी बसविणे अधिक अगत्याचें आहे असे जें आजच्या जगास पटलें आहे, आणि वाटतें हाच सदेश प्रसगविशेषी त्यानीं आपल्या काव्यातून अनेक वेळा दिला असून अगदी कळवळ्यानें,

'जुनें जाउ द्या मरणालागुनी
जाळूनी किंवा पुरून टाका ! '

इत्यादि प्रकारचे उद्‌गार काढले आहेत त्यांनीं प्रचारकी थाटाचें बरेचसे काव्य राष्ट्रभक्तिपर केले नसल्यामुळें तें एक राष्ट्र-कवि आहेत असा लौकिक त्यांना जरी प्राप्त झालेला नसला तरी त्याची देशहिताविषयीची तळमळ व द्रष्टेपणा विचारात घेतल्यास ते जे स्वत विषयी म्हणतात—

शान्तीचे साम्राज्य स्थापू बघत काळ जो आहे
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे ।

हें अक्षरश पटतें

* * *

अनुक्र. 20729
क्रमांक 022
13/5/14

कै. सी. के. दामले

# केशवसुतांचें त्रोटक चरित्र


"केशवसुत" ह्याचे वडील केशव विठ्ठल दामले ऊर्फ केसोपंत दामले यांचे पूर्वज मूळचे रत्नागिरीजवळ कोळंबे म्हणून गाव आहे तेथील रहिवासी होते परंतु खुद्द कोळंब्याहून केशवसुताच्या वडिलाचें घराणें केसोपंताच्या पूर्वींच एकदोन पिढ्या चिपळूणजवळील सोनगाव नावाच्या गावी येऊन स्थायिक झालें होतें सोनगाव हा गाव प्रसिद्ध मंडलिक घराण्याचा खोती गाव होय हा गाव वासिष्ठी नदीच्या उजव्या तीरावर परशुरामक्षेत्राच्या डोंगराच्या बरोबर पायथ्याशीं वसलेला आहे अर्थात् केसोपंताचे वडील या खोती-गावामध्यें केवळ श्रीमंत मंडलिकाच्या कृपेनें व आश्रयानेंच राहू शकले मंडलिकाच्या घरी काही कारकुनी, काहीं पुजारीपणा अशा प्रकारची घरगुती सेवाचाकरी करून विठ्ठलपंतानीं कसाबसा संसार केला केशवसुताचे वडील केसोपंत हे अल्पवयातच चिपळूण येथील मराठी शाळेचा शिक्षणक्रम संपवून सरकारच्या शाळा खात्यातील मराठी शाळेमध्यें शिक्षक बनले वयाच्या पंधराव्या सोळाव्या वर्षापासूनच त्याच्या गळ्यात शिक्षकाच्या कामगिरीची माळ पडली असे म्हणतात

आमची म्हणजे प्रस्तुत लेखकाची व कविश्रेष्ठ केशवसुताची जन्मदात्री मातोश्री ही चिपळूणच्या जवळील वासिष्ठी नदीच्या काठच्या मालदोली गावातील कै. गणुभाऊ करदीकर, त्या गावचे खोत, याची एकुलती एक कन्या होय मालदोली हा गाव सोन-गावच्या समोरच्या म्हणजे वासिष्ठी नदीच्या डाव्या तीरावर डोंगरावर वसलेला आहे केसोपंतानीं प्रथम शाळामास्तरची

जागा पत्करली, तेव्हा त्या मास्तरकीचा पगार दरमहा प्रथम फक्त तीन रुपये होता असें ते सागत असत केसोपत याचा जन्म कै विश्वनाथ नारायण मडलीक याच्या जन्मकाळच्या साधारण बरोबरचा असल्यामुळें लहानपणापासूनच कै अण्णासाहेब मडलिक याचा व केसोपताचा दाट परिचय होता, व मडलिकाची कृपा केसोपतावर आमरण कायम होती. शाळाखात्यात केसोपत हे कधींच तीस रुपयाच्यावर चढले नाहीत परतु त्या काळीं रत्नागिरी जिल्ह्यामध्यें तालुक्याच्या गावीं तीस रुपये पगार म्हणजे देखील चागला पगार मानला जात असे, कारण दहा माणसाचा ससार साधारण इतक्या पगारामध्ये तेव्हा चालू शके.केसोपतानीं प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें लवकर पेन्शन घेतले तें दरमहा १०।११ रुपयेच होतें असें म्हणतात पेन्शन घेतल्यानतर कित्येक वर्ष कै विश्वनाथ नारायण मडलिक याचे एक खोतीगाव वळणें या नावाचें दापोली तालुक्यात आहे त्या गावची व्यवस्था पाहण्यासाठी श्री मडलिक यानी केसोपताची योजना केली होती वडिलानतर आमचे थोरले बधु चितोपत हे सदर गावची व्यवस्था पाहू लागले ज्या गावचा स्पष्ट निर्देश केशवसुताच्या कवितेंत येतो तें खेडेगांव म्हणजे हें वळणेंच होय हें वाचकानीं ध्यानात ठेवावे " एक खेडे " या कवितेमध्ये ज्या खेड्याचे केशवसुतानी हृदयगम वर्णन केलें आहे त्याची कल्पना याच खेड्याच्या सृष्टिसौंदर्यावरून केशवसुतानी रेखाटली आहे.

आम्ही एकदर बारा भावडें होतो परतु बाराच्या बारा अशी सर्व एका काळी हयात नव्हतो असा माझा समज आहे सात मुलगे आणि पाच मुली अशी एकदर बारा अपत्ये आपल्याला झाल्याचे आमचे वडील व मातोश्री आम्हाला सागत प्रस्तुत लेखक हा त्या बारापैकीं अकरावा असल्यामुळें त्यानें फक्त स्वत - सकट दहाच भावडें पाहिल्याचें आठवतें पहिले दोन मोठे भाऊ त्याच्या लहानपणीच वारल्यामुळें त्याच्या अस्तित्वाची फक्त ऐकीव माहिती प्रस्तुत लेखकास आहे सात भावामध्ये केशवसुत म्हणजे कै. कृष्णाजी केशव हे पाचवे भाऊ होत याचा जन्म मालगुड

नावाच्या गावी शके १७८८, भाद्रपद कृष्ण १४, रविवार रोजीं झाला कृष्णपक्ष असून जवळ जवळ अमावास्या येत चालली होती, म्हणून कृष्ण असें नाव ठेविलें असावे कृष्णाजी केशव याची जन्म-कुडली पुढीलप्रमाणें आहे




भाद्रपद कृष्ण १४ रविवार, शके १७८८ सन १८६६, जन्म-स्थान मालगुड, जि रत्नागिरी

ज्याना फलज्योतिषाचा नाद असेल त्यानीं कोणत्या ग्रहाच्या उच्चनीचत्वामुळें, बलाबलामुळें, दृष्टीमुळें किंवा कोणत्या ग्रहाच्या योगामुळें केशवसुत याना इतकें सरस कवित्व करता आलें याचा आता यथेच्छ काथ्याकूट करावा

ही कुडली पाहिल्याबरोबर ती कोणा अत्यंत भाग्यवान् माणसाच्या कुडलीसारखी दिसते परतु ऐहिक दृष्ट्या केशवसुत हे भाग्यवान् नसले तरी

**दशमोऽगारको यस्य स भवेत् कुलदीपकः**

या सूत्राप्रमाणें पाहिलें तर विख्यात कवि म्हणून आता ठरल्या-मुळें केशवसुत हे अखेर खरे कुलदीपक निघाले यात शका नाहीं.

एकाद्या कवीचें चरित्र लिहू लागलें किंवा कवीचेच काय कोणाही मोठ्या प्रसिद्ध विभूतीचें किंवा थोर पुरुषाचें चरित्र लिहू लागलें कीं त्याच्या पूर्वजाची बरीच माहिती देण्याचा कित्येक चरित्रलेखकांचा परिपाठ असतो पूर्वजामध्यें काहीं विशिष्टपणा

किंवा सांगण्यासारखा गुण असला किंवा पूर्वज खरोखरच कोणी मोठे होऊन गेले असले तर पूर्वजांची ही पूर्वपीठिका चरित्र-नायकाच्या आयुष्याच्या हकीकतीला प्रस्तावनेप्रमाणें जोडल्यास ती खुलून दिसते कित्येक चरित्रकार तर चरित्रनायकाचे पूर्वज विशेष वाखाणण्यासारख्या गुणानीं युक्त असे होऊन गेले नसले तरीसुद्धा त्यांच्यावर वळेंच भलत्यासलत्या गुणांचा बोजा लादून आपल्या चरित्रनायकाचे कुल धूर्वापारच मोठें गुणाढ्य होतें असे भासविण्याचा प्रयत्न करितात परंतु चरित्रलेखन हे सत्याला सर्वस्वी स्मरून करावे, असा शिष्टसंमत मार्ग असल्यामुळें अवास्तव अशा मोठेपणाचे वृथा आच्छादन आम्ही आमच्या चरित्रनायकाच्या पूर्वजांवर घालूं इच्छीत नाहीं उलट एवढी गोष्ट नमूद करावीशी वाटते कीं, कृष्णाजी केशव याच्या पूर्वजांपैकी ज्या तीन पुरुषांची नावें आमच्या घराण्यांत माहीत आहेत, त्यामध्यें विशेष प्रसिद्ध किंवा विशेष कामगिरी करून कोणत्याही बाबतींत नामां-कित झालेला अथवा संपत्ति, विद्वत्ता, तपोबल, अशा कोणत्याहि स्पृहणीय यशःप्राप्तीमुळें अन्यजनास आदरणीय झालेला असा पुरुष कोणी होऊन गेला नाहीं मात्र, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये बहुतेक तालुक्यांतून केसो विठ्ठल दामले हे अत्यंत बुद्धिमान्, करारी, निःस्पृह आणि विद्यार्थ्यांवर कडक शिस्त ठेवणारे शिक्षक अशी ख्याति त्या प्रांतामध्यें होती.

कृष्णाजी केशव हे लहानपणीं अशक्त व किरकिरे असत असे आमची मातोश्री सांगत असे. साधारणपणे दांडगाईचे खेळ त्यांना अशक्ततेमुळें सोसत नसत व हंसण्याखिदळण्याकडे किंवा अचावचा अथवा अद्वातद्वा बोलण्याकडेही त्यांची बालवयामध्येंसुद्धा प्रवृत्ति नसे कोठेतरी एकटेंच बसावे, एकटेंच फिरावे, असा थोडा एक-कल्ली, मुग्ध, एकलकोंडा आणि वरवर पाहणारांस तरी मुखदुर्बळ भासणारा स्वभाव बालपणापासून त्यांच्या अंगीं दृग्गोचर होऊं लागला होता त्याचें मराठी शिक्षण पूर्वींच्या पद्धतीप्रमाणे चार पांच यत्तांचें आमच्या वडिलांच्या हाताखालीं कोंकणांत झालें.

नतर पूर्वीच्या चालीप्रमाणें वयाच्या १५ व्या वर्षी म्हणजे सन १८८१ सालींच त्याचा विवाह करण्यांत आला चिपळूणजवळच्या एका खेडेगावचे रा चितळे म्हणून रहिवासी होते याची मुलगी केशवसुताची बालवधू होती तिचें वय तेव्हा ७।८ वर्षांचे असावे 'अष्टवर्षा भवेत् कन्या' या सूत्रानुरूप तिचे लग्न आठव्याच वर्षी झालेलें असावे "केशवसुता" च्या पत्नी अत्यत गरीब, सालस व सरळ स्वभावाच्या होत्या केशवसुताचा मराठी अभ्यासक्रम कोकणात घरच्या घरीं झाल्यानतर सन १८८२ सालीं आमचे सर्वांत ज्येष्ठ बधु कै श्रीधर केशव दामले हे ग्रॅज्युएट होऊन बडोद्यास नवीन स्थापन झालेल्या कॉलेजात गणित व सस्कृत विषयाचे अध्यापक होऊन गेले, तेव्हा त्या बधूकडे पुढच्या शिक्षणासाठीं केशवसुत बडोद्यास निघून गेले. श्रीधर केशव हे अत्यत बुद्धिमान् होते रत्नागिरी हायस्कुलात मॅट्रिकची परीक्षा पास होऊन जगन्नाथ शकरशेटची पहिल्या नबरची सस्कृत स्कॉलरशिप त्यानीं पटकावली होती

बडोदे येथे त्याना कॉलेज व हायस्कुलमध्यें गणित व सस्कृत शिकवावे लागे गायकवाड सरकारचे बधु श्री सपतराव गायकवाड याना शिकविण्याचें कामही ते करीत असत. या दोन्ही कामाबद्दल त्याना २०० रुपये मिळत असावे श्रीधर केशव याच्याजवळ केशवसुत हे फार तर ८।१० महिनेच असतील केशवसुतापेक्षा धाकटे दुसरे बंधु मोरो केशव हे देखील या वेळीं बडोद्यास श्रीधरपताजवळ शिक्षणासाठी गेलेले होतेच परतु श्रीधरपंताची नोकरी बडोद्यास जेमतेम वर्षभर देखील झाली नाही तोंच त्याच्यावर मृत्यूचा घाला आला विषमज्वरानें पधरा वीस दिवस आजारी पडल्याचे कारण होऊन त्याची जीवनयात्रा अवघ्या तेविसाव्या वर्षी व ग्रॅज्युएट झाल्यापासून एक वर्षाच्या आतच सपली श्रीधरपताच्या मृत्यूमुळें आमच्या वडिलाची कोणत्या प्रकारची मन स्थिति झाली असेल त्याची कल्पना करणेंच बरें हातातोंडाशीं आलेला वडील मुलगा कर्तासवरता, मिळवता होऊन चागला मानमान्यतेस चढेल

व आपल्या घराण्याला थोडी ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्याला कारणीभूत होईल अशी आशा लागते न लागते तोंच मृत्युमुखी पडावा, याच्यापेक्षा या मृत्युलोकीं जास्त खडतर असा निर्घृण दैवाचा आघात दुबळ्या मानवप्राण्यावर कोणता होणें शक्य आहे? वडिलावर जशी ही आकाशातील कुऱ्हाड कोसळली, त्याचप्रमाणें श्रीधरपंताच्या अल्पवयस्क पत्नीवर व त्याच्याजवळ असलेल्या दोघा धाकट्या भावावर देखील तो एक मोठा दारुण प्रसंगच होता श्रीधरपंताच्या मृत्यूमुळें बडोदें अर्थात् सुटले व पुढें केशवसुत व मोरोपंत याच्या पुढील शिक्षणक्रमाची काय व्यवस्था करावी ही मोठी काळजी वडिलाना पडली कर्मधर्मसंयोगाने आमचे एक मातुल म्हणजे आईचे बंधु रामचंद्र गणेश करंदीकर हे मध्यप्रांतात वर्धा येथें वकिली करीत होते व त्यांची त्या धंद्यामध्यें त्या वेळीं चागली चलती चाललेली होती तेव्हा केशवसुत व मोरोपंत याची रवानगी वर्ध्यास या मामाकडे झाली परंतु वर्धा येथेंही त्याकाळीं इंग्रजी शिक्षणाची विशेष समाधानकारक सोय नव्हती तेव्हां वर्ध्याहून दोघेही बंधू नागपूर येथें गेले तथापि, या दोघा बंधूंचा नागपूरसारख्या लांबच्या ठिकाणी शिक्षणाचा खर्च सोसण्याची ताकद आमच्या वडिलांच्या ठिकाणीं नव्हती व मामाची तयारी देखील दोघाच्या शिक्षणाचा खर्च चालविण्याची होती कीं नाही याची शंकाच आहे. शिवाय केशवसुत याची प्रकृति अशक्त असल्यामुळें त्याना नागपूरचा कडक उन्हाळा लवकरच सोसेनासा झाला म्हणून केशवसुत हे नागपूर सोडून परत आले व मोरोपंत हे उमरावतीस काहीं स्कॉलरशिपच्या आधारावर विद्यार्जनसाठीं गेले नागपूर येथील ५।७ महिन्याच्या निवासामध्यें केशवसुत याना सुप्रसिद्ध कवि नारायण वामन टिळक याच्या ओळखीचा व मैत्रीचा लाभ घडला व फर्ग्युसन कॉलेजांतील सुप्रसिद्ध प्रो पटवर्धन यांचा देखील परिचय केशवसुताना तेव्हाच झाला. कै नारायण वामन टिळक तेव्हा थोडेसे कवि म्हणून मित्रमंडळींत माहीत झाले होते व केशवसुताच्या कवित्वशक्तीला प्रथम चालना

नारायण वामन टिळक याच्या सहवासानें व सगतीनें मिळाली असें केशवसुत हे माझ्याशीं कधीं कधीं बोलल्याचें मला स्मरतें पुण्यास कांहीं दिवस विश्रामबागेंतील हायस्कूलमध्यें केशवसुत हे विद्यार्थी होते परतु ते लवकरच न्यू इ. स्कूलमध्यें गेले न्यू इ. स्कूलमध्यें तेव्हा कै प्रो आगरकर, कै लो बाळ गगाधर टिळक अशी खदी मडळी शिक्षकवर्गामध्यें होती या तीन चार वर्षांमध्यें केशवसुत हे पुष्करणीच्या हौदाजवळील बोळात भागवताच्या वाड्यात किंवा हुजूरपागेसमोरील खासगीवाल्याच्या वाड्यात राहात असत. कै हरि नारायण आपटे याच्याशीं केशवसुताची मैत्री याच वेळीं जमली. सरदार श्री तात्यासाहेब मेहेंदळे हे देखील त्याचे याच वेळीं स्नेही झाले असावे. न्यू इग्लिश स्कूलमध्ये कै आगरकर याच्या सुधारणावादी शिकवणीची छाप केशवसुत याच्या भावनाप्रधान मनोवृत्तीवर चागलीच पडली असावी असें त्याच्या 'तुतारी,' 'अत्यजाच्या मुलाचा प्रश्न' वगैरे काव्यावरून दिसून येते "केशवसुत" याची प्रगति मॅट्रिकच्या परीक्षेपर्यंत न्यू इ स्कूलमधून झाली. त्याना विषयाचें ज्ञान बरें असे परंतु जलद लिहिण्याची कला त्याना मुळींच साध्य नसल्यामुळें तीन तासांमध्यें त्याना अवश्य तेवढ्या प्रश्नाची उत्तरें लिहून काढता येत नसत अशा काहीं विशिष्ट स्वभाववैचित्र्यामुळें त्याचें शिक्षण मागासलें त्याच्याहून धाकटे बधु मोरोपत हे भराभर परीक्षा पास होत जाऊन डेक्कन कॉलेजमध्यें बी. ए. च्या वर्षा-पर्यंत गेले तरी 'केशवसुत' मॅट्रिकच पास होत होते. अखेर १८९०-९१ सालीं ते एकदा मॅट्रिक पास झाले. पुढें द्रव्याभावा-मुळें पुढील शिक्षणक्रमाचा नाद त्यांना अजिबात सोडून द्यावा लागला वडिलाचे म्हणणें पडलें कीं, कोठेंतरी नोकरींत शिरून 'केशवसुता'नीं ससार सुरू करावा परतु 'केशवसुत' हे सर-कारी नोकरी मागण्यास कोठें अर्ज घेऊनच जात नसत. आमच्या वडिलाच्या हाताखालून तयार झालेले पुष्कळ शिष्य मोठमोठ्या अधिकारावर चढलेले होते व कै मडलिकासारखे मोठे धनाढ्य,

वजनदार व जगद्विख्यात आणि परोपकारी गृहस्थ आमच्या घराण्याचे हितचिंतक व वडिलाचे जन्मभरचे स्नेही होते. त्याच्याकडे 'केशवसुता'नीं मुंबईस भेटावयास जावें म्हणून वडिलानीं कितीतरी वेळा 'केशवसुता'ना सागून पाहिलें, परंतु 'केशवसुता'चा स्वभाव फारच भिडस्त असल्यामुळें ते मडलिकाच्या बंगल्यावर कधींच गेले नाहीत मुंबईत एकाद्या मिशनरी शाळेंत किंवा खासगी शाळेंत १५–२० रुपयावर मास्तरची नोकरी धरून ते मुंबईस राहू लागले एकादे वेळेस नोकरी सुटली तर खासगी शिकवण्या शिकवीत तारमास्तरचें काम शिकण्याचाही त्यानी कित्येक दिवस प्रयत्न केला नतर कमिसरिएट ऑफिसात ते मधून मधून हगामी नोकरी करीत असत परंतु कायमची नोकरी पाहिजे असेल तर कराचीस जा म्हणजे ४० रुपये सुरुवातीस मिळून पुढें चांगले वाढाल असें एका वरिष्ठानें सांगितलें परंतु कराचीस जाण्याचें 'केशवसुता'नीं नाकारिलें व कमिसरिएट खात्याला रामराम ठोकला अशा प्रकारें मुंबईत त्यानीं १८९३ सालापर्यंत दोन तीन वर्षे काढलीं. कविता लिहिण्याचा त्याचा क्रम मात्र या दोन तीन वर्षांत चालूच होता परंतु कविता जरी कोणीं लिहिल्या तरी कवितालेखनानें एका दमडीचीही प्राप्ति होण्याचा संभव नाही 'केशवसुता'नी अखेरपर्यंत इतक्या कविता लिहिल्या व त्याच्या कवितांची थोडी वाहवा होऊ लागली तरी त्याना कविता लिहिण्यापासून जन्मांत कधीं एक पैदेखील कोणी दिली नाही मुंबईत दोन अडीच वर्षे घालविल्यावर अखेर जेव्हा वडिलानी बिऱ्हाड करून राहण्याविषयी त्याच्या मागे फारच निकड लावली, तेव्हा १८९३ सालीं त्यानीं मोठ्या कष्टानें मुंबईस बिऱ्हाड केलें कसेबसे २५–३० रुपये मुंबईस ते मिळवीत असत कधी कधीं त्याच्या लहरी स्वभावामुळें नोकरी सुटली तर तेही बंद राहात पुढें १८९६–९७ मध्यें मुंबईस प्लेगची भयंकर साथ सुरू झाल्यामुळें केशवसुताना मुंबई सोडण्याची पाळी आली. वयाला तीस वर्षें झालेलीं, मध्यतरीं वडील १८९३ मध्येंच

वारल्यामुळें वडिलाचा आधार तुटलेला, अशा स्थितीत मुंबई सोडून बाहेर कोठें जावे याची त्याना विवचनाच पडली, परतु अखेर त्याचे श्वशुर खानदेशामध्यें असत, त्याच्याकडे काही दिवस कुटुबाला ठेवण्यास गेले असता खानदेशातल्या एकाद्या लहानशा गावीं म्युनिसिपालिटीच्या शाळेत मास्तरची नोकरी मिळाली तर पहावी म्हणून त्यानी खटपट केली, व भडगाव येथें प्रथम नोकरी धरली व नतर फैजपूर येथील अँग्लो–व्हर्नाक्युलर शाळेत ते असिस्टट मास्तर म्हणून राहिले खानदेशात ते जवळ जवळ १९०३–०४ पर्यंत होते पुढे धारवाड येथें सरकारी हायस्कूलात त्याची नेमणूक झाली व १९०४ पासून पुढें त्या ठिकाणीच हाय-स्कुलात मास्तर होते तेथे त्याना ३० ते ३५ रुपये दरमहा पगार मिळत असे. केशवसुताच्या अवघ्या ३९ वर्षांच्या आयुष्यमर्यादेची थोडक्यात अशी ही हकीकत आहे

केशवसुताच्या खासगी आयुष्यक्रमाची ज्याना माहिती नाहीं त्याना वाटतें कीं, कवि म्हटला म्हणजे तो एक आनदी, मजेत आयुष्य घालविणारा असा फुलपाखरासारखा प्राणी असावा परतु केशवसुताच्या एकदर आयुष्यक्रमामध्यें बालपण व विद्यार्थी-दशेचे थोडेसे दिवस म्हणजे बडोद्यास वडील बधु श्रीधरपत याज-कडे वर्षभर असताना व वर्धा–नागपूरकडे असताना पाच सहा महिने, याच्यानतर आनदाचा व मजेचा असा काळ त्याच्या फारसा कधी वाटचास आला असेल असे वाटत नाही इग्रजी वाङ्मयातील गोल्डस्मिथ या कवीला ज्याप्रमाणे कष्टामध्यें दारिद्र्यात बहुतेक सर्व जन्म काढावा लागला, त्याप्रमाणे केशव-सुताचें बहुतेक सर्व जीवित कष्टमय अशाच परिस्थितीमध्यें गेलें ग्रे कवीच्या चिरस्मरणीय शब्दानीं सागावयाचें झालें तर

Chill penury repressed his noble rage,
And froze the genial current of the soul.

किंवा केशवसुताच्या कवितेंतील शब्दानीं सागावयाचें म्हणजे

" मृत आशांच्या चितांवरुनिया
पिशाच्च माझें भटकत राहे
शांति नसेचि तया "

अशा प्रकारें तरुणपणच्या सर्व आशाची व आकाक्षाची निराशेच्या कुडामध्यें राखरागोळी होऊन गेल्यामुळें त्याची ससारयात्रा कष्टमय झाली होती त्याची वाचनाभिरुचि दाडगी होती, परतु मुबई सोडल्यानतर ती पुरी करून घेण्याला खानदेशातील फैजपूर व भडगावसारख्या खेड्यामध्यें त्याना पुस्तकें देखील मिळण्याची मारामार पडू लागली, व स्वत ती विकत घेण्याला ऐपत नव्हती अशा परिस्थितीमध्यें त्याना वाचनाची अभिरुचि असून ती कधींच मनाप्रमाणे पूर्ण करता आली नाही

केशवसुत याच्या हयातीमध्ये त्याच्या कवितेविषयी कोणाही मोठ्या माणसानें चार स्तुतिपर उद्गार काढले नाहीत, म्हणून महाराष्ट्रातील वाचकवर्गामध्ये व टीकाकाराच्या आणि विद्वानाच्या अगी खरी गुणग्राहकता नाही असा त्याचा ग्रह होत चालला होता आपल्या कविता विविधज्ञानविस्तारासारख्या भारदस्त मासिकात येत नाहीत म्हणून आपल्याला रा. मोगरे याच्याइतका देखील विद्वान् वाचकवर्गामध्यें मान नाही, याबद्दल त्याना अत्यत वाईट वाटत असे ते कोणाचा हेवा करणारे नव्हते, परतु आपण जीव तोडून अत.करणाला पीळ पाडणारी कविता लिहीत असता महाराष्ट्रातील मोठमोठ्या रसिक विद्वानानीं आपल्यासबधी प्रोत्साहनाचे चार स्तुतिपर उद्गारही काढू नयेत याबद्दल त्याना खेद होत असल्यास आश्चर्य नाहीं यावेळीच कै हरिभाऊ आपटे प्रसिद्ध कादबरीकार याची व त्याची मैत्री जडली हें पूर्वीं सागितलेच आहे केशवसुत याच्या कविता विद्यार्थिदशेपासूनच हरिभाऊस आवडत असत आणि त्याची कित्येक स्फुटे रा आपटे याच्या करमणूक पत्रामध्येच प्रथम छापून निघालेलीं आहेत फक्त त्याचे कांहीं विशिष्ट मित्र त्याच्या कवित्वशक्तीची खरी योग्यता ओळखून होते मासिक मनोरजन या मासिकाचे सपादक

कै काशिनाथ रघुनाथ मित्र हे सुधारणाप्रिय होते आणि ते केशवसुताचे परम स्नेही असून नेहमी मनोरंजनात केशवसुताच्या कविता छापीत असत कवि या नात्यानें त्यांच्या मरणोत्तर मात्र त्याची कीर्ति प्रतिवर्षी द्विगुणित होत जाऊन आता सारखी वृद्धिगत होत आहे. ही मरणोत्तर झालेली कीर्ति Posthumous fame जर कोणत्या ना कोणत्या अतींद्रिय साधनानी त्याच्या आत्म्याला कळेल तर अर्थात् त्याना समाधान वाटल्यावाचून राहणार नाहीं परतु त्याच्या हयातीमध्ये त्यांच्या कवितेबद्दल पुष्कळानी उपहाससुद्धा केला होता त्याचे कित्येक अरसिक व केवळ द्रव्यदृष्टि मित्र व नातलग कवितेचें हे वेड सोडून देण्याचा त्याना अनेक वेळ उपदेश देखील करण्यास मागेपुढें पाहात नसत परतु स्वयंस्फूर्तीने ज्याला कविता करण्याची हौस होती तो असल्या उपदेशाच्या योगाने कविता रचण्याच्या आपल्या अत्यानदाच्या मानसिक व्यवसायापासून कसा परावृत्त होणार ? कविता रचण्याचा त्याना इतका नाद होता कीं, एकदा एकादी कल्पना डोक्यामध्यें घोळत असली, की त्या कल्पनेबरहुकूम योग्य शब्दानी जर थोडक्या वेळामध्ये पद्यरचना झाली नाही तर ते रात्रभर जागरण करून ती कवितेमध्ये उतरविण्याचा प्रयत्न करीत त्याना कविता करण्याचा नाद फारच अल्पवयापासून लागला होता. वयाच्या १४।१५ व्या वर्षापासून त्याना चागले श्लोक व आर्या रचिता येत असत. पुण्यास न्यू इग्लिश स्कूलमध्ये पाचव्या सहाव्या यत्तेमध्यें शिकत असताना, वर्गांतील अभ्यासाकडे लक्ष न देता टिळक–आगरकर अशा गुरूची चित्रें पेन्सिलीनें ते आपल्या वहीमध्यें रेखाटीत असत किंवा एकाद्या श्लोकाचा चरण रचण्यामध्ये दग असत कविता रचण्याचा प्रथम त्याना नाद लागला, तेव्हा चित्रकलेचाही थोडा नाद त्याना जडला होता व त्याच्या अभ्यासक्रमाच्या वेळच्या वह्यामध्ये अनेक व्यक्तीचे चेहरे रेखाटलेले त्यानी मला एकदा लहानपणी दाखविले होते. परतु पेन्सिलीनें चित्रें रेखाटीत बसण्याचा हा नाद त्यानी पुढें सोडला मात्र

कवितारचनेच्या नादानें त्याच्या मनावर इतकी मोहिनी घातली कीं, ती पुढें जन्मभर जास्तजास्तच दृढबद्ध होत गेली त्यांना कविता शीघ्रगतीने करता येत नसे. परतु एकादे वेळेला स्वयस्फूर्तीनें ते एकाद्या कल्पनेला बोलता बोलतानासुद्धा चरणबद्ध करून टाकीत एकदा पुण्यास एका शकराचार्यांचे किंवा कोणा सस्थानिकाचे अगर सर्कसवाल्याचे हत्ती आले होते ते शृगारून रस्त्यानें चालले असता त्याच्या एका मित्रानें त्याचे लक्ष त्या हत्तीकडे लावण्याकरता ‘ते पाहा शृगारलेले हत्ती कसे डुलत डुलत चालले आहेत’ असे म्हटलें, परतु केशवसुताची तद्री कोठे दुसरीकडेच लागली होती तेव्हा ते आपल्या मित्राला एकदम उत्तर देताना उद्गारले:—

‘लवाजम्याचे झुलती हत्ती
लक्ष त्याकडे देतो कोण ?
खिशामध्यें हें घड्याळ बोले
आला क्षण ! गेला क्षण !’

पुण्यामध्ये सन १८८५ पासून सन १८९० पर्यंत केशवसुत याचे विद्यार्थी या नात्यानें वास्तव्य होतें तेव्हा ते बहुधा खासगीवाल्याच्या वाड्यात व कित्येक वर्षे पुष्करणीच्या हौदाजवळच्या बोळातील भागवत ह्याच्या वाड्यात बिऱ्हाडकरू म्हणून राहात असत खासगीवाल्यांचा वाडा म्हणजे सध्या शिक्षणप्रसारक मडळाची इमारत झाली आहे त्या ठिकाणचा आनदाश्रमाजवळील वाडा होय या वाड्यात शिरताना रस्त्याजवळच्या समोरच्या देवडीजवळील खोलींतच त्याचें वास्तव्य असे या जागेचा उल्लेख त्याच्या गोष्टी घराकडिल मी वदता गड्या रे’ या कवितेच्या सतराव्या श्लोकाच्या अखेरच्या चरणामध्यें आलेला आहे वर्तक या नावाचे त्याचे एक मित्र होते व हे वर्तक देखील कवितेचे भोक्ते असल्यामुळे ते दोघेजण मिळून काव्यशास्त्रविनोदामध्ये बराच काळ घालवीत असावेत असें वाटतें या विद्यार्थिदशेंतच केशवसुत यानी एक नाटक किंवा काही ग्रथ लिहून दक्षिणा

प्राइजकमिटीकडे पाठविला होता परतु त्या त्यांच्या ग्रंथाला उत्तेजन किंवा बक्षीस मिळालें नाहीं विद्यार्थिदशेचा क्रम सपल्यानतरचीं बरीच वर्षे म्हणजे सन १८९६ अखेरपर्यंतचीं पाच सहा वर्षे त्यानी मुबईंत काढिली परतु मध्यतरीं पांच सहा महिने मुबई सोडून ते सावतवाडी येथें मास्तर म्हणून इग्रजी शाळेमध्यें नोकरीकरिता गेले होते मुबईस रा गजानन भास्कर वैद्य हे त्यांचे विशेष जिवलग स्नेही असत मुबईस असताना ते बहुधा मास्तरचीच नोकरी करीत असत दादर इंग्लिश स्कूलमध्यें ते बरेच दिवस मास्तर होते व कल्याण येथें कोणी नवीन इग्रजी शाळा काढली होती तेथेंही काहीं महिने ते शिक्षकाची नोकरी करीत असत त्याच सुमारास कै नारायण वामन टिळक हे हिंदुधर्म सोडून ख्रिस्ती झाले होते व टिळकाची व केशवसुताची विशेष सलगी असल्यामुळे 'केशवसुत' हे हिंदुत्वास मुकतात कीं काय अशी धास्ती त्याच्या स्नेह्यास पडली होती परतु त्याच्या कित्येक मित्रानी त्याना या बिकट प्रसगीं सदुपदेश करून या अविचारापासून परावृत्त केले ख्रिश्चन होण्याकडे आपल्या मनाची प्रवृत्ति होत चालली होती ही गोष्ट खुद्द केशवसुतानींच पुढें काहीं वर्षांनीं ओघाओघानें सभाषणामध्यें माझ्याजवळ बोलून दाखविली होती अर्थात् ती सागोपागी नसून विश्वसनीय आहे

पुढें १८९४–९५ सालापासून ते बिऱ्हाड करून म्हणजे मुबईस सपत्नीक राहू लागल्यानतर त्याच्या आयुष्यक्रमास थोडें जास्त स्थैर्य आलें या वेळीं प्रथम ते फणसवाडी नजीक जगन्नाथाच्या चाळींत राहात असत व पुढें काही काळ कादेवाडीत केशवजी नायकाच्या चाळींत त्याचें बिऱ्हाड असे केशवसुताच्या विशिष्ट व तऱ्हेवाईक स्वभावामुळें त्याची नोकरी कायमची किंवा शाश्वत अशी कधींच नसे पुनः त्याचा स्वभाव फारच उदार असल्यामुळें कोणी त्याच्यापाशी चार पैसे मागितले व त्याच्या खिशात ते असले म्हणजे एकाद्या मित्राला "नाहीं" म्हणणें त्यांच्या जिवावर येई कित्येक लफंग्या लोकांनीं

त्याच्या या सरळ व उदार स्वभावाचा दुरुपयोग करण्यास कमी केलें नाही त्यांना स्वतःला मात्र अडचण असली तरी दुसऱ्या कोणाकडे ते तोंड वेगाडून याचना करण्यास जात नसत अशा प्रकारें सांपत्तिक दृष्टया ते नेहमी ओढाताणीमध्ये राहात असत त्याच्याहून धाकटे बंधु कै मोरो केशव दामले हे पुढें साधारण चांगल्या स्थितीमध्यें असल्यामुळें ते केशवसुत यांना पैशाची मदत प्रसंगवशात् करण्याला तयार असत, परंतु आपल्यापेक्षा धाकटया बंधूकडून अशा प्रकारें मदत घेणें "केशवसुता"च्या मानी स्वभावाला कमीपणाचे वाटल्यामुळे ते आपल्या बंधूकडून ती घेण्याचें नाकारीत मानी स्वभावामुळें केशवसुतांना सर्व आयुष्यक्रम अशा प्रकारें कष्टामध्यें काढावा लागला व त्याच्या कवितेमध्यें निराशेसंबधीं जे अनेक ठिकाणी उद्गार निघाले आहेत ते त्याच्या स्वानुभवाचे द्योतक होत. त्यांचा अखेरचा जो अभंग आहे त्याच्यामध्यें

**भिकार या जगीं इच्छित न मिळे कांहीं**
**म्हणुनी तुझे पायीं भिक्षा देहि**

अशी परमेश्वराची करुणा भाकली आहे. "केशवसुता"च्या संबधीं त्याच्या मृत्यूनंतर अनेक मासिक पुस्तकांतून लेख प्रसिद्ध झाले आहेत, परंतु त्याच्या चरित्रासंबधी विश्वसनीय माहिती त्याच्या नातलगाकडून मिळवण्याचा कोणीच प्रयत्न न केल्यामुळे अनेक भ्रामक व निराधार विधानें त्याच्यासंबधी केलेली आढळण्यात येतात त्याच्या कवित्वशक्तीबद्दल मात्र इतके विस्तृत टीकालेख व मुख्यत गुणग्राहक व स्तुतिपर टीकालेख आजपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत कीं, आपल्या कवितेवर स्तुतिस्तोत्राचा इतका वर्षाव पुढें होणार आहे, अशी कधी अस्पष्ट कल्पना देखील केशवसुताच्या मनाला त्याच्या हयातीमध्यें शिवली नसेल। परंतु अशा गोष्टी वाङ्मयाच्या इतिहासात पूर्वापार अनेक घडल्या आहेत तेव्हा त्याचा विशेष विषाद मानण्याचे कारण नाही

केशवसुताचा स्वभाव प्रौढ वयामध्यें अनेक प्रकारच्या काळज्या-मुळें जरी आनंदी किंवा उल्हासी नव्हता, तरी विद्यार्थिदशेत

असताना जेव्हा ते सुट्टीत कोंकणात वळणें येथें येत असत, तेव्हा आपल्या लहान भावंडाशीं हसण्याखेळण्यात व आपल्या स्वत च्या कविता त्याना वाचून दाखविण्यात ते बराच वेळ घालवीत असत 'टिप् फुलें टिप् माझे गडे ग ! फुलाची पखरण झिप' ही त्याची कविता त्यांनीं आमच्या धाकट्या बहिणीकडून पाठ करविली होती वळणें येथें आम्ही ज्या घरात राहात होतो त्याच्याभोंवतीं वन्य फुलझाडें इतकी असत कीं, फुलाच्या पखरणी आमच्या घराच्या भोंवतालच्या अगणात व परसामध्यें बहुधा नेहमीं पड-लेल्या असत विद्यार्थिदशेनतर त्याना जर कोठें अशा रमणीय ठिकाणी सुखामध्ये राहण्यासारखी सापत्तिक स्थिति प्राप्त झाली असती तर त्याच्या हातून विशेष विस्तृत अशी काव्यरचना झाली असती यात शंका नाही, व इतर ग्रथरचना करण्याला देखील त्यांना हुरूप आला असता परतु तशी विधिघटना नव्हती हेंच खरें।

खानदेशात असताना म्युनिसिपालिटचाच्या ॲंग्लो-व्हर्नॅक्युलर शाळामध्येच त्याची नोकरी असल्यामुळें लहानसहान गावातील म्युनिसिपालिटीचे मेंबर कधी कधीं त्याच्यावर बारीकसारीक बाबतींत बराच जुलूम करीत असत शाळेंतील मास्तरानी आपल्या मुलाना घरी येऊन फुकट जादा शिकविण्याचे काम करावे अशी देखील काही मेंबराची इच्छा असे परतु अशा प्रकारचे काम करून मेबरसाहेबाची मर्जी सपादण्याइतका मृदु व गुलामगिरीस शोभणारा "केशवसुता"चा स्वभाव नव्हता यामुळे म्युनिसिपालिटचातील कित्येक वजनदार परतु क्षुद्र मनोवृत्तीचे स्थानिक लब्धप्रतिष्ठित गृहस्थ त्याच्यावर नाराज असत आणि या नाराजीमुळें त्याना नोकरींत बढती वगैरे मिळण्याचा सभव कधीं आला तर तो नाहींसा होत असे एक दोनदा तर नोकरी जाण्याचा देखील प्रसग त्याच्यावर आलेला होता, तथापि त्याच्या अगचे गुण ओळखणारेही कित्येक गृहस्थ त्या ठिकाणीं असल्यामुळें केशव-सुताच्या तोंडचा घास काढून घेण्याचें श्रेय कोणा क्षुद्र गृहस्थाना घेता आलें नाहीं. खानदेशात असताना "विनायक" या दुसऱ्या

एका कवीची व त्याची मैत्री जडली. "विनायक" याचें उपनांव करंदीकर असें होतें. व ते पोलीसमध्यें जमादार किंवा फौजदार अशा हुद्यावर होते. भडगाव येथें आम्ही एकदा "केशवसुता"स भेटण्यास गेलों असताना पाचोऱ्याच्या स्टेशनावर आमच्या बधूंनीं विनायक कवीची व आमची ओळख करून दिली होती विनायक कवि हे पोलिसातील अमलदाराप्रमाणें झोकदार पोषाखात होते व त्याच्या चेहऱ्यावरूनच ते आनदी, रंगेल असे कोणीतरी इसम असावे असें तेव्हाच कोणालाही दिसून येण्यासारखें होतें अशा गृहस्थाचा व "केशवसुता"चा स्नेह असलेला पाहून प्रथमदर्शनी मला थोडा विस्मयच वाटला परतु कविता रचण्याचा नाद व काव्यविवेचनाची हौस 'विनायक" यांना असल्यामळें केवळ [illegible] परस्परांच्या मनामध्ये एकमेकाच्या कवित्वशक्ती-विषयींचा आदर एवढ्याच समानशीलत्वाच्या एका बाबतीच्या आधारावर "केशवसुत" व "विनायक" यांच्या मैत्रीची उभारणी झाली आहे असें जेव्हा सहवासानें दृष्टोत्पत्तीस आलें तेव्हा विस्मय वाटण्याचें काहीं कारण उरलें नाही हें सागावयास नकोच केशवसुताची व प्रस्तुत लेखकाची समक्ष अखेरची भेट सन १९०२ साली आमच्या मातोश्री उज्जैन मुक्कामी मोरोपत याच्या येथें दिपवाळीच्या सणातच कैलासवासी झाल्या त्या वेळीं पडली होती. तेव्हा ते खानदेशातून उज्जैन येथें आले होते त्यानतर त्याची व आमची समक्ष भेट कधीं झाली नाहीं धारवाडास गेल्यानतर ते फार दूर असल्यामुळें भेटीचा योग आला नाहीं धारवाड येथें गेल्यानतर त्यांची पत्रेंही मला क्वचितच येत परतु मोरोपंताचा व त्याचा थोडासा पत्रव्यवहार चालू असे साधारणतः पत्रें लिहिण्याचा "केशवसुतां"ना कटाळाच वाटे आणि लाबलचक पत्र ते क्वचित् लिहीत कार्डावर प्रसगवशात् फक्त खुशालीचा किंवा एखाद्या विवक्षित गोष्टीविषयी ते मजकूर लिहीत असत धारवाड येथें जीं जवळ जवळ दोन वर्षें त्यानीं घालविलीं तीं त्याची बरीच स्वास्थ्यात व सुखामध्यें गेलीं असावीं त्याना तीन अपत्यें होतीं

व तिन्ही मुलीच होत्या १९०५ सालच्या ऑक्टोबर अखेर दिवाळीच्या सुटीत ते धारवाडहून हुबळी येथें गेले होते हुबळी येथे हरिकाका दामले हे आमचे चुलत चुलते मराठी शाळेंत मास्तर होते त्यावेळीं हुबळी येथें प्लेग थोडासा चालू होता चार दिवस हुबळीस मुक्काम झाल्यानतर केशवसुत व त्याच्या पत्नी या दोघानाही एकदम प्लेगाचा ज्वर आला हुबळीहून मला पुण्यास तार आली परतु केशवसुत हे धारवाडास नोकरीस असता हुबळीहून तार का यावी हेंच तारेतील मजकुरावरून गूढ पडलें व धारवाडास जावे कीं हुबळीस जावे हें मला समजेना यामुळें जाण्याला एक दिवस उशीर लागला स्टेशनवर जी मडळी आली होती त्यानी मी उतरल्याबरोबर कळविलें की,केशवसुतांचे प्राणोत्क्रमण त्याच दिवशीं म्हणजे ता ७ नोव्हेंबर १९०५ रोजी सकाळीं झाले फक्त मी "येतों" अशी तार केल्यामुळे त्यानीं स्मशानविधि थोडा थाबवून धरला होता केशवसुताची पत्नी प्लेगाच्या आजारानें अत्यवस्थच होती त्याचें और्ध्वदेहिक त्याच दिवशी आटोपून अशा प्लेगदूषित स्थळामध्यें राहणें धोक्याचे असल्यामुळे दुसऱ्या दिवशीं मी परत पुण्यास आलों केशवसुताची भेट मृत्यूपूर्वी झाली नाही याबद्दल वाईट वाटले परतु प्लेगच्या कहरामध्यें असे प्रकार वारवार होत होते म्हणून जगाच्या राहटीप्रमाणें दु खावेग गिळून टाकण्याशिवाय मार्ग नव्हता त्यांची पत्नी त्याच्या मागाहून ४।५ दिवसानीं प्लेगालाच बळी पडली तीन लहान मुलीना त्याच्या आजोळीं म्हणजे चिपळूणकडे हरिकाकानी रवाना केलें नतर त्यास आमचे थोरले वधु ती चितोपत याजकडे पाठविले व त्यानींच त्याचे सगोपन केले कारण त्या लहान असून त्या लहान मुलीचे योग्य प्रकारें सगोपन करण्यासारखी स्थिरस्थावरता माझ्या स्वत ऱ्याच ससाराची तेव्हा लागली नव्हती या तीन मुलीपैकीं धाकटी थोड्याच दिवसांनी मरण पावली पहिल्या दोन मुलींचीं लग्नें आमचे वडील बधु मोरोपत व चितोपत यानीं

कोकणांत करून दिलीं आता केशवसुताच्या दोन्ही कन्या दिवगत झाल्या असून फक्त धाकटच्या मुलीचे पुत्र व कन्या हयात आहेत

केशवसुताच्या कवितेसबधीं अलिकडे प्रेमबुद्धि फार वाढल्यानें केशसुताचा फोटो प्रसिद्ध करण्याबद्दल मला अनेक लोकाकडून व विशेषत त्याच्या तरुण चहात्याकडून वारवार विनति करण्यात येते परतु केशवसुतानीं आजन्मात कधीं आपला फोटो काढविला नव्हता. धारवाड हायस्कूलच्या एका ग्रुपमध्यें त्याचा फोटो एकदा घेतलेला आहे अशी अर्धवट बातमी एकदा कोणी सागितली होती परतु तसा फोटो खरोखर अस्तित्वात आहे कीं नाही याची शकाच आहे कारण आतापर्यंत तो कोणासही उपलब्ध झालेला नाहीं १९०२ च्या अखेर केशवसुत हे मातृनिधनाच्या नतर उज्जैन येथे आले होते तेव्हा आम्ही सर्वांनी एकदा मडळीमध्यें फोटोला बसण्याचा त्याना अत्यत आग्रह केला परतु ते फोटो काढण्याला तयारच होत ना आमच्यासारख्याचा फोटो काढून काय करावयाचे आहे ? असे म्हणून त्यानीं सर्व नातलगाचीही विनति टाळली तेव्हा त्याच्या हजारों भक्तास त्याचें छायाचित्र पाहण्यास मिळावे अशी जरी अत्यत उत्कट इच्छा असली तरी ती पुरविणे अशक्य आहे केशवसुताच्या केवळ स्वभाववैचित्र्यामुळेंच त्याचा फोटो काढण्याचे राहिलें तेव्हा त्याचे छायाचित्र पाहण्याची त्याच्या हजारो चहात्याची व भक्ताची उत्कट इच्छा आता कोणालाही पूर्ण करता येणें शक्य नाही [1]

---

१. टीप—श्री वैद्य यांनीं स्मरणानें काढलेलें त्यांचें चित्र या पुस्तकात दुसरीकडे दिलें आहे. त्यायोगे आतां केशवसुताच्या भक्ताची इच्छा अल्पांशानें तरी भागेल असें वाटतें—सपादक

( श्री. परशुराम चिंतामण दामले बी. ए. एल्एल्. बी., राहुरी)

# केशवसुत : कांहीं स्मृति

## ( १ )

### कांहीं स्वानुभव

केशवसुत हे ज्या घराण्यात जन्मले, त्याचे मूळ गाव रत्नागिरी जवळचें कोळबें हें होय परतु केशवसुताचे आजे विठ्ठलपत हे कोळबें सोडून चिपळूणजवळील सोनगाव येथे राहू लागले पुढे हें सोन-गांवहि सुटून दामले मडळी देशावर व मुबईस रोजगारासाठीं गेली म्हणून आता दामल्याचा रत्नागिरी जिल्ह्याशीं सबध राहिलेला नाहीं

केशवसुतांचे वडील म्हणजे माझे आजे, केसोपत हे रत्नागिरी जिल्ह्यात शिक्षक होते ते अत्यत कडक शिस्तीचे होते इतके कीं, त्यावेळीं रत्नागिरी जिल्ह्यात कडक शिस्तीचा प्रश्न निघाला असतां त्याला ' केसो विठ्ठली कायदा ' असें म्हणत असन ! केसोपंत हे स्वतःच्या घरातहि कडक शिस्तीनेंच रहात असत

अर्थात् केसोपंताची ही कडक शिस्त त्याचे चिरजीव कै. कृष्णाजी केशव दामले ऊर्फ केशवसुत याच्यातहि पुष्कळ प्रमाणात उतरली होती प्रस्तुत लेखक लहानपणी केशवसुताजवळ राहिला असल्यानें त्याला त्याच्या कडक शिस्तीचा उत्तम अनुभव आहे. केशवसुताच्या या कडक शिस्तीचा प्रस्तुत लेखकास फायदा झाला आहे. मात्र केशवसुताची कडक शिस्त मर्यादा सोडून कधींच गेली नव्हती हेंहि नमूद केलें पाहिजे

केशवसुताच्या हयातींत त्याच्या काव्याकडे कोणी फारसें पाहिलें नाहीं, ही गोष्ट आता सर्वमान्य झाली आहे ! प्रसिद्धि

प्राप्त होण्यास पुष्कळ वेळा ‘ मरावे ’ लागतें, असें म्हणतात । केशवसुताचें असेंच झालें त्याच्या हयातींत नाहीं, तरी पण त्यानतर मात्र त्यांच्या काव्याचे महत्त्व व श्रेष्ठत्व लोकास पटलें आहे, हा कालाचा प्रभाव होय। ‘कालाय तस्मै नम ’ असेंच म्हटलें पाहिजे ।

कोणत्याहि कवीच्या काव्याचा विचार करावयाचा झाला, तर त्या कवीचे व्यक्तिगत जीवन ठाऊक असावयास पाहिजे केशवसुताचे व्यक्तिगत जीवन माहीत करून घेण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला नाहीं । आणि, आता त्या दिशेनें प्रयत्न करून फारसा उपयोगहि होणार नाहीं । कारण केशवसुताचे चुलत चुलते कै. हरि सदाशिव दामले (याच्याजवळ केशवसुत प्लेग होऊन हुबळी येथे वारले' ) अथवा त्याचे वडील बधु म्हणजे माझे वडील, कै चिंतामण केशव दामले हे हयात होते तोंपर्यंत त्याजकडून केशवसुतांची व्यक्तिविषयक माहिती विपुल प्रमाणात मिळणें शक्य होतें पण ते दोघेहि दिवगत झाल्यानें आता ती शक्यता राहिली नाही खुद्द मला त्याची माहिती थोडीफार आहे खरी, पण ती या व्यक्तींइतकी खासच नव्हे १९१७ मध्यें ‘नाट्यछटा’कार कै. ‘दिवाकर’ हे मला केशवसुताची माहिती विचारण्यासाठीं भेटले होते व मला ठाऊक असलेली माहिती मी त्याना पुरवलीहि पण हरिकाका व चिंतोपत याजकडून माहिती मिळावावयास हवी होती।

केशवसुताचे कनिष्ठ बधु कै सीतारामपत दामले यानीं केशवसुताच्या कवितेच्या पुस्तकात त्याचे लहानसे चरित्र दिलेले आहे. परतु त्यातील माहिती केवळ स्थूल मानानेंच बरोबर आहे हें येथे नमूद करून ठेवणें जरूर वाटतें । एवढेच नव्हे, तर केशवसुताच्या स्वभावाचे विशेष गुण म्हणून जे त्यांनीं लिहून ठेवले आहेत तेहि तितकेसे बरोबर वाटत नाहींत । आधी माहिती अत्यत थोडी दिली आहे स्वभावविशेषासबधीं सागावयाचें, तर त्यासबधीची माहिती सीतारामपतास विशेष होती असें वाटत नाही । उलट चौकशीअंती मला असे समजलें आहे कीं, केशवसुताचा व सीतारामपताचा एकत्र राहण्याचा योग फारसा आलाच नाहीं! केशवसुत विद्यार्थीदशेंत असतांना व सीतारामपत

अगदी लहान असताना त्याचा वडिलापाशी एकत्र राहण्याचा योग काही दिवस आला असावा पण त्या वेळी त्यास केशवसुताचें स्वभावदर्शन होणें केवळ अशक्य होतें । या अडचणीमुळेंच सीतारामपतानी केशवसुताचे चरित्र व प्रस्तावना लिहिण्याचें कार्य त्याचे मित्र प्रसिद्ध कादबरीकार ह ना आपटे याजकडे सोपविले असावे असें वाटतें ।

केशवसुताच्या कडक शिस्तीचें वर्णन वर आलें आहे मग त्यानीं 'मुलास झोडपणाऱ्या एका पतोजीस'–ही कविता का लिहिली असा प्रश्न उपस्थित होतो । केशवसुत हे फार त्रासिक व रागीट असत आणि ते प्रसगोपात्त वर्गातील मुलास खूप झोडपून काढीत असत असेंहि वर्णन करण्यात आलें आहे ।

पण माझ्या समजुतीप्रमाणे तें साफ चुकीचें आहे । प्रत्येक माणसाचा नहमी कायम असणारा स्वभाव व प्रसगविशेषी निर्माण होणारा तात्पुरता आविर्भाव या दोहोंत फरक करणे जरूर आहे. एखादा पतोजी मुलास नुसते बोलून थाबेल व दुसरा दोन छड्याहि मारील । म्हणून उपरोक्त शिक्षक अत्यत क्रूर आहे, असे म्हणता येणार नाही । केशवसुत नेहमीं अत्यत शात व व गभीर असत त्याच्या डोक्यामध्ये सदैव विचारपरिभ्रमण सुरू असल्यामुळें घरातील नित्याच्या 'कटकटी'कडे ते फारसे लक्ष देत नसत त्याना कवितेचें 'वेड' असे व त्या वेडाच्या नादांत ते असत, असे वर्णन केल्यास तें फारसे चुकीचें होणार नाहीं । त्यानी अनेक ठिकाणी म्हटलेलें आहे की, कविता लिहा-वयाची म्हणून मुद्दाम बसून तयार केलेली रचना काव्य' होणार नाही केशवसुत कविता करण्यासाठी म्हणून केव्हाही बसलेले नसत उलट कवितेशिवाय त्याच्या डोक्यात कधींच दुसरा विषय नसे अशी त्याची स्थिति व स्वभावविशेष होता । केशवसुत एके ठिकाणीं स्तब्धपणें बसलेले आहेत व कविता लिहीत आहेत असें दृश्य कोणालाच कधी दिसलें नव्हतें मी स्वत अनेक वेळा असे पाहिले आहे की रात्रभर ते इकडून तिकडे येरझारा करीत आहेत व तोंडानें काही गुणगुणत आहेत, आणि, पेन्सिलीचा एक

तुकडा व कागद एका कोनाड्यात पडलेला आहे ! कागदावर लिहिलेलें काय? –तर फार तर दोन चार ओळी !–अशा रात्रीच्या रात्री व दिवसचे दिवस केशवसुतानीं घालविलेले मला माहीत आहे ! एखाद्या वेळी असे व्हावयाचे कीं केशवसुतानीं रात्रभर इकडून तिकडे फिरावें, ते थेट दुसऱ्या दिवशीं ११–१२ वाजेपर्यंत ! सुमारें १२ वाजता शाळेची वेळ झाली, गेलें पाहिजे, अशी जाणीव त्याच्या मनात उत्पन्न व्हायची व मग भराभर विहिरीतून बादलीनें पाणी काढून, अंगावर कसेबसें ओतून, उपाशी पोटीच त्यानी अक्षरश पळत शाळेंत जावयाचे आणि मधल्या सुटींत घरीं येऊन जेवण करावयाचे !–असे एक ना अनेक प्रसंग आठवतात बरें, अशा प्रसंगी घरातील माणसानीं काहीं एक बोलण्याची सोय नसे ! कारण, अशा मन स्थितीत असताना त्यास कोणी हटकल्यास त्याना फारच राग यावयाचा ! जणू काय, त्याना काव्याची समाधीच लागत असे ! ! त्याची ' फिर्याद ' कविता त्याच्या मनःस्थितीचें योग्य दिग्दर्शन करणारी आहे ही व इतर काहीं प्रेमविषयक वाटणाऱ्या कविता वस्तुतः कवितादेवीस उद्देशून लिहिलेल्या आहेत. मात्र याचा अर्थ केशव-सुताना स्त्रीविषयक प्रेम समजत नव्हतें, त्याच्या ठिकाणीं ती भावना नव्हती, असा करण्याचें बिलकूल कारण नाही !

वर वर्णन केल्याप्रमाणें केशवसुत हे नेहमी एक प्रकारच्या तद्रीत असावयाचे. ज्याना त्याच्या मन स्थितीची कल्पना नव्हती, ते त्याना भ्रमिष्ट समजावयाचे ! ही त्याची मन स्थिति जन्मसिद्ध होती अगदी लहानपणापासून ते असे वागावयाचे, असें मला माझे वडील, चुलते व खुद्द केशवसुताचे चुलते यानीं अनेक प्रसंगीं सागितलेलें आठवतें !

याचा अर्थ असा नाही की, केशवसुतानी आपलीं ससारविषयक कर्तव्यें नीट पार पाडली नाहीत ! उलट, ससारविषयक कर्तव्यें करण्याच्या कामी ते दक्षच असत परतु ही कर्तव्यें करताना त्याची मनोरचना एखाद्या कर्मयोगी विरक्त पुरुषाची असे ससारामध्ये निमग्न होऊन ते राहत नसत. मात्र जरूर तें लक्ष्य सर्व गोष्टींकडे

देण्यास ते चुकत नसत आपल्या कुटुबातील व नात्यागोत्यातील मडळीची योग्य ती विचारपूस ते नेहमी करीत असत कुटुब म्हणजे स्वतःची बायकामुलें अशी त्याची कल्पना नव्हती

केशवसुताच्या काही कवितात निराशेचा सूर आढळतो, त्याचा सबध त्याच्या आर्थिक परिस्थितीशीं लावण्यात येतो ! त्याच्या 'तुझें नाम मुखीं, ध्यान तुझें डोळा,—या कवितेंत हा सूर सर्वांत जास्त उमटतो, असा टीकाकाराचा दावा आहे ! परतु हें काव्य पूर्णपणे आध्यात्मिक आहे व त्या पातळीवरूनच त्याचा विचार केला पाहिजे केशवसुताच्या स्वभावाचे जे अनेक पैलू आहेत, त्यात पारमार्थिकतेचा पैलू फार महत्त्वाचा आहे त्याच्या काव्यात निराशा आहे, पण ती ऐहिक भूक न भागल्यामुळे उत्पन्न झालेली नसून आध्यात्मिक भूक न भागल्यामुळें उत्पन्न झालेली आहे !

केशवसुत गरीब होते, पण 'गरिबी' व 'दारिद्रच' त्यात अतर आहे ! खेरीज, मनाने ते 'श्रीमत' च होते ! मी स्वतः फैजपूर येथें त्याजपाशी होतों कोकणात शिक्षणाची सोय नाही, हें जाणून मला त्यानी आग्रहानें स्वत चे जवळ ठेवून माझा विद्याभ्यास केला ! त्याच्या घरातील परिस्थिति गरिबीची असली, तथापि अत्यत व्यवस्थित व समाधानाची होती केशवसुत आपल्या खर्चाची व उत्पन्नाची तोंडमिळवणी नेहमी ठेवीत असत. इतकेंच नव्हे, तर थोडीफार बचतहि त्याजपाशीं असे ! साराश, केशवसुताचें काव्य जर नीट समजून घ्यावयाचे असेल, तर त्याच्या आर्थिक परिस्थितीचा त्याच्या काव्यावर परिणाम झाला होता, असें कोणीहि समजू नये. उलट गरिबी ही त्यानी आनदानें व स्वखुषीनें पत्करलेले एक व्रत होतें ! त्याच्या काळी मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण म्हणजे बरेच मोठें भाडवल होतें त्यांनी प्रयत्न केला असता, तर उत्तम नोकरी मिळून ते बऱ्याच मोठ्या पगारास चढले असते कवितेच्या नादात गुगले असल्यानें त्याच्या मनास आपण गरीब वा दरिद्री आहों, असा विचारहि कधीं शिवला नाहीं ! याच नादामुळें ते कधी शेजारीं पाजारीहि फारसे जात नसत. किंबहुना, आमच्या दामले घराण्याचा हा एक विशेष गुणच आहे असो मानी व सकोची

वृत्ति आणि आपल्यापासून दुसऱ्यास त्रास न व्हावा, ही इच्छा अशा तऱ्हेने केशवसुत वागत असत म्हणून त्यानी आपल्या बधू-पासून देखील कधी पैशाची मदत घेतली नाहीं

केशवसुताच्या चाहत्यास व मराठी काव्याच्या अभ्यासकास माझी अशी विनति आहे कीं, केशवसुताच्या आर्थिक परिस्थितीचा त्याच्या काव्यावर परिणाम झाला, असे त्यानीं मुळीच समजू नये.

केशवसुत सामाजिक सुधारणेचे पुरस्कर्ते होते पण जुन्यातील ग्राह्याशहि ते घेत ते स्वत नियमानें सध्या वगैरे करीत नसत. पण मला स्वत ला त्यानी सध्यावदनाचे पाठ दिलेले आठवतात, आणि ते देखील अगदीं शास्त्रीय पद्धतीनें। कवितेच्या वेडामुळें त्यानीं नियमित सध्यावदन केलेलें नसलें, तथापि फुरसतीप्रमाणे ते सध्यावदन करण्यास चुकत नसत।

पोशाखाच्या बाबतीतहि ते ,जुन्याच वळणाचे होते अगात लोकमान्य टिळक घालीत असत तसा अगरखा, डोक्याला काळी पगडी व शुभ्र काठाचें उपरणें—असा त्याचा नेहमीचा साधा पोषाख असे केव्हा केव्हा ते पाढरा रुमालहि घालीत असत फक्त जेवणानतर सुपारी खाण्याचें त्याना व्यसन होतें याव्यतिरिक्त दुसरी कोणतीहि सवय त्याना नव्हती त्यावेळीं चहा फारसा रूढ नव्हता व तोहि ते घेत नसत सुपारी खावयाची तीहि तोंडात एखादे खाड टाकावयाचें व तें चघळावयाचे सुपारी फोडण्याची त्याची पद्धत म्हणजे ती चाकूने फोडावयाची। सुपारीवर चाकू धरून त्यावर हात मारावयाचा। अडकित्ता ते सहसा वापरीत नसत

केशवसुताचें बहुतेक उत्तर आयुष्य मुबई व खानदेश येथें गेलें. तथापि त्याना कोकण व तेथील जीवन फार आवडे सुटीत फारसें कोठे न जाता कोकणात चिपळूण येथें श्वशुरगृहीं अगर दापोली जवळील वळणे या गावी त्याचे ज्येष्ठ बधु, माझे वडील, चितोपत राहत असत त्याच्याकडे ते जात असत 'एक खेडे' 'गोष्टीघराकडील' या कवितातील गाव हे वळणेच होय हें गाव अत्यत रमणीय असून तेथील हवापाणी तर फारच उत्तम आहे चितोपत व केशवसुत यास

परस्पराचा विशेष लळा होता केशवसुताचे धाकटे बधु कै प्रा. मोरो केशव दामले यानी केशवसुताच्या विद्वत्तेसबधानें मला अनेक गोष्टी सागितलेल्या आठवतात. इग्रजी कवीचा केशवसुतानी फारच बारीक अभ्यास केला होता असें मोरोपत सागत असत. शेक्सपियर व बायरन याच्या काव्यनाटचातील कठिण मर्मस्थानें केशवसुताकडून आपण समजावून घेतल्याचें ते सागत असत । इग्रजीप्रमाणें सस्कृत काव्यहि केशवसुतानी चागलें अभ्यासिलें होतें, असेहि मोरोपताकडून मला कळलें

केशवसुताना कोणत्याहि विषयाचा खोलवर विचार करण्याची सवय होती मला असे स्मरतें कीं मला सध्या शिकवण्याच्या निमित्तानें त्यानी पुष्कळ सस्कृत पोथ्यापुस्तकें वाचलीं सध्या नुसती पाठ न म्हणता स्वरासहित म्हणावयास त्यानी शिकविली. हाच प्रकार त्याच्या कवितेबाबत असे योग्य शब्द न सुचल्यास त्यासाठी ते दिवसच्या दिवस विचारमग्न होऊन घालवीत । आणि मनासारखी रचना न झाल्यास ते कागदच्या कागद फाडून टाकीत । जगाला काहीं विशेष सागण्यासारखें असले तर ते ठेवावयाचे नाहीं तर, भाराभर कशाला हवे, अशी त्याची विचारसरणी असे ।

केशवसुताच्या नादिष्टपणामुळें विद्यार्थिदशेंत त्याच्या हातून काहीं विषयांच्या अभ्यासाची हयगय होई । वडिलाच्या करडचा नजरेमुळें लहानपणी त्याचा अभ्यास उत्तम झाला पण पुढें वडिलापासून दूर गेल्यामुळें त्याचा काहीं विषयाचा अभ्यास फार खोल तर काहीं विषयाचा कच्चा राही ।

त्या वेळच्या रिवाजाप्रमाणें केशवसुताचें लग्न लहानपणीं झालें त्याचे लक्ष सासारिक गोष्टीकडे मुळातच कमी होतें यामुळें मुबईस नौकरी करू लागल्यानतर काहीं दिवस ते एकटेच राहात असत बिऱ्हाड करून ससाराला सुरुवात करावी असे त्याच्या मनातहि आलें नाहीं । दुसऱ्यानीं का होईना, ससाराला सुरुवात

करून दिल्यानतर ते कर्तव्यपालनास चुकले नाहींत आपल्या मुलीना अभ्यास शिकवताना व त्याना 'फुलाची पखरण' कविता पाठ म्हणावयास सांगताना मीं त्याना पाहिलें आहे आपलें काव्य श्रवणसुभग होण्यासाठीं ते स्वत त्यांतील ओळी पुन पुन्हा म्हणताना मीं ऐकिलें आहे. कविता गुणगुणण्याचा त्याना नादच असे।

त्याची राहणी साधी, पण स्वच्छ असे कपडे अत्यत स्वच्छ ठेवण्याकडे त्याचा कटाक्ष असे घरातील जागा झाडून-झटकून स्वच्छ ठेवण्याकडे ते जातीनें लक्ष पुरवीत त्याचे बधु मोरोपत हहा आपली बैठकीची जागा स्वत झाडून घेत. नोकरानें ती कितीहि स्वच्छ झाडली, तरी तें त्याच्या पसतीस येत नसे। केशवसुत आपल्या कुटुबातील सर्व माणसाशी आनदानें व मनमिळाऊपणानें वागत सध्याकाळी फिरावयास जाण्याचा त्याचा नित्यक्रम असे

केशवसुताचा फोटो मिळणे केवळ अशक्य आहे। अगदीं अलिकडे धारवाड हायस्कुलमध्यें एखाद्या 'ग्रुप' मध्ये त्याचा फोटो आहे की काय, याचा शोध केला. पण असा फोटोच नसल्याचे समजले। यामुळें आता कधींकाळी त्याचा फोटो सापडेल ही आशा व्यर्थ आहे तेव्हा केशवसुत कसे दिसत, हे आता वर्णनानेच सागितले पाहिजे। ते मध्यम उचीचे असून वर्णानेंहि मध्यम असत डोळे मात्र पाणीदार व तेजस्वी असून दृष्टि अतर्मुख असे ते दिसण्यात साधारणपणें त्याचे बधु चितोपत यांजसारखे होते चितोपताचा फोटो याच पुस्तकात आहे, त्यावरून केशवसुतासबधानें थोडीफार कल्पना येऊं शकेल

कशवसुतानी Golden Treasuary या इग्रजी कवितेच्या पुस्तकापेक्षा इग्रजी काव्याचा जास्त अभ्यास केला नसावा असेंहि काहीं टीकाकारानीं विधान केलें आहे परतु तें अगदीं असत्य आहे हे मी वर केलेल्या विवेचनावरून दिसून येईल एवढेच नव्हे तर इग्रजी काव्याचा त्याचा व्यासग फार विस्तृत व सखोल होता असे त्यांच्या दोघाहि बधूनीं स्वानुभवानें मला अनेकवार सांगितलेलें आठवतें

* * *

कै. वा. वा. गद्रे

# १९ : केशवसुतांच्या सहवासांतील तीन वर्षे

आधुनिक कविश्रेष्ठ केशवसुत याचे निधन ७ नवबर १९०५ रोजीं हुबळी येथें झालें प्रस्तुत लेखक केशवसुताच्या सहवासात तीन वर्षे मु फैजपूर जि. पू खानदेश येथें १९०१ ते १९०४ पर्यंत होता १९०४ साल अखेर केशवसुत धारवाड हायस्कुलात शिक्षक म्हणून गेले व मी मुबईस लॉ क्लासात जाण्याकरिता आलों मी मुबईंत असताना हुबळी मुक्कामीं ७ नवबर १९०५ सालीं केशवसुताच्या निधनाची वार्ता काव्यरत्नावलींत वाचली ती वाचून मला अत्यत दु ख झालें तें मी "मासिक मनोरजन" च्या जानेवारी १९०६ च्या अकात व्यक्त केले त्याच अकात केशवसुताचे चरित्र आलें आहे त्यातील काही माहिती सपादक काशिनाथ रघुनाथ मित्र याना मी दिली. १९०५ पासून गेल्या अनेक वर्षांत अनेक लेखकानी केशवसुतांच्या काव्यावर स्वतंत्र ग्रथ लिहून, काव्यचर्चा करून, चरित्रविषयक माहिती देऊन व केशवसुतांच्या नव्या सप्रदायाचे स्वरूप दाखवून केशवसुताचें नवकवींत श्रेष्ठ स्थान प्रस्थापित केलें आहे अशा कवीच्या स्मृतिदिनीं त्या कवीच्या तीन वर्षांच्या सहवासातील काही अनुभव नमूद करून ठेवावे असें मनात आलें रा. प चि दामलेकृत केशवसुताची कविता व प्रा र श्री जोग याचें केशवसुत–काव्य–दर्शन हीं दोन पुस्तकें वाचून केशवसुताचे सहवासातील आपला अनुभव स्मृतिदिनाचे दिवशी वाचकास सागावा अशी स्फूर्ति होऊन माझी आठवण म्हणून पुढील लेख लिहिला आहे काव्याचा आस्वाद घेताना कवीचें चरित्र माहीत असणे हें त्याच्या काव्याचे सम्यक् ग्रहण होण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे कवीच्या जीवनावरून

कवितेचा अर्थ लावणें अधिक सुरक्षित व इष्ट आहे असे विचार प्रा जोग यानीं व्यक्त केले आहेत ते योग्य आहेत केशवसुताचे चरित्र म्हणजे मधल्या स्थितीतील हजारो लोकाच्या चरित्रासारखें आहे हें चरित्र लिहिण्याचे काम कवीचे बधु कै सीताराम केशव दामले यानी केले आहे

**जन्म व बालपण**

रा कृष्णाजी केशव दामले म्हणजे केशवसुत याचा जन्म तारीख १५ मार्च १८६६ रोजी मालगुड, जि रत्नागिरी येथें झाला त्याचे वडील केशव विठ्ठल दामले हे रत्नागिरी जिल्ह्यांत सरकारी मराठी शाळेंत शिक्षक होते केसोपतांनीं प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें लवकर पेन्शन घेतलें त्यांनी पेन्शन घेतल्यावर कै. विश्वनाथ नारायण मडलीक याचा खोती गाव वळणे ता दापोली, या गावाची व्यवस्था पाहाण्यासाठी केसोपताची मडलीक यानी योजना केली. याच गावीं केशवसुताचे बालपण गेलें वळणें या खेड्याचें वर्णन केशवसुतानीं आपल्या एका कवितेंत केलें आहे केशवसुत लहानपणा सुदृढ प्रकृताचे नव्हते. अशक्तच होते लहानपणीं हूडपणा किंवा दाडगाई करण्याकडे त्याची प्रवृत्ति नसे. कोठेंतरी एकटेच फिरावे, एकटेंच बसावें, अशी त्याची सवय होती याच सवयीमुळें सृष्टिनिरीक्षणाकडे केशवसुताचें मन वेधलें वडिलाचे हाताखाली त्याचे मराठी पाच यत्तेचे शिक्षण खेड या गावातील शाळेत झालें त्याचें मराठी शिक्षण १८८१ त पुरें झालें या वेळी त्यांचें वय १४ वर्षांचे होतें

**इंग्रजी शाळेंतील शिक्षण (१८८१ ते १८९०)**

केशवसुताचा मराठी अभ्यास कोकणांत खेडेगावीं झाल्यावर इंग्रजी शिक्षणासाठीं सन १८८२ सालीं ते आपले ज्येष्ठ बंधु प्रो श्रीधर केशव दामले याचेकडे बडोद्यास निघून गेले त्यावेळी त्याचे दुसरे बंधु मोरेश्वर हेही श्रीधरपंताकडे इंग्रजी शिक्षणाकरिता गेलेले होते. परंतु दुर्दैवानें प्रो श्रीधरपंतास बडोद्यांत देवाज्ञा झाली.

यामुळें हे दोघेही होतकरू विद्यार्थी श्रीधरपताचे आधारास मुकले पुढें हे दोघे विद्यार्थी बधु वर्धा येथें आपले मामा रामचद्र गणेश करदीकर याचेकडे शिक्षणार्थ गेले, परतु तेथेही इग्रजी शिक्षणाची चागली सोय नसल्यामुळें उभय बधू नागपूरकडे अभ्यासाकरिता गेले पण तेथील उष्ण हवा दोघासही न मानवल्यामुळें मोरेश्वर उमरावतीस गेले व केशवसुत पुण्यास शिक्षणाकरिता आले. १८८४ साली पुण्यातील सरकारी हायस्कुलात चवथ्या यत्तेंत केशवसुतानीं आपले नाव दाखल केले पुढें ती शाळा सोडून न्यू इग्लिश स्कूल पुणें या शाळेंत चवथ्या यत्तेंत त्याचें नाव दाखल झालें या वेळीं प्रि आगरकर व लो टिळक हे केशवसुताचे शिक्षक होते केशवसुत १८८४-८९ पर्यंत न्यू इग्लिश स्कूल मध्यें होते १८८९ मध्यें ते मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास झाले नागपुरात कवि ना वा टिळक याच्या व पुण्यात रा ह. ना आपटे व वा ब पटवर्धन याच्या मैत्रीचा लाभ केशवसुतास झाला

**मुंबईंतील केशवसुताचें वास्तव्य**

सन १८९१ ते १८९६ पर्यंत केशवसुताचे वास्तव्य मुबईत होतें मुबईत कै विश्वनाथ नारायण मडलिकांच्या शिफारशीनें केशवसुतास चागली सरकारी नोकरी मिळाली असती, परतु नोकरीची याचना करण्यास ते मंडलिकाकडे गेलेच नाहीत प्रथम त्यानीं एका मिशनरी शाळेंत नोकरी पत्करली १८९३ साली ते प्रथम फणसवाडीत जगन्नाथाचे चाळींत व पुढें केशवजी नाईक याचे कादेवाडींतील चाळींत व माधवदास प्रेमजी चाळ मुगभाट येथें बिऱ्हाड करून राहू लागले या वेळी त्यास कॉमिसॅरिएट खात्यात नोकरी होती काहीं दिवस त्यानी दादर इग्लिश स्कूलमध्यें व कल्याण येथील इग्रजी शाळेंत नोकरी केली मध्यतरीं सहा महिने म्हणजे १८९३ सालातच सावतवाडी येथें शाळेंतील नोकरी करिता ते गेले असतां रा काशीनाथ रघुनाथ मित्र व रा बाबूराव बाळकृष्ण पडित याचा व केशवसुतांचा स्नेह जमला रा मित्र हे प्रागतिक विचाराचे गृहस्थ होते त्यांनीं १८९५-९६ सालीं मासिक मनोरजन सुरू केलें त्यातच

पुढें केशवसुतांच्या कविता येऊ लागल्या मुंबईंत असताना केशवसुत प्रार्थनासमाज, आर्यसमाज व मिशनरींची ख्रिस्ती धर्मावरील व्याख्यानें ऐकण्यास जात असत त्यांना सुधारकी मतें फार आवडत रा गजानन भास्कर वैद्य व त्याचे बंधु सुंदरराव वैद्य हे केशवसुताचे परिचित आहेत आर्यसमाजात त्याचे मूर्तिपूजेला विरोधक असें भाषण झालें तें लोकास आवडलें नाहीं म्हणून पुढें त्यानी मूर्ति-भंजन ही कविता प्रसिद्ध केली असें सुंदरराव वैद्य यानी मला सांगितलें १८९६ साली मुंबईंत प्रथम प्लेगचा प्रादुर्भाव झाला लोक उघड्या हवेत अगर बाहेरगावीं जाऊं लागले यामुळें १८९७ सालीं केशवसुत आपल्या कुटुंबास खानदेशात आपल्या श्वशुराकडे ठेवण्या-करिता गेले व मुंबईची नोकरी सोडून त्यांनी भडगांव येथें इंग्रजी शाळेंत ॲसिस्टंट मास्तरची नोकरी [illegible]

## भडगांवांत केशवसुत

सन १८९७–१९०१ पर्यंत केशवसुत भडगाव इंग्रजी शाळेंत असि. मास्तर होते त्याना पगार वीस रुपये होता या गावीं त्यास पगार थोडा, पण काव्यरचनेंस मन स्वास्थ्य लाभलें असें दिसतें गिरणानदीचे काठी बसून ते काव्यरचना करीत येथेंच त्याचा व फैजपूर–इंग्रजी शाळेचे हेडमास्तर रा सखाराम विष्णु विद्वांस याचा स्नेह झाला १८९८ सालीं श्री विद्वांस व केशवसुत हे दोघेही सरकारी एस. टी सी ची परीक्षा पास झाले

## केशवसुत–फैजपूर इंग्रजी शाळेचे हेडमास्तर

पूर्व खानदेशात सावदे स्टेशनपासून १॥ मैलावर सावदे गाव आहे व सावद्याच्या पश्चिमेस दीड मैलावर फैजपूर नावाचा मोठा गाव आहे. हा गांव यावल तालुक्यात आहे. गांवचें क्षेत्र लहान असून वस्ती दाट आहे येथें म्युनिसिपालिटी असून १९०१ सालीं चार इयत्ता असलेली इंग्रजी शाळा होती शाळेस एक दुमजली घर व त्याला जोडून एक मजली घर घेतलें होतें ही शाळा म्युनिसिपालिटीनें [illegible]

[illegible] १९०० [illegible] शाळेच

हेडमास्तर रा स. वि विद्वास हे होते विद्वास यानीं ही शाळा चागली चालविली रा विद्वास फैजपुरात फार लोकप्रिय होते. त्याची आकृति भव्य व पोषाख रुबाबदार असे त्याचे विद्यार्थी अजून फैजपुरात असावेत रा विद्वास याची नेमणूक यावल इग्लिश स्कूलचे हेडमास्तर या जागीं झाली व त्याच्याच प्रेरणेनें रा कृष्णाजी केशव दामले असि मास्तर भडगाव याची नेमणूक फैजपूर इग्रजी शाळेचे हेडमास्तर म्हणून १९०१ त झाली या शाळेंत इग्रजी इयत्ता चार, परतु हेडमास्तर व एकच असि मास्तर असे दोघेच शिक्षक होते पुढें याच शाळेंत माझी नेमणूक फ अ. मास्तर म्हणून झाली व मी धारवाडहून फैजपूरास या शाळेंत १९०१ सालीं रुजू झालों म्यु अध्यक्ष सोनु गणेश ऊर्फ तात्यासाहेब कुलकर्णी यानी शाळेंत येऊन रा कृ. के दामले यास मला रुजू करून घेण्यास सागितले हीच माझी आणि केशवसुताची शाळेत पहिली भेट यापूर्वी आम्ही एकमेकास पाहिलें नव्हतें.

**केशवसुत–निवास**

रा कृष्णाजी केशव दामले तथा केशवसुत हे फैजपुरात रा. दाजी चिमणाजी कुलकर्णी याचे वाड्यात पहिल्या मजल्यावर पश्चिम व दक्षिण अशा दोन दालनात राहात असत याच वाड्यात मराठी शाळेचे हेडमास्तर जोशी व गणपतराव शेंडे पोलीस हवालदार रहात याच वाड्यात माझी बिऱ्हाडाची सोय केशवसुतानीं केली आमची चार बिऱ्हाडें, मालक व त्याचे कुटुब, यानीं वाडा गजबजलेला असे माझ्या दालनापुढें मोठा सोपा होता त्या सोप्यावर एक बैठक व तक्ये मालक ठेवीत येथें मालक, केशवसुत व मी दिवसातून एकदा तरी एकत्र बसून गप्पा मारीत असू १९०२ सालीं मीही सहकुटुब येथें राहिलों केशवसुत इग्रजी शाळेंत माझे वरिष्ठ व घरी ते माझ्याहून १५ वर्षांनी वडील असल्यामुळे मी त्यास त्या दृष्टीनें मान देत असे सहवासानें त्याचा व आमचा घरोबा व स्नेह वाढला मी त्यास वडील बधूचा मान देत असे.

**फैजपूर इंग्रजी शाळा**

या शाळेंत फक्त इंग्रजी चार इयत्ता होत्या केशवसुत हे हेडमास्तर व प्रस्तुत लेखक फर्स्ट असिस्टंट व रा. रुपा हुना चौधरी हे से असिस्टंट असे तीनच शिक्षक शाळेत सुमारे ७५ मुले पटावर होतीं, परंतु हजेरी दररोज ४०–५० विद्यार्थ्यांची असे केशवसुत चौथ्या यत्तेचे सर्व विषय शिकवीत व [illegible] तिसऱ्या यत्तेचे सर्व विषय माझ्याकडे व दुसरी व पहिली यत्ता चौधरी यांचेकडे. तीन वर्षात एकदांच शाळेची परीक्षा रा. ब्रम्हे सरकारी इन्स्पेक्टर यानीं घेतली. शाळेला शेरा चांगला मिळाला शाळा चालविण्यापेक्षा शाळा टिकविण्याकडे त्यावेळी आम्हां तिघाही शिक्षकास लक्ष द्यावे लागत असे कारण त्या काळी मुलास इंग्रजी शिक्षणाची विशेष आवड नव्हती शाळेंत हेडमास्तर केशवसुत यास पगार रु ३० व इंग्रजी लेखन अलावन्स १० रु मिळून चाळीस रुपये पगार मिळत असे

**केशवसुताचें कुटुंब व दिनचर्या**

केशवसुत याचे वय १९०१ साली ३५ होतें त्याची उंची पांच फुटावर होती चेहरा वाटोळा, सी. के. दामले याचे सारखा, वर्ण गोरा कपाळ मोठें, चेहऱ्यावर तेज, नेत्रात हृदयभेदक दृष्टीची धार होती चेहऱ्यात हृदय आकर्षण करून घेण्याची शक्ति होती हें वर्णन सत्य आहे त्याचा पोषाख फैजापुरात हेडमास्तर असतां काळीनिळी पगडी, लांब कोट, धोतर, उपरणे पायात पुणेरी जोडा, प्रवासात पांढरा फेटा, काचा व वाहाणा वापरीत त्याचा फोटो काढण्याचा योग फैजपुरात आला नाहीं. कवि कसा होता हें जाणण्याची इच्छा वाचकास असते म्हणून हें वर्णन दिलें आहे. केशवसुताचा विवाह चिपळूण जवळील एका खेड्यातील रा. केशव गंगाधर पितळे याचे कन्येशी १८८१ साली झाला तिचा वर्ण काळा सावळा होता, गौरवर्ण नव्हता. पण ती कुरूप नव्हती अशा स्वरूपाच्या स्त्रिया सर्वत्र दिसतात पतिपत्नीत खरें प्रेम होतें ती माउली अत्यंत गरीब, सालस व सरळ

स्वभावाची होती सहवासामुळें त्याचा आमचा घरोबा वाढत गेला फैजपुरांत हें कुटुंब सुखानें नादत होतें केशवसुतास तीन कन्या होत्या त्याचीं वयं त्या वेळीं ८, ५, २ अशीं होतीं त्याचीं नावे मनी, वत्सला व सुमन अशीं होतीं. केशवसुतास पुत्रलाभ झाला नाहीं कन्या आपल्या वडिलास अप्पा म्हणत आम्हीं त्याच्या पत्नीस ' वहिनी ' म्हणत होतों माझी पत्नी विषमज्वराने आजारी असता केशवसुत व त्याच्या पत्नी यानीं तिची चागली शुश्रूषा केली इग्रजी शाळा नेहमी ११ ते ५ वाजेपर्यंत भरत असे. बाजारच्या दिवशीं शाळा सकाळीं भरत असे आम्ही दोघे बरोबरच जात असू चौथे यत्तेंत त्याचे बरोबर त्याचा एक पुतण्या पाडुरग नावाचा आमचेबरोबर शाळेंत येई. केशवसुताचें शिकवणें फार नमुनेदार होतें मुलावर त्याची छाप चागली होती, ते क्वचितच रागावत परतु रागावले म्हणजे शाळेंतील मुलास व घरी पुतण्यास झोडपून काढीत हें मी प्रत्यक्ष पाहिलें आहे शाळेचे कामाखेरीज केशवसुत नेहमीं घरींच असत हवा खाण्याकरितां कधी फिरावयास गेलेले मी त्यास पाहिले नाहीं रविवारीं पत्र लिहिण्याचें काम करीत असत हीं पत्रें आप्तवर्गास अगर कवि मित्रास असत पत्रे मोडी, बालबोध व इग्रजी लिपींत असावयाची अक्षर सुवाच्य, वळणदार, रेखीव, एक कार्ड लिहिण्यास अर्धा तास लागावयाचा ! माझ्या सागलीच्या वडील बधूसही त्यानीं एक समाचार पत्र पाठविलें, व पत्राचें उत्तरही त्यास आले केशवसुत अगदी हळू बोलत व ते सदा विचारात गढलेले असत. त्याची दृष्टि सदा अतर्मुख असे साधी राहणी व उच्च विचारसरणी हा त्याचा बाणा होता सुटीच्या दिवशीं मुलींना घेऊन माडीवरून खाली सोप्यावर बसण्याकरिता ते येत त्यावेळीं त्याचा माझा अनेक विषयावर सवाद होत असे. कधीं कधीं केशवसुत, मी, वाड्यातील मडळी मिळून पत्त्यानी खेळत असू

**फैजपुरांतील तीन वर्षांतील सामाजिक वृत्त**

फैजपूर गावात वाचनालयाची आवश्यकता फार होती म्हणून मी केशवसुताचा सल्ला घेऊन रा सोनुतात्या कुलकर्णी याचेकडे

गेलों व एक लहान वाचनालय काढण्याचे ठरविलें वाचनालयात पाच वर्तमानपत्रें, पाच मासिकें व शभर वाचनीय पुस्तकें इतका संग्रह प्रथम करावयाचा ...

... हे वाचनालय सुरू केले. वाचनालयाचे नाव 'आर्य-वाचन-मंदिर' असें ठेविलें रा सोनुतात्या कुलकर्णी यांच्या आवाराच्या प्रवेशद्वारावरील माडीवर हें वाचनालय स्थापन झालें. स्थापनेचा समारंभ, पानसुपारी झाली या वेळीं केशवसुत, सोनुतात्या, खुशाल हरि चौधरी वगैरे मंडळी उपस्थित होती रा खुशाल हरी चौधरी यानीं वाचनालयास दहा खुर्च्या, एक मेज व एक कपाट दिले परंतु लोकास वाचनाची गोडी नसल्यामुळें फार थोडे वाचक येत केशवसुत सध्याकाळी वाचनालयात येऊन जात असत

व्हिक्टोरिया राणी १९०० त निधन पावल्यावर ७ वे एडवर्ड गादीवर बसले. त्या वेळी कर्झनशाही होती शाळतून राजनिष्ठेचा दरबार भरविण्याचे सरकारी हुकूम आले १९०२ साली मराठी शाळेंत यावलचे मामलतदार रा. ना के गोडबोले बी ए यानी दरबार भरविला मुलाचा बक्षीस समारंभही झाला. इंग्रजी शाळेंतील मुलास संवाद व पद्यें शिकविण्याचें काम केशवसुताना करावे लागलें

... मंडळीना देशी परदेशी कापडाचें दुकान सहकारी मंडळी स्थापून उघडलें त्यावेळी पानसुपारी समारंभ झाला समारंभास केशवसुत उपस्थित होते. दुकानचे मॅनेजर रा रामभाऊ हरताळेकर हे झाले

सावदे येथें देशमुख वाड्यात हौशी मंडळीनीं 'सौभद्र' नाटकाचा प्रयोग केला त्या वेळीं केशवसुत, मी व काही मंडळी रात्रीं फैजपुराहून सावद्यास नाटक प्रयोग पाहण्यास गेलो होतों

**केशवसुतांचा काव्यरचनेचा व्यासंग**

केशवसुत हे अभिजात कवि होते. बालपणापासून त्यांस कविता करण्याचा नाद लागला तो आमरण होता फैजपुरात असताना

त्याचें द्रव्यसंपादनात, संसारात अगर शाळेचे कामात असावे तसें चित्त नसे सदा विचारमग्न असत समाजात मिसळणें हें त्यास आवडत नसे त्यांचेकडे मासिक मनोरंजन दर महिन्यास येई त्यात त्यांच्या कधीं कधी कविता येत रात्रीं दिवसा शतपावली करीत तेव्हा कविता गुणगुणत असत ही स्थिति मी प्रत्यक्ष पहात होतों.

जे रम्य तें बघुनिया मज वेड लागे ।
गाणें मनात मग होय सवेचि जागें ।।

असें त्यानी लिहून ठेविलें आहे मला कविता वाचण्याचा नाद आहे हें जाणून त्यानी एकदा मला माडीवर बोलाविलें व पेटींतून कविता लिहिलेल्या वह्या दाखविल्या व एक नाटकही लिहिलेलें दाखविलें त्यांच्या संग्रहात काही निवडक इंग्रजी पुस्तकें होतीं तें माझें गद्यपद्य-मय The Bell Standard Elocutionist हें पुस्तक नेऊन आवडीनें वाचीत असत

१९०२ सालीं त्यांची आई उज्जनींत निवर्तली त्यावेळी केशवसुत बंधु चिंतोपंत व मुलगा परशराम यासह उज्जनीस फैजपुराहून गेल्याचें स्मरतें.

**बिकट परिस्थिति**

१९०२–०३ सालीं दोनही वर्षे फैजपुरात प्लेग सुरू झाला. दर वर्षी गावाबाहेर जिन् फॅक्टरीच्या आवारात आम्हास राहावें लागलें इंग्रजी शाळेंतील मुलांची संख्या घटत चालली शाळा बंद पडते की काय अशी भीति वाटू लागली १९०४ साल सुरू झालें. पगार थोडा, नोकरी अशाश्वत, असें दिसून आलें फैजपूरची हवा उष्ण, ती मला मानवेना म्हणून मी तीन महिन्याची रजा घेतली नोकरीच्या शोधात धुळयास गेलों धुळयाहून १९०४ सालअखेर मुंबईत आलों धुळयाहूनच शाळेच्या नोकरीचा राजीनामा दिला. केशवसुत व रा. एस व्ही विद्वांस यांची नेमणूक याच वेळी सरकारी हायस्कुलात झाली केशवसुत धारवाड हायस्कुलात

शिक्षक व विद्वांस एलफिन्स्टन् हायस्कुलांत शिक्षक नेमले गेले मी मुबईत आलों व मि सन्टोक याच्या लॉ क्लासात नाव दाखल केले काहीं दिवसानी विद्वांस मला मुबईत भेटले

## हुबळी–धारवाडांत केशवसुतांची अखेर

फैजपुरात असताना केशवसुतास व मला बाबासाहेब कुळकर्णी सोनुतात्या, रामभाऊ व गोपाळराव हरताळेकर, बाबा वडगावकर, खुशाल हरि चौधरी, गणपत द चौधरी, विष्णु वामन ढोले, गणेश बा. केतकर या सर्व गृहस्थानीं चागली मदत केली. मी मुबईस गेल्यावर केशवसुत फैजपुराहून धारवाडास गेले. २८ जुलै १९०४ रोजीं धारवाड मुक्कामीं त्याची 'प्रतिभा' कविता बाहेर पडली धारवाड येथें केशवसुत सुमारें दीड वर्ष होते. तेथें काही दिवस त्याचे सुखात गेले असें त्याचे बधु 'मार्गण' म्हणतात १९०५ सालच्या आक्टोबर अखेर दिवाळीच्या सुटीत ते धारवाड-हून हुबळी येथे गेले होते हुबळी येथें केशवसुताचे चुलते हरिकाका दामले मराठी शाळेंत मास्तर होते हुबळी येथेही त्या वेळीं प्लेग सुरू होता. चार दिवस हुबळी येथें राहिल्यावर केशवसुत आणि त्याच्या पत्नी ह्या दोघासही एकदम प्लेगचा ताप आला व दुर्दैवानें ता ७ नोव्हेंबर १९०५ रोजीं सकाळी केशवसुतांचें प्राणोत्क्रमण झालें त्याची पत्नी त्याच्या मागून ४।५ दिवसानीं प्लेगानें वारली त्याच्या चुलत्यांनी त्याच्या तीनही कन्यास त्याचे बधु चि के दामले यांचेकडे चिपळुणास रवाना केले.

## केशवसुतांची कविता

सन १८८५ पासून १९०५ पर्यंत केशवसुतानीं १३२ कविता रचल्या केशवसुत रगेल नव्हते परस्त्री मातेसमान मानणारे होते. ते स्त्रैण नव्हते परतु त्यांस स्त्रीपुरुष प्रेमाचे व त्यांच्या मोहक-कोमल भावनाचें सम्यक् ज्ञान होतें यात शका नाही त्याचें आपल्या पत्नीवर अतिशय प्रेम होतें तें त्यांनीं अनेक कवितात व्यक्त केलें आहे

फैजपुरात केशवसुताच्या सहवासात असतांना त्याचा माझा दर रविवारीं सोप्यावर बैठकीत सवाद होत असे केसरीपत्र मी मोठ्यानें वाचावें व त्यांनी ऐकावें समाषणांत अनेक गोष्टी येत. केशवसुत म्हणत 'प्रत्येक नोकराला त्याच्या ससारास पुरेल इतका पैसा मिळाला पाहिजे' 'यत्न केला तर फैजपूर इग्रजी शाळेची वाढ हायस्कूलपर्यंत होईल' 'सपादक मासिक मनोरंजन यांचेकडून मला १०–२० रुपये कवितेबद्दल कधींकधीं येतात' त्याच्या कविता न. १२३ ते १२७ ह्या त्याच्या फैजपुरातील मुक्कामात मासिक मनोरजनमध्यें आल्या केशवसुत म्हणजेच श्री. कृ के. दामले हें मला फैजपुरात आल्यावर मनोरजनावरून समजलें. कविसमेलन भरावणे त्याना मान्य नव्हतें दोन कवींनीं एकमेकास प्रेमाने भेटावे असे त्याचें मत होतें केशवसुताचे कविमित्र रेव्ह ना. वा टिळक, किरात, चद्रशेखर, फडणीस, काव्यरत्नावलीकर्ते न. श रहाळकर, कवि विनायक, लेभे व लोंढे हे त्याचे समकालीन कवि होते.

असो केशवसुतास गरिबींत दिवस काढावे लागले ही गोष्ट खरी पण त्या काळीं स्वस्ताई असल्यामुळें हल्लींप्रमाणे फार हाल होत नसत केशवसुताचा भडगाव व फैजपूर येथें अधिकाऱ्यानीं कधींही अपमान केला नाहीं ते कवि आहेत ही माहिती लोकास नव्हती केशवसुताचे पुतणे परशराम याल ८ वर्षांचे असताना मी १९०२–०३ साली फैजपुरात पाहिलें व तेच रा परशराम चिंतामण दामले बी. ए एलएल बी. वकील राहुरी जि अहमदनगर हे तीन महिन्यामागें मुबईत मला भेटून गेले रा प चि. दामले यांनीं केशवसुताचा कवितासग्रह हा ग्रथ व प्रा रा श्री. जोग यानीं केशवसुत काव्यदर्शन हा ग्रथ प्रसिद्ध करून केशवसुताचें कायम स्मारक केलें याबद्दल त्याचे मन पूर्वक आभार मानून हा लेख पुरा करितों

* * *

श्री द वें केतकर, बी ए बी. टी., विजापूर.

# २० : आमचे मराठीचे शिक्षक 'कवि केशवसुत'

आम्ही धारवाड सरकारी हायस्कूलमध्यें (इ. स. १९०४) इग्रजी तिसऱ्या इयत्तेंत असताना तेथील तालीममास्तर श्री पराजपे हे काही काळ मराठी विषय शिकवीत असत नतर श्री. दामले मराठी शिक्षक म्हणून आले. पुढे इ स १९०५ मध्यें आम्ही चवथीत प्रवेश केला त्यावेळींही श्री दामलेच मराठी शिक्षक होते, एकदर कालावधि सुमारे वर्षसव्वावर्ष एवढाच असावा असें निश्चित वाटते.

इ. स १९०५ सालीं मुबईचे गव्हर्नर लॉर्ड लॅमिग्टन यानीं सरकारी हायस्कूलला भेट दिली त्या वेळी लाँग लिव्ह ऑवर किंग . . याची चाल तेथील पर्शियन टीचर व दामले यानी सागितली असे स्मरण आहे.

नतर पढें हुबळीस केशवसुताचे चलते हरि काका दामले यानी दिपवाळीकरिता बोलाविलें म्हणून श्री. दामले सहकुटुब हुबळीस गेले, व तेथेंच ते स्वत व त्याचें कुटुब प्लेगनें दिवगत झालें अशी बातमी शाळेंत सुमारें १२ वाजता आली सर्वत्र दु खाचें वातावरण पसरलें हेडमास्तर श्री. भास्कर यशवत जठार यानीं दुःखप्रदर्शन केलें.

**शिकविण्याची पद्धत**

अन्वयार्थ वगैरे स्पष्टीकरण सुबोध करीत असत. परतु पुन्हा विचारले असता चिडत असत. रागही येई. परतु पुन्हा सागत असत पण त्या सागण्यात पहिला उत्साह नसे आमच्याकडूनच अर्थ पुन्हा करवीत. मुक्तेश्वर व एकनाथ या नावाचा उच्चार ते वारवार करीत त्या वेळी आम्हाला त्याचें महत्त्व मुळीच समजत नसे एकदां—

मी — सर पीन म्हणजे काय?

दामले -- पीन म्हणजे लड्ड--हे बघ मुक्तेश्वर काय म्हणतो--असें म्हणून तोंडानें साविर्भाव एक दोन कविता म्हटल्या

**त्याची चर्या**

ते फार मितभाषी, कामापुरतेंच बोलत असत सदैव गभीर चर्या. प्रसन्न मुद्रा आम्हाला कधींच दिसली नाहीं नेहमीं विचार-मग्न मन आनद, उत्साह, हौस याशीं त्याचे सख्य नव्हतें दात आवळून भाषण, आवाज खालचा सारा व्यवहार अगतिक वृत्तीचा होता शाळेंतील समारभातही तें निर्लिप्तपणेंच असत कोणाशी मिसळणें, मनमोकळेपणें विनोद, गप्पा मारीत बसणे याची नावडच होती टप्पोरे डोळे त्याची अतर्मनातीलच मैत्री दाखवीत पर्शियन टीचर त्याना एकदा म्हणाले "हमारे तर्फ जरा देखो" याचे कारण या पर्शियन टीचरशीं त्याचे थोडेसें सख्य होतें हेही कवि होते ते आपल्या कविता श्री दामले याना म्हणून दाखवीत मग हेही आपल्या मराठी कविता त्याना वाचून दाखवीत पर्शियन टीचर अत्यत आनदी प्राणी होते तसें दामले मुळींच नव्हते मग ते त्याना म्हणत-- इतनी अच्छी कविता आप लिखते हैं, लेकिन् आपके मुहपर खुषी क्यों नही दिखती !

**त्यांचा पोषाख**

पर्शियन टीचरचा पोषाख फारच थाटाचा असे. परतु श्री दामले याचा पोशाख मात्र अगदींच साधा त्याचे दोन पारशीवजा कोट होते कापड निळसर व पाढऱ्या रेघाच्या चौकटी. दोन पैरणी, ताबडी पगडी, धारवाडच्या मातीमुळें ताबूस धोतरें व अगदी साधी दोन उपरणीं, लोकमान्याप्रमाणें उजव्या खाद्यावरून डाव्या खाद्यावर टाकलेलें असे पायात आगरकरी जोडा उची मध्यम, रग गव्हाचा, उभें गध, कपाळ मोठें, चेहरा नीरस डोळ्यात चाणाक्षपणा असे

**विद्यार्थ्यांशीं संबंध**

शिकविताना आम्हाला बरेच मारीत असत. चिडखोर वृत्ति फार एकदा शार्दूलविक्रीडिताची व्याख्या सांगून आपण स्वतः केलेला एक श्लोक मोठ्या आवेशानें म्हणून दाखविला. त्याच,

वृत्तात एक व आर्या वृत्तात एक असे दोन श्लोक मी स्वत त्याच्या-वर (मारल्याबद्दल) करून आणले होते माझ्या एका मित्रानें तो कागद ओढून घेऊन मास्तराच्या पुढे ठेविला

श्री दामले मास्तर–अरे, कविता माझ्यासारखी जोरदार केलीस खरी; परतु तींत माझी चेष्टा आहे, म्हणून तुला हेडमास्तरकडे नेतो चल. (मग मी लाबच्या वाटेनें जाऊ लागलों. तेव्हा म्हणाले–) No No या वाटेनें चल, This is a shorter way. पण पुढें त्यानी मला हेडमास्तरकडे नेलें नाहीं माझा कान पिळला व परत जागेवर जाण्यास सागितलें व नतर काहीं वेळानें मला पुनः सौम्य आवाजात म्हणाले–

"अरे केतकर, तुजजवळ काव्यशक्ति आहे. तिचा चागला उप-योग कर पाचट कविता करू नकोस त्याचा उपयोग होणार नाही. तुला करायचेच असेल तर चागल्या वृत्तात काव्य कर." असो हा त्याचा उपदेश माझ्या मनावर पूर्ण ठसल्यामुळें मी जी जीं काव्यें केली ती सारी सुबोध वृत्तातच केली आहेत "सुनानो स्वय उद्धरा आपणासी" –हें सुमारें ७०० श्लोकाचें काव्य साहित्य-प्रणीत वृत्तातच केले आहे त्यात श्री केशवसुताची मुद्रा सहज दिसून येईल

सासारिक आर्थिक परिस्थिति नीट नसल्यामुळे त्याच्या जीवनात नीरसता, व चेहेऱ्यावर दुर्मुखलेपणा आला असावा असें आम्हाला नीटसें ते कवि असतील असेंही कोणास समजलें नाहीं त्याच्या बरोबरीचे शिक्षक भिन्नभाषिक होते कर्नाटकी होते, म्हणून त्याच्यात मिसळणें त्याना जड गेले असेल, परतु एकत्र बसून बोलणे, हसणें, वगैरे करण्याला कोणतीच हरकत नव्हती परतु त्याचा तसा स्वभावच नव्हता किंवा नेहमी काव्यरचनेच्या तद्रीत असल्याकारणानें त्याच्या अगीं हा एकाकीपणा येण्याचाही सभव आहे. साराश ते शाळेंत असून शाळेंत नव्हते मित्रात असून मित्रात नव्हते जगात असून जगात नव्हते आनदाची छटा त्याच्या मुखा-वर कधीच दिसली नाही

* * *

कै. डॉ. भी गु बिश्केरूर, एम्. बी. बी. एस., जळगाव

# २१ : मास्तर भ्रमिष्ट आहेत झालं

सन १९०१ ते १९०३ या सालात मी फैजपूर येथें ज्या शाळेंत केशवसुत शिक्षक होते त्या शाळेंत होतों एवढेंच नव्हे तर A B C D चा प्रथम पाठ मी श्री केशवसुताकडून घेतला आहे । त्या वेळीं, फैजपूरची ही इग्रजी शाळा फक्त दोन ईयत्तापर्यंतच होती सन १९३० सालीं तिसऱ्या ईयत्तेचा वर्ग उघडला केशवसुताकडे दुसऱ्या इयत्तेचा वर्ग असे पण पहिलीवर बहुतेक मास्तर नसावयाचेंच, असले तरी तात्पुरते, दुसरीचा एखादा विद्यार्थी असे त्यामुळें केशवसुताना पहिलीचा व दुसरीचा दोन्ही वर्ग सभाळावे लागत फैजपूरची ही शाळा रस्त्यास लागून एका दुमजली लहानशा घरात भरत असे खालीं दोन खोल्या व वर एकच खोली अशी ही इमारत होती अजूनही ही इमारत त्या ठिकाणीं आहेच ही इमारत रस्त्याला लागूनच असल्यामुळें व मागें मोठचाशा इमारती नसल्यामुळें, तींत भरपूर उजेड व हवा असे उत्तरेस दरवाजा व पश्चिमेस म्हणजे रस्त्याचे बाजूस खिडक्या अशी रचना केशवसुताच्या वर्गाची असे दर्शनी दरवाजाचे जवळच पण पश्चिमेकडील खिडक्याकडे तोंड करून केशवसुताची टेबल, खुर्ची असे. ‘ देवीदासबाबा ’ हे गृहस्थ केशवसुताचे वेळी स्कूल-बोर्डचे चेअरमन होते आणि याच गृहस्थाशी केशवसुताचा खटका उडत असे.

### केशवसुतांचें व्यक्तिमत्त्व

माझें वय त्या वेळी नऊ-दहा वर्षांचें होतें. त्यामुळें केशवसुतांची चेहरेपट्टी आज स्मरणानेंहि मी काहींच सागू शकत नाही मला आठवतें तें एवढेंच कीं, केशवसुत-उच, गोरे, व लाब मिशांचे असावेत अंगकाठी सडपातळ होती ते उपरणें नेहमी

घेत असत निदान बाहेर कोठेंही जातांना उपरणें घेत त्याच वेळीं माझे वर्गात असलेल्या कांहीं व्यक्ति अजूनहि फैजपुरास आहेत. श्री अनंत रामचंद्र कुलकर्णी, गोटयाभाऊ ही मंडळी आजही हयात आहेत

**केशवसुतविषयक आठवण**

एकदा वर्गांत शिकवीत असताना पश्चिमेच्या खिडकीतून उन्हाचा कवडसा वर्गांत पडला होता व त्यातून चमकणारे असंख्य धूलिकण दिसत होते केशवसुतांनी मला विचारलें, त्या वेळीं ते स्वत:शींच कांहीं तरी पुटपुटत असावेत असे वाटतें ते म्हणाले, 'हें काय आहे ?' मी म्हटले 'हें उन्ह आहे, सर ' केशवसुतांनीं पुनः विचारलें, 'यांत तुला काय दिसतें ? ' मी म्हटलें 'अणु ' त्यावर ते हसून म्हणाले, "या प्रत्येक अणुपरमाणूत एक 'जग' आहे या दर जगात एक हिंदुस्थान व त्यात एक फैजपूर आहे. त्यात तूही एक आहेस व मीही एक आहे" ही गोष्ट ध्यानांत राहण्याचे एक कारण झालें शाळेंतून घरी आल्याबरोबर ही गोष्ट म्हणजे मास्तर म्हणतात–दर अणूपरमाणूतून एक एक फैजपूर आहे व त्या प्रत्येकात मी व मास्तर आहोंत, ही अद्‌भुत गोष्ट मी माझे वडील बसले होते तेथें सांगितली त्या ठिकाणी वर म्हटलेले, देवीदासबाबाही अर्थात् होतेच त्यानीं म्हटले, 'मास्तर काय भ्रमिष्ट आहेत झाल !'

* * *

श्री वि श्री करंदीकर रि. शिक्षक, न्यू इ स्कूल, पुणें

# २२ : मी सरस कविता पुनः लिहीन

(१) माझे बधू श्री सदाशिव श्रीधर करदीकर हे केशव-सुताचे अगदी जिवलग मित्र होते माझे बधु पण कवि होते माझ्या बधूचे New preparatory Classes होते केशवसुत आमच्या बिऱ्हार्डी १८९९ च्या फेब्रुवारी मार्चचे सुमारास आलेले होते, त्या वेळी केशवसुतानीं आपली 'भवानी तलवार' नावाची प्रदीर्घ कविता दाखविली होती भवानी तलवार ' हें काव्य Revolutionary प्रकारचें होतें माझे बधु म्हणाले की, सध्याचे सरकार हे काव्य प्रसिद्ध करू देणार नाही तेव्हा मी तें शक्य तितक्या काळजीपूर्वक जपून ठेवीन व काळाच्या भक्ष्यस्थानीं पडू देणार नाही असे ते म्हणाल्याचे आठवतें

(२) माझे बधु व केशवसुत असे बैठकींत बसलेले असताना बधूची मुलें जवळ आली म्हणजे केशवसुताना आनदाचे भरतें येई माझ्या बधूना मुले जवळ आलेलीं खपत नसत तेव्हा काही तरी निमित्तानें बधू त्याना दूर पाठवीत ती जाऊ लागलीं म्हणजे केशवसुत म्हणत, तरुणाचे रक्त आहे, असू देत जवळ एकदा काहीं कविता बधूच्या मुलानीं खराब केल्या व फाडल्या तेव्हा केशवसुत म्हणाले, 'जाना दो' आपण त्याच्यापेक्षा सरस लिहून काढू

(३) केशवसुत पर्शियन कोट घालीत असत डोक्यास फेटा बाधीत असत त्याची रुमाल बाधण्याची पद्धत इतकी आकर्षक होती कीं, त्याकडे पहात रहावे असें वाटत असे त्याचा पोषाख व राहणी अगदी साधी असे.

त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें म्हणजे एक प्रकारची भीति व दरारा वाटत असे त्याचा चेहरा अगदीं उग्र होता ते कोणाशींही विशेष बोलत नसत त्यांचे जे मित्र असत त्याच्याशीं फक्त ते समरस होऊन बोलत असत ते नेहमी अतर्मुख असत

* * *

# २३ : कविवर्य केशवसुतांचे एक पत्र

श्री धारवाड, ता ९।२।०५

...... यास– सा न वि वि

तुमच्या कविता मागेंच पावल्या त्या बऱ्या आहेत. पण मनोरजनकाराकडे पाठविण्याचा उपयोग होईल असे वाटेना म्हणून मजजवळच आहेत तसें तुम्हास कळवावयाचे, पण माझें म्हणणें तुम्हास कसें काय रुचेल अशी शका आल्यानें लागलेंच लिहिलें नाहीं आणि एकदा मागें पडल्यानें लिहिण्याचें आजवर राहून गेलें त्याची माफी असावी

तुमचा कविता लिहिण्याचा उद्योग फार दिवसाचा असावा असें दिसतें करिता तुम्हास सूचनार्थ काही लिहावे म्हणतो पण माझा तसा अधिकार नसल्यानें मन शकित होतें तरी ज्या अर्थी तुम्ही मजकडे आला त्या अर्थी मला काय वाटतें तें कळवि-विण्याचे माझें कर्तव्य म्हणून लिहितों

नवीनच पद्यलेख लिहिणारास ते आपले लेख फार आवडतात आणि ते प्रसिद्ध व्हावे अशी फार उत्सुकता असते पण ती त्यानें प्रथम दाबणें इष्ट असतें काही तरी आणि कसें तरी लिहिलेलें प्रसिद्ध करण्यात काय अर्थ ? बाकी तुमचा नवीन यत्न ध्यानात घेऊन पाहिले असता तुमचे लेख पुष्कळ चागले आहेत. मी तर प्रथम फारच गचाळ लिहीत असे. तुमच्याइतकें चागलें लिहिण्याचेंहि मला साधत नसे.

चार चौघात जावयाचे तर आपले कपडे स्वच्छ व नीटनेटके असणें जरूर असतें त्याप्रमाणेच पद्यलेखन प्रसिद्धीस आणावयाचे तर जपून शुद्ध लिहिलें पाहिजे त्यात ऱ्हस्वदीर्घांची ओढताण होईल तितकी करून टाळलेली पाहिजे व्याकरणाचे नियम पूर्णपणें पाळलेले पाहिजेत. भाषासंप्रदाय आणि छद शास्त्राचे नियम याची

हेळसाड केलेली असणे उपयोगाचें नाहीं ज्यात वृत्तनियम पाळले आहेत, ज्यात व्याकरणाची चूक नाहीं, शब्दांची रूपें शुद्ध आहेत अशीं पद्यें असतील तर तीं वाचण्यास लोक हाती तरी धरतील मग त्यात शब्दसौष्ठव किती आहे किंवा रसपारिपाक कसा उतरला आहे हा पुढला विचार

तुम्ही पाठविलेल्या पद्यात वरीलपैकी किती गोष्टींकडे लक्ष पुरविले आहे हें तुमचे तुम्हीच पहा

पद्यलेख लिहावयाचे तर रिकाम्या वेळी त्याखेरीज दुसरा काहीं उद्योग आपणास साधण्यासारखा नाही असे असेल तर पुष्कळ अशुद्ध पद्यें लिहिण्यापेक्षा मोजकीच शुद्ध पद्यें लिहिणें उत्तम उगाच नादीं भरून आपले ससारसबधी सद्गुण मात्र गमावून घेणें यात शहाणपणा नाहीं कविता म्हणजे आकाशाची वीज आहे ती धरू पाहणारे शेंकडा ९९ आपणास होरपळून मात्र घेतात मी अशा ९९ वापैकींच आहे, म्हणून म्हणतो भ्रमात असाल तर जागे व्हा तुमच्या अलीकडील पत्रीं चुक्या मी दुरुस्त कराव्या म्हणून तुम्ही लिहिले आहे त्यात चुक्या पुष्कळ आहेत आणि कल्पनाहि म्हणण्या-सारख्या अभिनव नाहीत म्हणून तो उद्योग करण्यास मन घेत नाहीं स्पष्टोक्तीचा राग मानू नका.

हल्लीं महाराष्ट्रात ज्यास गद्याच्या चार ओळीही जपून लिहिता येत नाहींत असे वृत्तदर्पण्ये कवि पैशापासरी झाले आहेत अशात आपली गणना करून घेऊ नका वाणी ही फार मोठी देवता आहे सामान्य देवताच्या आराधनास सुद्धा फार जपावे लागतें मग या देवतेच्या आराधनास किती जपावे लागेल बरें!

तुम्हास जगाच्या अधारात आपल्या बुद्धीचा किरण पाडणे आहे काय? असेल तर तुमचे हृदय उललेलें आहे काय? फाटलें आहे काय म्हणून मी विचारतों कारण तो प्रकाश जेव्हा बुद्धि परावृत्त करून जगावर पाडते तेव्हा अंधारात चाचपडणारास वाट दिसू लागते एरव्ही कागदावर दिव्याचीं चित्रें रगवून " अधारांतून चालला आहा तर एव्हढा आमचा कदील तरी घेऊन जा " असें म्हणून

आग्रहानें ते आपले दिवे म्हणजे दिव्याचीं चित्रें लोकाच्या हातीं देणारे स्वयसेवक ऊर्फ स्वसेवक नाक्यानाक्यावर गर्दी करून उभे आहेत त्यांच्या त्या दिव्याच्या चित्रानीं त्याना काय किंवा कोणाला काय, वाट थोडीच दिसणार आहे ?

तुम्हाला स्वानद पाहिजे आहे काय? स्वानद हें कवीचे उत्तम पारितोषिक होय यात शका नाही पण खाज सुटली असताना खाजविल्यानें जो आनद होत असतो तसला आनद काय कामाचा? सगळे ऐहिक आनंद याच मासल्याचे आहेत. त्याच्या परिणामी हळहळच रहावयाची तर उत्तम पारितोषिक असा टिकाऊ स्वानद कसा मिळवावयाचा याचा विचार तुम्हीच करा तो मिळू लागला म्हणजे मजकडे किंवा कोणाकडेच पद्यलेख पाठविण्याची तुमची आतुरता जिरेल

मला या बाता सागणारा हा खुद्द चुटकेच खरडीत असतो तें कशाकरिता तर ? असा प्रश्न तुमच्या मनात उद्भवणें साहजिक आहे त्या लोकास वाट दाखवू पाहणारा आधळा वाटाड्या किंवा लोकास ब्रह्मज्ञान सागणारा कोरडा पाषाणत्र मला समजा पुढील ठेचा खाणारा मी मागल्या तुम्हास सावधगिरीची सूचना देत आहे तेवढी मनावर घ्या म्हणजे झालें कळावे लोभ असावा हे वि

कृ के दामले

ता क तुम्हाला मोठें होण्याची इच्छा आहे काय ? असेल तर ती चागले होण्याच्या इच्छेच्या लगामीं पाहिजे आणि आपण चागले आहो कीं नाहीं तें आईबापाच्या व घरातील लहान मोठ्या सर्व माणसाच्या मुद्रेंत प्रथम पाहिलें पाहिजे असो कृ के. दा.

* * *

टीप :– हें पत्र मृत्यूच्या आधी सहासात महिने केशवसुतानीं श्री ज वा. हर्षे (आनदीरमण) यांना लिहिलें होतें.

संकलन : श्री गोपाळ रामचंद्र परांजपे

# २४ : केशवसुतविषयक वाङमय सूचि

**केशवसुतांची कविता :–**

१) केशवसुत यांची कविता – संग्राहक, हरि नारायण आपटे १९१७.

२) कृष्णाजी केशव दामले यांचा कवितासंग्रह व चरित्र – संपादक सीताराम केशव दामले

३) केशवसुतांची कविता ( आवृत्ती ४ थी ) :– संपादक परशराम चिंतामण दामले १९३८

४) केशवसुतांची कविता ( आवृत्ती ५ वी ) :– संपादक परशराम चिंतामण दामले १९४९

५) हरपलें श्रेय :– स रा श्री जोग, १९५६

**ग्रंथ व किरकोळ लेख –**

६) केशवसुत आणि त्यांची कविता :– न श रहाळकर १९१९

७) तुतारीचे पडसाद :– श्री वि वर्तक, १९२६

८) केशवसुत (काव्यदर्शन) रा श्री जोग १९४७

९) केशवसुत चरित्र, चर्चा, अभ्यास '– सत – गाडगीळ

१०) केशवसुत चरित्रविषयक टिपणें :– श का गर्गे – ' रत्नाकर ' फेब्रुवारी १९२६

११) केशवसुत चरित्रविषयक टिपणें :– श का गर्गे – रत्नाकर ' नोव्हेंबर–डिसेंबर १९३०

१२) केशवसुत चरित्रविषयक टिपणें :– श का गर्गे – रत्नाकर ' फेब्रुवारी १९३१

१३) केशवसुत–मृत्युलेख –' काव्यरत्नावलि ' डिसेंबर १९०५

१४) केशवसुत–चरित्रलेखन –' काव्यरत्नावलि ' अंक १ ला १९१७

१५) केशवसुत–चरित्रलेखन– सी. के दामले– केशवसुतांची कविता ' आवृत्ति २–३–४.

१६) केशवसुत—चरित्रलेख—श्री ह अत्तरदे—'यशवंत' जानेवारी १९४५

१७) केशवसुत आणि विनायक-श्री गु चिक्केरूर 'यशवंत' एप्रिल १९४५.

१८) मराठी काव्याची उत्क्रांति व केशवसुत .– बा अ. भिडे – काव्य-चर्चा' पृ. २०४–२१९

१९) केशवसुत आणि कवीचा व्यापार – प्रो. रा. प सवनीस – 'काव्य चर्चा पृ. २२० ते २२७

२०) केशवसुत – श्री. साधुदास. 'काव्यचर्चा' पृ. २२८ ते २३१.

२१) केशवसुत व टिळक :– प्रा. वा गो. मायदेव – ' काव्यचर्चा ' पृ २३२ ते २४६.

२२) केशवसुत—ग. त्र्य. माडखोलकर –'आधुनिक कविपंचक' पृ. ५३–८४.

२३) केशवसुत—ग. त्र्य. माडखोलकर – ' काव्यविचार ' पृ. १ ते १४.

२४) केशवसुत—गेल्या साठवर्षांतील मराठी कविता—ग. त्र्य. माडखोलकर ' अर्वाचीन मराठी साहित्य'

२५) केशवसुत—रा. श्री. जोग ' अर्वाचीन मराठी काव्य ' पृ. ४० ते ५७.

२६) केशवसुत– वि सी. सरवटे. – 'मराठी साहित्य समालोचन' पृ. २१३ ते २२३.

२७) केशवसुत—दा. न. शिखरे – ' मराठीचा परिमल ' खंड २ पृ. ५२५ ते ५६१.

२८) केशवसुत—वि. पा दांडेकर– 'मराठी साहित्याची रूपरेषा' उत्तरार्ध पृ. ५५ ते ६५

२९) केशवसुत—अ. ना. देशपांडे आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास भाग १ ला.

३०) केशवसुत-- भ श्री. पंडित–' आधुनिक मराठी कविता ' पृ. १४८

३१) केशवसुत—माधवराव पटवर्धन– ' अर्वाचीन मराठी वाङमयसेवक 'प्रथम खण्ड' पृ ९८ ते १७५.

३२) केशवसुतांच्या काव्यदृष्टीतील उत्क्रांति
३३) नवा शिपाई (रसग्रहण)
३४) आम्ही कोण (रसग्रहण)
}कुसमावती देशपांडे 'पासंग' (टीकात्मक लेखसंग्रह)

३५) केशवसुतांची कविता – प्रिं बं का राजवाडे – 'मनोरंजन' जुलै, सप्टेंबर आक्टोबर–नोव्हेंबर १९२०

मराठ २०८२९ २३/३/४५

क्रमांक

३६) केशवसुत– प्रा. म. वि. राजाध्यक्ष ('पांच कवि' –म राजाध्यक्ष.)
३७) केशवसुत– डॉ. पा. दा. गुणे – मनोरजन ऑक्टोबर १९१७
३८) 'झपूर्झा आणि म्हतारी'–श्री म वर्दे–'मनोरजन' जानेवारी १९२०.
३९) केशवसुताची राष्ट्रीय कविता – ना. म. भिडे – 'मनोरजन' नोव्हेंबर १९२५.
४०) केशवसुताचें अतरग –वि. कृ. आबेकर–' मनोरजन' मार्च १९१८.
४१) केशवसुत याची कविता ना. म. भिडे–' विविधज्ञान विस्तार' अक ६ जून १९१९.
४२) केशवसुताची अभिनव काव्यरचना – रा. कृ. लागू – ' नवयुग ' ऑक्टोबर–नोव्हेंबर १९२१.
४३) केशवसुताचा साप्रदाय– ग. त्र्य. माडखोलकर नवयुग जुलै १९१९.
४४) केशवसुताचा साप्रदाय– ए. या. निफाडकर – 'नवयुग' ऑगस्ट सप्टेंबर १९१९.
४५) तुतारी वाङ्मय व दसरा – वि स खाडेकर– ' नवयुग ऑगस्ट सप्टेंबर १९२९
४६) केशवसुताच्या परंपरेविषयीं कांही त्रोटक विचार–प्रा श्री बा. रानडे – 'महाराष्ट्र साहित्य' ऑगस्ट व ऑक्टोबर १९२३
४७) केशवसुत (काव्य)– रा श्री जोग–प्रदक्षिणा १९४०
४८) केशवसुताची कविता – प्रि वा बा पटवर्धन– ' रत्नाकर ' जानेवारी १९२६
४९) केशवसुताची कविता–वा कृ. ताटके–'मनोरजन' डिसेंबर १९३०
५०) केशवसुताच्या कवितेचा अभ्यास – अ. म जोशी – 'सह्याद्रि' सप्टेंबर १९४०
५१) कवि केशवसुत(एक बाजू)–ह श्री शेणोलीकर–'फ कॉलेज मॅग ' सप्टेंबर १९४०
५२) नव्या युगाचा काव्यप्रणेता – अ ह. जोशी 'फ कॉलेज मॅग. फेब्रु १९४१.
५३) अभिप्राय (केशवसुताची कविता)– श्री न चि केळकर 'केशवसुताची कविता' आवृत्ति ४ थी

५४) केशवसुत—ना के बेहरे – 'केशवसुतांची कविता' आवृत्ति ४ थी

५५) काव्य आणि क्राति – आ रा देशपाडे – ' अभिरुचि ' सप्टेंबर ऑक्टोबर १९४४.

५६) केशवसुताची कविता – आचार्य भागवत – ' सत्यकथा ' फेब्रुवारी १९४८

५७) केशवसुत – लालजी पेंडसे – 'सत्यकथा' फेब्रुवारी १९४८

५८) केशवसुत – प चि दाभले– 'युगवाणी' नोव्हेंबर–डिसेंबर १९४७

५९) तुतारीचे पडसाद – त्र्य सी कारखानीस – 'नवभारत' जानेवारी १९५१

६०) केशवसुत (काही विचार) – प्रा. वा ल कुळकर्णी – ' साहित्य ' ऑक्टोबर १९४९.

६१) कविश्रेष्ठ केशवसुत – मनोहर देशपाडे 'रोहिणी' एप्रिल १९४९.

६२) पुन्हा केशवसुत – वसत कानेटकर – 'साहित्य ' मे १९५०

६३) केशवसुत आणि ताबे–श्री के. क्षीरसागर– 'साहित्य' जुलै १९५०.

६४) केशवसुताचा निसर्गविषयक रहस्यवाद–के. मा आराध्ये–'युगवाणी' जुलै ऑगस्ट १९४८.

६५) केशवसुत आणि सामाजिक क्राति – 'नाथमाधव' – 'वाङमयशोभा' फेब्रुवारी १९५१.

६६) केशवसुताच्या एका कवितेचा इतिहास–श्री. बा. रानडे–'सत्यकथा' ऑक्टोबर १९५३

६७) केशवसुतांचा व्यक्तिवाद आणि वास्तवाधिष्ठित ध्येयवाद – रा श. वाळिंबे–'लोकमान्य' दिवाळी अंक १९५४.

६८) केशवसुताची स्वप्नसृष्टि – श्रीराम अत्तरदे– ' युगवाणी ' ऑगस्ट सप्टे–ऑक्टो १९४७, फेब्रु–एप्रिल–मे १९४८.

६९) युगप्रवर्तक केशवसुत – चि अ. कुळकर्णी–'बलवन्त' २३–११–५५

७०) केशवसुत स्मृतिदिनानिमित्तानें -शिरीप अत्रे–नवयुग १३–११–५५

७१) केशवसुत आणि मराठी काव्याचीं ५० वर्षे–भ. प्र मोहरीर 'यशवत' नोव्हेंबर १९५५

७२) केशवसुताचा पुरोगामी दृष्टिकोन – आ. सी. शेटये–'दैनिक लोकमान्य' १३–११–५५.

७३) केशव सुत–रा. श्री वैद्य – 'दैनिक नवशक्ति' ७–११–५५.

७४) 'केशवसुताची तुतारी' – (टिपणें)– ग. वा. ग्रामोपाध्ये 'छंद' सप्टें –ऑक्टोबर १९५५.

७५) केशवसुत–काव्यचर्चा – जुलै, सप्टेंबर, ऑक्टोबर 'उषा' वर्ष ३ रें.

७६) कविश्रेष्ठ केशवसुत – मनोहर देशपांडे. रोहिणी एप्रिल –१९४९.

७७) बडवाला कवि – द. दा. जवारकर. रोहिणी मार्च १९५५.

* * *

अनुक्रम २०७५ क्रमांक नों: दि: १३/५/५८

REFBK-0008909

८०९